



## जी ए कुलकर्णी यांच्या १९ कथांवरील चर्चा- भाग -६





यात्रिक ( पिंगळावेळ )
रंगरेखा ( पारवा )
रक्तमुखी ( सांजशकुन )
रत्न ( काजळमाया )
राणी ( निळासावळा )
रातराणी ( पारवा )
रात्र झाली गोकुळी ( पारवा )
राषस ( हिरवेरावे )
लई नाही मागणे ( रक्तचंदन )
वंश ( काजळमाया )
वस्त्र ( रक्तचंदन )
वहाणा ( हिरवेरावे )
वासंती ( निळासावळा )
वीज ( पिंगळावेळ )
वेड ( सांजशकुन )
व्यथा ( पारवा )
शलॉट ( पारवा )
शिक्षा ( हिरवेरावे )
शेवटचे हिरवे पान ( काजळमाया)


# जीए कथास्वाद
# भाग ६

# जीए कथास्वाद ६

## जी ए कुलकर्णी यांच्या कथांवरील चर्चांचे संकलन


### संकलन व संपादन- सुनीळ सामंत



### ई प्रकाशक- ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

9987737237



या पुस्तकातील सर्व लेखनाचे व चित्रांचे अधिकार त्या त्या लेखकांकडे व चित्रकारांकडे आहेत. पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी त्यांची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

# जी ए कथास्वाद ६

यात्रिक ( पिंगळावेळ )

रंगरेखा ( पारवा )

रक्तमुखी ( सांजशकुन )

रत्न ( काजळमाया )

राणी ( निळासावळा )

रातराणी ( पारवा )

रात्र झाली गोकुळी ( पारवा )

राषस ( हिरवेरावे )

लई नाही मागणे ( रक्तचंदन )

वंश ( काजळमाया )

वस्त्र ( रक्तचंदन )

वहाणा ( हिरवेरावे )

वासंती ( निळासावळा )

वीज ( पिंगळावेळ )

वेड ( सांजशकुन )

व्यथा ( पारवा )

शलॉट ( पारवा )

शिक्षा ( हिरवेरावे )

शेवटचे हिरवे पान ( काजळमाया)

# प्रास्ताविक

मराठीतील सर्वोच्च कथालेखकांमध्ये ज्यांचे नांव अग्रक्रमाने घ्यावे अशा श्री जी ए कुलकर्णी यांच्या शताब्दीचे वर्ष २०२२-२०२३. या वर्षाचे सार्थक व्हावे या हेतूने जीएंच्या कथांचे प्रेमी एकत्र येऊन त्यांनी एकावेळी फक्त एक कथा घेऊन त्यावर जमेल तितकी सखोल चर्चा करून, त्या कथेतून काय मिळाले ते सांगण्याचा प्रयत्न केला. जीए यांची कथा लोलकासारखी प्रत्येकाला वेगळा प्रकाश, वेगळा रंग दाखवते. हिऱ्यासारखे जीएंच्या कथेला अनेक पैलू असतात आणि वेगवेगळ्या वाचकांना त्यातले वेगवेगळे पैलू दिसतात.

चौघांनी आपल्याकडचा एक एक रुपया दिला आणि त्यातून एक एक रुपया घेतला, तर पर्त्येकाकडे एकच रुपया रहातो. पण प्रत्येकाने एक एक विचार दिला तर चौघांकडे चार चार विचार जमा होतात. विचारांच्या या शिस्तबद्ध पण मुक्त देवाणघेवाणी मुळे ही चर्चा अत्यंत आनंदमय झाली. होते आहे. या चर्चेत इतरांनाही आनंद घेता यावा यासाठी हा संकलित पुस्तकप्रपंच.

- संकलक- सुनीळ सामंत (9869674820)

# चर्चेतील सहभागी व्यक्ती

आशा भागवत
अतुल ठाकूर
अभयकुमार कुलकर्णी
अलका तडकलकर
अशोक पाटील
उमेश तुपे
कस्तुरी महेश
जयश्री जंगले
माधव पुराणिक
दिलिप बडे
नागेश कुलकर्णी
नितीन वैद्य
निशा क्षिरे
परमजीत सिंग
प्रदिप कुलकर्णी
प्रमोद कुलकर्णी
प्राची बापट
मंजिरी देशमुख
मनमोहन आंबेकर
महेश आफळे
मिलिंद सकपाळ
मिहीर ठकार
यतीन गुळवणी
राजेश उनवणे
राम कुलकर्णी
लक्ष्मीकांत देशपांडे
लखन दगडे
वंदना बोकील
वर्षा हळबे
विलास वाघोलीकर
विशाखा आपटे
विशाखादत्त
विश्वेश्वर नांदेडकर
वैभव कुलकर्णी
शिवाजी कुऱ्हाडे
श्रीकांत देशमुख
संजीव कुलकर्णी
साधना डोंगरे
सुनीळ सामंत
सुमन महामुनी
स्नेहल बोकील
हेमंत खडके
पुरुषोत्तम मोने
मेघा महाजन

# यात्रिक जी ए कुलकर्णी पिंगळावेळ

सुनीळ सामंत:

अर्थ शून्य भासे मज हा कलह जीवनाचा

धर्म न्याय नीती सारा खेळ कल्पनेचा॥

ही भावना अतिशय ठाम प्रश्नांतून उभी करणारी ही कथा, 'डॉन क्विक्झोट' या १६०५ सालच्या स्पॅनिश कादंबरीवर आधारलेली आहे. (मूळ कादंबरी मी वाचलेली नाही. ती वाचलेल्या कोणी जर या कथेबद्दल विस्ताराने लिहिले तर ते वाचायला आवडेल)

या कथेत दोन पात्रे आहेत. एक आहे कल्पक प्रवृत्तीचा डॉन; ज्याने फार मोठी स्वप्ने पाहिली व ती स्वप्ने साकार करण्यासाठी संपूर्ण आयुष्य उधळून दिले. फार मोठ्या कल्पना, फार भव्य आयुष्य जगण्याचा प्रयत्न केला. त्याच्यासोबत होता सॅन्को. सॅन्को हा एक प्रॅक्टिकल माणूस, तरीही शेवटपर्यंत त्याने डॉन ची सोबत सोडली नाही. डॉन आणि सॅन्को यांच्यातील स्वप्न व वास्तव यावरचे संवाद मुळातूनच वाचण्यासारखे आहेत. खरेतर जीएंच्या वाचकांना डॉनपणाचा अनुभव आला असण्याची व त्यांच्या अवतीभावती सॅन्कोंच्या गर्दीचाही अनुभव आला असण्याची शक्यता आहे असे मला वाटते. सर्वसामान्य लोक ज्या प्रकारच्या आयुष्याला आनंदाने स्विकारतात ते आयुष्य नाकारणारे सर्वच डॉन असतात.

शेवटी पराभूत होऊन डॉन आपल्या गावी माघारी येतो इथून कथा सुरू होते. ही कथा वाचताना काही ठिकाणी नित्शेच्या-''दस स्पोक धरतृष्ट्र' ची आठवण होते.

गावाच्या शिवेवर डॉनला एक साधू , (बहुदा बुद्ध) भेटतो. या साधूला अंतिम ज्ञान प्राप्त झालेले असते.  या उपदेशकाशी बोलताना डॉन त्याला अतिशय मूलभूत असे धर्मासंबंधी प्रश्न विचारतो.

उपदेशक जेव्हा सांगतो की मला अंतिम ज्ञान झालेले आहे तेव्हा डॉन त्याला हे ज्ञान अंतिम कशावरून असे प्रश्न विचारतो. आयुष्याचा एक क्षण बाकी असतानाही अंतिम हा शब्द वापरणे योग्य नाही.

त्यावर उपदेशक आपल्या पाठीशी असलेल्या हजारो अनुयायांची व राजांची, सम्राटांची माहिती देतो. तेव्हा डॉन विचारतो "तुमचा धर्म सत्ता व सैनिकांच्या रांगा यामुळे पसरला, तुम्हाला अन्यायी मिळाले, इतक्या लोकांनी धर्म स्वीकारला तर तो खरा नाहीतर खोटा हे कसलं तर्कशास्त्र आहे? एकेकाळी नरबळीला अनुयायी होते कि.  अनेक धर्म आले ते बदलले आणि हत्तीच्या प्रताप्रमाणे अजस्त्र निर्जीव पडून राहिले. अनुयायी मिळणे हा इतिहासातील केवळ एक योगायोग आहे. आज जो विचार लोक स्विकारत नाहीत तो हजार वर्षानंतर स्विकारला जातो. ठिणगी दगडावर पडली तर विझून जाते. तीच ठिणगी गवतावर पडली तर वणवा भडकतो. ठिणगी तीच.  तसेच विचार हजार वर्षे आधी मांडले तर अनुयायी मिळत नाहीत पण हजार वर्षानंतर मात्र त्यामागे हजारो अनुयायी येतात.

धर्म या संकल्पनेबद्दल जीएंनी या भागात अनेक बिनतोड प्रश्न उभारले आहेत.

त्यानंतर डॉनला जुडास भेटतो. त्याच्या मते त्याने केलेल्या सर्वोच्च पापापासून त्याला मुक्ती हवी असते. ते पाप हे सर्वोच्च का यावर डॉनने विचारलेले प्रश्नही नेमके आहेत. जुडास आपल्या प्रतारणेसाठी अनेक कारणे देतो तेव्हा डॉन म्हणतो ज्यावेळी कुणी एकाच कृत्याबद्दल अनेक आणि विसंगत कारणं सांगू लागतो त्यावेळी तो जास्तीत जास्त सत्य सांगण्याचा प्रयत्न करत नसतो तर काहीतरी लपवण्याची त्याची धडपड असते. डॉन त्याला समजावतो की तू केलेले पाप हे

लहान पाप आहे. त्यापेक्षा तू येशूच्या नावाने आयुष्यभर खोट्या कथा सांगत फिरला असतास तर ते मोठे पाप झाले असते.

अखेरच्या क्षणी डॉन आपल्या घरी पोचतो आणि गहू आणि जळाऊ लाकडाचे दुकान काढण्याचे बोलू लागतो. तेव्हा मात्र सॅन्को समजतो की डॉन आता मृत्युपंथाला लागलेला आहे. (यातून जीएंना हे सुचवायचे आहे काकी- अंतिम ज्ञान म्हणजे प्रॅक्टिकल जगणेच होय?)

यावेळी न्हाव्याचेही तत्त्वज्ञान वाचण्यासारखे आहे. अतिशय प्रॅक्टिकल विचार तो मांडतो. कालची सोन्याची पुतळी आज देखील त्याच खणखणीत नगद आवाजात बोलत राहते पण कालची सौंदर्याची पुतळी आज गाडीच्या चाकाखाली सापडलेल्या डब्यासारखी होते. सगळीच मांजरं अंधारात काळीच असतात.

जीएंची ही कथा म्हणजे केवळ माणसांतच (विरळपणे) आढळणारी पशूत्व नाकारण्याची ऊर्मी आणि सामान्य जीवन जगणारे बहुसंख्य यांच्या विचारांतले द्वंद्व आहे. ही कथा वाच्ताना जीएंनी उभे केलेले मूलभुत प्रश्न आयुष्यभर विचार करायला भाग पाडतात

दिलिप बडे:

परतीचा प्रवास. आत्मदाह, आत्मवंचना, जीवनाच्या रिक्तपणाचे काठोकाठ स्मरण ठेवणारा, मार्गातील सारे दिपस्तंभ विझलेला, भूक-झोप-मैथून या आदिम प्रेरणा हाच शरिराचा मुलाधार आहे का? हा प्रश्न आपल्या सर्वांच्या समोर ठेवणारा. अंतिम प्रवास.

संजीव सावरगांवकर:

या कथेचे शीर्षक फार विचारपूर्वक जीएंनी योजलेले दिसते. यात्रिक म्हणजे भ्रमंती करणारा, एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाणारा, सहेतुक अथवा निर्हेतुक, त्याच्या भ्रमंतीमध्ये अनुभव ,श्रम, परिश्रम, ज्ञानलालसा असे व शेवटी यात्रा पूर्ण झाल्यावर ती कथा कोणाला तरी त्या सांगण्याची इच्छा असायचीच. अशी यात्रा कधी एकट्याने तर कधी सहाय्यका बरोबर असते. जी. ए. यांचे लेखन वैशिष्ट्य या कथेत ही जाणवते.

थोडी वेगळी माहिती: त्यांच्या यात्रिक नावाच्या दोन कथा आहेत. पहिली होती ती कथा १९६० साली प्रसिद्ध झालेल्या "आकाश फुले" या कथासंग्रहात आहे. त्या कथेत एका यात्रेकरू ची कथा आहे. येशूचा जन्म ते येशूचा मृत्यू, हा 33 वर्षांचा कालावधी घेऊन कथेची मांडणी केली आहे. १९६० सालातील त्यांची लेखन शैली साधी होती. सरळसोट गोष्ट सांगितली आहे.

विलास वाघोलीकर:

माननीय सुनीळजींनी या कथेचे प्रास्ताविक हे थोडक्यात, मुद्देसूद पणे केले आहे. कथा मोठ्या विस्ताराची, वाचकाला एकाग्र करायला लावणारी आहे. कथेत घटना चिमूटभर, तत्वचर्चा हातभर आहे. इंग्लीश ‘डॉन क्विझोट’ कथेचा पुढचा भाग जीएंनी दाखवला आहे. त्यामुळे या कथेच्या नवनिर्मितीबद्दल शंका येऊ शकते. apocryphal म्हणता येईल.या कथे बद्दल जीएंनी एका पत्रात लिहिले होते." वेगळा प्रकाश टाकून त्यामध्ये डॉन व सँको कसे दिसतात हे पाहण्याचा प्रयत्न कथेत केला होता." याप्रमाणे बाहेरच्या जगात अयशस्वी होउन डॉन परत आल्यावर, तो गावात जाण्याआधी काय होते हे या कथेत दाखवले आहे.

कल्पीत ,रूपकेही सत्य मानले पाहीजे, असे येथे डॉन सांगतो . जीएंनी प्रवासी कथेत ही लिहिले आहे -" - समिधेचा अग्नीशी जेवढा संबंध, तेवढा सत्याचा ( कवितेचा) प्रत्यक्षाशी संबंध असतो . माझ्या दृष्टीने जे जे शक्य कल्पित असते, ते ते . सत्यच असते" हा विचार येथे डॉन सांगतो . .. .ज्याला रूपक सुचत नाही तो माणूस नव्हे .

- येथे नंतर सँको, व्यवहारवादी दृष्टीकोन मांडतो .आपले पोट भरले आहे ही निःसंशय जाणीव सत्य आहे . हाच विचार, 'प्रॉपर बेसिक बिलि फ' मध्ये असतो . भाकरी मध्यवर्ती ठेवून त्याभोवती तत्वज्ञानाने फिरले पाहीजे . असा विचार केला तर तुझ्यात व प्राण्यात फरक काय ? त्यावर उत्तर असे की माझ्यात व प्राण्यांत तत्वज्ञानाच्या दृष्टीने फरक का असावा?

- जे प्रत्यक्ष असते, ते सिद्ध असते .व म्हणून ज्ञान असते . पण माणसाचे जीवन अशा फक्त सिद्ध ज्ञानावरच चालत नाही . त्याला श्रध्देचा आधार घ्यावा लागतो .येथे धर्मविचार येतो.

- खूप अनुयायी मिळाले की तुमची श्रद्धा योग्य, असे ( धर्मात ) म्हटले . तर सिकंदरभोवती सुरुवातीला मूठभरच सैनिक होते . तुमचा अनुभव खरा कशावरून ? ते खुळे सोने असू शकते . शिवाय यापुढे असा दुसरा मनःशांतीचा अनुभव येणार नाही, हे कशावरून ?

दिलिप बडे:

वासुदेव सावंत यांची दोन्ही पानं वाचली. जी.एं.च्या कथे मध्ये प्रतिमांची भाषा फार वापरली आहे.असा एक दोष त्यात सांगितला आहे.  वाचला.

सुनीळ सामंत: मा. संजीवजी यांचे उत्कृष्ट व विस्तृत (माहितीपूर्ण) विवेचन वाचणे हे नेहमीच आनंददायी असते. याही कथेचे विवेचन त्यांनी आपल्या खास शैलीदार पद्धतीने केले आहे. त्यांनी मांडलेले, 'ज्या व्यक्ती कथेमध्ये आणावयाच्या असतात त्या व्यक्तीत ते समष्टी पाहतात', हे धों. वि. देशपांडे यांचे मत मला अत्यंत विचारार्ह वाटले.

या कथेमधील सहा प्रमुख पात्रे ही सहा मानवी प्रवृत्तींची प्रातिनिधिक पात्रे आहेत हेही त्यांचे विवेचन वाचून माझ्या ध्यानात आले. त्यातला डॉन हा मला आपल्यासारख्या वेड्या लोकांचा प्रतिनिधी वाटला हे मी आधी लिहिले आहेच. पण इतरही सहाजण कमी अधिक प्रमाणात आपल्यात असतात. त्या दृष्टीने वाचायला घेतले तर हीच नव्हे जीएंच्या सर्वच कथा या वेगळ्या प्रकारे डोळे उघडणाऱ्या असतात.

संजीवजींची व्यक्तिगत ओळख नाही. पण हे विवेचन वाचून ते स्वतःही वरच्या दर्जाचे लेखक कवी असावेत असे वाटले.

विलासजींनी सुरेख पद्धतीने कथानकातले बारकावे दाखवले आहेत. त्यातला 'बदली बळी' हा शब्द कथेत उठावशीरपणे दिसला नाही. पण सर्वच कलावंतांच्या बाबतीत ते खरे आहे. भले सर्वजण बळी या शब्दात सामावणारे नसतील. पण संपूर्ण समाजातील निद्रिस्त भावनांचे ते प्रतिनिधित्व करतात हे खरेच.

डॉन क्विक्झोट ही स्पॅनिश कथा आहे. स्पेनमधील लोक हे त्यांच्या नृशंसपणासाठी त्याकाळी प्रसिद्ध होते. द. अमेरिका व इतरही जिथे जिथे ते गेले तिथे त्यांनी लाखोंची कत्तल केली व जंगलं नष्ट करून शेती करावी तसे स्थानिकांना संपवून राज्य केले. अशा वेळी डॉन क्विक्झोट हे पात्र त्यातील मानवतेचा कैवारी असल्यामुळे वाचकांना आपलेसे वाटले असेल कदाचित. बदली ब:ळी.

विलास वाघोलीकर:

https://www.openculture.com/2018/10/read-don-quixote-animated-video-makes-case.html डॉन क्विझोट या कादंबरीचे महत्व सांगणारा व्ही डी ओ या लेखात आहे

सुनीळ सामंत:

धन्यवाद सर. मला वाटते वेगवेगळ्या काळात असे अनेक डॉन क्विझोट जन्माला येतच असतात. यांना आपल्या भाषेत मृगजळाच्या मागे धावणारे मृग (जीएंच्या एका कथेत तो आहेही) म्हटले जाते. हल्लीच्या काळात मोबाईल गेम्ससाठी जीवाची बाजी लावणारे वेडे आपण ऐकले वा पाहिले आहेतच.

पण अधिक खोलात विचार केला तर आपण सगळेच जण जेव्हा जेव्हा व्यावहारिकतेचा त्याग करून काही स्वप्नील काम करतो तेव्हा इतरांच्या दृष्टीने क्विक्झोटच असतो.

जे आयुष्यात कधीही काही अव्यावहारिक करत नाहीत ते जन्माला येतात किंवा नाही याला काही अर्थ असतो असे वाटत नाही.

जयश्री जंगले :

सुनीळजी, सुंदर विवेचन. जयश्री जंगले : मला वाटतं, आपण Different drummer इथेही विसरू नये.

त्यावेळच्या प्रचलित शौर्यकथांपेक्षा वेगळा नायक म्हणून डा ॅन किओते (उच्चारअसा होतो.) ची निर्मिती केली. सांचो पाझा आणि तो एकमेकांना पूरक आहेत. ते सामान्यच आहेत. असामान्य वाटणारे अनेकदा असेच असतात. आणि ते सामान्यांचे असामान्यत्वही अधोरेखित करतात.

सुनीळ सामंत :

सॅन्को हा एक प्रॅक्टिकल माणूस, तरीही शेवटपर्यंत त्याने डॉनची सोबत सोडली नाही. डॉन आणि सॅन्को यांच्यातील स्वप्न व वास्तव यावरचे संवाद मुळातूनच वाचण्यासारखे आहेत. खरेतर जीएंच्या वाचकांना डॉनपणाचा अनुभव आला असण्याची व त्यांच्या अवतीभावती सॅन्कोंच्या गर्दीचाही अनुभव आला असण्याची शक्यता आहे असे मला वाटते. सर्वसामान्य लोक ज्या प्रकारचे आयुष्य आनंदाने स्विकारतात ते आयुष्य नाकारणारे सर्वच डॉन असतात.

शेवटी पराभूत होऊन डॉन आपल्या गावी माघारी येतो इथून कथा सुरू होते. ही कथा वाचताना काही ठिकाणी नित्शेच्या-"धस स्पोक धरतृष्ट्र झरतुष्ट्र' ची आठवण होते. गावाच्या शिवेवर डॉनला एक साधू , (बहुदा बुद्ध) भेटतो. या साधूला अंतिम ज्ञान प्राप्त झालेले असते. या उपदेशकाशी बोलताना डॉन त्याला अतिशय मूलभूत असे धर्मासंबंधी प्रश्न विचारतो. उपदेशक जेव्हा सांगतो की मला अंतिम ज्ञान झालेले आहे तेव्हा डॉन त्याला हे ज्ञान अंतिम कशावरून असे प्रश्न विचारतो. आयुष्याचा एक क्षण बाकी असतानाही अंतिम हा शब्द वापरणे योग्य नाही.

त्यावर उपदेशक आपल्या पाठीशी असलेल्या हजारो अनुयायांची व राजांची, सम्राटांची माहिती देतो. तेव्हा डॉन विचारतो "तुमचा धर्म सत्ता व सैनिकांच्या रांगा यामुळे पसरला, तुम्हाला अन्यायी अनुयायी मिळाले, इतक्या लोकांनी धर्म स्वीकारला तर तो खरा नाहीतर खोटा हे कसलं तर्कशास्त्र आहे? एकेकाळी नरबळीला??? अनुयायी होते कि. अनेक धर्म आले ते बदलले आणि अजस्त्र हत्तीच्या प्रेताप्रमाणे निर्जीव पडून राहिले. अनुयायी मिळणे हा इतिहासातील केवळ एक योगायोग आहे. आज जो विचार लोक स्विकारत नाहीत तो हजार वर्षानंतर स्विकारला जातो. ठिणगी दगडावर पडली तर विझून जाते. तीच ठिणगी गवतावर

पडली तर वणवा भडकतो. ठिणगी तीच. तसेच विचार हजार वर्षे आधी मांडले तर अनुयायी मिळत नाहीत पण हजार वर्षानंतर मात्र त्यामागे हजारो अनुयायी येतात.

धर्म या संकल्पनेबद्दल जीएंनी या भागात अनेक बिनतोड प्रश्न उभारले आहेत. त्यानंतर डॉनला जुडास भेटतो. त्याच्या मते त्याने केलेल्या सर्वोच्च पापापासून त्याला मुक्ती हवी असते. ते पाप हे सर्वोच्च का यावर डॉनने विचारलेले प्रश्नही नेमके आहेत. जुडास आपल्या प्रतारणेसाठी अनेक कारणे देतो तेव्हा डॉन म्हणतो ज्यावेळी कुणी एकाच कृत्याबद्दल अनेक आणि विसंगत कारणं सांगू लागतो त्यावेळी तो जास्तीत जास्त सत्य सांगण्याचा प्रयत्न करत नसतो तर काहीतरी लपवण्याची त्याची धडपड असते. डॉन त्याला समजावतो की तू केलेले पाप हे लहान पाप आहे. त्यापेक्षा तू येशूच्या नावाने आयुष्यभर खोट्या कथा सांगत फिरला असतास तर ते मोठे पाप झाले असते.

अखेरच्या क्षणी डॉन आपल्या घरी पोचतो आणि गहू आणि जळाऊ लाकडाचे दुकान काढण्याबाबत बोलू लागतो. तेव्हा मात्र सॅन्को समजतो की डॉन आता मृत्युपंथाला लागलेला आहे. (यातून जीएंना हे सुचवायचे आहे का की- अंतिम ज्ञान म्हणजे प्रॅक्टिकल जगणेच होय?)

यावेळी न्हाव्याचेही तत्त्वज्ञान वाचण्यासारखे आहे. अतिशय प्रॅक्टिकल विचार तो मांडतो. कालची सोन्याची पुतळी आज देखील त्याच खणखणीत नगद आवाजात बोलत राहते पण कालची सौंदर्याची पुतळी आज गाडीच्या चाकाखाली सापडलेल्या डब्यासारखी होते. सगळीच मांजरं अंधारात काळीच असतात.

जीएंची ही कथा म्हणजे केवळ माणसांतच (विरळपणे) आढळणारी पशूत्व नाकारण्याची ऊर्मी आणि सामान्य जीवन जगणारे बहुसंख्य यांच्या विचारांतले द्वंद्व आहे. ही कथा वाचताना जीएंनी उभे केलेले मूलभुत प्रश्न आयुष्यभर विचार करायला भाग पाडतात..

॥ श्री ॥

(9)

DATE १२।१०।२२

यात्रिक

धो.वि. देशपांडे म्हणतात त्याप्रमाणे जी.ए.ना त्यांच्या कथांकरीता ज्या व्यक्ती कथेमध्ये आणाव्याच्या असतात त्या व्यक्तीत समष्टी पाहतात. त्यामुळे त्यांच्या पात्रांची व्यक्तीगत दुःखे अखिल मानव समाजाची दुःखे होऊन बसतात. व्यक्तीच्या प्रश्नांना मानवाच्या प्रश्नांची गूढगंभीर उदात्तता प्राप्त होते. तिचे जय पराजय मानवाचे जयपराजय ठरतात. जी.ए. बिंदूत सिंधुचे दर्शन घडवितात.

या कथेत ते असंभवाला संभावाचे रूप देऊन वाचकाला अद्भुताच्या प्रदेशात घेऊन जात आहेत. शब्दकळा त्यांच्या लेखणीच्या टोकावर कसलेल्या नटरंगी नर्तकी सारखी नाचते आहे. कथेत प्रतिमा व प्रतिके हात जोडून उभी राहतात. कथा वाचताना दमछाक होते, वाचनाचा आनंद मिळतो पण कथासार कळतेच असे नाही आणि वाचक परत कथेच्या सुरवातीपाशी येऊन थांबतो. सारे कसे चमत्कार राघुसवणाऱ्या गाडीचा प्रवास जत्रेतील गाडी असतो.

कथेची जात कुळी 'ॲपोक्रीफल स्टोरीची' आहे. अपोक्रीफल म्हणजे 'खोटा कल्पित, शाबीत न झालेला' मूळ शब्द 'ॲपोक्रीफा' असा आहे.

डॉन क्विक्झोट व सँको पाझा ही कथा मनोरंजना मधील एक अमर जोडी. टवाळी उडविण्यासाठी ही जोडी कथांमध्ये असायची ती तत्कालिन राजकीय, धार्मिक, सामाजीक प्रमुखांची व्यासातीक टवाळी करणे हा कथेचा अर्क अर्थ असायचा. अशा जोड्या कालांतराने तयार झाल्या जसे इंग्रजी साहित्यात सॅम्युअल पिकवीक व व्हॅलेट सॅम वेलर, पी.जी वुडहाउस यांचे बर्टी वुस्टर व जीव्हज तर आपल्या मराठी साहित्यात चिमणराव व गुंड्याभाऊ.

(2)

PAGE No. 9
DATE

प्रत्येक माणसातील गुणादुगुण पाहिले तर काही ठळक गोष्टी नजरेत येतात हे व त्यातील महत्वाचे दोन घटक काढले तर h एक मुरव. दुसरा धुर्त, पहिला भाबडा दुसरा कपटी. एक स्वप्नाळू दुसरा व्यवहारी. त्यावेळेस मूळ लेखकाने, सर्वांटीझने डॉन म्हणजे मुरव, भाबडा, स्वप्नाळू, असे पात्र तयार केले तर सँको ला धुर्त, कपटी, व्यवहारी बनविले. प्रत्येक माणसाच्या आत हे डॉन व सँको असतात नाण्याच्या २ बाजू असल्यासारखे. प्रमाण कमीजास्त होते कधी कधी. ही पात्रे कथेत कशी आली व त्यामागचा त्यांचा साहित्य इतिहास काय म्हणुन वरील लेखन प्रपंच. ज्यांना डॉन. सँको साहित्यातील जोडी माहिती आहे त्यांनी आणखीन माहिती सांगितली तर उत्तमच.

कुळकर्णी. श्रीधर प्रमाणात माणसाची मानसिकता विभागली जाते ती या प्रकारे

आपण अश्वत्थामा व राजपुत्र यांची 'भेट' कथा हि मागे अभ्यासली आहे. त्या कथेत जसा कल्पनाविलास जी.एं.नी केला आहे तसाच कल्पना विलास डॉन-सँको व येशु, जुडास, यती यांना मध्यवर्ती धरुन कथा रचना केलेली आहे. ज्या काळात डॉन, सँको, न्हावी, यती, येशु, जुडास आपापले आयुष्य वैशिष्ट्य रंगतात पण वाचुन तेवढ्यापुरते समजते पण नंतर उमगत नाही.

एकेक पात्राची माहिती थोड्या शब्दात घ्यायची कल्पना मनामध्ये धरुन लिहतो आहे.

डॉन: आयुष्यभर भूमिती केली ती वेडी स्वप्ने मनात धरुन कि ती केव्हातरी सत्यात येतील. त्यामुळे त्याला ना राज्य मिळाले, ना राजकन्या, ना मानमरातब, ना समाज प्रतिष्ठा. त्याचे वैशिष्ट्य म्हणजे मुर्ख म्हणुन जगला मूर्ख म्हणुन राहीला पण मध्या मध्या जाणकार ज्ञानी माणसांना वैचारिक प्रश्न विचारत त्याचे खरे मुखवटे न पाहता डॉन कायम ठट्टेचा हसत राहीला. तो स्वत: बाबत अगदी निरीच्छपणे सांगतो मी कधी बुध्दीचा

गर्व धरला नाही. कारण मला बुद्धीच नाही. तर्कांचा
ताठरपणा नाही, अहंपणा नाही. मी अगदी पूर्ण
असाध्य वेडा आहे. पण इतर माणसे कोणत्या
बाबतीत शहाणी आहेत हे मात्र मला कधी
उमगले नाही. तरीही मी असे म्हणेन कि
माझ्यामध्ये माझे १००% सत्व आहे. होते.

डॉनला स्वप्नात, मांसमय विश्वात भेटलेले यती,
वेडा, जुडास व प्रत्यक्षात भेटलेले न्हावी यांचेशी जेव्हा
त्याचे बोलणे होते तेव्हा त्याचे प्रश्न खरोखरीच
गहन वाटतात, त्यांना उत्तरे शोधतांना यतींची
काय जुडासची काय शाब्दिक, मानसिक तारांबळ
च उडते, ते त्या प्रश्न फेकणाऱ्यांचे पुढे अन
उत्तरीत होतात व उद्विग्नपणे डॉनचा उद्धार
करत चालू लागतात. (डॉनचे ते स्वप्नच
असल्याने त्याला याबाबत समाधान, अंतिम
उत्तर मिळाले का नाही हे हो जी.ए. नी कथेत
अनुत्तरीत ठेवले आहे हे मात्र निश्चित).
असा हा डॉन आता मृत्युपंथाला टेकला आहे
व सँको त्याला शेवटपर्यंत सांभाळतो आहे ही
सत्यपरिस्थिती डॉनला ही कळली आहे.

सँको : डॉनला सुनावणारा सँको, जमिनीवर
राहणारा सँको. पोटाची (स्वतःच्या) व गाढवाच्या
पोटाची सुद्धा काळजी घेणारा व्यवहारी सँको, संसारी
सँको, सर्व अर्थात सँको कितीतरी रूपे आहेत त्याची
उक्ति डॉनला सुनावतो ते वाक्यच बघा ना.
"तुमच्या प्रेम काय होते माहित आहे? तुम्ही खुद्द
तोंडाने काल्पनिक भाकरी खायची धडपड केलीत.
मालक, पण मी स्वतः तुमच्यापेक्षा जास्त मूर्ख कारण
(वेड लागलेले डोकं (बुद्धीचे?) माझ्या खांद्यावर
असतांनाही तुमच्या खुळचट (स्वप्नांच्या) शब्दांवर
भाळून मी माझे हसे करून घेतले. सँकोचे
आणखीन एक म्हणणे "तुम्ही खुळचट स्वप्नांना सत्य
मानले म्हणून लोक तुम्हाला पहायला जमतील अन
तुमच्यामागे मी, म्हणून मी देखील तुमच्याच इतका
(कु)प्रसिद्ध होऊन (अमर) होऊन बसलोय."

स्फुर्ती ही नेहमी गाजरअसते, ती कधीही ... ९

(४)

सँकी तसा व्यवहारीक डॉन. डॉनच्या स्वप्नांच्या ... अधिपत्याखाली येऊन मगदी तरुण अणुव्यात सँकोला डॉनला भेटलेला वेळी, भेटला, दिसला, लोकलासुध्दा. पण सँको काही काळापुरता वेड्याच्या स्वप्नात वाहत गेला. जिप्सीच्या कारभात राहीलू. काळ्याभोर डोळ्यांची व काळ्या केसांची एल्सा. एक जिप्सी मुलगी तिच्यावर एकतर्फी प्रेम केले. कुरवात कष्ट काढले अन एका सवी अनपेक्षित पणे एल्साने त्याचा कसा वापर केला हे तो एका तिफाइताला सांगत असल्याचे ऐकुन प्रेमाचा प्रेम फोपचा फुटून आणून तो व्यावहारीक जगातील प्रवेश करता झाला. वायको यथातथाची पण लग्न केले. मिळाली ससरा श्रीमंत होता. सँकोचे तत्वज्ञान साधे "अर्धच जमिनीवरच उभे मसाले की पडणे आदळणाची शक्यता फार कमी होते" हे सांगणारा व तसे वागणारा.

डॉनने सँको आपल्याबरोबर आयुष्यभर राहील्या बद्दल सँकोचे आभार मानले. त्या वेळेस सँकोने त्याला सांगितले कि त्यात सँकोचा काडीचाहि मोठेपणा नाही. त्याचा तो स्वप्न जगू शकला असता. पण डॉनला तो म्हणाला मालक मी कोणी परका नसून तुमचाच, मागे राहीलेला भाग होतो (आहे) तुमच्याशिवाय मी जाणार कुठे? आणि डॉनचे वेगळेपण सँकोने स्वच्छ शब्दात सांगितले.

तर असा हा सँको, डॉनच्या नाण्याची दुसरी बाजू असणारा. त्याचे तत्वज्ञान व्यावहारीक. आपले पोट भरले आहे का हा रोखठोक जाणीव ठेवणारा. ते जर रिकामे असेल तर जगातील सगळी खुबचट पुस्तके त्या पोटात घातली तरी पोट भरल्याचा समज करता येत नाही ही खरी जाणीव ठेवणारा. हातात असलेले गाजर हे त्याच्या स्वतः करीता व गाढवाकरता उपलब्ध असणे हे त्याला जगातील सगळ्या तत्वज्ञानापेक्षा जास्त प्रिय आहे.

धरी बसुन करण्याचा आहे.

नाही! त्याचा छंदच मुळी कसलीही यातायात न करता गावकऱ्यांच्या / समाजाच्या डोक्यावर मीठ वाटत राहणारे आणि कापणीच्या वेळी माणसे त्याच्या दारात येतात. "मग ती माणसे शहाणी असोत का वेडी. डॉन असोत का सँको असोत.

जगातील सर्व नाटकांचे सार्वकालीन सत्य म्हणजे कुणी फेंत असो अगर नसो, न्हाव्याने आपले बोलणे कधीच थांबवायचे नसते. ती तितकीच एक प्राचीन व पवित्र प्रथा अव्याहतपणे तो चालवत होता. व सल्ला विचारला नसताही तो सल्ला देत होता (हा एक खास वेगळा डौलच) नगद नारायण कीर्तन जय व वेगळे सौंदर्य हे जरी दिसत असले तरी त्याचे एकच तत्त्वज्ञान "सगळीच मांजरे अंधारात काळीच असतात". तसेच "लग्न करतांना ते सासऱ्याच्या खिशाशी करावे, कारण खिसा सत्य असतो. तो रूप बदलत नाही."

ह्या तीन मनोवृत्ती म्हणजे माणूस. मग त्यात डॉन पण असेल तर तो नेत्याच्या कोंदणात बसतो तर सैको न्हावी हे सगळे अनुयायी, जनता, समाज. (एका मोठ्या ध्येयासाठी.) त्यांना त्यांची मते, आकांक्षा, अपेक्षा असल्या तरी डॉन सारखे नेते त्यांना मृगजळाची भ्रामक, चकचकीत, सोनेरी, इंद्रधनुष्याची स्वप्ने दाखवून जगायला भाग पाडतात. त्याच वेळेस डॉन इंद्र· इंद्रधनुषी दिसतात, भ्रामक जगात जेव्हा जाऊन येशु, जुडास, यती यांना अनंत प्रश्न विचारून भंडावून सोडायचा व ते प्रश्न जेव्हा अनुत्तरीत राहायचे तेव्हा डॉनला झिडकारून स्वप्ने निकालात निघायची व डॉनला आपल्या स्वप्नांचा फोलपणा, पोकळपणा वाटला नव्हे तसा तो होताच.

डॉनने पाहिलेल्या स्वप्नात शब्दच्छल जरी चांगला, logical करत असला तरी उत्तर शून्य हेच असायचे. त्याची विचार धारा "माझे काय चुकले? माझे कुठे चुकले? मी कुठे कमी पडलो? त्याने येशुच्या स्वप्नांच्या झालेल्या स्वप्नाशी आपले स्वप्न ताडून पाहतांना तो वैतागून म्हणतो. ज्या येशुने त्याच्या स्वप्नांसाठी मार खाल्ला, विटंबना सहन केली. स्वतःचा क्रॉस खांद्यावर घेऊन मरण पत्करले. मग त्याच्या स्वप्नात व माझ्या स्वप्नात फरक काय? जमिनीवर असणारा

Triple Camera



त्य सांगतो " अरे डॉन येशुचे स्वप्न खरे होते म्हणुन त्याचा धर्मप्रसार झाला, अनुयायी मिळाले कारण ते कवण सत्य होते इत्यादी.

जेव्हा यती (स्वप्नात) सांगतो कि त्याला अंतिम ज्ञान झाले. त्यावेळेस डॉनला प्रश्न पडतात अंतिम म्हणजे काय? अंत कुणाचा? व्यक्तीचा? जगाचा? व्यक्तीचा असेल तर त्या व्यक्तीचा अंत होईपर्यंत कोणतेच ज्ञान अंतिम ठरु शकत नाही. कारण जगणे म्हणजे अनाखीन नवे अनुभव घेणे (अनुभव म्हणजे ज्ञान काय?) शब्दांची Parody.

जेव्हा यती म्हणतात हा असा अनुभव एकाच वेळीच येतो तेव्हा साहजिकच डॉनचे प्रश्न तयार होतात. निव्वळ संख्येवर सत्य ठरु शकते की? मताधिक्याने सत्य सिध्द होते का? जे अज्ञात होते, जे अननुभुत होते त्याचे गुणधर्म तुम्हाला अंतिम सत्य मिळाले (या यंत्रकन्या कल्पनेप्रमाणे) ते अंतिम कसे? काळातीत वस्तुरूप सत्य म्हणजे काय? मला कळालेले हे अंतिम सत्य अंतिम काय? इतके प्रश्न यतीला विचारले शेवटी यती चिडून बोलते झाले ज्ञानप्राप्ती पाहिजे असेल तर बुध्दीचा गर्व, तर्काचा ताठरपणा व अहंपणाचा मद संपायला हवा. (त्यातील डॉन कडे नव्हतेच, होता तो चौकसपणा) तू चुकवायला आला आहेस, नमाळ्याला नाही. व यती त्यांच्या स्वप्नातुन संतध्यान पावले.

जुडासची काल्पनीक भेटही अशीच. डॉन त्याला अनेक प्रश्न विचारतो व शेवटचा प्रश्न असा असतो की तू तसा का केलेस? जुडासने जुनराज्ञी माव लावला त्यावर डॉनची प्रतिक्रिया शांतपणे येते ज्या वेळी कुणी त्याच कल्यावर अनेक व विस्फोट कारणे सांगु लागतो, त्या वेळेस तो सत्य सांगत नसतो तर काहीतरी लपविण्याची धडपड करत असते.

अशी हजारो स्वप्ने पाहिलेला, जगलेला, प्रश्नोपनिषदे तयार करणारा, अंतीम सुन्दर व सत्य न मिळालेला डॉन शारीरिक दृष्ट्या मरण पावतो पण विचारांच्या रुपाने अंतिम काळापर्यंत त्याचे अनुत्तरीत प्रश्नांचे अवघड भुयार बावरत, अस्वस्थतेमध्ये जीवन जे नवे जगत राहतो हे मात्र खरे सत्य.

# रंगरेखा -पारवा

🙏 💐 💐 💐 💐 💐 💐 💐 🙏

] विलास वाघोलीकर: 🙏 💐 💐 💐 💐 💐 💐 💐 🙏

जी. ए. कुलकर्णी यांचा पारवा कथासंग्रह , सन १९६० मध्ये प्रसिध्द झाला. तसा हा सुरुवातीचा, दुसरा कथासंग्रह होता. पण लक्षात येते की जीएंच्या जीवनविषयक दृष्टिकोनातील मुद्दे, (तत्वज्ञान नव्हे,) सुरुवातीपासून निश्चित झाले होते. पारवामधील 'रंगरेखा' या सहा छोट्या कथा वाचल्यावर हे दिसून येते. या कथांना रूपककथा म्हणता येईल. जीएंनी नंतर, 'रक्तमुखी', 'अनंत', 'गोरिला', इत्यादींसारख्या मिथककथा लिहिल्या, त्याच्या पाऊलखुणा, या 'रंगरेखा' गटातील कथांमध्ये दिसतात. म्हणून तत्वचर्चेच्या अंगाने या कथांकडे पहात आहे. वाचकांनी मूळ कथा वाचून समजून घ्याव्यात ही विनंती....

कथा क्र. ६ : स्मृती

पृथ्वी अमर्यादित अनाकलनीय अवकाशात फिरत आहे. अशा पृथ्वीवर माणूस वावरत आहे.

(मत्स्यकन्या या कथेवरील विलासजी वाघोलीकर याचे विवेचन कथास्वाद भाग २ मधे समाविष्ट करण्यात आले आहे)

दिलिप बडे:

https://youtube.com/watch?v=231Fzbw8iio&feature=share&si=EMSIkaIECMiOmarE6JChQQ

विश्वेश्वर नांदेडकर:

विलास राव 'मस्त्यकन्या' ही म्हटले तर जी ए ची एक सुखात्मिका. पण आपण या कथेचे जे पैलू उलगडून दाखवले ते अप्रतिमच. माझ्या नजरेस समोर एकदम एक लक्ख प्रकाशात कथा साक्षात उभी राहिली. खरोखर तुमची आकलन शक्ती खूपच छान आणि क्ष किरणांसारखी आहे. कथेचे तत्व तुम्हाला लखलखीत पणे दिसते. आम्हाला ते हुडकवे लागते. You are really great stay blessed.

सुनीळ सामंत:

D I T T O ! 'रंगरेखा' मधील मत्स्यकन्या या कथेबद्दल लिहिण्यापुर्वी, रंगरेखा आणि त्या आधी पारवा बद्दल...

'पारवा' हा सामान्य व्यक्तींच्या दूःखमय जीवनावर बेतलेल्या कथांचा संग्रह आहे. 'काकणे' मधली बलात्कारित 'कावेरी', 'रात्र झाली गोकुळी' मधली फ़सवणूक झालेली दुर्गी, (या दोघीही वहिरीत जीव देण्याच्या विचारातल्या) , 'शलॉत'मधली आयुष्याने नाकारलेली काशी, 'जखम' मधले वेगवेगळ्या तऱ्हांनी फ़सवले गेलेले हरलेले गोविंदराव, पराभूत सखाराम आणि फ़ुकट मेलेल्या अमाशीची कथा 'बळी', गरीबीचा आणि अपमानाचा दंश झेलणाऱ्या बाबाजीची कथा 'नाग', 'रातराणी' मधली कोड झाल्यामुळे फ़सवली गेलेली आणि जीव देणारी मेधा, आपल्या प्राध्यापकांना आपले सर्व गुण आवडूनही त्यांचे मन मात्र आपल्या बहिणीवरच गेले हे पाहून दुखावलेल्या लताची कथा- 'भेट', आयुष्यात कायम हरलेल्या आणि अखेर अंध मुलाचा बाप होणाऱ्या राघवेंद्राची कथा – 'पाळणा', मरणासन्न विजू, तिचा हताश भाऊ नानू आणि थकलेली आई यांची कथा- 'निरोप', वेडसर भास्करभट आणि सर्वत्र नकार घेणारी कालिंदी यांच्यामधे पिचलेली राधाबाई

यांची कथा- ‘व्यथा’. असा हा दु:खमय करड्या रंगाने झाकोळलेला कथा संग्रह पारवा.

त्यातल्या या रंगरेखा- काहीशा वेगळया रंगाच्या. मी प्रथम त्यांच्याकडे वि स खांडेकरांच्या कथाप्रमाणे पाहिलं. इतर सर्व कथांहून त्या वेगळया आहेत. अगदी छोट्या, पण फ़ार मोठ्या कॅनव्हासला कवेत घेणाऱ्या. जीएंच्या भावी रूपककथांची चाहूल देणाऱ्या या कथा आहेत.

मत्स्यकन्या ही कथा वाचताना मला बावर्ची सिनेमातील एका वाक्याची आठवण झाली. आनंद हा फ़ुलझडीप्रमाणे येतो डोळे दिपवतो आणि नाहिसा होतो पण शोकगीत मात्र ऊदबत्तीप्रमाणे फ़ार काळ मनात रेंगाळत रहाते. मत्स्यकन्या ही कितीही सुंदर आणि गुणवान असली तरी शोकाची किनार न लाभल्याने , दुखाची जाणीव न झाल्याने, संवेदनाहीन असल्यामुळे ती जीवनाचा खरा आनंद, सुख जाणू शकत नाही. बासरीवादकाची ती उदास धुन, तिला दुःखाची जाणीव करून देते, शोकमग्नता जाणवते आणि मगच तिला "मोक्ष" मिळतो. असे काहीसे मला वाटले.

मत्स्यकन्या म्हणजे साहित्य, कला. ती कितीही झगमगीत वैभवशाली असली तरी तिला जोवर सामान्यांच्या दुःखाशी जोडले जात नाही तोवर ती अस्पर्श रहा्ते.

मला ही कथा अशी वाटली. जीएंच्या दुःखात्म कथांची वकील. जी एंच्या कथा अमर होण्यामाग्चे गुपित.

विलास वाघोलीकर:

आपल्या या ग्रुपचा महत्वाचा फायदा मला, वाचकांना दिसतो. तो असा की, आधी वाचलेल्या जीएंच्या कथा, वेळ काढून, आवर्जून, लिखाण करायचे म्हणून बारकाईने, पुन्हा पुन्हा वाचल्या जातात. त्यावर लिहीले गेल्यामुळे ती कथा इतरांना जास्त समजते. पर्यायाने आपणही स्वत :ला जास्त समजतो. ग्रुपमधील वाचक

अभ्यासू, साक्षेपी, विविध क्षेत्रात काम करणारे असल्यामुळे या चर्चेला व्यापकता येते व सूक्ष्मपणा ही येतो. म्हणून आपले सविस्तर प्रतिसाद निश्चित आवडतील.

मंजिरी देशमुख:

अगदी खरं, शिवाय कथेकडे निरनिराळया दृष्टीकोनातून पहाता येते आणि कथा समजून घेता येते.

सुनीळ सामंत:

बरोबर. मला काही लोकांचे पर्सनल मेसेज येतात की मला लिहावेसे वाटते पण धाडस होत नाही. काही चुकेल की काय असे वाटते. मला वाटते की जी एंच्या कथांचे आकलन चूक किंवा बरोबर असे होऊ शकत नाही. ज्यांना इतरांहून वेगळे काही वाटते त्यांनी मुद्दाम वेगळे लिहावे. त्यातून विचार मंथन होईल.

व्यक्तिशः मला हे लक्षात आले की विलासजी, संजीवजी, विश्वेश्वरजी, हेमंतजी, निशाजी, महेशजी, रेखाजी, दिलिपजी , माधवजी, अतुलजी, अशोकजी आणि इतरही अनेकांच्या मानाने माझे आकलन अगदीच तोकडे होते. पण आता मला एक वेगळा आत्मविश्वास आला, नवीन दृष्टी मिळाली आणि कथावचनाचा आनंद वेगळया स्तरावर गेला. केवळ जीएच नव्हे तर इतरही काही चांगल्या लेखकांच्या कथा वाचतान अमी अधिक सूक्ष्मपणे समजून घेऊ सकतो.

अजून बराच पल्ला बाकी आहे.

संजीव सावरगांवकर:

मित्रांनो लिहीते राहा. तुमच्या कल्पना वेगळया असू शकतील. सरावाने चांगले लेखन जमून जाते. अनुभव बोलतोय.

सुनीळ सामंत:

विलासजींनी रंगरेखामधील मत्स्यकन्या वर एवढे उत्कृष्ट लिहिले व चित्रे सादर केली की सगळी चर्चा मत्स्यकन्येवरच झाली.

बाकीच्या पाचही कथांवरही चर्चा करावी असे वाटले म्हणून आज चाहूल या कथेवर लिहीत आहे.

कथा लहान असली तरी तिचा आवाका भव्य आहे. कथेची सुरुवात एका इवल्याशा फुलातील सूक्ष्म किड्यापासून होते आणि कथेचा शेवट एका अवाढव्य ताऱ्याच्या मृत्यूसंदेशापर्यंत होतो. वि स खांडेकरांच्या लघुकथांसारखी ही कथा त्यांच्यासारखाच एक चिंतनशील संदेश देते. मरण प्रत्येकालाच आहे. आज ना उद्या हा सुर्य, ही पृथ्वीसुद्धा नष्ट होणार. जबतक सूरज चांद रहेगा- यातला जबतक ला कबतक खैर मनायेगा? असा प्रश्न निर्माण होऊ शकतो. इथे काहीच अमर्त्य नाही. मग ती लहान कळी आपले उमलते जीवन जसे आनंदमय जगते तसेच आपणही का जगू नये! मृत्यूचा बाऊ करू नये आणि जीवनाचा गर्व करू नये. असे काहीसे ही कथा मला सांगून गेली.

लहान असली तरी खोलवर परिणाम करणारी ही कथा आहे.

संजीव सावरगांवकर:

कथा:रंगरेखा कथासंग्रह :पारवा.

सिखा न सकि जो किताबे तमाम उमर भर मुझे |

फिर करीब से कुछ चेहरे पढे और न जाने कितने सबक सिख लिये ||

जी. ए. यांनी लिहिलेली पुस्तके कथा मग त्या त्यांच्या स्वतःच्या असोत अथवा त्यांचे कथा लेखन रूपांतरित कथांचे असोत, भाषांतरित असोत, अनुवादित

असोत त्या उत्तम साहित्यिक दर्जाच्या आहेत़ ही एक निर्विवादपणे मान्य करण्याची गोष्ट आहे. या सर्व कथांनी आयुष्यभर आपल्याला एक उत्तम वैचारिक, साहित्यिक, प्रगल्भ वाचक तयार केला आहे असं म्हणावेसे वाटते. त्यांची कोणतीही कथा परत परत वाचाविशी वाटणे, त्यातील गर्भितार्थ शोधणे हे एक आनंदाचे बौद्धिक काम आपण मन लाऊन करत असतो. त्यातील अपेक्षित मुद्दा, अर्थ, संकल्पना मनापासुन उमगली तर एक मानसिक समाधान त्यातून प्राप्त झाल्याचा पारितोषिक क्षण अत्यंत निरलसपणे आपण उपभोगत असतो. आणि म्हणुन कोणत्याही कथेतील वातावरण, साहित्यिक वाक्य, कथेतील पात्रे, स्त्री-पुरुष, प्राणी, स्थळे यांचे जेव्हा दर वाचनाचे वेळेस आकलन होत जाते तेव्हा अगदी खरोखरीच असेच जाणवले कि

"करीब से कुछ चेहरे पढे और न जाने कितने सबक सिख लिये "

प्रत्येक वेळी केलेले कथा वाचन दर वेळेस आपल्याला नवीन काहीतरी शिकवून जातेच जाते.

सध्याच्या काळात कथांमध्ये हल्ली "अती लघु कथा" ची एक लेखन फॅशन आहे. पण रंगरेखा मधील जी. ए. यांच्या कथा "अलक" नाहीयेत पण नेहमीच्या कथेचे पेक्षा थोड्या लघु कथा आहेत असे म्हणावेसे वाटते. रंगरेखा चा त्यांचा लेखन संदर्भ पाहिला तर तत्कालीन मासिकात त्या प्रसिद्ध झालेल्या दिसत नाही. अगदी एकत्रही नाही किंवा वेगवेगळया ही कथा दिसत नाही. या कथांची जातकुळी वेगळी जाणवते पण सांगता येत नाही.

या सहा कथांचे वैशिष्ट्य सांगायचे म्हटले तर "चाहूल" "मित्र" व "स्मृती" मध्ये मृत्यू हा मित्र व मृत्यु नंतरच्या अनुभव हा पूर्व आयुष्याचा परिणाम आहे हे जाणवून देतो. "दैव" कथेत दासीच आयुष्य आणि तिचे अस्तित्वातील राणी चे नशीब( नियती)आणि राणीचे राहण्याच अस्तित्वातील आयुष्य व दासीचे नशीब

( नियती) हा त्या दोघींच्या दैवातील फरक, त्यामुळे असणारी सत्य परिस्थिती राणी शांत पणे दासीच्या नजरेस आणून देते.

"मत्स्यकन्या" कथेमध्ये इच्छापूर्ती आहे ती तिची जमिनीवर राहण्याची इच्छा आणि त्याची पूर्तता होय. आणि जमिनीवरील त्याला, तो आयुष्यातील शोधत असलेला "स्वर" तिच्या रूपाने मिळतो. दोघेही एकमेकांना पूरक असल्याने ही कथा सुखांत म्हणावी लागेल.

"तत्त्वज्ञान" ही कथा सूर्यप्रकाशात जाण्याचा वेडा आणि त्याच्या जगातील जगावेगळा हव्यास झाडाच्या मुळाने ठेवला. आयुष्याच्या जगण्याच्या वेगळा हव्यास ठेवल्याने ना त्याला सुगंध मिळतो ना फुल पाहावयास मिळते( अशक्य गोष्ट शक्य करण्याचा प्रयत्न) पण मुळा चा सूर्यप्रकाशात अंत मात्र त्वरित होतो. असा अंत झाल्याचे त्याला कळते आणि मृत्यु आधी म्हणते " आंधळा भ्रमातील असलेले आपण भ्रममुक्त तरी झालो हाच आपला फायदा व मिळालेले ज्ञान. म्हणजे मुळाचे "तत्त्वज्ञान" हे फुकाचे झाले. पण मृत्यूने आपले कार्य आधीच केले होते.

"स्मृति" कथेचे वेगळेपण म्हणजे आकाशस्थ असलेली शापित चांदणी एका भावनिक क्षणी केवळ कोणी एक मानव साद घालतो म्हणून ती पृथ्वीवर येते. त्याचे हळू आवाजात केलेल आवाहनही साधे आहे, ते अस्तित्वातच येणे सुद्धा त्यालाच अपेक्षित नाहिये त्याचे बोलावणे म्हणजे "दिव्यतेजा खाली ये आणि माझ्या आयुष्यात माझ्या घरात एक तेजस्वी पाऊल उमटव". तिने बरोबर पृथ्वीवर राहावे हे सुद्धा यातून ध्वनित होत नाही. त्या अनपेक्षित वाक्यं बोलण्याने मात्र दिव्यतेजाचा कळीचा शब्द अंतरिक्षात मोकळा होतो व ती पृथ्वीवर येते त्यानंतर तिचा अपेक्षाभंग होऊन ती चिडते व त्याला मृत्यूनंतर कोळयाचे आयुष्य जगायला भाग पाडते.आणि स्वतः मात्र चिरंजीवी अमर आयुष्य जगायला अंतराळ जवळ करते.

या सर्व कथा इतक्या मिनी लघुकथा आहेत की त्यावर लिहिणे थोडे अशक्यप्राय  व्हावे. तरीही प्रत्येक कथेला माझ्या लेखन बुद्धी वकुबानुसार प्रत्येक कथेवरचा आस्वादक मुद्दा एकेका वाक्यांत सादर  केला आहे.

चाहूल : जीवो जीवस्य जीवनम् || "आणि विशाल पुरुषाची हास्यरेषा त्याच्या चेहऱ्यावर उमटली व मनात म्हणाला हे पुरंध्री एवढेच तुझ आयुष्य!!!

दैव : दैवजात दुःखे भरता दोष ना कुणाचा |

पराधीन आहे जगती पुत्र मानवाचा ||

मित्र : कोहम् ? कोहम् ? सोहम !सोहम !! हे मृत्यू मी हे ओझेही सोडतोय, स्वप्नेही सोडतो आहे. तुझी ओळख मला पटली आहे. आता मला सोडून जाऊ नकोस. तूच आता माझा मित्र आहेस.

मत्स्यकन्या : परी कथेतील राजकुमारा स्वप्नी माझ्या येशील का ? भाव दाटले मनी अनामिक साद तयांना देशील का?? राजकुमार ही तिचे आवाहन ऐकून साथ देतो व म्हणतो, हे मत्स्य कन्या तूच माझ्या आयुष्यातली "स्वर" आहेस व त्याच्या मनी चे स्वप्न जुळून आल्याने तो म्हणतो "स्वर आले जुळूनी"....

तत्वज्ञान: मी(मूळ)मोकळा मोकळा, मोकळे सारे आकाश | अथांग अवनीवर मिळे मृत्यूच्या ज्ञानाचे तुफान ||

स्मृती : "स्वप्नातल्या कळयांनो उमलू नकाच केव्हा" दैवा पुढे मानवच हरतो असे नाही तर अमर दिव्यतेजा चांदणी पण हरते. मानवाने फुकाचे शब्द उच्चारून तिच्या स्वप्नांचा चुराडा केला. पण तिला अभिप्रेत असलेला शब्द स्वतःवरच वाया गेला याचे दुःख झाले, अपेक्षाभंग झाला व तेजस्वी अमरता तिच्या नशिबी कायमची आली. (खर तर पृथ्वीवर तिचा काय तोटा झाला आहे, होता ? स्वप्नपूर्ती झाली नाही इतकेच. खरं तर अमरता कायम आहे हे ज्ञान तिला होतच होतं. पृथ्वीवरील

मानवाला मात्र तिच्यामुळे मृत्यू भोगावा लागला व कोळी होऊन पुनर्जन्म भोगावा लागला. ( कोळ्याला तरी मागील आयुष्यातलं मन आहे का? असते का?)

अशा या कथा आणि त्यातील मानवी पात्रांच्या जगण्याच्या व मृत्युपश्चात असलेल्या व्यथा.

आता आपण वाचक म्हणून या कथा कश्या पाहू शकतो ? तर माणसे (खरीखुरी किंवा भ्रामक, कथेतली) आपल्या जीवनात येतात व जातात. इथे पृथ्वीवर आलेला प्रत्येक जीवाचे ते आयुष्य हे शापित भागध्येय असते. त्या आपल्या आयुष्यात किंवा कथेतील आयुष्यात ते आपण पहात असतो कदाचित जगतही असतो, नशीब म्हणूनही आयुष्य जगत असतो. पण वाचक म्हणुन तुम्ही प्रगल्भ व सच्चे साहित्यप्रेमी असाल तर तुम्ही वाचलेले महान साहित्यिकांचे साहित्य अखेरपर्यंत तुमच्या सोबत राहते.अगदी मनाच्या गाभ्यात, मेंदूच्या विचारात कायम असते अगदी अविनाशी आत्म्याच्या अस्तित्वा सारखे. म्हणून तर त्याला ‘अक्षर’ म्हटले जाते. हा अक्षर आत्मा आपल्याला पुन्हा पुन्हा नवजीवन देत राहतो, जगण्यासाठी नवी चेतना देत राहतो आणि ही आणखीन एक जीएंच्या लेखनाची खासियत आहे.

हे कथेतील नियती, मृत्यूदेवते, आम्हा मानवाचे कथन समजावून घे आणि जमलं तर येथील आमचे जगणे सुसह्य कर ही तुज चरणी प्रार्थना

बहिणाबाईंच्या वरील कवितेतील दोन कडव्यांनी समारोप करतो.

हिरीताचं देनं हेंन, खरं तुला समजलं |
काय कशाला म्हणावं, एका तुला उमजलं ||
मना जिवा संसाराची, तुला गुपितं कळली I
लपलेली कर्म रेखा तुझ्या दैवाने मिळाली ||

तर या अशा आपण वाचलेल्या रंगरेखा मधील सहा कथा.

सुनीळ सामंत:

वाह, संजीवजी. तुम्ही तर रसास्वादाची चरमसीमा गाठली. यातले दोन परिच्छेद तर असे आहेत की जीएंचे एखादे स्मारक झाले तर त्यातील भिंतींवर लिहिले जावेत.

जी. ए. यांनी लिहिलेली पुस्तके कथा मग त्या त्यांच्या स्वतःच्या असोत अथवा त्यांचे कथा लेखन रूपांतरित कथांचे असोत, भाषांतरित असोत, अनुवादित असोत त्या उत्तम साहित्यिक दर्जाच्या आहेत ही एक निर्विवादपणे मान्य करण्याची गोष्ट आहे. या सर्व कथांनी आयुष्यभर आपल्याला एक उत्तम वैचारिक, साहित्यिक, प्रगल्भ वाचक तयार केला आहे असं म्हणावेसे वाटते. त्यांची कोणतीही कथा परत परत वाचाविशी वाटणे, त्यातील गर्भितार्थ शोधणे हे एक आनंदाचे बौद्धिक काम आपण मन लाऊन करत असतो. त्यातील अपेक्षित मुद्दा, अर्थ, संकल्पना मनापासुन उमगली तर एक मानसिक समाधान त्यातून प्राप्त झाल्याचा पारितोषिक क्षण अत्यंत निरलसपणे आपण उपभोगत असतो. आणि म्हणुन कोणत्याही कथेतील वातावरण, साहित्यिक वाक्य, कथेतील पात्रे, स्त्री-पुरुष, प्राणी, स्थळे यांचे जेव्हा दर वाचनाचे वेळेस आकलन होत जाते तेव्हा अगदी खरोखरीच असेच जाणवले कि

"करीब से कुछ चेहरे पढे और न जाने कितने सबक सिख लिये "

जीएंचे जीवनकार्य आणि त्यांच्या लेखनाचा त्यांच्या (संख्येने कमी असले तरी) खास वाचकांच्या जीवनावर झालेला परिणाम या दोन परिच्छेदांत पुरेपूर उतरला आहे असे मला वाटते.

सुनीळ सामंत: दैव

या रंगरेखा कथासंग्रहामधील मधील सर्वच कथा वाचतना मला वि. स. खांडेकरांची आठवण येते.

दैव ही कथा मला सांत्वनात्मक वाटते. हे सांत्वन दोन्हीही तऱ्हेने आहे. आपल्या योग्यतेनुसार आपल्याला लाभले नाही याची खंत असणाऱ्यांना ही कथा दैववाद, नियतीवाद यांचा दाखला देऊन, यात तुझी काही चूक नाही, ते तुझे दैव होते असे सांगून सांत्वन करते.

दुसरीकडे ज्यांना योग्यतेच्या मानाने अधिक लाभले, त्यांना जेव्हा समाजाकडून हेटाळणी चा सामना करावा लागतो त्यांचेही सांत्वन या कथेत आहे. तू काही हे मिळण्यासाठी पाप, गैरकृत्य केलेले नाही, हे तुझ्या दैवात होते, ते तुला मिळाले. इतरांनी हेवा, मत्सर वा द्वेष करण्यासारखे तू काही केलेले नाहीस असे सांगून त्यांचेही ही कथा सांत्वनच करते.

जीएंच्या इतर कथांच्यामानाने ही कथा काहीशा एकसुरी व बाळबोध वाटली मला. पण आपला मुद्दा मांडण्यात ती यशस्वी झाली आहे.

विलास वाघोलीकर:

१) जगताना आपल्या महत्वाकांक्षेप्रमाणे, प्रयत्नांप्रमाणे मिळत नाही. त्याचे असमाधान घेवून पुढे जगावे लागते. आपल्याला मिळाले नाही तरी इतरांचा मत्सर करू नये ही शिकवण गरजेची असते.

२) तू का अपेक्षा करतोस ? चांगल्याला सोटा व वाईटाला पेढा, हेच जगात असते, असे मनावर बिंबवल्यावर असमाधान बाजूला होते. मला वाटते ही कथा ते दाखवते. जीएंच्या नंतरच्या कथांतही हा दृष्टिकोण येतो. उदा. ‘स्वामी’ मधला सामान्य माणूस जन्मभरासाठी कोंडला जातो. ध्रुवशीलेला राज्यकारभारात दुसरे पद मिळते , तर चंचलेची इच्छा गाडली जाते. ‘तुती’, तसेच ‘काकणे’ मध्ये निरागस

सुम्मी, कावेरी संकटात सापडतात. म्हणून ही कथा मिथक आहे किंवा वरवरची आहे, असे म्हणून बाजूला सारली जावू नये. एकेक कथेवरील आपल्या विवेचना बद्दल खूप धन्यवाद.

सुनीळ सामंत: मित्र

या कथागुच्छातील इतर कथांच्याच धाटणीची ही कथा आहे. या कथेतील मित्र म्हणजे मृत्यू

'प्रवासी' कथेतील नावाड्यापासून, देवळातील वधकापासून ते अखेरच्या दैत्यापर्यंत वेगवेगळया स्वरुपात भेटणाऱ्या नियतीची बीजकल्पना या कथेत येते. अगदी बाल्यावस्थेत एका सर्पाच्या रुपाने मृत्यू भेटायला येतो पण आई वाचवते. नंतर वीजकल्लोळाच्या रुपाने येतो तेव्हा प्रेयसीसाठी हा त्याकडे पाठ वळवतो. पण नंतर मात्र आयुष्याचे ओझे साहेनासे झाल्यावर तो मृत्यूला शोधत येतो.

या कथेची भाषाशैली व शब्दवैभव अतिशय देखणे आहे. जीएंच्या नंतरच्या कथांतून या भाषासौंदर्याचे गर्सन???? व्हायला लागते.

पारवा या एकूणच कथासंग्रहात (माझ्याकडील दोन्हीही आवृत्त्यांत) कुठेही कोणत्याही कथेच्या पुर्वप्रसिद्धीचा उल्लेख नाही. १९६० चा संग्रह आहे म्हणजे या कथा पन्नासच्या दशकातल्या किंवा त्याही पुर्वीच्या असाव्यात. जर कोणाला याबाबत अधिक माहिती असेल तर कृपया कळवा.

विलास वाघोलीकर:

अगदी योग्य विवेचन आहे. कथांची पूर्वप्रसिद्धी मला माहीत नाही. जीएंच्या भाषेबद्दल काय बोलायचे. तसा एक परिच्छेद लिहिणे म्हणजे शिवधनुष्य उचलणे होईल. मत्स्यकन्येतल्या भरतवाक्याचे उदाहरण म्हणजे एक कविता ,एक गद्यकाव्य

होईल. “माझा प्रवास असाच चालायचा. आम्ही माणसे दिवसाच्या क्षणिक लाटेवर जगतो...." जीएंच्या लक्षणीय परिच्छेदांपैकी हा आहे.

सुनीळ सामंत: तत्त्वज्ञान

या कथेतील मुळांना जमिनीबाहेर येऊन आपण ज्या फुलांसाठी श्रम करतो ते फ़ूल प्रत्यक्ष पहायची इच्छा होते. साहजिकच, जेव्हा मुळे जमिनीवर येतात तेव्हा झाड कोलमडते, फ़ूलही मरते आणि मूळही. मृत फ़ुलाला पाहून मरणासन्न मूळ अशा समजुतीत मरते की आपण जे केले ते योग्यच केले, कारण, आपण ज्याला सुगंधित फ़ूल समजत होतो ते तसे नव्हतेच.

अनेकदा कुतुहल हे सेल्फ़डिस्ट्रक्टिव्ह असते. ते शमवण्यासाठी स्वतः मरावे लागते. जसे सायनाईडची चव शोधण्यासाठी एका शास्त्रज्ञाने ते जिभेवर ठेवले, आणि एक अक्षर लिहून तो मेला. ते अक्षर होते S. S म्हणजे Sweet, sour, salty असे काहीही असू शकते.

गुगलवर Curiosity शोधल्यावर हे सापडले- The drive to discover is deeply ingrained in humans, on par with the basic drives for food or sex, says Christopher Hsee of the University of Chicago, a co-author of the paper. Curiosity is often considered a good instinct—it can lead to new scientific advances, for instance—but sometimes such inquiry can backfire. “The insight that curiosity can drive you to do self-destructive things is a profound one,” says George Loewenstein, a professor of economics and psychology at Carnegie Mellon University who has pioneered the scientific study of curiosity. Morbid curiosity is possible to resist, however.

या कथेतली जीएंची भाषा खरेच हेवा वाटण्यासारखी सुंदर आहे. कल्पनाशक्ती अचाट आहे. तर्कशास्त्राला धरून आहे. एका वनस्पतीच्या अवयवांना स्वतंत्र विचारविश्व कल्पण्याची त्यांची शक्ती महानच आहे.

ही कथा सर्वांनी वाचावी कारण ही कथा वेगवेगळे पैलू असणारी आहे. कदाचित मला जे दिसले त्याहून वेगळे इतरांना दिसेल.

विलास वाघोलीकर:

रंगरेखातील कथा बहुतेक वाङ्मयशोभा मासिकात १९६१ मध्ये प्रसिद्ध झाल्या होत्या. माझ्याकडे ‘चाहूल’ कथेची इमेज मिळाली. ती माहितीसाठी देत आहे. साहित्य संशोधकांनी त् ।????या मासिकाचे १९६० चे संशोधन केले तर या सहा कथांबद्दल जास्त माहिती मिळेल.

दिलिप बडे:

पारवा : तत्वज्ञान, काळाच्या पडद्यावर सर्व जीवन भ्रमच ठरते. समुद्र-डोंगर-वनस्पती-प्राणी यांच्या अस्तित्वाचा कसलाही परिणाम काळाच्या पडद्यावर नाही. परिणाम करत नाही.ना ज्वालामुखीने काळाचा पट जळतो. ना समुद्राच्या पाण्याने ओला होतो.कथेत फुल आहे-वास आहे.पण मुळांमध्ये ते जाणण्याची क्षमता नसते. माणुसही गती-काळ यांचा पट मांडु शकत नाही.

दिलिप बडे: पारवा-मित्र-वाळलेली फुले

भाव विश्व, पालापाचोळा, भौतिक वस्तू, भग्न मुर्तिंचे अवशेष, तडा गेलेल्या श्रद्धा.या सर्वांचे फेकुन दिलेले गाठोडे, प्रवाशाने जीवनभर सांभाळलेले अर्थशुन्य ओझे. हे ओझे भेटलेला विशाल पुरूष फेकुन देतो. हा विशाल पुरूष (मुर्त्यू)बालपणी

कृष्णसर्पाच्या रूपाने,तरूणपणी तारूण्यात वीज रूपाने भेटण्याचा प्रयत्न करतो. शरीर थकले-मन भंगले-प्रवास असह्य झाला तेंव्हा प्रवाशाने आपण होऊन विशाल पुरूषाच्या हवाली आपले शरीर व ओझे अर्पण केले. मृत्युला (विशाल पुरूष) मित्र मानले.

रंगरेखा-चाहूल-फुल-फुलपाखरू-निळया रंगाचा पक्षी-माणकांच्या ओठांची स्त्री.

पृथ्वीवर सारेच रंगकर्मी. प्रत्येकाचा जीवनकाल कमी जास्त. १०० वर्षांचं मानवी आयुष्यही क्षणभंगुर. फक्त मानवालाच मृत्यूची जाणीव. ती सतत असतेही आणि नसतेही. फुल आणि वास सकाळी ऊमलणार-संध्याकाळी कोमेजणार, निळया लाल रंगाचा पक्षी भुकेसाठी फुलपाखराचा बळी घेणार, पक्षांची सुरेल शीळ-लाल निळा रंग पाहून स्त्रीच्या मनात लालसा निर्माण होऊन ती पक्ष्याचा बळी घेणार आणि स्वतःच्या आयुष्याबद्धल ही म्हणत राहणार "क्षणाचा रंग!क्षणांच जीवन”. रंगरेखा या मालेतील कथांचा परस्पर संबध असावा असे वाटते.

सुनीळ सामंत: स्मृती- कथागुच्छ- रंगरेखा- कथासंग्रह -पारवा- लेखक- जी ए कुलकर्णी

ही कथा , या कथेतील रूपकाचा अर्थ, मला अजिबात समजला नाही. या कथेत एक काळवंडलेला वृक्ष आहे, एक मोडकळीला आलेले घर आहे, कथा नायक दिवसा अत्यंत उदास असतो पण रात्री एक चांदणी दिसते तेव्हा तो आनंदित होतो. तो तिला साद घालतो. ती स्त्रीरुपात अवतरते तेव्हा मात्र तो तिला नाकारतो. आणि ती नाहिशी झाल्यावर त्याचे ते घर व वृक्ष अधिकच भकास होतात.

ती चांदणी म्हणते- "मी ती चांदणी,” ती म्हणाली, "तू मला बोलावले होतेस ना, म्हणून मी आले.. या शब्दांची मी शतकानुशतके वाट पाहत होते. खाली

पसरलेल्या पृथ्वीच्या विस्ताराकडे मी दररोज अपेक्षेने पाहत असे. मानवाच्या अनेक लाटा काळावर येऊन नाहीशा झाल्या. अनेकांनी माझे पूजन केले. माझ्यावर नजर रोखून आपले जीवन फुलवले. पण मी खाली यावे, असे कुणीसुद्धा म्हटले नाही आणि तसा शब्द आल्याखेरीज माझी त्या तेजस्वी, अमर पण भावनाहीन जगातून सुटका नाही. त्या माझ्या जगाला मी कंटाळून गेले. अमर्याद विस्तार, अनंत, अभंग अशी भीषण शांतता. प्रत्येक तेजोवलयाचे विश्व निराळे. अमरतेत उत्कटता नाही. सुख फुलाप्रमाणे उमलावे, नाहीसे व्हावे. क्षणभंगुरतेच्या जाणिवेने जीवनाला धार यावी; अंत अनिवार्य आहे म्हणून त्याविषयी आसक्ती उदंड वाढावी. आज तुझ्या शब्दांनी माझी सुटका केली. आता सुखदुःखाच्या धाग्यांनी माझे आयुष्य विणले जाईल. दुःखाच्या स्पर्शाने डोळे भरतील, हर्षाच्या फुंकरीने अंग कंपित होईल. बोल, मी तुझ्या घरात कुठे राहू?" या कथेतील विविध उपमांचा, रुपकांचा अर्थ मला अजिबातच समजला नाही. ती चांदणी जे म्हणाली त्यावरून काही अर्थ लागला नाही. कोणी सांगितले तर आनंद होईल.

विलास वाघोलीकर:

१)पृथ्वीबाहेरच्या अवकाश - विश्वाकडे आपण कसे पहातो ? माकडाचे काय... मध्ये थोडी दिशा दाखवली आहे. हे तारकांचे विश्व अफाट, अनाकलीय व सजीव विरहीत आहे असे आपले आत्तापर्यंतचे ज्ञान सांगते.

२) या कथेत, कल्पना आहे की, त्या विश्वातील चांदणीला, पृथ्वीवरच्या सजीव विश्वाबद्दल कुतुहल, (थोडा मत्सर) वाटत असेल. त्यामुळे त्या चांदणीला या जगात सजीव म्हणून यावे असे वाटत असेल.

३)पण या जगात येण्यासाठी कुणीतरी प्रार्थना, आवाहन केले पाहीजे. नायकाने निराशेपोटी तसे आवाहन केल्यावर, चांदणी स्त्री रुपात आली.पण ती दिव्य प्रतिमा आपल्या दरिद्री घरात कशी राहील असे नायकाला वाटले.

४)गरीब तरुणाला श्रीमंत तरुणी आपल्याकडे कशी राहील असे वाटते. त्यामुळे गरीब तरुण श्रीमंत तरुणीला व्यवहारात नकार देतो. तसे येथे होते.

५) मग चांदणीला, तरूणीला निराशा वाटते. ती दिव्य असल्याने कोळी होण्याचा श…???

संजीव सावरगांवकर:

माझा ही हाच विचार होता पण लगेच शब्दांकन करणे जमले नाही.

विलास वाघोलीकर: धन्यवाद. पुनरुक्ती झाली तरी आपले विवेचन कृपया द्यावे. शब्द, मांडणीमध्ये वेगळेपणा येईल..

# रक्त मुखी - सांजशकुन

विलास वाघोलीकर:

रक्तमुखी व अनंत या दोन्ही कथा जीए कुलकर्णी यांच्या 'सांजशकुन' पुस्तकात आहेत. या दोन्ही कथा, मिथक कथा आहेत. पण त्या वास्तवाशी जोडणाऱ्या असून त्यांना अनेक आयाम असल्याने, श्रेष्ठ कथा वाटतात.

दोन्ही कथांत प्रवासी आहेत. मार्गदर्शक योगी, किंवा महंत आहे. प्रवासात चढ असलेले डोंगर आहेत. चक्रव्यूहाचे चकवे आहेत.

अब्राहम मास्लो या कथांमध्ये डोकावून गेले होते, असे वाटते. या मानसशास्त्रज्ञांनी मानवी गरजांचा पिरॅमिड दाखवला. त्यात, तळाच्या प्राथमिक गरजांमध्ये,आहार, श्वास; शाररिक आसक्ती; नंतर शरीराचे संरक्षण(भय); नंतर वर चढत चढत, वरच्या पातळीवर स्वतःचा शोध, या गरजा दाखवल्या आहेत. एका प्राचीन श्लोकात 'आहार निद्रा भय मैथुनं च सामान्यमेतत् पशुभिर्नराणाम् । धर्मो हि तेषामधिको विशेष: धर्मेण हीनाः पशुभिः समानाः' असा उल्लेख आहे. जीएंच्या 'रक्तमुखी' कथेत प्रामुख्याने भौतिक गरजा व मृत्यूचा, तर 'अनंत' कथेत स्वशोधाचा , प्रतिभेने विचार केला आहे. म्हणून त्या क्रमाने विवेचन करता येईल.

रक्त मुखी कथा--

भाग एक-या वर उल्लेखलेल्या भौतिक गरजांचे जीएंनी काव्यात्मक रुपांतर केले आहे.

१)एका प्रवाशाला उजवीकडच्या रस्त्याने सोन्याच्या प्रदेशात जायचे असते. त्याला सोन्याचा हव्यास दाखवला आहे.आहार, त्याप्रमाणे निवारा, वस्त्र, यांच्यासाठी, जगभर कोठेही सोन्याचा छापा चालतो. कथेच्या या भागात ॲडम स्मिथ डोकावलेला दिसतो.योगी त्या प्रवाशाला म्हणाला,"उजवीकडच्या रस्त्याने

गेले की, सोन्याचा प्रदेश लागतो. होय, गंजून विकृत न होणाऱ्या त्या धातूचे आकर्षणच तसे आतडी कुरतडणारे असते. लोहचुंबकापेक्षा त्याचेच आकर्षण जास्त ओढीचे, जास्त भीषण असते. या पिवळया ज्वालेला एकदा स्पर्श झाला, की आयुष्यभर अंग जळत राहते. मला स्वतःला त्या मोहातून सुटण्याचा एकच मार्ग होता. तो म्हणजे पूर्ण अनिच्छा निर्माण होईपर्यंत त्या मोहाचा उपभोग घेणे. त्या प्रदेशात तुझ्या पायाखाली सोन्याची वाळू असेल. अंग टेकशील तेथे तुला सोने आढळेल. आणि मग काही दिवसांनी गवताचे एक पाते पाहण्यासाठी तू जीव गहाण ठेवायला तयार होशील. पण तू अवश्य त्या ठिकाणी जा, कारण माणसाच्या आयुष्यात हेदेखील घडले पाहिजे"

३)दुसऱ्या प्रवाशाला, डावीकडच्या रस्त्याने, अप्सरांच्या प्रदेशात जायचे असते. वर उल्लेखलेल्या मास्लोच्या पिरॅमिडमध्ये ,ही एक गरज मानली आहे. कथेच्या या भागात फ्रॉईड डोकावून गेला असावा, असे वाटते. यावर त्या प्रवाशाला योगी म्हणतो, "तू तेथे जा , पण तेथून निसटणे,सोपे नव्हे, तर सुटकेचे वाटेल."

३) तिसऱ्या प्रवाशाला, सरळ जाणाऱ्या रस्त्याने, सत्तेच्या प्रदेशात जायचे असते. भय,म्हणजे, शारीरिक संरक्षणाला वर उल्लेखलेल्या पिरॅमिडमध्ये एक गरजेचे स्थान आहे. जीएंनी त्या गरजेला सत्तेचे रूप दिले आहे. माणूस समाजातच जन्मतो, जगतो, व मरतो.त्यामुळे सर्व क्षेत्रांत, होय सर्व क्षेत्रांमध्ये, सत्ताकारण असते. कथेच्या या भागात स्टालिन डोकावलेला दिसतो. यावर योगी त्या प्रवाशाला म्हणतो," जा, पण सत्तेच्या परिघात जावून, तिचा निपाःत करूनच सत्तेवर विजय मिळवता येतो."

४)चौथा माणूस, खुद्द योगी असतो. त्याची भौतिक इच्छा, ही, स्व मृत्युचे आधी ज्ञान व्हावे. (त्यामुळे तेव्हा उपाय करता येईल), अशी असते.

तिघांना वरीलप्रमाणे महत्वाकांक्षा असतात. पण त्या रस्त्यांवर प्रवाशाला मारू शकणारी ,एक रक्षक स्त्री असते, हे त्यांना कळलेले असते. गुहेमधील योगी, तिन्ही प्रदेशांत जावून आलेला आहे, म्हणून ते तिघं, तीन टेकड्या व दोन नद्या ओलांडून ,योग्याच्या गुहेत येवून मार्गदर्शन मागतात. योगी त्यांना बसायला सांगून आत गडप होतो.

तेव्हा ती रक्षक स्त्री,--नियती---पैंजण वाजवत गुहेपासून लांब चालत जाते. अचानक त्या डोंगराच्या शांत प्रदेशात पैजणांचा आवाज आल्याने, तिघेही बावचळून जातात. ते उठून, गुहेच्या दारात जावून, परत येवून बसतात. पण त्यावेळी गडबडीत , त्यांच्या बसण्याच्या क्रमामध्ये ,त्यांच्या नकळत बदल होतो.

मधल्या काळात, योगी चिंतन करून बाहेर येतो. व घड्या घातलेल्या सूचनांच्या चिठ्ठ्या देतो. त्यालाही प्रवासी बसण्याच्या स्थान क्रमातील बदल कळत नाही. त्यामुळे खालील गफलत होते.----

१)उजव्या रस्त्याने गेल्यावर, सोन्याचा प्रदेश मिळतो. त्या प्रवाशाचा म्रुत्यू, लाल फुलाचा वास घेतल्यास होणार असतो. पण त्याला लाल मद्य न घेण्याची चिठ्ठी मिळते. त्यामुळे संध्याकाळी तो झोपडीत जातो. तेव्हा नियती स्त्री ,त्याला लाल सांजफूल वास घेण्यासाठी देते. स्वतः होवून तो फूलाचा वास घेवून मरतो.

२)डाव्या रस्त्याने गेल्यावर, अप्सरांचा प्रदेश मिळतो. त्या प्रवाशाचा मृत्यू, मद्य घेतल्याने होणार असतो.

पण त्याला लाल फळ न घेण्याची चिठ्ठी मिळते. त्यामुळे संध्याकाळी तो झोपडीत जातो. तेव्हा नियती स्त्री ,त्याला लाल मद्य देते. स्वतः होवून तो मद्य घेवून मरतो.

४)सरळ रस्त्याने गेल्यावर, सत्तेचा प्रदेश मिळतो. त्या प्रवाशाचा मृत्यू, लाल फळ घेतल्यास होणार असतो.

पण त्याला लाल फूलाचा वास न घेण्याची चिठ्ठी मिळते. त्यामुळे रात्री तो देवळात जातो. तेव्हा नियती स्त्री, त्याला लाल द्राक्ष देते. तो लाल फूल नको ,असे म्हणतो. तेव्हा ती त्याला म्हणते, "तू स्वतःच्या स्वपणात गुरफटून पडलेला एक सामान्य माणूस आहेस.स्वत:चा क्षुद्र अहंकार ठिकठिकाणी पुसत जाऊन पुन्हा त्या ठिकाणी हूंगून समाधान मिळवून राहण्याचा तुझा स्वभाव आहे.फूल म्हणजे एक साक्षात्कार आहे, किंवा त्यांचा रंग म्हणजे एक विलक्षण स्वर आहे, हे समजायला तर अहंकार विसरावा लागतो. ज्या ज्या ठिकाणी स्वतःला विसरावे लागते, त्या त्या ठिकाणी तू पूर्णपणे व्यर्थ आहेस. तू कधी कवी होणार नाहीस, ज्ञानी होणार नाहीस, तुला कधी प्रेम करता येणार नाही. तू कधी कोणाचा मित्र होवू शकणार नाहीस.अरे, तुला एखादे रोपटे देखील कधी आनंदाने जमिनीत लावता येणार नाही. हां, पण एका द्रुष्टीने तुझ्यासारखी माणसे आपापल्यापरीने फार सुखी असतात. तुला स्मशानात ठेवले तरी, इतर माणसे आडवी असता आपण मात्र उभे आहोत, असले गोगलगाईच्या घरासारखे सुख तू स्वतःसाठी काढशील, व त्यात चिकट समाधानाने राहशील.लाल फूल द्यायला तुझ्यासारखा अयोग्य माणूस मला शोधूनदेखील मिळाला नसता." नंतर, तो, नियती स्त्रीकडून, स्वतः होवून लाल द्राक्ष घेवून मरतो.

अशा प्रकारे, अशा छोट्या चुका होतात, पण त्यांचे भयानक परिणाम होतात. नियती अनाकलनीय असते, हे येथे, धक्का देवून दाखवले आहे. इतिहासात पंधरा

मिनिटे उशिरा मदत मिळाल्याने, नेपोलियनचा पराभव झाला, अशी कथा सांगितली जाते, असे हे उदाहरण आहे.

४)योग्याला स्व मृत्युचे पूर्व ज्ञान हवे असते. नियती स्त्री, त्याला, आधीच सांगते, "योगी, तुम्ही गाईच्या शिंगांवर , अडकून राहाल आणि पंख नसलेला प्राणी, आभाळातून येवून तुमच्या डोक्यावर आदळेल ,व तुमचा मृत्यू होईल." असे त्याला सांगते. त्यावर ही विधाने तर्कसंगत नाहीत, असे योगी म्हणतो. पण नंतर गोमुख नावाच्या सुळक्यावर तो असताना, घारीने पकडलेले कासव त्याच्या डोक्यावर पडून, त्याचा म्रुत्यू होतो.

भाग दोन : कथेची वैशिष्टये -

मृत्यू

या रक्तमुखी कथेत चार मृत्यू दाखवले आहेत.ते मृत्यू अगदी थोड्या वेळेत घडले आहेत. त्यावेळच्या वेदनांचे वर्णन, काव्य वाटेल अशा भाषेत केले आहे.

१)पहिल्या, सोन्याची महत्वाकांक्षा असलेल्या, प्रवाशाने, वर्ज्य लाल फूलाचा वास घेतल्याने त्याचा म्रुत्यू होतो. "त्याचे अंग सोनेरी, सुगंधी झाले. पण दुसऱ्या क्षणी त्याच्या अंगावर धग पसरली. ती धग त्याच्या डोळयापर्यंत पोहोचली, व सगळे नगर, शरीर, काळवंडून गेले."असे जीएंनी म्हटले आहे. सूचकतेने फुलाच्या प्रतिमेतून मृत्यू दाखवला आहे.

२)दुसऱ्या, अप्सरांच्या प्रदेशाकडे जाणाऱ्या प्रवाशाने वर्ज्य मद्याचा घोट घेतल्यावर, त्याचा मृत्यू होतो. "मंदीरातील शिल्पे रानभूल नृत्ये करू लागली. पण मग अंग पेटल्यासारखे झाले. वेदना ओठावर विरली व तो खाली पडला."असे म्हटले आहे. येथे अप्सरांच्या रानभूल नृत्यातून मृत्यूचा उल्लेख केला आहे.

३)तिसऱ्या प्रवाशाला सत्तेच्या प्रदेशात जायचे होते. त्याने वर्ज्य फळ, द्राक्षे खाल्ली. व त्याचा मृत्यू झाला. "मग त्याचा चेहरा ताणल्यासारखा झाला. डोळयांमागे तापलेले सर्प बेभानपणे धावले, एकमेकांत पडले. व तो वेडावाकडा खाली पडला."असे म्हटले आहे. या प्रवाशाची महत्वाकांक्षा सर्पांप्रमाणे निष्टुर सत्तेची असते. त्या प्रतिमेतून त्याचा मृत्यू सूचित केला आहे.

४)योगी, पक्ष्याला हात लावायला गेला. तेव्हा डोंगरावरून पडला. ठेचकाळत खाली आला. जळत्या तारा हिंदकळल्याप्रमाणे, त्याचे अंग यातनांनी चिंबून गेले. तो पडला व त्याच्यासमोर दिसणारा काळा पडदा त्याच्यावर कोसळला. जळजळीत आभाळाकडे त्याला पाहवेना. तेव्हा काहीतरी जड वेगाने त्याच्या डोक्यावर पडले. तेव्हा त्याचे अंग उजळल्यासारखे झाले. व त्याचे पाय वेडेवाकडे होवून, तो कोसळला. असे जीएंनी वर्णन केले आहे. योग्याला ध्यान करताना स्व मृत्यूचे चिंतन करताना काळा पडदा दिसत होता. पडद्याच्या प्रतिमेतून त्याचा मृत्यू सूचित केला आहे.

अशा प्रकारे जीएंनी या कथेत चार म्रुत्यू दाखवले आहेत. ते प्रत्ययकारी शब्द आहेत.

नियती व माणसाचे निर्णय—

१) नियतीच्या अनाकलनीयतेचा प्रत्यय या कथेत दाखवला आहे. योग्याकडून ज्ञान मिळून सूचना मिळतात. पण अनेक घटनांची साखळीने सूचनांची अदलाबदल होवून, प्रवाशांना त्यांचा म्रुत्यू टाळता येत नाही. म्हणजे संबंधितांना , नियती अनाकलनीय होते.

२)नियतीकडून योग्याला स्व-मृत्यूचे रमलशब्द कळतात. पण त्याच्या मर्यादित ज्ञानाने त्याला त्या रमलशब्दांचा खरा अर्थ लावता येत नाही.

३)तसेच त्याला,त्याच्या मर्यादित ज्ञानाचाही अहंकार होतो.त्यामुळे तो रमलशब्दांचा स्वतःसाठी विपरीत अर्थ घेतो.

४)नियती अक्राळविक्राळ असते असे नाही. तर नियती, साध्या रूपात, हळू पावलांनीही येते. फक्त ती, निर्मम, निर्दयी असते. हा पैलू येथे दाखवला आहे.

५) सुधारित अस्तित्ववाद- प्रत्येक वेळी, नियती स्त्री, प्रत्येक प्रवाशाला, तुला ही वस्तू हवी असेल तर घे. मी सांगते म्हणून घेवू नकोस, असे सांगते. पण प्रवासी, त्याच्या उपलब्ध ज्ञानाने, त्या वस्तूपासून आपल्याला धोका नाही, असे समजतो. व नियतीच्या मर्यादेत, ती वर्ज्य वस्तूच घेतो. माणसाला इच्छा स्वातंत्र्य आहे असे दिसते. पण ते 'इच्छास्वातंत्र्य', नियतीच्या मर्यादेत असते. हा सुधारित अस्तित्ववाद जीएंनी अधोरेखित केला आहे.

६) सुधारित नियतीवाद--नियती माणसाला अनाकलनीय आहे, म्हणून अटळ आहे, असे वाटते. योगी तिन्ही प्रदेशांमध्ये जावून परत येतो. तरी, स्वतःबद्दल, नियतीचा विचार कळत नाही. म्हणजे त्याला नियती अनाकलनीय आहे. जे कळते, ते रमलशब्द मिळूनही त्याला त्यांचा अर्थ कळत नाही. म्हणजे पुन्हा अनाकलनीयता येते. पण त्याचा मृत्यू, त्या स्थळीच, त्या काळीच होतो, अटळ असतो. म्हणून 'नियती अनाकलनीय आहे'.

म्हणूनच--- - -माणसाच्या द्रुष्टीने--अटळ आहे, असे येथे दाखवले आहे, असे वाटते.

अस्तित्ववाद व नियतीवाद यांमध्ये सुधारणा केल्या की 'जीएंचा नियतीवाद' हा द्रुष्टीकोन मिळतो.

७)मानवी ज्ञानाची मर्यादा जीए पुन्हा दाखवतात, ती वाक्ये, या कथेच्या भरतवाक्यांचा परिच्छेद आहे---

" योगी, तुम्ही अनेक अनुभव गोळा केले व ते पिंजून त्यांच्या ओतापोताने वस्त्र विणण्याचा तुम्ही आपल्या परीने प्रयत्न केलात. पण ही गोष्ट मात्र तुमच्या ध्यानी आली नाही. योगी, तुमच्यातील अज्ञ काय, ज्ञानी काय, प्रत्येक जण आपापल्या वर्तुळातच परिघाने सदैव बंदिस्त असतो. एकाचे वर्तुळ लहान असेल, तर दुसऱ्याचे त्याहून थोडे मोठे असेल. एकाचे वर्तुळ त्याच्या पावलाभोवती जमिनीवर असेल, तर दुसऱ्याचे कदाचित वर चढून, त्याच्या डोक्यामागे वलयाप्रमाणे दिसत असेल. एवढाच फार तर फरक असतो. तुम्ही माणसे जाऊन जाऊन जाणार तरी कोठे?"

याप्रमाणे 'रक्तमुखी' कथेत ,प्रामुख्याने भौतिक गरजांचा प्रत्ययकारी विचार केला आहे. त्यानंतर स्वज्ञानाचा विचार करणारा प्रवासी, 'अनंत'कथेत गेल्यावर काय होते, हेसुद्धा पहाणे महत्त्वाचे आहे. 'अनंत' कथेचा विचार सलगपणे पण पुढे करता येईल.

विनंती--वाचकांनी ही कथा मूळातून वाचावी ही विनंती.

विलास वाघोलीकर: चित्राचे स्पष्टीकरण

१) योगी त्याचे स्वमृत्यूचे चिंतन व कासव पडून मृत्यू २) अप्सरांच्या प्रदेशात ३) तीन प्रवाशांचे मृत्यू - पत्रिकाची अदलाबदल ४) सोन्याचा प्रदेश ५) सत्तेचा प्रदेश आणि मास्लोचा गरजांचा पिरॅमिड

दिलिप बडे: जी.ए.च्या कथांसारखी तुमची रेखाचित्रे बोलतात.तुम्ही चित्रांना कलरफुल करत नाही.हा निर्मोह आवडतो.

विश्वेश्वर नांदेडकर: अप्रतिमच. प्रगाढ व्यासंग आसल्या खेरीज असे लिखाण अशक्यच. अभिनंदन सर

दिलिप बडे: अवघड कथा सोप्याने समजावलीत.

सुनीळ सामंत: विलासजी आपल्या या पाचही चित्रांची जेवढी तारीफ़ करावी तेवढी कमीच. जीए स्वतः शब्दांतून नेमकी चित्रे निर्माण करत. त्यांच्या बहुतांश कथा या चित्रमयच आहेत. एखादा चित्रपट, वेगवेगळ्या कोनांतून कॅमेरा टिपत जातो तसे ते लिहीत. त्यामुळे त्यांच्या कथांचे रुपडे डोळयांसमोर असे. त्याला आपण रेषांमधून साकारले आहे. चित्रे पाहून मन सुखावतेच पण बुद्धीही सुखावते.

रक्तमुखी ही सांजशकुन या कथासंग्रहातील सर्वात मोठी कथा. इतर कथा तीन ते अकरा पानी आहेत. ही एकच कथा विस पानांहून मोठी आहे. अनंत आणि अहम या कथांबरोबरच ही कथा कालानुरूप शेवटची आहे. १९७४ ची. अनंत आणि अहम या कथांप्रमाणेच ही कथा पहाडांतली आहे. अहम मधे बैरागी, अनंतमधे महंत आणि रक्तमुखी मधे योगी आहे. तीनही कथांत प्रवास आहे. कारणे वेगवेगळी आहेत. तीनही कथांमधे अंत मृत्यूने होतो.

पण अहम मधे बैरागी काही क्षणासाठी का होईना विजयी होतो. अनंतमधे जगण्याचे वैय्यर्थ आहे. रक्तमुखी ही मात्र निखळ न्यतीवादाच्या विजयाची कथा आहे. तुम्ही कितीही आणि काहीही करा, जे नियत आहे तेच घडणार असे ही कथा सांगते.

विलासजींनी या कथेचे सूतोवाच इतके सुंदर आणि व्यापक केले आहे की त्यावर अजून काही लिहीणे अप्रशस्त ठरेल.

पण काही मुद्दे मांडू इच्छितो.

१) साधारण या (आणि प्रवासी आणि इस्किलार सारख्या इतर) कथा लिहिल्यानंतर जीएंनी लेखन थांबवले असे कळते. तो या कथांतील नियतीशरणतेचाच भाग असेल का?

२) असे वाटण्याचे कारण हे की जीए इतर अनेक लेखकांप्रमाणे लेखन आणि प्रत्यक्ष जीवन यात फ़ारकत करणारे वाटत नाहीत. ते जे लिहितात तेच त्यांचे स्वतःचे जीवनविषयक तत्त्वज्ञान असावे.

३) नियतीशरणता माणसाला inactivity कडे नेते का? जीएंचे खास चाहते हेही काही प्रमाणात नियतीशरण्य असतात का?

४) रक्तमुखी या कथेतील तीनही प्रवासी जर यशस्वीपणे आपापल्या प्रदेशात पोहोचले असते तरी ते कायम आनंदात राहिले असते की योग्याकडे परत आले असते? या सर्व जीवनाचे वैय्यर्थ जाणून.

दिलिप बडे: जी.एं.कथेतील पात्रांची नियती स्वतः ठरवत.जी.ए.जे ठरवतील तीच पात्रांची नियती.

विलास वाघोलीकर: मला ही कथा अपील झाली. १)एक तर ती मिथक कथा आहे. माणसाच्या इच्छांचा अतिरेक त्या माणसांना हवा असतो. उदा. स्टॅलीनला पूर्ण सत्ता हवी होती. अशांचे भागधेय दाखवणारी ही कथा आहे. अशांचा केविलवणा मृत्यू होण्याची शक्यता जास्त असते.उदा हिटलर. २) नियती आगांतुकपणे दाखवली आहे असे वाटत नाही. दुसरे असे की, एक छोटी चूक कशी जीवघेणी ठरते ते परिणामकारकपणे दाखवले आहे. ३) तिसरे, मृत्यू हा अटळ व अनाकलनीय आहे. कोणाचा मृत्यू कधी कसा 'अकस्मात्' येईल हे सांगता येत नाही. हे योग्याच्या उदहरणाने स्पष्ट केले आहे. कथा सुखान्त केली पाहीजे , असे नासी

फडके टाईप उदाहरण आवश्यक नाही. ४) या कथेत इच्छास्वातंत्र्य, नियती, मृत्यू यांबद्दल खोल, व सूक्ष्म विचार जीएंनी कलात्मकरित्या सूचित केले आहेत.

दिलिप बडे: संपत्ती, सत्ता, सौंदर्य तिन्ही भोग घेऊनही योगी शेवटी रक्तमुखीच्या ओठांची लालसा बाळगतो. हे अनाकलनीय वाटते.म्हणजे माणुस भोगातुन सुटत नाही.अध्यात्मातही टिकत नाही.

संजीव सावरगांवकर:

मृत्यू किती ही पाषाण हृदयी असला तरी जीवनापेक्षा तो नक्कीच अधिक दयाळू असतो. कथेमध्ये ही हे खरे व आयुष्यातही हेच खरे. आपल्या आयुष्यातील प्रत्येक प्रवाशाच्या खांद्यावरच दिसणारे, न दिसणारे इच्छांचे ओझे, त्या इच्छांची पूर्ती होण्याकरता केलेला अमाप, अनंत कष्टांच्या ओझ्याचे वजन, ते पाठीवर घेऊन अखंडपणे केलेला प्रवास हा सुख देणारा असावा असे प्रत्येकास वाटते. प्रवाशांचे स्वतःचे त्याबाबतची प्राक्तन, त्याच्या कपाळी लिहिलेले विधीलिखित, हे नियती सुद्धा बदलू शकत नाही. अप्राप्य स्वप्ना मागे धावणारे ते तीन यात्रिक असो किंवा सर्व तिन्ही प्रदेशात जाऊन आलेला योगी असो त्यांची विधी लिखीते अटळ आहेत. त्यांच्या त्यांच्या वेळी ती त्या त्या क्षणी घडणारी आहेत. आणि त्याला प्रत्येक वेळी साक्षी असणार आहे रक्तमुखी. ती अलिप्त आहे तिला कोणाच्या प्राक्तनाचा बदल करावयाचा अधिकार नाही. त्यात ती ढवळाढवळ करू शकत नाही. प्रत्येक क्षणी ती फक्त प्रेक्षक आहे. सूचक वाक्य बोलणे हा तिचा धर्म आहे. ती प्रत्येकालाच सावधही करत असते. सूचनाही देत असते. आठवणी पण करून देत असते. पण ज्याचा मृत्यूविनाश होणार असतो त्याला त्याच्यापासून वाचवण्याचा प्रयत्नही ती करत नाही. ती हे सर्व घडणारे पाहणारी (observer) नियती आहे.

या कथेच्या रक्तमुखी शीर्षकावरून जीए यांनी अगदी डायरेक्ट नियतीलाच नायिका बनवलेली आहे. ती रक्षिका आहे, प्रवाशांच्या करता मदतनीस आहे , तिचे स्वरूप सामान्य आहे. ती तरुण आहे, रूपवान आहे, पण ती एकदम निर्वीकार ही आहे. तिला द्वेष नाही, लालसा नाही ,मत्सर नाही, मात्र ती सहजपणे हत्या करते कारण तो तिचा स्वभाव आहे. अशी ही रक्तमुखी, कथेची नायिका. प्राक्तना प्रमाणेच प्रत्येकाचा जीव घेण्यास ती आसुसलेली आहे आणि प्रत्येक वेळेस ती त्यात सफलही होते.

माझ्या मते ही कथा खरी रक्तमुखी म्हणजे नियती व योगी म्हणजे अनुभवाने नियतीवर मात करून जिवंत राहिलेले योग्याची आहे. तो तिन्ही ठिकाणी जाऊन आलेला आहे, अर्थातच हे त्याचे भाग्य व प्राक्तन कारण नियतीचे कार्य त्याच्या मृत्यु पर्यंतच आहे. तो जिवंत परत आलेला आहे. त्याच्या अनुभवातून तो त्या त्या प्रदेशात जाण्याकरता इच्छुक प्रवाशांना मार्गदर्शन करतो. अनुभवाचे बोल ही सांगतोय. प्रवासाला जाण्याआधी काय काळजी घ्यायची आहे त्याची चिठ्ठी देतो आहे. प्रत्येक आसक्त प्रवासी त्याला दिलेली चिठ्ठी वाचून व स्वतःच्या कमतरता रक्तमुखीला सांगितल्यामुळे आपापल्या इच्छित प्रदेशात जाऊ शकत नाही. कारण त्यांच्या करता त्यांच्या ज्या कमतरता आहेत त्याच त्यांचे करता मृत्यूस कारणीभूत होतात. थोडक्यात त्यांची विधी लिखित मृत्यु असते. तर योगाने दिलेल्या चिठ्ठ्या त्यांच्या असलेल्या प्राक्तना मध्ये काही बदल करत नाहीत. जरी प्रत्येकाला चुकीची चिठ्ठी मिळाली असली तरीही.

कनक, कामिनी, सत्ता यांची उत्कट वेड्यासारखी, वासनांची तृप्ती होण्याची राक्षसी महत्त्वाकांक्षा, मानवाच्या शरीराच्या व किरकोळ स्वार्थांचे विचार मनी ठेवून प्रवासपूर्ती करण्याची प्रत्येकाची प्रबळ इच्छा पूर्ण होत नाहीत. त्या इच्छा नष्ट पावतात ते त्यांच्या स्वभाव वैशिष्ट्यांमुळे व स्वतःच्या नकारात्मक गोष्टी अनाहूतपणे स्त्री सौंदर्याला सांगितल्यामुळे.

पहिल्याला सोन्याचा सोस पण मद्य वर्ज आहे. दुसऱ्याला मद्याची लालसा आहे (मद्यपी असतो) त्याला लाल रंगाच्या वस्तू वर्ज्य आहे. पण मद्याचा घोट घेताच त्याच्याकडून मृत्यू कवटाळला जातो. तिसरा थोडा आढ्यताखोर आहे नेत्यासारखा आहे. आदेश देणारा आहे त्याला लाल फुल वर्ज्य आहे पण लाल द्राक्ष खाऊन तो मृत्युमुखी पडला. प्रत्येकाच्या मृत्यूनंतर रक्तमुखीने अनुक्रमे हनवटी गाल व कपाळावर आपले ओठ टेकवून नियतीची मुद्रा उठवून टाकलेली आहे.

मरणाला कवटाळण्याच्या अगोदर माणसाला कदाचित थोडे शहाणपण येत असावे. कथेतील योगी या गटातील मानव वाटतो. तो तिन्ही प्रदेशात जाऊन आलेला आहे. जिवंत परत आलेला आहे. त्याचा दिव्याने दिवा लावून पुढील मानव वंशाच्या करता एक पक्का रस्ता तयार करण्याचे प्रयोजन आहे. या तिन्ही प्रदेशात जाण्याकरता त्याच्या अनुभवाचा प्रवाशांनी फायदा करावा ही सदिच्छा आहे. अनेक प्रकाराने त्याचा अभ्यास झालेला आहे. अनुभव गाठीशी आहे. आपल्या चुका त्याला कळलेल्या आहेत. जर आतापासून जीवन जगण्याची पुन्हा एक संधी इतर मानवांच्या माध्यमातून मिळाली तर कदाचित आपली परिणीती काही वेगळी होईल असे त्यास वाटत असावे पण पुन्हा संधी इतर मानवांच्या माध्यमातून मिळत नाही संधी मिळत नाही मग ते कदाचित प्रश्न सोडवण्याचा जुना मार्ग बदललेला असतो म्हणून किंवा कथेमध्ये तर किंवा कशामध्ये माणसे ज्या क्रमाने पहिल्यांदा बसलेले होते तो क्रम नियतीच्या नुसत्या पैंजणांच्या आवाजाने व क्षणा भराच्या दर्शनाने जागेवर परत येतात तेव्हा क्रम बदलून ते तिघेही बसतात हे योग्याच्या निदर्शनास येत नाही. त्या तिघा माणसांनी क्रम बदललेला त्यामुळे त्यांच्या चिठ्ठ्या बदलल्या आणि प्राक्तनात नव्हते ते भोगावे लागून मृत्यू समीप करावा लागला आहे. इथे अनुभवापेक्षा नियतीचा खेळ महत्त्वाचा ठरलेला आहे. आता योग्याच्या हाती त्या तिघांचा मृत्यू ऐकल्यानंतर काय उरले आहे ? आत्तापर्यंत त्याच्या नशीबात आलेले क्षण तो आपल्या साऱ्या शक्त्यानिशी जगतोय एवढेच त्याचे हाती उरते. त्याला आनंद

मिळाला तर त्या क्षणापुरता मिळतो. रक्तमुखीशी बोलताना तो म्हणतो "तुला निश्चित यशाची इतकी सवय झाली आहे की असल्या अपयशाने तु दुःखी होणारच" रक्तमुखी तिच्या ललाटी असलेले अटळ विधी लिखित सांगते "मी एक केवळ साधन आहे, मी काही योजीत नाही, काहीही घडवत नाही, त्याचप्रमाणे घडणारे मी काही थांबवू पण शकत नाही. माझे जसे कपट नाही तसे योगी महाराज तुमचे वैगुण्य पण नाही. पण त्याचे वैगुण्य तिला माहित आहे. एवढे ज्ञान प्राप्त केल्यावरही त्याला आता एक विशाल काळा पडदा नजरेसमोर दिसतो. त्याच वेळेस रक्तमुखी त्याचा मृत्यू क्षण व जागा सांगते. योगी यावर हसतो व म्हणतो "त्या विजयाच्या क्षणी तुझ्याशी एक शब्द तरी बोलण्याची संधी मिळण्याची माझी इच्छा आहे".

त्याच्या अंतिम क्षणी तो नियतीला म्हणतो की माझ्याबाबत तुझे शब्द खोटे झाले आहेत. त्याचा ती इन्कार करते व म्हणते " हे मानवा तुम्ही अनेक अनुभव गोळा केले ते पिंजले त्याचे वस्त्र विणण्याचा प्रयत्न केलात पण ते विफल आहे. योगी तुमच्यातील अज्ञ काय, ज्ञानी काय, प्रत्येक जण आपापल्या वर्तुळातच परिघाने सदैव बंदिस्त असतो. वर्तुळ लहान एकाचे मोठे एकाचे पावलाभोवती जमिनीवर असेल तर एखाद्याचे डोक्यामागे वलयाप्रमाणे एवढाच फरक शेवटी तुम्ही माणसे जाऊन जाऊन जाणार तरी कोठे?? (तुम्हा मानवांना माझे, तुमचे नियतीचे आकाशवर्तुळ पाहणे , मनात आणणे, त्याची कल्पना करणे शक्यच नाही व नसते) म्हणून तुम्ही सर्व जण कायम नियती शरण आहात. अंततः तिने आपले ओठ योग्याच्या ओठावर टेकले व त्याचे मृत शरीर खाली ठेवले.

मृत्यू क्षणी योग्या च्या मनात कदाचित खालील विचार आले असतील

जिना भी आ गया मुझे, मरना भी आ गया |

हे मृत्यु समजने लगा हू अब, तुम्हारी नजर को मै ||

या कथेवर अनुमान करायचे म्हटले तर असे म्हणावेसे वाटते की उत्कृष्ट कलाकृतीच एक अनिवार्य तर्कशास्त्र असतं. त्याच्यापुढे कलाकाराची/ लेखकाची मात्रा चालत नाही. पात्रे कल्पिणे फक्त त्याच्या हाती असतं पण कथा मात्र कथानकाच्या रुळावर चालते ती पात्रांच्या म्हणण्यानुसार, लेखकाच्या नव्हे. इथे रक्तमुखी नियती करता ते नाव घेऊन येते. अशी ही जी.ए. ची कथा व्यापणारी त्यांची लाडकी नियती. त्यामुळेच रक्तमुखीचे कथेतील तर्कशास्त्र व वाचकांचे तर्कशास्त्र हे सोबत चालताना दिसतात.

म्हणून "नियती रक्तमुखी " त्या चौघांच्या मृत्यू पटलावरचे रमल सहजरीत्या खेळून पट व डाव दोन्हीही जिंकते हे या कथेचे वैशिष्ट्य ठरेल

विश्वेश्वर नांदेडकर: या कथेत योगी प्रवाशांना चिठ्ठ्या का देतो तोंडी सूचना का देत नाही हा प्रश्न नक्की पडावा.

परमजीत सिंग : जी ए ना पडला होता का? जर पडला असता तर त्यांनी तोंडी सूचना दिल्या असत्या. नाही ना मग आपण विचार करणारे कोण?

विश्वेश्वर नांदेडकर: मला पडला. कारण देवाने मलाही विचार करायची बुद्धी दिली आहे

परमजीत सिंग: बुध्दी सर्वांना आहे. ते लिहून गेले ना मग संपलं. त्या पुढे आपण विचार करायचा नाही.ते जर हयात असते तर, गोष्ट वेगळी होती

विलास वाघोलीकर: आपण कथेचा सारांश छान सांगितला आहे. योग्याच्या मनातले विचार अगदी योग्य सांगीतले आहेत. तिन्ही प्रदेशांतून जावून आल्यामुळे, चिंतन करून थोडे फार भविष्य कळत असल्याने आपण पुढील प्रवाशांना मार्गदर्शन

करून त्यांचे मृत्यू टाळू शकू व त्यामुळे नियतीचा पराभव करू शकू असा, नियतीचाही पराभव करायला निघालेला योगी मानव आहे. पण तो त्यांचे मृत्यू टाळू शकत नाही. स्वमृत्यू टाळू शकत नाही व नियतीला पराभूत करू शकत नाही. रक्तमुखी स्पर्श करते तो kiss of death आहे तो कोणी टाळू शकत नाही. आपला 'आकाशवर्तुळ' हा शब्द मला आवडला. आधुनिक मानवजातीला हे आकाशवर्तुळ - अवकाश विज्ञान भेदता येईल का हा प्रश्न आहे. एका मर्यादेपर्यंत या आकाशवर्तुळाचे ज्ञान मिळेल. पण माणसाकडे कमी उर्जा असल्याने मानवजात आकाशवर्तुळाला भेदू शकणार नाही. आपल्यासारख्या साक्षेपी वाचकांनी जीएंच्या प्रत्येक कथेवर लिहिणे आनंददायी आहे. तरी धन्यवाद.

सुनीळ सामंत: ही कथा योगी आणि नियती यांच्यातील द्वंद्व आहे या दृष्टीने पाहिल्यावर या कथेचा आयामच बदलून जातो. यावर अधिक विचार करून लिहितो. पण यावेळी मला अजून एका कथेची आठवण होते आहे. एका देवाचा मृत्यू. या कथेत नियतीवादाचे सूत्र अत्यंत ठळकपणे सांगितले आहे.

दिलिप बडे: चार मृत्यू.निर्विकारपणे घडतात.त्याची कारणे असली काय-नसली काय.

सुनीळ सामंत: आतापासून जीवन जगण्याची पुन्हा एक संधी इतर मानवांच्या माध्यमातून मिळाली तर हे आवडले. मला वाटते हाडाचे शिक्षक, पालक हेच करत असतात. जे आपल्याला मिळवता आले त्याहून वरचे आपल्या विद्यार्थ्यांनी वा पुढच्या पिढ्यांनी मिळवावे.

FURTHER. READING    Kiss of death..

या कथेत या वाक्प्रचाराचा संदर्भ आला आहे. इंग्लीश साहित्यात हा प्रसिद्ध वाक् प्रचार आहे. त्याचा ज्यूडास - माफीया इत्यादी प्रसिद्ध संदर्भ आहे. जीएंचा इंग्लीश साहित्याचा अभ्यास प्रचंड होता. त्यामुळे त्यांनी या वाक्प्रचाराचा कथेत योग्य उपयोग केला आहे. Further Reading म्हणून गुगलमध्ये पाहिल्यावर खालील संदर्भ मिळाले.

[Oo exact origin is unknown, but an Italian source identifies the bacio della morte as the kiss given to the assassin delegated to "execute" a death sentence, as if to seal the solemn judgment and to wish success on the assignment.

[Oo later Simpsons episode, "Mayored to the Mob", Fat Tony asks Homer Simpson to give Mayor Quimby a gift for him, being that Homer recently became the M…

विलास वाघोलीकर: https://images.app.goo.gl/xEiX2tNASjnunZEc8

दिलिप बडे: अहंम ही कथा प्रयत्नवादाचे महत्व आधोरेखीत करते.म्हणजे नियती जर सार्वत्रिक-सार्वकालीक आहे.तर प्रयत्नवाद सुद्धा सार्वत्रिक- सार्वकालिक ठरतो.त्यामुळे कोणा एकाचे समर्थन-असमर्थन गैर ठरते.

विलास वाघोलीकर: अहम् मध्ये नायक तात्पुरता बंधारा घालून प्रवाह अडवतो. खाली पहातो तर मधे फळ घेतलेला म्हातारा मेलेला असतो. सकाळी पानांवर थेंब पडलेले असतात. (रात्री पाऊस पडलेला असतो) नायक फांदीचा

आधार घेतो. पावसाने नदीला पूर येवून लोंढा येतो. ते झाड व नायक, त्या लोंढ्याबरोबर वहात जावून दरीत पडतात. कारण न कळणारी म्हणून नियती म्हटले, तर नियतीच्या लीला येथेही आधी कळत नाहीत. प्रयत्न करणे आपल्या, नायकाच्या हाती होते. पण फळावर मात्र अधिकार नाही. (विदूषक) यानिमित्ताने वाटते, आपण जीएंच्या जीवन चिंतनावर छोटा- मोठा लेख लिहिल्यास ते सर्वांना उपयोगी होईल.

दिलिप बडे: जे दिसत ते आपण पहात नाही,जे आपण पहातो ते आपणास दिसते. रक्तमुखी-नियती-ही संकल्पना मानव निर्मित आहे.कारण तिचे परिणाम अन्य ग्रह किंवा अवकाश यावर परिणाम करत नाहीत.पृथ्वीवर मानव तयार झाला आणि नियती सुरू झाली.मानवी जीवनाचे ध्येय आनंद व शांती असेल तर आपला प्रवास आनंद व शांतीचा शोध असा असायला हवा.प्रकाशाचा शोध आणि अंधारातील प्रकाश ही आपल्याला दिसायला हवा. मला प्रकाश दिसतो आणि मी अंधार पाहतो दोहीतील फरक आपण विचारात घेऊ या. मानवाला नियतीने मुर्त्यूच्या मर्यादेत अनेक शक्ती बहाल केल्या आहेत. त्या शक्तींचे आपण वाहक होऊ या.

जी.एं.नी आपल्या कथांमधुन प्रकाशातील अंधार अचुक टिपला आहे.तो जी.एं.चा समस्त मानवजातीला आशिर्वाद आहे.

डॉ माधव पुराणिक

: दिलीप बढे यांचे विचार -अनुमोदन

१ मानवाकडे शक्ती आहे (प्राण, बुध्दी,मन, चैतन्य, अस्मिता,चित्त इ.)

२ व्यवहारात ही शक्ती पंचमहाभूतांच्या विविध रूपातून व्यक्त होते (पंचमहाभूते, शब्द,रूप ,रस,गंध, स्पर्श, १० इंद्रिये)

३ प्रत्येक जण त्याच्या कुवतीनुसार अनुभव घेतो, व्यक्त करतो.

४ जगातील सर्व महान प्रतिभावानांचे (जी ए सह) अनुभव (लेखन) हे आपल्या प्रत्येकाला उपलब्ध आहे. त्यावर समीक्षा पण आहे.

५ यातून प्रत्येक जण जगत असतो. कृती करतो. आकलन वाढवित असतो.

६ प्रत्येकाच्या बोलण्यावरून, लिहीण्यावरून त्याला जीवनाचे (जन्म, जीवन, मृत्यू यांचा अर्थ) जे आकलन झाले आहे त्याचा इतरांना अंदाज येतो

७ माणसांच्या अनुभवाचे साधारण ४ प्रकार असतात

अ) आदिम, प्राणी पातळीवरील अनुभव ( भूक, तहान, झोप इ.)

ब) व्यावहारिक, सांस्कृतिक,भाषिक, इ सर्वसाधारण सामाजिक मान्यता असलेले ( रसिक, सुसंस्कृत, सुशिक्षित, कलांचा आस्वाद घेणारा इ)

क) प्रत्यक्ष लेखक, चित्रकार, कवी, गायक इ

ड ) अध्यात्मिक अनुभव ( ध्यान,जप इ)

( अनुभवांचे स्तर - शारीरिक, मानसिक, भावनिक, बौद्धिक, शाब्दिक,भाषिक, आत्मिक इ)

८ काहीवेळा / बहुतेक वेळा क प्रकारचे अनुभव उपजत क्षमतेतअसयात ( व्यासंगाने विस्तारतात)

ड प्रकारचे अनुभव बऱ्याच वेळा प्रयत्न केल्यास येऊ शकतात

९ सत्याकडे अनेक मार्गांनी जाता येते.

१० अशा प्रकारे कोणी नियती मानून पुढे जाउ शकतो. कोणी प्रयत्न करून. इ.

११ शेवटी अंतिम कसोटी एकच आहे. मृत्यू पूर्वी स्वत:ला सांगता आले पाहिजे जे त्याला समजले ते.

किंवा लेखनातून इ ते व्यक्त करण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

१२ माणसाला विविध प्रकारच्या शक्ती उपलब्ध आहेत उदाहरणार्थ,

१ जी ए सारख्या अनेकांचे लेखन

२ अध्यात्मातील मार्ग - अनुभव घेऊन

१३ या सर्व गोष्टींवरून मला दिलीप बढे यांचे म्हणणे (माझ्या प्रत्यक्ष अनुभवावरून)पटले. जे मला अनुभव आले ते मी कवितांमधून/ प्रत्यक्ष जगण्यातून (कृती) ,/जी ए गटचर्चेच्या टिपणांमधून व्यक्त करायचा प्रयत्न केला.

सुनीळ सामंत: ’’जीएंच्या कथांतील नियतीवाद’ या विषयावर एक सखोल चर्चा व्हावी. ती चर्चा या ग्रुपवर आता तरी करणे योग्य नाही कारण सध्या आपण एकावेळी एक कथा घेऊन चर्चा करीत आहोत. त्यामुळे या स्वतंत्रविषयावरी स्वतंत्र चर्चेसाठी वरील सर्व मुद्दे "जीए मुक्तचर्चा" या समूहावर पाठवत आहे. कृपया सर्वांनी या चर्चेत आपापले निरिक्षण व विचार त्या ग्रुपमधे मांडावेत ही विनंती..

# रत्न- जी ए कुलकर्णी- काजळमाया

सुनीळ सामंत:

रत्न ही कथा जीएंच्या अत्यंत उत्कृष्ट कथांपैकी एक आहे. ही अप्राप्याचा ध्यास असलेल्या एका युवकाची कथा आहे. रत्न म्हणजे अंतिम सत्य जे फक्त त्या युवकालाच जाणवते. पण तो ते इतरांसमोर व्यक्तही करू शकत नाही. त्यामुळे त्याला घर गाव देश सोडावा लागतो. त्याची आई त्याला निरोप देताना म्हणते आज दुसऱ्यांदा आपली नाळ तुटते आहे. ही नाळ केवळ आईशीच नव्हे तर संपूर्ण समाजाशी तोडल्याशिवाय तो पुढील प्रवासाला जाऊ शकत नाही.

या पुढील प्रवासातील वर्णन केवळ जीएंच्याच शब्दात वाचले पाहिजे म्हणून ते वेगळे खाली देत आहे...

त्याची पावले त्याच अधीर तृष्णेने तशीच सदैव चालत राहिली. गोपुरांच्या आणि महाद्वारांच्या शिलाखंडांच्या कणाकणात शिल्पाकृती साठवणाऱ्या भव्य मंदिरांचा, विविध पुष्पांच्या सुगंधाने कुरवाळलेला प्रदेश; क्षितिजापयेत अमर्याद पसरलेल्या सागराची सुवर्णकणांसारख्या वाटणाऱ्या वालुकेच्या तीराशी होणारी शुभ्र संगमरेषा व तिच्या फेनील काठचे अबल पक्ष्याच्या पंखांसारखे अतिपर्ण असलेले तालवृक्ष; अहोरात्र ओलसर वाफेचे उच्छ्वास उमटत असलेले, सर्वत्र हिरव्याच रंगाचे, एकरंगी भीमसाम-चे उग्र बनप्रदेश; त्यांतील हिरव्या रंगात एकदम वेदनेचे व्रण दिसावेत त्याप्रमाणे लखकन दिसणारे लाल-पिवळे पक्षी; आणि वृक्षांच्या राक्षसी फांद्यांवरून नीरवपणे सरकत त्यांना एकामागोमाग विशवत बाणारे अजस चित्रसपै;???? जळत असलेल्या पावलांखालीच सावलीचा तुकडा सांभाळत शिरावर प्रज्वलित अमिकुंड घेऊन तुडवत जावा लागणारा रखरखीत मरुप्रदेश; अंगातील उष्ण रक्त देखील गोठवणारा, सर्वत्र विशाल शववस्त्र पसरल्याप्रमाणे हिम

पसरलेला, ऐन माध्यान्ही चंद्रप्रकाश दाखवणारा, परंतु विविधरंगी मोरपंख विस्तारल्याप्रमाणे प्रकाशरंगाची शोभिवंत माया रात्री प्रकट करणारा हिमप्रदेश; जेथे अनेक शतके वैभव नांदले, परंतु जेथे आता एखादे भग्न देवालय, एकाकी उरलेला वधस्तंभ, प्रासादांचे करुण अवशेष यांविना काहीच उरले नाही अशी काळाच्या जर्जर स्मृतीसारखी वाटणारी शापित महानगरे... या साऱ्यांच्या विस्तृत पटावर त्याची पावले अनिवार्य अतृप्त अशा ओढीने चालत राहिली आणि श्रमाने त्याच्या शरीराची लक्तरे झाली. या अखंड भ्रमंतीत त्याला रत्ने दिसली नाहीत असे नाही. शुभ्र प्रकाश स्वीकारून परत देताना सहस्ररंगी सौंदर्य अर्पण करणारे अप्सरानेत्र; गवताच्या पात्यालादेखील हिरव्या रेषेचे सौम्य जीवन जगायला जेथे स्थान नाही अशा वणव्यासारख्या बालुकामय प्रदेशालाही आदिवसंतांचे हरितवैभव देण्याचे सामर्थ्य असलेले मरकत; विश्वाच्या अंत्यदिनी तांडवनृत्याने दिशा कोसळत असता अमी आणि रक्त यांचा वर्षाव होत असल्याचे रुद्रतेज दाखविणारे शोणित रत्न; एखाद्या इंद्रजाल-जगताचे गवाक्ष असल्याप्रमाणे वाटणारे व्याघ्रनेत्र…

----

प्रवाशाला जेव्हा पुढील प्रवास करणे अशक्य वाटते तेव्हा त्याला एक जख्ख म्हातारी भेटते ती त्याला समोरील पहाड ओलांडून कसे जायचे ते सांगते या रूपकाचा अर्थ मला समजलेला नाही.

पहाड ओलांडल्यानंतर प्रवाशाला एक हिमनदी आडवी येते व तिथे त्याला कृष्ण गरुड भेटतो. आपली उरली सुरली शक्ती त्या गरुडाला त्या दान केल्यानंतर प्रवासी रत्नप्रदेशात पोहोचतो तिथे त्याला असंख्य मानवांचे सांगडे दिसतात आणि अनेक प्रकारची रत्नेही वेगवेगळ्या स्वरूपात वेगवेगळ्या मुर्त्यांना जखडलेली दिसतात आपली शक्ती संपलेली असतानाही प्रवासी सांगाड्यातील अस्थिंचा वापर करून रत्न मिळवतो पण ते रत्न दाखवण्यासाठी कोणीच नसते. या वेळेपर्यंत प्रवासीही निर्मल निर्मम अवस्थेला पोहोचलेला असतो ती वृद्धा त्याला पुन्हा एकदा

भेटते. त्याच्या हातातील द्रोणामध्ये त्याने रत्न धरलेले असते परंतु इतरांना म्हणजे ती वृद्धा किंवा कावळा यांना यातले काहीही दिसत नाही

या कथेचे मर्म मला नेमके समजलेले आहे असे वाटत नाही. अप्राप्य रत्न म्हणजे ज्ञान असावे असे वाटते.

जाणकारांच्या उत्तरांची व विवेचनाची वाट पहात आहे.

ही कथा वाचतानाच समोर अतुल ठाकूर यांचा लेख आला. त्यातले एक वाक्य फ़ारच महत्वाचे वाटले- जीएंच्या कथा या आत्मकथा आहेत- अशा आशयाचे ते वाक्य आहे. त्या अर्थाने ही कथा वाचण्याचा प्रय्त्न केला. पण तरीही अर्थ लागला नाही.

विलास वाघोलीकर:

मी कथा वाचत आहे. कथा मोठी व गुंतागुंतीची आहे.त्यामुळे अपेक्षेपेक्षा जास्त वेळ लागेल. क्षमस्व. कथेचा आवाका जी एंच्या जीवनचिंतनाचा आहे, एवढे जाणवते. धन्यवाद.

रत्न कथा-

ही कथा, रूप कथा आहे. तसेच स्वप्न व जागृत अवस्थेतील मध्यावस्थेत, वर्णन केलेली कथा वाटते. ठिपका, अनंत, विदूषक, ऑर्फियस, कांचनमृग , मत्स्यकन्या.. अशा अनेक कथांचे प्रतिबिंब या कथेत असल्याने नेटाने वाचावी अशी ही महत्वाची कथा आहे.

कथेत रत्न या भौतिक वस्तूचा शोध दाखववला असला तरी मतितार्थाने शोध हा अंतिम ज्ञानाचा, जीवन साराचा आहे. त्यासाठी परिवार, प्रदेश, शरीरातील हाडा - स्नायूची शक्ती व शेवटी रक्तही सोडावे लागते. किंवा ज्ञान शोधात हाडाची काडे -

त्याग करावा लागतो हे मान्य होईल. सहस्त्र रंगी अंतरंग उजळून निघणारे रत्न, ज्ञानाचे जीवन साराचे असणार. ते मिळाले असे वाटते पण नंतर टाकून द्यावे लागते. ‘अनंत’ या कथे प्रमाणे शेवटी ते शून्याकारही नाही हे कळते. पोकळ गोलाकाराच्या चकतीत काही द्रव्य नाही हे तेथे कळते. त्या कथेत जसा ट्रेजर हंट आहे – तशीच एकामागून एक समस्यापूर्ती आहे, तशी या कथेतही त्याग करत पुढे पुढे जावे लागते. वृद्धा, कृष्ण गरूड यांचे घनदाट जंगल, वेगवान प्रवाह, हिमखंड, सपाट हिमप्रदेश हे वर्णणीय आहेत - सूचक आहेत. ‘ऑफियस’ या कथेप्रमाणे, पूर्ण ज्ञान हे परस्पर विरोधी शब्द आहेत. ज्ञान मिळते तेव्हा ते पूर्ण नसते. पूर्ण झाले की ज्ञान मरते. म्हणून ज्ञान हे फळ नसून प्रक्रिया आहे. या विचाराने या प्रदेशातून त्या प्रदेशात जाण्यासाठी, ज्ञानाच्या पायऱ्या ओलांडाव्या लागतात. विदूषक कथेतील सुभाषिता प्रमाणे येथेही सारवाक्ये आहेत. रत्नाचे वर्णन, प्रदेशांचे वर्णन ,मृत्यूचे , जीवनाचे वर्णन हे सर्व ,जीएंनी गद्य काव्यात केले. ते सर्व अद्वितिय आहे. शेवटी मृत्यूच्या शिळेचे प्रखर वर्णन केले आहे.

कृष्ण गरूडाने मृत्यूची शिळ मारली की रेशमी धागा तुटावा तसे जीवन तुटते. आकाशाला स्पर्श करू इच्छिणारे वृक्ष उन्मळून पडतात. अपत्याला घास देणारी माता घास अर्ध्यावर सोडते (' बाळघास') - पित्याची पावले अर्ध्यावर निर्जीव होतात. प्रेमिकांचे कूजन अपूर्ण राहते. गायिकेच्या कंठातील गीत नष्ट होते. जीवन उध्वस्थ होते. अश्रू वाहू लागतात. अनिश्चित कालासाठी भविष्यातली शृंगारलेली मूढ स्वप्ने नष्ट होतात.

रत्न मिळाले असा भ्रम होतो.पण वास्तवात ती मृत्यूस्थिती असते असे दाखवून जीएंनी कथेचा शेवट केला आहे.

कथा रत्न चा शेवटचा भाग -

हळूहळू अंधाराची घनता कमी झाली व नदीचा प्रवाह ओसरू लागताच एकेक वस्तू प्रवाहावर स्पष्ट दिसू लागावी त्याप्रमाणे भोवतालचे जीर्ण मंदिर, रथागार,

परिसरातील चाफा, प्रकाशात उजळू लागले. चाफ्यावर रात्रीत उमललेली चारसहा फुले दिसू लागली. काही वेळाने मंदिराच्या स्तंभावरील धनुधारी द्वारपाल, भग्न गोपुरावरील वीरा-सनातील आकृती, तोरणावरील पद्मस्थ मूर्ती याही स्पष्ट होऊन त्यांचे डोळे स्वच्छ प्रकाशात अनिमिष पाहू लागले. मंदिराच्या अंगणात एक वृद्धा काठी टेकत दोन गाई मागोमाग आली, व थांबून तिने ओवरीत पसरलेल्या शांत आकृतीकडे नजर टाकली.तिने एकदोन हाका मारल्या, व काठीने त्याला हळूच डिवचून पाहिले. अखेर तिने हातातील गाठोड्यातून भाकरीचा एक तुकडा एका द्रोणात घातला, व द्रोण त्याच्याशेजारी ठेवून ती गाईमागोमाग निघून गेली.

ती जाताच कर्कश आवाज करत एक कावळा खाली उतरला, व त्याने द्रोण प्रास्ताविक हालचालीने पुढे ओढला. झोपलेल्या मनुष्याकडून काहीच प्रतिकार न झाल्याने त्याने निर्धास्तपणे द्रोणातील अन्नाचा तुकडा उचलला, व रिता द्रोण रित्या ओंजळीशेजारी टाकून सळसळा पंख हलवत तो मंदिरावर जाऊन बसला. आणि तेथे तो समाधानाने काव काव करू लागला !

संजीव सावरगांवकर:

लेखकांची साहित्य लेखन लेखनाबाबत वर्गवारी करायची म्हटली तर ८० टक्के लेखक सामान्य लेखन करतात, १५ ते १८ % लेखक सप्रयोग व गुणसंपन्न लेखन करतात, मात्र केवळ दोन टक्के लेखक जीनियस किंवा अलौकिक बुद्धीवैभव व लाभलेले प्रज्ञावंत असतात. जीनियस लेखक याबाबतचे चिंतन खालील विचार प्रकट करते.

GENIUS IS MASTER OF MAN, GENIUS DOES WHAT IT MUST AND TALENTS DOES WHAT IT CAN.

मराठी वाङ्मयात जीएन चे स्थान जीनियस या विशेषणाकरता अग्रभागी आहे आणि भविष्यातही ते असणार आहे. त्यांची प्रत्येक कथा म्हणजे एकेक पैलूदार हिरा व एकेक दैदिप्यमान रत्नच होय.

रत्नही अशीच एक चौपेडी कथा आहे. आधी तर पहिला दुसऱ्या वाचनात त्या कथेचा आवाका लक्षातच येत नाही. शांतपणे तिसऱ्या चौथ्या वाचनात ती थोडीफार समजते, उमगते पण त्यावर लिहावयाचे म्हटल्यावर त्यावरील मनात येणारे विचार , कथेतील पल्लेदार वाक्ये व त्यातील गर्भित अर्थ समजून घेताना आपली कथेचे बाबतची आकलन क्षमता व आस्वाद शब्दांकित करण्याची बौद्धिक कुवत अत्यंत कमी आहे हे कळते. शब्द संपत्ती जवळपास नाही हेही जाणवते. जीवाची घालमेल होते. लिहिण्याची उर्मी येऊन सुद्धा, मेंदूतून शब्द बाहेर पडत नाहीत. मग कथेतील रत्न वेडा व मी आस्वादक वेडा एकमेकांसमोर उभे ठाकतो. आश्चर्य चकीत होऊन एकमेकांच्या कडे पाहत बसतो. मग लक्षात येते की "आपल्या पावलांचा प्रवास आपणच ठरवण्याचे सामर्थ्य सुद्धा आपल्यात असत नाही". "तो बदलण्याची अगर थांबवण्याची शक्ती देखील आपल्याला लाभत नाही". इतका तो प्रवास अटळ, अनावर असतो. येणाऱ्या प्रवासातील समोर दिसत असलेला गावकुस असो, तुडवावे लागणार वाळवंट असो, अगर एकही हिरवा स्पर्श नसलेली टेकडी असो, आईच्या नात्याची नाळ असो का द्रोणात दिलेली माजघरातली चिमूटभर माती असो, त्या रत्नाच्या प्राप्तीचा ओढीमुळे घडत जाणारा प्रवास, येणाऱ्या अडचणी, शारीरिक व मानसिक दमणूक हे सर्व त्या रत्न वेडा मानवा कडून त्याचे विधिलिखित व नियती सर्व घडवून आणत असते. कथेचे सार एक वेगळ्या दृष्टिकोनातून खालील शब्दात प्रकट करता येईल.

घटावरी कोणी मारीत काठी, दुभंग हो माती |
या मातीची कथा सांगणे, इतके आमच्या हाती||

अटळ जे जे ठरलेले ते, जन्म आणि मृत्यू ||
नियती खेळते निर्घृण तरीही, सर्वांशीच हुतुतू ||
कथा सांगतो कथेकरी तुम्हा, कथा आम्ही जगलो |

जगताना त्या व्यथा लाखदा, पुन्हा पुन्हा मेलो ||

आता या कथेचे बाबतची सुरवात. या कथेतील चार पेड म्हणजे त्या वेड्या माणसाचा "ध्यास" पूर्ण जगा वेगळा आहे. त्याच्या नजरेसमोर ते रत्न धरले तर त्यातील तेजामुळे आपले सारे अंतरंग ही उजळून निघाले पाहिजे असा त्याचा आग्रह आहे. हा निग्रह त्याच्या लहानपणापासून त्याच्याशी नियतीबद्ध आहे त्यातून सुटका करून करून घ्यायचे स्वातंत्र्य त्याला नाही. तर ते तर ते त्याचे कर्म आहे. असे हे रत्न म्हणजे त्याला होणारी मोक्ष प्राप्ती का??) काही मानवांना हे रत्न प्राप्त झालेले आहे. ते रत्न त्रिनेत्री असून (म्हणजे मानवाचा तिसरा डोळा का??). ते अनंत-रंगी आहे. याच्या एका कक्षेत चंदनाचा गंध असलेल्या चंद्रिकेची शीतलता आहे तर दुसऱ्या कक्षात आदिसूर्याच्या प्रखरतेची तप्तता आहे.

यातील पुढील दोन पेड म्हणजे पहिला कृष्ण गरुड व दुसरा सुवर्ण गरुड हे कायमच एकमेकांना पूरक राहिलेले आहेत. ही संकल्पना जी. ए. यांनी रामानुजांच्या तत्त्वज्ञानातून उचललेली आहे. जी. ए. नियती व्यतिरिक्त बाहेरील शक्ती मानतात.

त्यातील काळपुरुष म्हणजे कृष्ण गरुड हा सर्व मानवांच्या सुखदुःखांचा भूतकाळ होय (म्हणजे कृष्ण गरुडाचा डावा डोळाच की तो). तो अनादी आहे, अनंत आहे पण मानवा जिवांशी तो सतत खेळतच असतो. तर असा हा कृष्ण गरुड संहाराचे प्रतीक आहे तर सुवर्ण गरुड हा निर्मितीचे प्रतीक आहे. या दोघांमधील कोणीच कधीच मृत्यू पावत नाहीयेत. व या काळया पांढऱ्या म्हणजे जन्ममृत्यूच्या रंग गोट्याचा खेळ अखंड अव्याहत चालू असतो व राहतो. आळीपाळीने हे कृष्ण व सुवर्ण गरुड होत असतात. म्हणजे एकाचा अंत हा दुसऱ्याचा चा जन्म असतो. चिनी यिन यांग च्या तत्त्वज्ञानाप्रमाणे मृत्यू बरोबर जीवन संपते, जन्माबरोबर जीवन सुरू होते. (पण मृत्यू बरोबर काहीही संपत नाही हे मात्र खरे नाही कारण मृत्यूनंतर जीवन

म्हणजे कठोपनिशद , ते आत्म्याचे जीवन व त्यास मृत्यू नाही) मोक्ष(रत्न)प्राप्ती बरोबर या कथेचा तोही एक गर्भित अर्थ आहे. (त्याचे विवेचन पुढे येईलच)

अस्तित्व वाद म्हणतो या जीवनात, व्यक्तीला, मानवाला पूर्ण स्वातंत्र्य

उपभोक्ता आले पाहिजे. दुसऱ्या कोणालाही त्याच्यावर कोणताही अधिकार चालवता येत नाही. जी.ए. यांची या अस्तित्ववादाची पकड पक्की आहे. हे तत्वतः मान्य असले तरीही कथेतील नायक व इतर पात्रे अगदी स्वतः नियतीसुद्धा, नियतीने घडवण्याच्या प्रत्येक क्षणाच्या अस्तित्वा बाहेर, पाऊल टाकू शकत नाही किंवा टाकत नाही.त्या त्या पात्राचे प्राक्तन अटळ असल्याप्रमाणे प्रत्येक जण आपापली दिलेली कर्म करत राहतात. त्यांना त्यांचे वेगळे स्वातंत्र्य नसते.

चौथा पेड आहे दोन गाईसह भेटलेली वृद्धा(नियती) तिचे संदर्भ कथेत दोनदा आहेत.

या सर्व कालावधीत नायकाचा रत्नाचा शोध चालूच असतो. भग्न मंदिरे, रथाघर, मंदिरातील भग्न मुर्त्या, स्तंभ, समुद्रकाठ, अरण्ये, मोठे वृक्ष, लाल पिवळे पक्षी, अजस्त्र सर्प, रखरखीत मरुप्रदेश, हिमप्रदेश, जयस्तंभ, शापित महानगरे पहात ओलांडत त्याचा अखंड प्रवास चालू असतो. या प्रवासात वेगळी वैशिष्ट्य असलेली रत्नही त्याला दिसली, सापडली. अप्सरा नेत्र, मरकत, शोणीतरत्न, नीलशिवाकंठ,अशी रत्न त्याने पाहून टाकून दिली होती. कारण त्याला हवा असलेला प्रकाश आत्मा त्यात दिसला नव्हता. स्वत:ची गात्रे जर्जर झालेली होती, शरीरात ऊर्जा राहिलेले नव्हती, पाउल पुढे टाकावस वाटत नव्हते. पण नजरेसमोरील निसर्गलीला पाहून तो तर एकदम स्तिमित झाला. स्वतःशीच स्वगत बोलल्यासारखे विचार मनात आले. प्रवास खंडित करण्याचा विचार मनी आला. त्या क्षणी अतिप्राचीन जर्जर वृद्धा त्याला पाहून म्हणाली "तू ही तसाच अधीरपणे हाताश

होणारा आहेस, अज्ञान पूर्व गर्व असलेला, शूद्र आत्मविश्वास असलेला मानव आहेस. अरे ते रत्न (मोक्ष) आहे जे काही मानवांना प्राप्त झालेले आहे. ते या पर्वतापलीकडे आहे. तिथे पोहोचण्यासाठी मदत करण्याचे ती त्याच्याकडे मूल्य मागते. म्हणते तुझ्या दृष्टी मध्ये तेज आहे, इर्षा आहे ती दृढता तु मला व या माझ्या आधार दंडास अर्पण करावीस. तो जी फांदी तोडून मदत करतो ती ते अमान्य करते. त्यामुळे तो त्या वृद्धे पुढे लोटांगण घालतो व त्याचे अंग वार्धक्याने वक्र होते व तो गलितगात्र होतो. येवढे होऊन मात्र पर्वताच्या मागील प्रदेशात जाण्याचे गुह्य ती त्याला सांगून जाते व पुनर्भेटीचा संकेतही देते.

तो विदीर्ण प्रवास जवळपास संपत आल्यामुळे तो उद्गारतो की "माझा मरण क्षण जवळ आलाय,हे ऐकून त्याला कृष्ण गरुड भेटतो व तो म्हणतो की त्याला रत्नाचे अल्पज्ञान आहे. वेगवान प्रवाह ओलांड जाण्याचा मार्ग दाखवण्यासाठी तोही त्या मानवाकडे मूल्य मागतो. ते असते त्या मानवाचे रक्त. त्या रक्ताची प्राप्ती कृष्ण गरुड करून घेतो.त्यानंतर त्या मानवाला प्रवाह ओलांडून जाण्यास मदत करतो. त्याआधी त्या वेड्याला त्याचा भूतकाळ दाखवतो व भविष्यकाळ दाखवता येणार नाही याचा खेद प्रकट करतो.

कृष्ण गरुड ही त्याची कथा व व्यथा सांगतो. दर संवत्सराला एक दिवस सोडला तर तो कायम वायु लहरींवर शीळ घालत राहतो जी त्याची त्यालाच स्वतःला ऐकू येत नाही. हे त्याचेच विधिलिखित व कर्म. पण ज्यांना ती शीळ ऐकू जाते त्यांना लगेचच मरण क्षण भोगाव लागतं असतो.?? त्या एका दिवशी प्रवाह पलीकडे जाऊन त्याच्या स्वरांचे विष नाहीसे होते व त्या स्वरांना ऐकुन जन्मोत्सव साजरे होतात. कृष्ण गरुड व सुवर्ण गरुड यांचा हा एकमेकाशी बंदीवास आहे. सुवर्ण गरुडाला जन्मदाता बरोबर सुखाचे दान देण्याचे भाग्य नाही व कृष्णा गरुडाची शीळ ऐकल्यानंतर सारे आयुष्य भंगुन जाते व त्या मृत्यू क्षणी बळी स्वीकारणारा म्हणजे तो स्वतः गरुड जास्त व्यथित होतो.

अशा या कृष्णा गरुड व सुवर्ण गरुड यांनी दिलेल्या मधल्या कालखंडात आपण मानव आयुष्य जगतो, सुखदुःख उपभोगतो, काम, क्रोध, संपत्ती, लालसा, अशा अपेक्षा घेऊन जगतो व क्वचित प्रसंगी अप्राप्यरत्न रत्न शोधण्याचा प्रयास करीत शोध घेत राहतो, रानमाळ हिंडत राहतो. याच काळात आपली विधी लिखिते व नियती आपला खेळ जर्जर म्हातारीच्या रूपाने तिचे स्वताचे अस्तित्व टिकवण्यासाठी, मानवांकडून मूल्य स्वीकारत असते.

दुसऱ्या भेटीचे वेळी ती अति दैदिप्यमान असामान्य दैवी सौंदर्य मूर्तीच्या रूपात येते व मागील भेटीचा संकेत देते.

हाडाची काडे करणारा कठीण प्रवास करून त्याला वेगवेगळया मूर्तींमध्ये रत्न दिसल्यानंतर ती हस्तगत करण्याचे त्याचे सर्व प्रयत्न असफल होतात. तो त्याचे भग्न निर्जीव झालेले हात उरावर घेऊन ओंजळेकडे निराशे ने पाहतो त्या क्षणी ज्यासाठी रक्त वेचले, हाडे झिजवली ते रत्न हृदयाच्या गाभाऱ्यात सांभाळून ठेवलेले सहस्त्ररंगी रत्न आता त्याच्या ओंजळीत होते व त्याची बोटे त्या रत्नाच्या रेषेभोवती तृप्तीने फिरत होती.हळूहळू रत्नाचे तेज वाढू लागले होते व त्याच वेळी कृष्ण गरुडाची याची अत्यंत सुरेल शीळ त्याच्या कानावर पडली. ती त्याच्या कानी आली त्याचवेळी देवतेकडे कृष्ण गरुडाची नजर तिजवर पडली. परत पाहिले तर आता आता वेड्याची ओंजळ रिकामी होती.

या सर्व घटनांमध्ये प्रत्येक जण म्हणजे तो वेडा ,कृष्ण गरुड, सुवर्ण गरुड, देवता (नियती) यांना त्यांचे नसलेले स्वातंत्र्य उपभोक्ता येतं पण कर्म ही करीत राहावे लागते. पुन्हा कर्मचक्राचा प्रारंभ सुरू केला जातो आणि तोही जगनियंताका च्याकडून???.

यमाची दिशा दक्षिण म्हणून कृष्ण गरुड तिकडे जातो. सुवर्ण गरुड कृष्ण गरुडाची आरसा प्रतिमा म्हणून उत्तरेकडे जातो. अंततः वृद्धेच्या रूपात नियती काठी टेकत दोन गाईंच्या मागोमाग आली तिने वेड्या च्या मृतदेहाकडे पाहिले. गाठोड्यातून भाकरीचा एक तुकडा द्रोणात घातला व जमिनीवरठेवला. (तो

काकबळी होता). त्या कावळ्याने आपला घास उचलला व प्रवासी मानवाच्या आत्म्यास मोक्ष प्राप्त करून दिला. वेड्याने त्याचे स्वतःचे रिक्त मरण काही पाहिले नाही व कृष्णा गरुडास त्याच्या शिळेचा आवाज कसा आहे हे न सांगताच आपले आयुष्य संपवले.

कथेमध्ये संदर्भ वाक्य खूप आहेत यावर वेगळ्यावेगळ्या दृष्टिकोनातून लिहिता येईल.

1) रत्नाच्या तेजामुळे आपले सारे अंतरंग ही उजळून निघाले पाहिजे :-

त्या माणसाला हृदयातील आत्म्याची उन्नती साधायची होती म्हणून त्याचा तो आयुष्याचा अट्टाहास होता. मोक्ष मिळावा, आपल्या कर्मामुळे मोक्ष मिळावा अशी त्याची इच्छा होती.

2) आज पुन्हा एकदा नाळ तुटली :-

आई सर्वसाधारण स्त्री होती. तिच्या बोलण्यात ममता कमी पण ताटातुटीचाच व्यवहार जास्त होता. त्याचे आध्यात्मिक ईप्सित तिला माहीत नव्हते.

3) तू आणखीन एक तसाच अधीरपणे हाताश होणारा, पाणी मिळाले नाही तर जल अस्तित्वात नाही म्हणणार आत्मज्ञानी:-

अशा प्रकारच्या रत्नाची आस धरलेले काही मूठभर माणसंही स्वतःच्या तुटपुंज ज्ञानावर पृथ्वीवरील ज्ञानमंदिर कोळून प्यायला च्या अविर्भावात असतात.

4) ते रत्न त्रिनेत्री असून अनंतरंगी आहे. :-

आध्यात्मिक पातळीवर तिसरा नेत्र हा ज्ञानप्राप्तीचा सोपान असतो तो ज्याच्या नशिबी कार्यवाही होतो तो मोक्षाला प्राप्त होतो. अनंतरंगी उजेड म्हणजेच आत्म्याच्या अंतरंगाची उजळण.

5)आधार दंडाच्या साह्याने जीवन प्रवासाचे उत्तर भाग संपवायचा असतो :-

दुसऱ्याची शक्ती स्वतः करता वापरून आत्मबल वाढविणे याची जाणीव म्हणजे ज्ञानाची पहिली पायरी होय. स्वतःमधील "स्व" सोडा व नियतिशरण व्हा म्हणजे दैवी प्रगती होईल.

6) कृष्णा गरुड हा मृत्यू देवच आहे तरीही त्याच्या अस्तित्व करता मानवाचे रक्त मिळणे ही त्याची अत्यंत गरज आहे:-

थोडक्यात मृत्यूलाही रक्त समिधा लागते. ज्यावर त्याचे कृष्ण गरुड असण्याचे अस्तित्व असते. पण त्याला त्याची स्वतःची इतरांकरता घातलेली मरण शीळ मात्र ऐकू येत नसते ही त्याची कर्मश्रृंखला व बंधन.

7)मागे सांगितल्याप्रमाणे कृष्णा गरुड व सुवर्ण गरुड एकमेकांसाठी व्यत्यास आहेत.

8) कृष्ण गरुडाने त्याच्या रक्ताचा शेवटचा थेंब आपल्या भव्य चोचीत घेतला व म्हणाला :-

तुझ्यातील आशा आता ओसरली आहे, तू कधी आता पराभूत होणार नाहीस, तुला कधी अवमानित वाटणार नाही, तुला कदाचित रत्न दर्शन घडेल कारण ते निर्मम अवस्थेतच प्राप्त करून घेता येते.

आत्मशोधनच्या पायऱ्या चढताना स्वार्थ, सत्ता, पैसा, कामिनी या सर्व मोहांपासून मोकळे होत जाणाऱ्या मानवाला अशाच मोक्षा चा अंतिम टप्पा गाठता येतो. तेव्हा मानव कोहम? कोहम? सोहम ! सोहम!! या अवस्थेला पोहोचलेला असतो. पण ते ज्ञान त्याला तेव्हाही होत नाही व रत्न मिळण्याच्या क्षणी होत नाही. रत्नप्राप्तीचा आनंद ही तुझाच एकाकी असेल तुझ्या मृत्यू क्षणी एवढाच रत्नप्राप्ती म्हणजे अखेर स्वतःच्या दृष्टीमध्ये घडून आलेले एक परिवर्तन असते:-

न मिळणाऱ्या रत्ना चा ध्यास धरून नसलेले रत्न ओंजळीत धरून प्राप्तीचा एक धूसर क्षण म्हणजे आयुष्याची इतिकर्तव्यता मानणे हा मानवाच्या सर्वात मोठा शाप व त्या समजुतीत राहून कृष्ण गरुडाची शिळ ऐकून मृत्यू होणे ही त्याची अखेरची कर्म रेषा होय.

"आणि म्हणून पुन्हा कर्मचक्राचा प्रारंभ झाला पाहिजे" हे नियतीचे ललाट वाक्य कानी पडते आणि कावळा आपला घास उचलून कर्मचक्रास गती देतो.

संजीव सावरगांवकर: प्रयत्न केलाय लिहायचा. तुम्हा सर्वांच्या प्रतिक्रिया, सुधारणा, वेगळा विचार असेल तर तो दिलखुलास पणे कळवा ही विनंती.

विलास वाघोलीकर: सुनीळजींनी प्रास्तविकात महत्वाचे मुद्दे दिले होते. संजीवजींनी कष्ट घेवून, अनेक योग्य संदर्भ देवून यशस्वी विवेचन केले आहे. रामानुजाचार्य, उपनिषदे, शेवटचे काक संदर्भ अत्यंत योग्य आहे. दोघांनाही खूप खूप धन्यवाद विलास वाघोलीकर

मनमोहन आंबेकर: पोस्टवर नाव नसते तर जी एं चे कथन असू शकते असे भासले असते.

सुनीळ सामंत: Plus one वा संजीव जी.... कथा वाचत असताना जसे डोळे दिपले, तसेच आपले हे विवेचन वाचतानाही दिपले.

दिलिप बडे: जी.एं.च्या कथेतील प्रवासी ध्येयवेडा-स्वप्नवेडा आहे.पण रत्न कथेतील प्रवाशाची ओंजळ रिकामी आहे आणी त्या प्रदेशात कोणतेही रत्न नाही त्यामुळे हा प्रवास भ्रामक-निष्फळ ठरला.प्रवासी कथेतील नायक लौकिक सुखासाठी रत्न चोरतो पण ते एखाद्या गारगोटी प्रमाने नदीच्या तळाशी निरऊपयोगी जाऊन पडते.ना प्रवास संपला, ना रस्ता.खुप भटकंती झाल्यानंतर-गात्रे गलित झाल्यानंतर आपले कुठेच जाणे झाले नाही अशी भ्रमावस्था तयार होणे ही माणसांचीअसहायता.

सुनीळ सामंत: संजीवजी

जसे प्रश्न जीएंच्या कथेबाबत विचारले तसेच आता तुमच्या विवेचनातील काही संकल्पनांवर विचारू इच्छितो. आशा करतो की आपण राग मानणार नाही.

चौपेडी म्हणजे काय? किंवा कथांचे पेड कसे असतात? पेड हा वेणीबाबत वापरायचा शब्द आहे पण तो कथेला कसा लागू होतो? हा नियमित वापरला जाणारा सब्द आहे की तुमचे स्वतःचे निर्माण आहे?

जीएंच्या कथांबाबत समीक्षकांना अनेकदा वेगवेगळ्या कल्पना मांदाव्या लागतात. उदा. बहुकेंद्रित. जनरली कथांमधे एक नायक असतो वा नायिका असते. आणि तिच्याभोवती कथा विणली जाते. पण जीएंच्या अनेक कथांमधे हे केंद्र बदलत जाते. या कथेलाही हे लागू होते असे वातते. तुमचे विवेचन वाचल्यावर पुन्हा कथा वाचली तेव्हा असे जाणवले.

सर्वात शेवटी-

घटावरी कोणी मारीत काठी, दुभंग हो माती |
या मातीची कथा सांगणे, इतके आमच्या हाती||

अटळ जे जे ठरलेले ते, जन्म आणि मृत्यू ||
नियती खेळते निर्घृण तरीही, सर्वांशीच हुतुतू ||
कथा सांगतो कथेकरी तुम्हा, कथा आम्ही जगलो |
जगताना त्या व्यथा लाखदा, पुन्हा पुन्हा मेलो ||

ही कोणाची कविता? अगदी जीऐंचे मनोगतच वाटले. बाकी तुम्ही कृष्ण गरूड आणि सुवर्ण गरूड तसेच वृद्धा आणि कावळा यांच्या रुपकाचे लावलेले अर्थ अतिशय समर्पक आहेत. लाजवाब.

संजीव सावरगांवकर:

१)कथेची ४ पात्रे आहेत. नायक, कृष्ण गरुड, सुवर्ण गरुड व वृद्धा. हे चार पेड कथा तयार करतात, कथा गुंफण्यात व पुढे नेण्यात महत्वाच्या आहेत. प्रत्येकाची कर्मे करणे आहे पण त्यांना कोणत्याही प्रकारचे इतरांचे बाबत कोणतेही स्वातंत्र्य नाही. लेखकाने त्यांना बांधुन ठेवले आहेत. एक जरी पेड नसला तर कथा ढासळेल हा माझा तर्क. थोडक्यात ते सर्व चौकटी मध्ये बद्ध आहेत. हेच चार स्तंभ, पेड, पात्रे, शक्ति कथा पुढे नेतात. नाहीतर एकटूया नायकाच्या स्वप्नरंजनाला कोण विचारणार. ते त्याच्या जवळच राहणार. असो.

२) कविता खानोलकर यांची. संदर्भ ‘सहोदर’ पुस्तक. ग्रेस, खानोलकर, जी. ए. यांचेवर लिहलेले पुस्तक. लेखिका. डॉ.माधवी वैद्य. प्रफुल्लता प्रकाशन. माझ्या मते कथा ,मला किती समजली व त्यावर मी माझे मत, मनोगत व्यक्त करू शकतो का हे महत्वाचे. बाकी जी. ए. हा संशोधनाचा, विपुल अभ्यासाचा, वेगवेगळया दृष्टिकोनातून कथा समजावून घेणे हा स्वांत सुखाय अनुभव.

सर, कथांचे पेड नसतात. कथेचे, कथे मध्ये पेड असतात.

गौरी देशपांडे : विस्मयचकित करणारं साम्य ! Hats off to all 3 genious writers!!

संजीव सावरगांवकर: खूप विचारपूर्वक लिहिले आहे. जी. ए. कथेचे सारखेच 2,3 वेळा एक एक प्रकरण वाचले की संदर्भ लागतात आणि त्यात संदर्भ पुस्तकेही भरपूर आहेत.

सुनीळ सामंत: हे काही प्रमाणात खरे आहे. पण काही कथांच्या बाबतीत अगदी जंगलात हरवलेल्या मुलासारखे होते. तेव्हा आपल्यासारखे विवेचक असणेही आवश्यक. बाकी जीएंसारखेच माझे एक मत म्हणजे साहित्य व्यवहार हा लेखक , वाचक आणि यांतील दुवा म्हणून प्रकाशक एवढाच असावा. पण जीएंच्या कथा वाचताना आधार लागतो.

माधव पुराणिक : कृष्ण गरूड व सुवर्ण गरूड इत्यादीं यबद्दल चे विवेचन ' जी एं च्या कथा एक अन्वयार्थ - धों वि देशपांडे (१९७३) यावर आधारित आहे का ?

संजीव सावरगांवकर: होय. माझ्या मते कथा कशी समजली ते महत्वाचे, त्याला इतर कुठला आधार असणारच

# राणी - पुस्तक निळासावळा

विलास वाघोलीकर: 🙏 💐 💐 💐 💐 💐 💐 💐 🙏
. कथा- राणी - पुस्तक निळासावळा - लेखक जी ए कुलकर्णी
विवेचक - विलास वाघोलीकर

राणी ही जी एंची बांधेसूद , लहान अशी, संसारकथा आहे.त्यामध्ये वाचकांना धक्के दिले आहेत.

- कथेची सुरुवात वृद्ध भाऊंच्या सकाळच्या जागण्याने होते.ते आजारपणातून उठले आहेत. सूर्याच्या कोवळया उन्हाच्या लपेटण्याने त्यांना तरतरीत वाटते.

- ते रजई उचलतात व त्यांना रजईवर विणलेले, दिमाखदार तुळशी वृंदावन व झगझगीत रंगीत झाडाचे चित्र आहे, हे लक्षात येते. त्यामुळे त्यांना त्यांच्या निधन पावलेल्या पत्नीची आठवण होते. तिने व्यवस्थितपणे भाऊंचा संसार केला होता. दोन मुलांना जन्म देवून, त्यांचे व्यवस्थित संगोपन केले होते. पण नंतरच्या बाळंतपणात तिचे निधन झाले..... वाचकाला धक्का - (|)

- नंतर भाऊ वृद्ध झाले. त्यांचे गुडगे प्रचंड दुखावून ते अंथरुणाला खिळले व अंधही झाले.... वाचकाला धक्का - (2)

- मुलांनी भाऊंची राहण्याची सोय पहिल्या मजल्यावरच्या खोलीत केली. माधव ,नानू ,माधवची बायको (सूनबाई) व त्यांची जेमतेम चालणारी छोटी मुलगी ,'राणी', हे खालच्या खोल्यांमध्ये रहात होते. राणीला भाऊंचा लळा होता व ते तिला गोष्ट सांगत.

- त्या दिवशी राणी भाऊंकडे वरच्या खोलीत आली नाही. म्हणून ते रमाकाकूंना विचारतात. त्यावर त्या सांगतात - राणीचे चार - पाच दिवसांपूर्वी आजारपणाने अचानक निधन झाले.व त्या काळात भाऊसुद्धा आजारी होते. भाऊ तर आठवडाभर चक्क बेशुद्ध होते... वाचकाला धक्का - (3)

- त्या कुटुंबात दर सोमवारी घरी अभिषेक करण्याची पद्धत होती.त्याबद्दल विचारायला भटजी खालच्या खोलीत येतात. अर्थात् राणीचा मृत्यू झाल्यामुळे, तो अभिषेक करायचा नाही, हे सांगीतले जाते. तेव्हा ते (अकारण) मोठ्याने बोलतात. व ते बोलणे भाऊंना ऐकू जाते. -" म्हाताऱ्याला उदंड आयुष्य आहे. पण सोनकेळीसारखी मुलगी वाया गेली" त्यांचे हे बोलणे हा वाचकाला धक्का - (4)

- त्यामुळे भाऊंना (हे मानवजातीचे आहे) कळवळून दुःख होते.ते दुः ख जीएंनी त्यांच्या झळझळीत शब्दांत व्यक्त केले आहे.

....भाऊ म्हणाले,".. मला जगायचे नाही पोरी. पोरी, मी माझे आयुष्य तुला दिले असते." त्यांचा चेहरा गुडघ्यामध्ये लपला होता. पण त्यांची हाडाहाडांची कमान, मान व पाठ घुसळल्याप्रमाणे होत होती..... वाचकांना धक्का (5). येथेच कथा संपते.

*या कथेत जीएंनी अंधत्वाचे दुःख वाचकापर्यंत पोहचवले आहे. अंधत्वामुळे माणसाचे विश्व बदलते. अंधत्वानंतर, उरलेल्या ध्वनी, स्पर्श इत्यादी संवेदनांआधारे माणसाचे, (येथे भाऊंचे) विश्व उभे असते. उदाहरणार्थ , घड्याळयाची टिकटिक ,खिडकीतून आलेले सूर्याचे उन्ह , शरीराला लपटलेला सूर्यप्रकाश, रजईचा स्पर्श, गुदमरवून टाकणारा अंधार, कपबशी - औषधाच्या बाटल्या अशा पदार्थांचे कंगोरे, राणीला सांगीतलेली गोष्ट, तिच्या शरीरातील ठोके, राणीच्या गालाचा स्पर्श, कपबशा मांडल्याचा आवाज, नानाचे खोकणे, सिगारेटचा वास, राणी ताटावर ठणठण पळी वाजवते तो आवाज, रमाकाकूंचा पायाचा दणदण आवाज, वठलेल्या झाडावर दगड मारल्यासारखा रमाकाकूंचा आवाज, भटजी जाताना सैल दगड वाजतो. इत्यादी. हे दाखवून जीएंनी अंधत्वाचे विश्व शब्दांत व्यक्त केले आहे.

* मांजराने बशीतले दूध चाटूनपुसुन घ्यावे व बशी स्वच्छ करावी, त्याप्रमाणे जी एंनी आयुष्यातील दुःखे त्यांच्या कथांमध्ये व्यक्त केली. एखाद्या माणसाला आधी दृष्टी असते, पण नंतर त्याची दृष्टी जाते. अशा वेळी आलेले अंधत्वाचे दुःख, या कथेत आले आहे. जीएंच्या दुसऱ्या 'प्रवासी' कथेतही तेथील शिकारी अंध असतो. तेथे तो शब्दवेधाने सुरी मारून 99 माणसांची शिकार करतो. याप्रमाणे अंध माणसाचे संवेदनांचे विश्व हे आवाज, स्पर्श, गंध, चव या इतर संवेदनांवर, विशेषतः आवाजावर तयार होते.

* कथेत भाऊंची निधन पावलेल्या पत्नीचे थोडक्यात चित्रण केले आहे. ती उद्योगी, संसारदक्ष, प्रेमळ गृहीणी होती. कलाकुसर करणारी होती. तिने घरीच खटाटोपीने भाऊंसाठी रजई तयार केली. तिने दोन मुलांना जन्म देवून त्यांचे संगोपन केले. * येथे* * पत्नी* * भूमिकेतील* * स्त्रीचे* * चित्रण* जीएंनी मनोज्ञपणे केले आहे. असे चित्रण त्यांनी अनेक कथांत केले आहे. हे नोंद घेण्यासारखे आहे.

* माननीय हेमंत खडके यांनी म्हटल्या प्रमाणे, नियतीच्या मोठ्या वर्तुळात प्रयत्नांचे वर्तुळ सामावलेले असते. या कथेत आजारपणावर औषधांचे प्रयत्न केले. पण अपंगत्व, मृत्यू आले तर नियतीचे सामर्थ्य समजून स्वीकारले जाते.

*कथेत, पत्नी , राणी व भाऊ या तिघांची आजारपणे- तसेच पत्नी व राणी चा दोघांचे मृत्यू दाखवले आहेत. अंध ,वृद्ध भाऊंचे बेशुद्ध होण्याइतके आजारपण दाखवून , डोळे ओले करणारी ही शोकांतिका जीएंनी गडद केली आहे. याप्रमाणे जीएंची ही कथा वाचकांना धक्के देणारी, लक्षणीय झाली आहे.

* धन्यवाद. -विलास वाघोलीकर

🙏 💐 💐 💐 💐 💐 💐 💐 🙏

मनमोहन आंबेकर: हे जी एंच्या सर्व कथांचे सूत्र असावे असे वाटते.

दिलिप बडे: वटलेल्या झाडावर दगड मारल्या सारखा रमाकाकुंचा आवाज.2)भटजी जाताना सैल दगड जातो.दोन्ही नोंदी-सुक्ष्म, हे जी.एं.च भाषा वैभव.वाघोलीकर तुमची कथा मांडणी म्हणजे सहजपणे मॅजिक क्युब जुळवावा अशी.जी.एं.ची अनेक अंगानी धावणारी कथा जोडणे अवघड काम आपण छान करता.

दिलिप बडे: https://youtu.be/rHCdv7wXnQ4

विलास वाघोलीकर: आपण प्रा आशालता कांबळे यांचे हे व्हीडीओ भाषण दिले आहे ,ते ऐकण्यासारखे आहे. राणी कथेतील करुणमय भाग त्यांनी सांगीतला आहे. व्हीडिओ बद्दल धन्यवाद. विलास वाघोलीकर

माधव पुराणिक- प्रा.कांबळे यांचे अभिवाचन व निवेदन प्रभावी, हृदयस्पर्शी,सखोल व वेगळा अनुभव देणारे. व्हिडिओ बद्दल दिलीप बढे यांचे मनापासून धन्यवाद

सुनीळ सामंत: सर, आपले हे विवेचन छान झाले आहे. मुख्य म्हणजे ते एखाद्या रिपोर्ट सारखे (मी करतो तसे) न होता शैलीदार झाले आहे. यातले आपण सांगितलेले धक्का देणारे क्षण यापुर्वी (अनेकदा वाचूनही) मला वेगळे स्पष्ट असे जाणवले नव्हते. दुसरे म्हणजे ध्वनींना जीएंनी दिलेल्या उपमांकडेही यापुर्वी इतके वेगळे असे लक्ष गेले नव्हते ते आपल्या विवेचनामुळे गेले.

ही कथा मी जनरली नवीन (जी ए न वाचलेल्या) वाचकाला रेकमंड करत आलो आहे. ही जीएंच्या कथांपैकी सामान्य वाचकाला अपील करणारी कथा आहे.

(म्हणजे आपण काही असामान्य वाचक आहोत असे नाही, पण तरीही जीएंचा वाचक हा काहीसा स्पेशल इंद्रिय असलेला असतो असे मला वाटते).

या कथेवर एखादी शॉर्टफ़िल्म होऊ सकेल का?

विलास वाघोलीकर: धन्यवाद. राणी कथेत प्रत्येकाला काही तरी वेगळे जाणवेल. उदा. लहान कथा, सुलभ कथा, संसार कथा, वयस्करांची कथा, अपंगांची कथा, ध्वनी जगताची कथा इ. मला ती मानवी शोकांतिकेची कथा वाटते. मत्स्यकन्येत म्हटले आहे - दोन जीवांच्या सहाय्याने माणसाच्या जीवनाची सुरुवात होते. पण शेवट होतो तो एका एकाकी कोपऱ्यात. या कथेत ते आहे. फिल्म - एकांकिका करताना मनातील ध्वनीसंबंधी प्रतिमा व्यक्त करता आल्या पाहिजेत. पुन्हा एकदा आभार. विलास वाघोलीकर

# रातराणी

वैभव कुलकर्णी : कथा —रातराणी !

जीएंची एक फक्त तिन पात्रे असलेली आणि एका संध्याकाळची कथा.

माधव नावाचा एक मध्यमवर्गीय इंजीनियर आणि त्याची पत्नी लिलू यांच्यातील एक शांत संध्याकाळ ! माधवला बागेची अतोनात आवड असते. तो सतत बागेत काहीतरी लावत असतो, फुलझाडांवर काम करत असतो.

शैजारच्च्या वत्सलाबाईंच्या मुली बरोबर , मेधा बरोबर त्याचे प्रेमप्रकरण असते. मेधा अत्यंत सुंदर असते आणि तिलाही बागकाम, फुलझाडांची आवड असते. मेधा माधवला लग्नाचा आग्रह करते कारण ती प्रेग्नंट होते. पण माधवला तिच्या मानेवर कोडाचा पांढरा डाग दिसतो आणि तो तिला झिडकारतो.

ती खिन्नमनाने तेथून निघून जाते.त्याला काहीही वेडेवाकडे बोलत नाही...अत्यंत सरळपणे सगळे स्विकारते. आणि जीव देते !

माधव लिलूशी लग्न करतो. मेधाच्या कुटूंबियांचा शेजार नको म्हणून दुसरी जागा शोधायचा प्रयत्न करतो.पण ते कुटूंबच आता तेथून कायमचे निघून जाणार असल्याचे समजताच तोच बंगला रंगवून आळशी ,सुखवस्तू लिलूला घेऊन येतो.

......आणि एके संध्याकाळी निरोप घ्यायला मेधाची आई वत्सलाकाकू येते.........जाता जाता माधवला `मला सार माहित होते. या मुलीलातरी माणसा सारख वागव ` एवढे सुनावून पराभूता सारख्या निघून जातात.

,.........इकडे लिलूच्या मनात तिने पुर्वायुष्यात असविंदचे आयुष्य कसे ऊध्वस्त केले ,त्याच्या मनाशी कसा खेळ केला हे विचार थैमान घालू लागतात.

आपण ते पाप केले नसते तर इथेही हे दुखः घडले नसते.....मेधाच्या आयुष्याचे जे काही झाले त्याला आपणच जबाबदार आहोत असा एक वेडा विचार

तिच्या मनात चमकून जातो आणि ती वत्सलाकाकू गेल्या त्या दिशेने शरमुन व्याकूळ नजरेने पाहू लागती.

इथे जीए कथा संपवतात.

आणि सारे काही वाचकांवर सोडून देतात.

वैभव कुलकर्णी : जीएंच्या साहित्यातले रूपकात्मक सर्प दर्शन !

जीएंच्या कथेतील आत्महात्या !

जीएंच्या कथे मधले मेडिकल सायन्स आणि सामाजीकता !

जीएंच्या कथेतील स्त्रिया !

जीएंच्या कथां मधून येणारे झाडाझूडपांचे botanical science सहीत चे ऊल्लेख आणि रूपकता !

जिएंच्या च्या कथां मधले सेक्स आणि त्याचे मानवी जीवनावरचे परीणाम !

जीएंच्या कथेतील वृध्दत्व !

हे सगळे स्वतंत्र अभ्यासाचे विषय आहेत.

या सगळया मूळ बंदिशी आहेत........प्रत्येकाच्या अनुभवानीशी उलगडत जाणाऱ्या.........,

सुनीळ सामंत: आपल्या या ग्रुपवर कोणीतरी एक फ़ार महत्वाचे वाक्य लिहिले होते. "जीएंची कथा जिथे संपते तिथे अनेक कथा जन्म घेतात"

जीएंच्या बहुतांश सामान्य जीवनकथांना (म्हणजे रुपककथांना सोडून) हे लागू पडते.

त्याचे सर्वोत्कृष्ट उदाहरण म्हणजे रातराणी. वैभवजींनी ही कथा अगदी सहजपणे उलगडून दाखवली आहे. त्यांचे आभार. त्यांनी या कथेतील सर्वच पात्रांचे अंतरंग कमीत कमी सब्दांत टिपले आहेत. या कथेतील सर्वात महत्वाची वाक्यंही त्यांनी विवेचनात नेमकी टिपली आहेत.

या कथेचे इतर काही पैलू असतील तर तेही दाखवले जावेत.

मंजिरी देशमुख: जी एं विषयी नेहमीच बोलल्याचं वाचण्यात आलं आहे की जी. एन ची कथा जिथे संपते तिथेच ती सुरू होते.

सुनीळ सामंत: ओके. पण हे माझ्या आजवर लक्षात आलं नव्हतं. ते कोणीतरी इथे लिहिले तेव्हा युरेक्का झालं.

वैभव कुलकर्णी : रा त रा णी माधव बंगल्याच्या व्हरांड्यात उभा राहिला व त्याने सुखावलेल्या नजरेने समोर पाहिले. निळ्या विशाल पंखासारखे आभाळ, स्वच्छ धुतल्यासारखे वाटणारे समोरचे दृश्य, जुनी चरबट पाने जाऊन त्या जागी आलेली नाजूक शालीन हिरव्या रंगाची पालवी, साऱ्यांनीच त्याच्या कोरीव, पूर्ण आयुष्याचे प्रतिबिब धारण केले होते. त्याला वाटले, आजचा दिवस कसा नीरव, उडत लहानलहान होत जाऊन नाहीसे होणाऱ्या पाखराप्रमाणे संपत आला. आता आपले आयुष्य स्थिरावले, फळले. अशाच दिवसांच्या मालिकेचे त्याला तोरण लागणार. जे हवे ते सारे मिळाले या समाधानाने मनावर जी तृप्तीची साय येते त्याखाली त्याचे मन सुखावले. तो एका खांबाला रेलून उभा राहिला व आजूबाजूच्या शांततेच्या स्पर्शाला, आपल्या मनाला कुरवाळू देऊ लागला. समोरील रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी लोखंडी पिंपाएवढ्या बुंध्याच्या झाडांच्या रांगा होत्या. अगदी पहाटेला टेकडीवरून धुके सरकत खाली आले, की ते झाडांच्या अनेक बोटांत गुरफटून विशाल जाळ्याप्रमाणे झाडातच लोंबू लागे आणि रात्री चांदणे ओतू लागले, की

त्याला फांद्यांच्या हालचालींनी तडे जात व ते फुटून त्याचे तुकडे रस्त्यावर तुकड्यांचे नक्षीकाम केल्याप्रमाणे पडत. बंगल्याला खूप मोठे आवार होते. तेथे त्याने स्वतः खांदे दुखवून छोटीशी बाग केली होती. त्या वेळच्या सुखद श्रमाची त्याला आठवण झाली व तो स्वतःशीच हसला; पण आता सारे वाफे तयार झाले होते. त्याच्या आयुष्यासारख्याच तृप्त वाटणाऱ्या काळसर मातीवर हात दीड हात रोपे तयार झाली होती. आणखी पंधरा दिवसांत ॲस्टरचा विविधरंगी गालिचा उलगडणार, फ्लॉक्सच्या घोळक्याखाली ती झाडे अगदी ओझावून जाणार. निशिगंधामधून तर आताच उंच छड्या निघाल्या होत्या व त्यावर छोटेछोटे हंस चिकटवल्याप्रमाणे फुलोरा जागा झाला होता. भिंतीच्या कोपऱ्यात लहान गेटाजवळ रातराणी माहेरवासिनीप्रमाणे सुखावली होती. आता तिच्यावर फुले नाहीत; पण ज्या वेळी असत त्या वेळी आवारातील खासगी रात्र त्या मदिर गंधाने धुंद होऊन जात असे. दिवसा तिच्यात तीनचार भारद्वाज दिसत आणि ते तेथल्या तेथे हलू लागले, की रातराणीलाच त्यांचे बदामी पंख, रेशमी काळा रंग आणि वितळलेल्या माणकाच्या थेंबाप्रमाणे डोळे आहेत असे वाटे आणि तिची पाने तर मेधाच्या चिचपानी जॉर्जेटप्रमाणे... साऱ्या बांधेसूद दृश्यावर चर्रदिशी ओरखडा उठल्याप्रमाणे ते नाव करकरले. त्याने ती आठवण झदिशी उडवून टाकली व तसे करताना आपल्याला कुणी पाहिले तर नाही ना, या शंकेने इकडेतिकडे पाहिले. काय अधिकार आहे तिला आता आपल्या सुखावर पावले उमटवण्याचा? त्या एका मोहक्षणी आपण होय म्हटले असते तर आपलेही सारे आयुष्य वाया गेले असते. तिने आपले स्वतःचे घालवले त्याप्रमाणे. तिची आई हलक्या कुळातील होती, तिचे म्हणून ओळखले जाणारे घर अद्यापही होन्नावरला आहे हे देखील तिने कधी सांगितले नाही. कधीसुद्धा ती त्याविषयी बोलली नाही. पहिल्यापासून सारे व्यवस्थित आखून, व्यवहारी फसवणूक! – खरे का रे हे सारे? तुला असे वाटते प्रामाणिकपणे? माधव हादरला व त्याला स्पष्ट ताठ उत्तर देता येईना. तो अस्वस्थ झाला; पण तरी एकंदरीने आता त्याचे काय? ती तर गेली. तिच्या आईला देखील त्यातील काही माहिती नाही. नाहीतर नंतर ती एकदा-दोनदा आली - बोलली असती का? पण त्याच्या मनाचा

आनंद हिंदकळला. त्याला उगाचच एकटे वाटू लागले. त्याने आत पाहत हाक मारली, “लिलू! लिलू!" ती बाहेर आली त्या वेळी ती कसलेतरी मासिक वाचत होती. कारण तिने ते बरोबरच आणले होते. ते तिने कठड्यावर टाकले व ती खांबाला टेकून उभी राहिली.

"हं, आता कुठल्या झाडाचा पाव इंच तुकडा कापला तुम्ही?" तिने विचारले. तिचा आवाज घडी करून दाबल्याप्रमाणे सपाट होता. तिच्या प्रश्नाला थोडा अर्थ होता. कारण माधवने बाहेर बोलावले की ओळखावेच, की त्याने एक रोप काढून दुसऱ्या ठिकाणी लावले आहे, गुलाबाची छाटाछाट झाली आहे, कोलियसच्या बहुरंगी पानांच्या झाडांची निराळी रचना झाली आहे. “काही इंजिनियर फावल्या वेळात बागकाम करत असतील; पण एखाद्या धंदेवाईक माळ्यानं फावल्या वेळात इंजिनियरचा धंदा केल्याचं पहिलंच उदाहरण म्हणजे तुमचं!” असे एकदा तिने त्याला कंटाळून सांगितलेही होते. माधव काही बोलला नाही. मनात अचानक उसवलेली आठवण विसरण्यासाठीच त्याने लिलूकडे पाहिले. तिच्याकडे पाहिले की त्यालाच काय, कुणालाही एखाद्या फुलाचीच आठवण व्हावी असा गोरा ताजेपणा तिच्यात होता. नव्या लग्नाची घडी अद्याप न मोडल्याने त्याचे आयुष्य अद्याप स्थिर व्हायचे होते; परंतु आपले सुख कोणत्या आकाराने वाढणार आहे याची त्याला कल्पना आली होती. ती रंगाने मेधापेक्षा नक्की उजळ होती; पण मेधाच्या आवाजात विलक्षण आर्तता होती. ती गाऊ लागली की रातराणीला फुले येत आहेत असे वाटावे. अगदी तृप्त सुखाच्याही अंतर्हृदयात असलेली हुरहुरीची निळीसावळी छाया त्यामुळे स्पष्ट, जागी होत असे. त्यानंतर अगदी बेचैन वाटे; पण आयुष्याच्या आणखी एका पापुद्र्याखाली आपण गेलो असे वाटे. पण लिलूविषयी त्याला फार कृतज्ञता वाटली. तिच्या वडिलांच्या मदतीने त्याला ही नोकरी मिळाली. सुख पोसले, जर त्या मोहाच्या क्षणी शब्द घसरला असता, तर हलक्या जातीच्या मुलीच्या सान्निध्यात फसव्या मुखवट्याने आपण आयुष्याचे एकेक पान निराशेने तोडत बसलो असतो. मग तेच लहानपणापासूनचे दारिद्र्य पुढेही चालूच राहिले असते...

नाही, लिलूमुळे नक्की आपले आयुष्य सभ्य, सुखाचे झाले! माधव खुलला. तो थोडा हसलाही. “काय करतेस तू अशा वेळी आत बसून?" त्याने विचारले.

"हो, कुंड्या-खुरपी उचलायला कुणीतरी हमाल पाहिजे म्हणून का सांगत नाही स्पष्ट?" त्या कठड्यावरच बसत हसत ती म्हणाली. "हो, बरी आठवण झाली," तो उत्साहाने म्हणाला, “या व्हरांड्यातही आपण दोनचार कुंड्या ठेवू. इथं कोशियाची दोन लहान डेरेदार झाडं सुंदर दिसली असती; पण ती आपल्याकडे नाहीतच. तेव्हा सध्यातरी जिरेनियम ठेवू." आणि मग ती वेल चढवायची कुठे?" आपण त्यात गंभीरपणे लक्ष घालत आहो हे दाखवण्यासाठी लिलू म्हणाली. कपाळावर हात मारत माधव पटकन पहिल्या पायरीवरच बसला. “तू अगदीच अशी कशी ग?" तो चिडून म्हणाला, “जिरेनियम म्हणजे काय दोडकी-पडवळी आहेत होय वेल चढवायला?" नको असता पुन्हा मेधा आलीच. त्याच्या बागेकडे किंचित तोयाने पाहणारी. तिने दोनच पेटाऱ्यांत लार्कस्परची रोपे लावली होती; पण तसे एक रोप माधवला कधी तयार करता आले नाही. सल्फेट-फॉस्फेट झाले, पुणे-मंगळूरहन आणवलेल्या बिया झाल्या; पण नाही. रोपे होऊन वीतभर वाढायची, एखाददुसरा किरकोळ तुरा दाखवून वाढ खुंटायची; पण मेधाचे तसे नाही. हाताला बिया चिकटल्या असता तिने हात मातीवर नुसता झाडला, तरी रोपे अधाशीपणाने, खुषमस्कऱ्यासारखी तरारून तिच्यापुढे उभी राहत. हिरव्या रंगाशी तिचे काही गूढ नाते होते की काय कुणास ठाऊक! निशिगंधाच्या कंदातून पांढरे फूल आल्याप्रमाणे, ती स्वतःच कुठल्यातरी कंदातून वर आली असावी अशी तिला झाडे समजत. हिरव्या रंगातील आयुष्य, भोवती शेवाळ मातलेल्या हिरवट पाण्यातच शेवट! आता लार्कस्पर गेले, पेटाऱ्यांना वाळवी लागून त्याचे तुकडे झाले आणि तिच्या घराचा दरवाजाही क्वचितच उघडे. जिरेनियमचा वेल म्हणे! उद्या तू निशिगंधाच्या फुलांचे लोणचे घालशील बाई! लिलूचे लक्ष तर केव्हाच त्या विषयावरून उडाले होते व ते भोवतालच्या शांततेवर तरंगू लागले होते. हा भाग गावातील सर्वांत शांत व माणसांची वर्दळ अगदी कमी. शाळा सुटल्यावर दहाबारा मुलींचा घोळका बडबडत-खिदळत गेला, दोनचार

मोटारी फर्रदिशी पळाल्या की संध्याकाळची हालचाल संपली. मग सर्वात शेवटी जाड वहाणांचा पोस्टमन जणू संध्याकाळला शेवटचे टोके घालत फिरत असल्याप्रमाणे फेरी टाकून गेला, की अद्याप चक्क उजेड असला तरी रात्र सुरू झालीच. पोस्टमनची वाट पाहत कुणी दारात थांबत नाही. पत्र मिळाल्यावर तेथेच चौकटीत उभे राहन कुणी ते अधीरपणे वाचत नाही. थोड्या वेळाने आत दिवे लागल्यावर ठिकठिकाणी खिडक्यांचे प्रकाशित पिवळसर चौकोन मात्र हजारो पानांचे खवले असलेल्या प्राण्याच्या डोळयांप्रमाणे जागे होत. "तुम्ही कसल्या वस्तीत बंगला घेतला हो! कुठं शेजार नाही, पाजार नाही!" ती एकदम म्हणाली, "आणि एकटं असतानाही हा दहा माणसांचा बंगला कशाला हवा होता?" माधव थोडा वेळ गप्प राहिला; पण मेधा काहीकेल्या मनातून जाईना. तेथे ती ठिकठिकाणी आठवणींची रोपे लावत फिरत होती. पायांखाली ती चिरडून टाकण्याचा प्रयत्न करूनही ती जोमाने वाढतच होती. माधव बेचैन झाला व शब्दांच्या गुंतवळयात कुठेतरी लपून राहण्याचा प्रयत्न करू लागला. "हे बघ लिलू," तो म्हणाला, "आयुष्यात पुष्कळदा असं घडतं. एखादी वस्तू आपण पाहतो, आपण तिच्याकडे इतके ओढले जातो, की वाटतं, बस्स, हीच वस्तू नेमकी आपणाला हवी. दुसरी किंवा त्यापेक्षा जास्त चांगली नको. तसली नव्हे, तीच. तोच टाय, तेच शूज, त्या बांधणीचे तेच पुस्तक, तोच गुलाब. तसं झालं माझं या घराच्या बाबतीत. मी जागा शोधत हिंडत होतो. उगाचच मी या बंगल्याकडे पाहिलं त्याच वेळी मला वाटलं, हे घर आपल्याला पाहिजे. इथं आपण राहणार, जगणार. सुदैवानं ते त्या वेळी रिकामं होतं. इतक्या मोठ्या घराची त्या वेळीच काय, पण आताही गरज नाही; पण मी ठरवलं या गावात राहायचं तर इथं. इथं आपलं आयुष्य फुलणार!" पण लिलू येण्यापूर्वी पंधरा दिवस हाच बंगला जणू रोगट असल्याप्रमाणे तातडीने सोडण्याची त्याने खटपट केली होती, हे मात्र त्याने सांगितले नाही. आजूबाजूस पाचपाच पोरांचे शेजार असलेले, किडलेल्या लाकडी ओंडक्यातील भोकाप्रमाणे दिसणारे एक जुने घर त्याने ठरवलेही होते. लिलूने कॉलेजातील शेवटचे वर्ष संपवायचा विचार बदलून अचानक इकडे यायचे ठरवल्यामुळे त्याचे सारेच बेत उधळले गेले होते. अमुक दिवशी येत आहे,

असे तिचे पत्र आल्यावर तर तो घाबरून अस्वस्थच झाला. कागदाचे ढिगारे उपसून त्याने मेधाची पत्रे, खूपशी फुले वेणीत असलेला, वेणी गळयाभोवती टाकलेला तिचा फोटो, तिने एका पत्रात घातलेली रातराणीची वाळलेली फुले; ही सारी त्याने निबरपणे जाळून टाकली. तिने दिलेल्या स्टेनलेस स्टीलच्या कॅलेंडरवरील तिचे नाव त्याने चाकूने खरडून नाहीसे करण्याचा प्रयत्न केला; पण ते जाईना म्हणूनच ते त्याने परसात कचऱ्याच्या ढिगात टाकून दिले. पण नंतर त्याला समजले, की शेजारच्या लोकांनी बंगला, फर्निचर विकले आहे व ती आता चारसहा दिवसांत येथून जाणार आहेत. या आनंदाने प्रथम त्याचा त्यावर विश्वासच बसेना. वत्सलाकाकू जाणार आहेत? कायमच्या? छातीवरील प्रचंड, अदृश्य ओझे उतरल्याप्रमाणे त्याने हाच बंगला रंगवून घेतला. सोप्याला चंद्राप्रमाणे दिसणारा मोठा निळा दिवा लावला. लिलू आली ती स्वच्छ, धुतलेल्या घरात. आता हे घर म्हणजे हिरव्या जगातील एक लहानसे कोरीव लेणे, आपल्या लिलूच्या सुखासाठी निर्माण केलेले. आता त्यावर कसलीही छाया नाही. कोणत्याही भुताची पावले वाजणार नाहीत. "त्या शेजारच्या बंगल्यात कोण राहतंय?" जण बराच वेळ विचारायचा प्रश्न एकदम आठवल्याप्रमाणे लिलूने विचारले. माधव दचकला; पण त्याने स्वतःला सावरले. जणू प्रथमच पाहत असल्याप्रमाणे त्याने बंगल्याकडे पाहिले व सहज बोलण्याचा प्रयत्न करीत तो म्हणाला, "त्या होय? तिथं कामत म्हणून राहतात; पण घरात विशेष कुणी मंडळी नाहीत. ते कामत लाकडाचे कॉण्ट्रॅक्टर होते ते वारले. आता अधांगाने अंथरुणाला खिळलेला मुलगा पांडुरंग व आई वत्सलाकाकू." तो किचित हसला. “पण शेजार म्हणून तुला त्यांचा फारसा उपयोग नाही, त्यांनी तो बंगला विकला. ती मंडळी आजकाल जाणार होती; कदाचित गेलीही असतील." पण लगेच त्याचे मन संशयाने चाकूच्या पात्यासारखे झाले व त्याने विचारले, “पण का चौकशी करतेस त्यांची?" “नाही, तसं विशेष काही नाही, उगाच उत्सुकता वाटली इतकंच,” लिलू म्हणाली, "त्यांची मोलकरीण आज दुपारी आली होती. आपलं काम मिळेल की काय, याची चौकशी करत होती, तेव्हा ती सांगत होती..." “सांगत होती? काय?" जवळजवळ उठतच माधवने विचारले; पण ती मोलकरीण अगदी अलीकडेच आली होती हे

त्याला आठवले. त्याचा ताण कमी झाला. त्याने हसून पुन्हा विचारले, ‘‘काय सांगत होती ती?" "त्यांची एक मुलगी होती म्हणे मोठी. त्या मोठ्या विहिरीत तिनं जीव दिला. तुम्हाला माहीत होती ती?" "होय, प्रथम थोडे दिवस मी त्यांच्याच घरी जेवत असे," बेफिकीर आवाजात माधव सांगू लागला, "आपल्या आईबरोबर इथं ती आली होती एकदा-दोनदा. ती मुलगी थोडी बावळटच होती. दिसायलाही साधारणच, त्या घरातच वेडाची छटा दिसतेय. तिच्या बापालाही तसले झटके येत म्हणे. त्या भरात म्हणे उडी घेतली तिनं. मी नव्हतो त्या वेळी इथं. परत आल्यावर पोस्टमनकडून कळली मला सारी हकिगत." ती म्हणे गरोदर होती," जणू स्वतःशीच लिलू म्हणाली. ते एकाकी, टाकून दिल्यासारखे दिसणारे घर, त्यात दुःखाने गोठून गेलेली कुणीतरी माणसे. त्यांच्या जाणिवेने तिचे मन दडपल्यासारखे झाले. दुःखाच्या सान्निध्यात आपला छोटा संसार, छडीवर लागलेल्या निशिगंधासारखे आयुष्य, सारे तिला अधाशी, फार स्वार्थी वाटले. माधवने शरमेने मान खाली घातली. आपल्या अंगावर सर्वत्र सरड्याप्रमाणे काटे फुटत आहेत, असे त्याला वाटले. दिसायला साधारण म्हणताच मेधाचे विलक्षण सुंदर डोळे त्याच्याकडे पाहून उपरोधिकपणे हसले. एकदा-दोनदा आली होती आपल्या आईबरोबर!

ती त्याला दररोज भेटत असे. रातराणीच्या झुडपाजवळ असलेल्या लहानशा गेटमधून ती येत असे, ती रातराणीचा एक तुरा खडत असे आणि तिचा गंध शालीसारखा पांघरून ती वाट पाहत उभी असे. तो दोन महिने रजेवर जाणार होता. त्याच्या आदल्या दिवशी ती थोडी लवकरच आली. ती आत आली व टेबलाला टेकून उभी राहिली. तिच्या चेहऱ्यावर नवा तृप्त आनंद होता, काहीतरी सांगायला ती धडपडत होती. ‘‘आता आपण लग्न करूया रे," आनंदाने मोहरून ती कुजबुजली. तिने रेशमी काळ्या केसांत रातराणीचा झुबका खोवला होता. हिरव्या जॉर्जेटचे पातळ, माणकाच्या तुकड्यांच्या चकमक कुड्या. तिच्या हातात देखील तीच फुले. ती त्याच्या चेहऱ्यावर हलकेच खेळवत होती. त्या धुंद, उष्ण, मांसल वासाने माधव भोवळल्यासारखा झाला. त्याला वाटले, ही मेधा? छट. ही रातराणीच हिरव्या स्वराने

उमलत आहे. ‘‘मी कळवतो तुला दोन दिवसांत," कडा स्वप्नांनी अस्पष्ट झालेल्या आवाजात तो म्हणाला. त्याने तिच्या केसांतील तुऱ्याचा वास घेतला आणि तिच्या बांधलेल्या केसांचा चपटा संभार त्याने हलकेच हातावर घेतला. तेथील सारा कृष्णगंध त्याला ओठांनी टिपायचा होता. आणि तेथे एकदम सर्पाचे तोंड दिसल्याप्रमाणे तो दचकला व मागे सरकला. तिचा हात त्याच्या हातून गळला व एकदम असह्य शिसारी आल्याप्रमाणे तो तिच्याकडे पाहू लागला. त्याने एकदम प्रहार केल्याप्रमाणे मेधा एकदम आकसली व टेबलाच्या अगदी कोपऱ्यात अंग चोरून उभी राहिली. "का, का सांगितलं नाहीस तू कधी मला, तुझ्या मानेवर कोड आहे म्हणून?" तो कर्कशपणे म्हणाला. तिची मान एकदम खाली गेली. ‘‘मला तुला फसवायचं नव्हतं; परंतु कधी सांगायचा प्रसंग आला नाही," ती स्वतःशीच बोलत असल्याप्रमाणे हलक्या आवाजात म्हणाली, "आणखी मला वाटलं, तुला माहीत आहे व तरीही..."

तो एकदम ताठला होता. त्याने एक शब्दही उच्चारला नाही; पण त्याला काय सांगावयाचे होते ते तिने समजून घेतले होते. ती तशीच खालच्या मानेने बाहेर पडली. गेट उघडण्यापूर्वी तिने खूपशी फुले तोडली व शांतपणे तिने सारा चेहरा त्यावर दडपला. ती गेली व तिने काळजीपूर्वक गेट लावून घेतले. माधवला वाटले होते, ती ताडताड बोलेल, आदळआपट करून धमकी देईल, छातीवर डोके ठेवून अश्रू ढाळील; पण तिने त्यांपैकी काहीच केले नाही. एक फुललेला पूर्ण अनुभव संपला, एक गाठ बसली, अशा तहेने ती निघून गेली होती. निदान एकदातरी तिने वळून पाहायचे होते! तो पुण्यात आल्यावर तिने त्याची सारी पत्रे - किती लांबलचक पत्रे त्याने लिहिली होती! इतर कुणालाही न सांगितलेल्या आवडीनिवडी, आकांक्षा, स्वप्ने सारी त्याने तिच्यापुढे मांडली होती-परत पाठवली. ती सारी परत आल्यावर त्याला आश्चर्य वाटले, आपल्या भाबडेपणाची थोडी शरमही-निळा हातरुमाल, एक पुस्तक, सारे व्यवस्थित लाल रिबिनने बांधून पाठवून दिले. जांभळ्या आभाळाखाली, जांभळ्या पाण्यात, पिवळ्या दिव्यांच्या लालसर होड्या असलेले

एक छोटे चित्र मात्र तिने पाठवले नव्हते. सोबत साऱ्यांवरील मृतोल्लेखाप्रमाणे तिचे शेवटचे पत्र होते. "... मला कशाचाही पश्चात्ताप नाही. तू मला फसवलंस असेसुद्धा मी कधी म्हणणार नाही. या धोक्याची मला पूर्ण कल्पना होती आणि सारं मी उघड्या हातांनी स्वीकारलं. तू मनाला अकारण टोचणी लावून घेऊ नकोस. हे असं घडणार आहे, असं खात्रीचं सांगून जर मला पुन्हा जगायला मिळालं, तरी हे जसंच्या तसं मी पुन्हा सारं जगेन. एक क्षणही न सोडता. कोणतंच सुख कधी मला हातचा राखून स्वीकारता आलं नाही. मला पश्चात्ताप नाही. दुःख नाही. हा अनुभव पुरेसा उमलला असता तर मी फार सुखी झाले असते हे खरे; पण असा तरी अनुभव आला, हे का कमी आहे? अशी तरी भाग्यवान माणसं कितीशी दिसतात? क्षणभर तरी आपल्याला डोळ्यांत एकमेकांची प्रतिबिंब दिसली. एक दुःख मात्र सलतं. आईचं. तिच्यावर अकारण शिंतोडे उडतील. तिच्या गतदुःखाच्या खपल्या निघतील. माझ्या भावाच्या आजारानंतर माझ्या दुःखानं ती खचणार. शेवटच्या चार दिवसांत तीच मला सोडून जाणार असल्याप्रमाणे मी माझी सारी आपुलकी तिच्यावर पसरली. उद्यापासून ती आठवडाभर आमच्या गावी जाऊन येणार आहे हे त्यातल्या त्यात बरंच; पण नंतर मात्र ती अगदी एकटी पडणार! तिला यातील काहीच माहीत नाही. पोरीचं दुःख तरी काय होतं, हे समजलं नाही म्हणून ती वेड्यासारखी आयुष्य पोखरत बसेल, हेच एक दुःख मला शेवटी जाणवतं. "शेवटचं एकच. ती रातराणीची फुलं. तिनं आपली पहिली भेट पाहिली. या शेवटच्या भेटीत तिला असू दे!" पत्र मिळाल्यावर माधवला प्रथम फार अस्वस्थ वाटले. नंतर त्याने ते ड्रावरमध्ये टाकून दिले. 'सगळे मृदू शब्दांचे जाळे. सारी फसवणूक. कधीतरी ती आपल्या आईविषयी बोलली होती का? आणि तो शिसारी आणणारा डाग तिने का झाकून ठेवावा? शेवटचे पत्र? ह्यः! आणखी एक आठवड्यात दुसरे पत्र येईल -' तो चिडून पुटपुटत होता. पत्र काही आले नाही. तो परत आला त्या वेळी त्याला सारी हकिगत समजली. बरेच दिवस मग त्या बंगल्यात कुणी दिसले नाही. नंतर पुन्हा दिवे लागले. वत्सलाकाकू कधीतरी दारात दिसायच्या. त्याने एकदा जाऊन त्यांचे सांत्वनही करण्याचा प्रयत्न केला होता. आता त्याही जाणार. तेथे नवे लोक येणार. नवे जीवन, त्यातील निराळी नवी सुखदुःखे! ती

दिसायला साधारण होती, एकदा-दोनदा आईबरोबर आली होती! त्या शांततेने लिलूही गप्प झाली होती. मधूनमधून कठड्यावरील मासिकाची पाने फरफरत, रोपे हसत व रातराणीच्या झुडपात पसा-मूठभर हालचाल दिसे. मेधाने आपल्या आईविषयी कधीच का बोलू नये? आईचे रीतसर धार्मिकरीत्या कामतशी लग्न झाले होते हे खरे; पण तिच्या नावाने प्रसिद्ध असलेले ते होन्नावरचे घर, त्याचे काय? हे देखील आपण स्वीकारले असते - स्वीकारले असतेस? खरे? प्रामाणिकपणे? काय निर्लज्ज आहेस तू! अशा मुलीला पत्नी म्हणून बरोबर घेऊन हिंडला असतास? बहिणींच्या घरी तिला स्वतःबरोबर नेले असतेस? भेकड, स्वतःशी देखील खरे बोलण्याचे तुला धैर्य नाही – पण तो डाग! लग्न झाल्यानंतरही तिने तो आपणाला दाखवला नसता! आपण आपल्या नशिबानेच सुटलो. नाहीतर नंतर अपेशी, वाळीत टाकलेले दरिद्री आयुष्य! पण आता आपल्या आयुष्यात येण्याचा तिला काय अधिकार आहे? आपल्यामुळे ती मेली? कोण म्हणतेय? कुणाला माहीत आहे हे सारे? ते सारे तिच्याबरोबर संपले. आपले आयुष्य स्वच्छ आहे. समोर लिलू आहे. आता या सुखावर कसला तडा, कसला डाग? माधवने निबरलेल्या मनाने वर पाहिले. जणू त्याने ते सारे कायमचे पुसून टाकले. तो शीळ वाजवू लागला व त्याने आळस झाडला. "लिलू, आपण पिक्चरला जाऊया चल. अद्याप वेळ आहे," तो उठत म्हणाला; पण लिलू जिकडे पाहत होती तिकडे त्याचे लक्ष गेले व तो एकदम थांबला. भूतकाळातून भूत आल्याप्रमाणे वत्सलाकाकू गेट उघडून एकेक पायरी सावकाश उतरत त्यांच्याकडे येत होत्या. त्यांना पाहताच माधवचे अंग अनामिक भीतीने थरथरले. एकदम ओरडून त्यांना 'जा जा' म्हणून सांगावेसे त्याला फार वाटले; पण त्याच्या तोंडून शब्द फुटला नाही. वत्सलाकाकू जवळ आल्या. त्या लाल ठिपक्यांचे बदामी पातळ नेसल्या होत्या व अंगावर काळ्या किनारीची हिरवी शाल घेतली होती. त्यांचा रंग आता जुन्या हस्तिदंती फणीसारखा दिसत होता. त्या वेळीही लिलूला एकदम वाटले, ऐन तारुण्यात ही बाई फार सुंदर असली पाहिजे. वत्सलाकाकूनी आपले अधू डोळे ताणून माधवकडे पाहिले व त्या कुंपणावरील चिंधी हलल्याप्रमाणे हसल्या. "म्हटलं, उद्या पहाटे आम्ही इथून जाणार, भेटून जावं,"

क्षीणपणे हसत त्या म्हणाल्या. त्यांनी पुन्हा डोळे ताणत लिलूकडे पाहिले. त्या नजरेखाली ती एकदम अस्वस्थ झाली. वत्सलाकाकूंनी मान डोलावली, “ही बायको का, माधवराव? बरं झालं संसाराला लागलात. सुरेख आहे हो मुलगी." लिलू जागी झाल्याप्रमाणे झाली व चटकन कठड्यावरून उठली. “या, आत या ना! तुमची ओळख होते न होते तोच चाललात तुम्ही," ती म्हणाली. वत्सलाकाकू वर आल्या नाहीत. तेथूनच त्या म्हणाल्या, “आता येत नाही. आता आणखी लोक येणार आहेत घरी, तेव्हा आधी भेटून जावं म्हणून आले. नंतर कुठली सवड मिळायला! सारा संसार जायचा ना इथून. आता काय उरलंय आमचं? आता आपल्या गावात जायचं, तिथ खत टाकायचं," त्या खिन्नपणे म्हणाल्या व लिलू एकदम गप्प झाली. वत्सलाकाकूंनी इकडेतिकडे पाहिले व तेथल्या तेथेच त्या पंधरावीस पावले हिंडल्या. मूळ वस्तूपासून सुटून जाणारी एखादी सावली स्वतंत्र हिंडावी त्याप्रमाणे त्या विरलेल्या वाटत होत्या. त्यांनी रोपांकडे पाहिले व पुन्हा मान हलवली. त्या लिलूकडे वळल्या व म्हणाल्या, “यांचा सारा वेळ अजून इथं खणण्यातच जात असेल, नाही? आमची एक मुलगी होती. तीही अशीच वेडी ग! तिला झाडाझुडपांची फार हौस बघ. ही रातराणी आहे ना, ती तिनंच लावली तुमच्या आवारात. त्या वेळी दुसरं बिहाड होतं इथं, बापटांचं. आमच्या बंगल्यात लावायला गेली तर तिच्या वडिलांनी सांगितलं, रातराणीबितराणी काही नाही. तिच्यामुळे साप येतात. तर आपण साप मारू म्हणून ती भांडायला लागली. दोन दिवस जेवली नाही, बोलली नाही. माझी काय पंचायत गत्या वेळी! फारच हट्टी ती लहानपणापासून. अखेरीस ते झाड इथं आलं, वाढलं, त्याचं पाणी इथं होतं म्हणायचं झालं-" मेधा जणू घरात असल्याप्रमाणे त्या बोलत होत्या, सांगत होत्या. माधव कासावीस होऊ लागला. त्या क्षीण आवाजाने त्याचे आयुष्य कुरतडल्यासारखे होऊ लागले. जा येथून आता! जा, जा! आणखी एक शब्द बोलू नको पुढे, जा! तो सारखा मनातल्या मनात जपू लागला. "बराय, मी जाते आता, यापुढं कसली भेट म्हणा!" पाचदहा मिनिटांनी जायला वळत वत्सलाकाकू म्हणाल्या. संध्याकाळच्या वाऱ्याने त्यांचे अंग शहारले व त्यांनी शाल अधिकच लपेटून घेतली. “येते ग मुली. लक्ष्मीसारखी आहेस तू." त्या लिलूला

म्हणाल्या. लिलू खांबाला टेकून त्यांच्याकडे पाहत कठड्यावर बसली. माधवला वत्सलाकाकू जात असलेल्या पाहून एकदम हायसे वाटले. गळ्याशी आवळणारी भीती एकदम सैल होऊन नाहीशी झाली. तो लगबगीने पुढे गेला व त्याने गेट उघडून धरले. धापा टाकत वत्सलाकाकूतेथे क्षणभर थांबल्या व त्यांनी माधवकडे रोखून पाहिले. “मी आता भेटणार नाही माधवराव; पण मला थोडं बोलायचं होतं," त्या हलक्या आवाजात म्हणाल्या, "मला सारं पहिल्यापासून माहीत होतं. पोरीच्या सुखासाठी मी जगाकडून बेअब्रसुद्धा सहन केली असती; पण सारं मी नसताना घडलं. आता या सुंदर मुलीला आयुष्यात आणलंस. तिला तरी आता माणसासारखं वागव!" त्यांनी शाल पुन्हा लपेटून घेतली व त्याच्याकडे पुन्हा पाहिले. क्षणभर फुललेला डोळ्यांतील कठोरपणा विझला व त्यावर पुन्हा वयाची राख जमली. पुन्हा मागे न पाहता वत्सलाकाकू पांढऱ्या सावलीप्रमाणे निघून गेल्या. माधव खिळल्यासारखा निर्जीव तेथे उभा राहिला. भूतकाळ पांढऱ्या ठिपक्यांच्या हजारो टोकांनी आपल्याला स्पर्श करीत आहे असे त्याला वाटले. कोणाचे ते शब्द? कोण बोलले आता? लाल ठिपक्यांच्या बदामी पातळातल्या, हिरवी शाल घेतलेल्या वत्सलाकाकू? छे, त्यांचे डोळे तर मेधासारखे वाटले. मेधा की लाल, बदामी, हिरवी रातराणी? या साऱ्यांचा गुंतवळाच त्याच्या धक्का बसून बधिर झालेल्या मनातून फिरला. शरमेने त्याला फार दुबळे वाटू लागले. या वेळी कुणाचातरी आधार असावा असे वाटून तो आंधळेपणाने पावले टाकत लिलूकडे आला व चिंबलेल्या आवाजात तो म्हणाला, “लिलू, अग लिलू -" पण ती अगदी स्तब्ध बसली होती. त्याचे शब्द तिच्याभोवती फिरले व बाजूच्या हिरव्या शांततेत बुडाले. तिच्या मनात अद्याप सावकाश पावले टाकत जाणाऱ्या, आघाताने असहाय झालेल्या वत्सलाकाकू होत्या, त्यांचे निर्जीव अधू डोळे होते, लक्ष्मी, लक्ष्मी हे त्यांचे शब्द ऐकू येत होते. नुसती खोटी नजर टाकली की घायाळ होणाऱ्या भाबड्या अरविंदाच्या जीवनाशी आपण निव्वळ चाळा, गंमत म्हणून खेळलो व त्याच्या आयुष्याचा अगदी विध्वंस करून टाकला. त्याचा सूड म्हणूनच की काय या ठिकाणी कुणीतरी, इतक्या दूर, परक्या ठिकाणी त्या मुलीचे आयुष्य विसकटून टाकले आणि त्यात ही बाई होरपळून

निघाली. आपण ते पाप केले नसते, तर कदाचित हे दुःखही घडले नसते. या तिच्या दुःखाला आपणच जबाबदार आहो, असा एक वेडा विचार चर्रकन तिच्या मनात येऊन गेला व वत्सलाकाकू गेलेल्या दिशेने ती शरमून व्याकूळ नजरेने पाहू लागली.

विश्वेश्वर नांदेडकर: कथा वाचल्यावर मन कसे सुन्न होवून जाते एकंदरीत प्रत्येकाच्या आयुष्यात एक खोलवर झालेली जखम आसते आणि त्या साठी तोच जिम्मेदार असतो. आणि ती टोचणी आयुष्यभर स्वस्थ बसुदेत नाही हेच खरे

सुनीळ सामंत: या कथेला रातराणी हे नाव दिले असेल?

विलास वाघोलीकर: - जीएंच्या या कथेचे प्रास्ताविक, कुलकर्णी जींनी मुद्देसूद केले आहे.धन्यवाद. या कथेची वैशिष्टये काय दिसतात ?

- बागकामाचे, बागेतील वनस्पतींचे खोल ज्ञान. वनस्पती या माणसासारख्या जिवंत असतात. त्यांच्याकडे तसे हिरव्या हाताने पाहिले पाहिजे, ही जाणीव कथेत दिसते.

- माणसाचे तारूण्य वादळासारखे येते. काही विशिष्ट मूल्ये धरून त्या वेड्या , धुंदीमय कालखंडात वागले पाहिजे. सत्ता, पैसा , ज्ञान यांच्या आहारी जावून मूल्ये विसरली तर, कुठेतरी हत्या, आत्महत्या, निगरगट्ट जीवन घडते. तरुण जीवन वाईट नसते. पण वाईट होवू शकते हे दाखवणारी जीएंची कथा आहे. जीएंच्या स्टाईल मधील. धन्यवाद. विलास वाघोलीकर

वैभव कुलकर्णी : जीएंना वनस्पतीशास्त्राचे भरपूर ज्ञान असावे.त्यांच्या कथेत जिरेनियमचे ऊल्लेख वारंवार येतात.....या कथेत नुसत्या जिरेनायमचा ऊल्लेख आहे. पण माणसे आरभाट आणि चिल्लर मधे सेंन्टेड जिरेनियमचा ऊल्लेख आहे.(स्टिफन माळ्याने दिलेली सेंन्टेड जिरेनियमची फांदी)..

या खेरिज कोलियस ,कोशिया , लार्कस्पर , अशी ही बागेतील झाडांची नावे रातराणी कथेत येतात.

निग्रेटाच्या लाल फुलाचे वर्णन तक्षक मधे आहे....

रातराणी ही मेधाची आणि त्यांच्यातल्या प्रेमाच प्रतिक आहे. रातराणीला फक्त रात्रीच गुढ आणि तीव्र सुगंध येतो....इतका येतो की नंतर नंतर नकोसा वाटतो. म्हणून रातराणी या कथेत मेधाच्या कटू आठवणी त्याची कधीही पाठ सोडणार नाहीत , नेहमी छळतच रहाणार., याचे प्रतिक असावी.

वैभव कुलकर्णी : या कथेत जीएनी कधीही कालबाह्य न झालेल्या एका आजाराच्या सामाजीक भीती विषयी लिहले आहे. कोड !

हा रोग नाही.पण रंगद्रव्याच्या कमतरतेने होणारा त्वचेच्या रंगातला(मेल्सानीन) पांढरेपणा असतो. कोड किंवा vitiligo किंवा leucoderma बहूतेक अनुवंशीक असतो. कालांतराने छोटा डाग वय वाढेल तसा सगळीकडे पसरतो....पुढच्या पिढीतही दिसून येतो.

आजही कोड असलेल्यांच दोन कुटूंबात विवाह होतात.

पुण्याच्या सर्जन डाॅ.माया तुळपूळेंनी या विषयावर नितळ नावाचा चित्रपट काढला आहे

लार्कस्पर कोशिया

दिलिप बडे: https://youtu.be/z1yZh2TFuTo

संजीव सावरगांवकर: कथा :रातराणी

कथासंग्रह: पारवा

सरळसोट पणे ही कथा वाचली तर दोन शेजारी कुटुंबांची छोटीशी कथा आहे. नायक नुकत्याच विकत घेतलेल्या एका घरात राहतोय तर नायिका दुसऱ्या घरात

राहणारी आहे. नायकाची घर खरेदी व रंगवून झाल आहे. तर नायिकेच्या कुटुंबाला घर विकूनच सोडून जावे लागते आहे. या छोट्या, कदाचित सहा महिने कालावधीत, ह्या कथेचे कथासार आहे. दोन्ही घरांच्या मध्ये रातराणी फुलली आहे. नायिकेचा हात गुण म्हणजे झाडेझुडपे तिच्या स्पर्शाने मोहरत फुलत जातात. रातराणी च्या साक्षीने नायक माधव, नायिका मेधा, व माधवची नवापरणीत पत्नी लीलू यांची आपापली कथा व व्यथा कथेचे मध्ये गुंफली आहे. प्रत्येक पात्राच्या मनातील रातराणी आणि ती कशी बहरते व कशी कोलमडते याचा अनुबंध म्हणजे ही रातराणी कथा आहे.

मेधा चे मनोगत

मला झाडांचे, फुलांचे वेडच आहे. हिरव्या रंगाशी माझं गूढ नातच आहे जणू. मी रोप लावले की हमखास बहरणारी हिरवाई तयार होणार. आम्ही कामत, वडील कॉन्ट्रॅक्टर होते अन लवकरच वारले. आई म्हणजे (वत्सलाबाई), भाऊ पांडुरंग ,अर्धांगाने खिळलेला. त्यातून आई माहेराकडून खालच्या कुळातली असल्याने त्यामुळे शेजारपाजारी आमचे संबंधच नाहीत. माझे हे असे उत्स्फूर्तपणे प्रेममय होऊन बागडण्याचे वय. शेजारचा, जवळपास माझ्याहून थोडासा मोठा असणारा, माधव लाघवी,प्रेमळ होता. मी तर त्याच्या प्रेमातच पडले. त्याला पत्र लिहिणे, रोज रात्री रातराणी ची फुले माळून त्याला भेटणे नित्याचे झाले होते. हे प्रेमप्रकरण थोडेफार आईला माहीत होते पण मोघम माहिती होती तिला. मात्र माझ्या मनातील एक सल मी त्याला अजून सांगू शकले नव्हते. मला कोड होते. मानेवर एक छोटा पांढरा डाग होता. तो रजेवर जाणार म्हणून व तृप्त आनंदाने लवकरच मातृत्वाची मला पदवी मिळणार आहे या स्वप्नांवर भारावून मी त्याला म्हटले "अरे माधव, आता आपण लग्न करूयात रे". माझ्या केसात माळलेल्या रातराणी च्या फुलांचा वास घेत, माझ्या मानेवरील केस त्याने बाजूला केले तोच त्याला तो कोडाचा डाग दिसला व त्याचे एकदम सारेच बिनसले. प्रेमाचा धागा अचानकपणे तुटला. त्याने या कारणामुळे

माझ्याकडे पाठ फिरवली.त्यामुळे माझा एक फुललेला पूर्ण अनुभव संपला. मीही त्याला एक पत्र लिहून माझ्या भावना कळवल्या व त्याची सर्व पत्रे परत त्यालाच नीट परत पाठवली.माझ्या नशिबाने माझी आई गावी गेलेली असल्याने मी केलेली आत्महत्या (कुमारी गरोदर होते ना मी) ऐकून ती एकटीच पडणार हेच एक माझं मृत्यू च्या वेळचे शेवटचं दुःख होतं. शेवटी मी माधव ला पत्रात लिहिले होते. "माधव ह्या रातराणी च्या फुलांनी आपली पहिली भेट पाहिली आहे त्यामुळे या (आपल्या) शेवटच्या भेटीतही तिला तू राहू द्यावी (ती तू तोडू नकोस). मात्र माझ्या आयुष्यातील रातराणी आता कोळपलेली आहे. मृत झालेली आहे अगदी माझ्यासारखी जणू. मी तुझ्या आयुष्यातून गेलेली असले तरी मनातून, आठवणीतून गेलेली नाही याची साक्षीदार म्हणजे ही मी लावलेली रातराणी हे लक्षात ठेव.

माधवचे मनोगत

उमलले आभाळभर हे चांदणे माझे तुझे |
लपवून लपलेच नाही भेटणे माझे तुझे ||

हे असे श्वासातल्या श्वासात आपण बोललो |
आणि वाऱ्याला समजले बोलणे माझे तुझे ||

दरवळया लागली ही शांतता दोघातली|
केवढे गंधाळले, गंधाळणे माझे तुझे||

वैभव जोशी ची ही कविता माधव च्या मानसिकतेची भावना बोलते. मेधा चा आणि रातराणी चा सुगंध आता माझ्या मनासारखा पूर्वीसारखा दरवळतच नाहीये. पूर्वी रातराणी सुंदरच फुलवायची मेधा. रात्रीचा तिचा सुगंध आणि मेधा बरोबरचा त्या सुरम्य रात्रप्रेमाच्या आठवणी, एकमेकांच्या श्वासात गुंतलेले प्रेमळ

संवाद, तिचा उत्कट सहवास आणि हो तिच्याबरोबर रममाण होण्याचे ते सोनेरी क्षण,तो सुवर्ण स्पर्श अगदी सारे सारं आठवतंय. मी रजेवर जाण्यासाठी तिला भेटणार होतो, बोलणार होतो, प्रेम व्यक्त करणार होतो. पण ती माझ्यापेक्षा जास्तच उत्सुक होती म्हणाली "अरे माधव आता आपण लग्न करूयात रे "

माझ्याबरोबर संसाराला आसुसलेली ती अगदी मनापासून बोलली. मीही तेवढ्याच प्रेमाने तिला कवेत घेऊन तिच्या मानेवर ओठ टेकणार, तेव्हा अचानकपणे तिच्या मानेवर कोडाचा डाग मला दिसला आणि चटका बसल्यागत मी दूर झालो. तिच्याबरोबर माझी प्रेम, संसार, पत्नी म्हणून स्वीकारण्याची इच्छाच एकदम मेली. मी शेवटी तिला टाळलंच आणि तेच कारण देऊनच तिला मी अव्हेरून टाकले, टाळलं.

माझ्यापेक्षा तीच जास्त समजूतदार निघाली. लिलीच बरोबर माझे लग्न होण्याआधीच कोणालाही न सांगता, अगदी तिच्या आईलाही न सांगता, तिने आत्महत्याच केली.त्याआधी तिने तिचे सर्व मनोगत मनमोकळे पणे एका पत्राने मला कळवले व मी लिहिलेल्या पत्रांचा गठ्ठा व इतर आठवणी निरपेक्षपणे मला परत केल्या. आता लीलू माझी नवपरणीत वधू या मोठ्या घरात येणार होती. त्यामुळे माझा हा पूर्वीचा इतिहास मला नष्ट करणे अत्यंत जरुरीच होत. मी ते सर्व नष्ट केले ही. पण बाहेर लावलेली रातराणी मात्र नष्ट करू शकलो नाही.आणि तरीही माझ्या मनामध्ये एक भीती होतीच. केंव्हा तरी वत्सलाबाई, मेधाची आई, माझ्या अपरोक्ष लिली ला हा मागचा इतिहास सांगतील. पण तो माझा भ्रम ही लगेच संपुष्टात आला. वत्सलाबाईंनी घर विकलं व तेच त्या सांगायला माझ्या घरीच आल्या.लिली बरोबर होतीच. त्यांची इतर बडबड चालू होती रातराणी चे रोपण मेघाने कसे याठिकाणी व का केले हे सांगत राहिल्या. बागेवरती नजर टाकून लिली कडे पाहत म्हणाल्या "अगदी लक्ष्मीसारखी आहेस ग तू"

मी गेट जवळ थांबलो होतो की त्या आता केव्हा जात आहेत. माझ्यापाशी येऊन, मला कानात सांगितल्यासारखं म्हणाल्या , त्यांना मेधाचे व माझे प्रेमप्रकरण

सर्व माहिती होतं. पण बऱ्याच घटना त्यांच्या अपरोक्ष घडल्या होत्या. अगदी मेधा ची आत्महत्या सुद्धा. त्या म्हणाल्या " माधव, मात्र या मुलीला तरी माणसासारखे तू वागव रे".त्यांच्या या एका वाक्याने माझे भाव विश्व ढवळून निघाले.मला बधीर झाल्यासारखं झालं, एकदम धक्काच बसला. माझ्या मनातील मेधाच्या रूपातील रातराणी ची पार राखरांगोळी झाली. हताश होऊन मी लीलू ला हाक मारली. लीलू ए लिली....

लि लू चे मनोगत

माझ्या वडिलांचे ओळखीमुळे खरंतर माधवला नोकरी लागली. थोडा इंजीनियर आणि भरपूर माळी असलेल्या माधवची ओळख पुढे वाढून माझे त्याच्याशी लग्नच झाले. आम्ही दोघे नवे नवे लग्न झालेले माधवच्या एवढ्या मोठ्या बंगल्यात राहण्यासाठी चाललो होतो. मला स्वतःला झाडाझुडपांचे बागेचे म्हणावेसे एवढे ज्ञान नाही पण आता या घरात राहायचे म्हटल्यावर शेजारपाजारची चौकशी करणे जरुरीचे होते. आणि कामतां कडील मोलकरणी कडून, माधव कडून आणि शेवटी वच्छलाबाई यांच्याकडून थोडे थोडे मोघम कळत जाऊन माझ्या माझ्या मनामध्ये मेधा माधव चे जिग सा पझल जुळून आलं. त्याचीच मागची बाजू म्हणजे माझे आयुष्य , लग्ना पूर्वीच आयुष्य. माझ्या खोट्या नजरेवर घायाळ होणारा भाबडा अरविंद अगदी पोचटच निघाला. त्याच्या जीवनाशी मी निव्वळ चाळा म्हणून, गंमत म्हणून खेळले व त्याचे आयुष्याचा सत्यानाश झाला. त्याचे परिणीती म्हणा वत्सला बाईंनी सांगितलेले, ऐकलेले मेधाचे आयुष्याचे कथासार म्हणा, येथील शांतता म्हणा त्याचे व आपण केलेल्या पापाचे सावट हे या रातराणी च्या रूपाने मेघाने लावलेल्या रातराणी च्या रूपाने आयुष्यभर मला मारत राहणार आहे. ती बोचरी रातराणी मला कायमची खुपत राहणार आहे. ना ती मला तोडता येणार आहे ना तिच्याकडे दुर्लक्ष करता येणार आहे. ती आता वत्सला बाईंच्या आणि न पाहिलेल्या पण ऐकलेल्या मेधा च्या शेवटच्या आठवणीच्या रूपाने मला भेटतही राहणार आहे. आणि सदा

सर्वकाळ या मेधाच्या आयुष्य नाशाला, मी या तिच्या दुःखाला जबाबदार असणार आहे असा वेडा विचार मनी येऊन माझ्या संसाराला सुरुवात होणार आहे.

एक रातराणी, तीन आयुष्य एकमेकांशी निगडित आहेत. एकमेकांचा आयुष्य सल सुखाचा, दुःखाचा, प्रेमाचा, विरहाचा बरोबर घेऊन रात्री मदनधुंदीत ती रातराणी कायम रोज फुलणार आहे. त्या तीव्र सुगंधात पूर्णपणे फुलणारी असेलच. आता तिच्या भोवती राहणाऱ्या कोणालाही त्यातून वगळता येत नाहीये. माधव च्या घराच्या बुद्धिबळाच्या पटावरील मोहरे एकमेकांना कायमचे शह देत आयुष्याची चाल चालत राहणार आहेत तसेच ते मूकपणे एकमेकांना चुकवत पण मुखवटा घालून जगणारे हे तीन जीव ,(हो एक मेधा चा मृत आत्मा) त्या रातराणी भोवती कायम घुटमळत राहणार आहेत.

कथेची बांधणी उत्कृष्टपणे झालीय. नीट वाचून, त्याचे धागे दोरे वेगळे करून, कथेची व्याप्ती समजुन घ्यावी लागते. प्रत्येकाचा आधीच्या आयुष्याचा सल मनात कायमस्वरूपी राहुन पुढील आयुष्य जगण्यास माधव, लिली, वत्सला बाई यांना भाग पाडतो.

........

आस्वादक

संजीव सावरगांवकर. कोथरूड, पुणे. 7350002870.

सुनीळ सामंत: खुप सुंदर आणि शैलीदार आस्वाद.

यात रातराणीची ही तेहेरी पेड आता जाणवली.

तरीही रातराणीच का? गुलबक्षी, मोगरा किंवा जास्वंद का नाही?

जीए विनाकारण रातराणीला मध्यवर्ती आणतील असे वाटत नाही.

संजीव सावरगांवकर: रातराणी चे वैशिष्ट्य म्हणजे दिवसभर कळया बाळगून रात्री फुलून येणारी भरपूर मादक सुगंध देणारी, प्रेम वृद्धिंगत करणारी वेल. इतर फूल झाडांना त्यांची स्वताची लिमिटेशन्स आहेत. गुलबक्षी रंगाची पण सुगंध नाही, मोगरा सुगंधी पण विशिष्ट काळात फुलणारा, जास्वंद रंगीत पण वास हीन. रातराणी हे प्रेमाचे प्रतिक जवळपास बारमाही फुलणारे. मानवाच्या प्रेमभावना उत्पन्न करणारे मदन पुष्प. अजुन इतर संदर्भ ही शोधावे लागतील.

रजनीगंधा या सिनेमालाही केंद्रस्थानी रातराणी होती. अनेक मराठी गाण्यांतही रातराणि आहे. आणि त्यांनाही तुम्ही म्हटलेलेच संदर्भ आहेत.

संजीव सावरगांवकर: रातराणी ज्याला चांदणी देखील म्हणतात. रातराणीच्या फुलांचा गंध सर्वत्र दरवळत असतो. ह्याचे लहान लहान फुले गुच्छ मध्ये असतात. फुले रात्रीच्या वेळी उमलतात आणि सकाळी मावळतात. यामुळे ह्याला रातराणी म्हणतात.

सदाहरित झुडूपं असलेली रातराणी 13 फुटापर्यंतची असू शकते. ह्याची पाने सरळ, अरुंद सूरी प्रमाणे लांब, गुळगुळीत आणि चमकदार असतात. फूल पातळ ट्यूबलर सारखे हिरवे आणि पांढरे असतात. जाणून घेउया याचे 5 आश्चर्य कारक फायदे.

1 रातराणीचे किंवा चांदणीचे फूल वर्षभरातून 5 किंवा 6 वेळा येतात. प्रत्येकी वेळी 7 ते 10 दिवसात आपला गंध सर्वत्र दरवळतात. याने वास्तुदोष दूर होतो.

रातराणी किंवा चांदणीचा गंध घेतल्याने जीवनातील सर्व वेदना नाहीश्या होतात, मानसिक ताण कमी होतो. स्नायू रोगात रातराणीचा आणि त्याचे फूल फायदेशीर असतं. रातराणीच्या सुगंधाने सर्व प्रकाराची काळजी, भीती दूर होते.

3 रातराणीच्या फुलांचे गरजे तयार केले जातात. जे केसात माळले जाते. हे माळून बायका नेहमी आनंदी राहतात.

4 रातराणीच्या फुलांनी अत्तर देखील बनवले जाते. मानसिक ताण दूर करण्यासाठी, चांगल्या आरोग्यासाठी आपल्या शयनगृहात आणि आंघोळ करताना रातराणीच्या अत्तराचा वापर केले पाहिजे. रातराणीच्या अत्तराने स्नान केल्याने किंवा सुगंध घेल्याने डोके दुखीचा त्रास कमी होतो. सकाळी रातराणीच्या सुगंधी पाण्याने आंघोळ करावी. जेणे करून दिवसभर शरीरात ताजेपणाची भावना येते आणि घामाच्या वासांपासून सुटका होते.

5 रातराणीच्या सुगंधांचा मनावर आणि मेंदूवर सखोल प्रभाव पडतो. ज्यामुळे आपल्या विचारांवर त्याचा फरक पडतो. आपली सकारात्मक विचारसारणी होऊ लागते

वैभव कुलकर्णी : फक्त रातराणीचाच घमघमाट येतो.....गुढ....फक्त रात्री.

रातराणी तारूण्याचे प्रतिक आहे

सुनीळ सामंत: 👍

दिलिप बडे: रातराणी-ती गाऊ लागली की रातराणीला फुले येत आहेत असे वाटावे.अगदी तृप्त सुखाच्याही अंतर्हदयात असलेली हुरहुरीची निळीसावळी छाया त्यामुळे स्पष्ट जागी होत असे.अशी मेधा,मेधा म्हणजे बुद्धी-प्रतिभा-तेज.मेधाची आई तरूण पणी सुंदर दिसत असली पाहिजे हा लिलूच्या मनातील संकेत मेधाचे सौंदर्य स्पष्ट करतो.लिलीचे फुल तेही सौंदर्यच.अशीही जी.एं.नी गुंफलेली- कथा बुद्धिचे श्रेष्ठत्व सिद्ध करते.2)ही रातराणी आहे ना तिंनच लावली तुमच्या आवारात (बापट)आमच्या बंगल्यात लावायला गेली तर तिच्या वडिलांनी सांगितलं.रातराणीबितराणी काही नाही.तिच्यामुळे साप येतात तर आपण साप मारू म्हणुन ती भांडायला लागली.अस वत्सला काकू लिलुला म्हणाल्या.येथे माधवच

सर्परूप आहे.अशी ही सर्पांच्या सहवासाने वाढणारी शापित रातराणी.सुंगधातील बहार.

दिलिप बडे: परमोच्च सुवासाशी मेधाची बरोबरी"म्हणुन कथेच नाव रातराणी.

विलास वाघोलीकर: कथेतील उपमा - वर्णनांचा योग्य अर्थ वाटतो.धन्यवाद. विलास वाघोलीकर

वैभव कुलकर्णी : एक होती रातराणी
सांगे गुलमोहर कहाणी
आठवणीने तिच्याच
आले डोळया त्याच्या पाणी

उठे जीवघेणी कळ
जेव्हा सुटे दरवळ
कसे आठवते सारे
जरी लोटला हा काळ

एक धुंद होती रात
पानं-फुलं होतं गात
हरखला गुलमोहर
जणू टाकुनिया कात

सारा उत्कट तो संग
त्याचा खुललेला रंग
तिला वास्तवाचे भान
अन तो स्वप्नामध्ये दंग

त्याची नुरली ना ओढ
पण मनी राही तेढ
उभी एकाकी रातराणी
मंद हसतसे गुढ...

सुनीळ सामंत: वाह वैभवजी.

तसे तर तुम्ही नेहमी कामात व्यग्र असता. पण रातराणीसाठी विशेष खुलला आहात!

विवेचन - डॉ माधव पुराणिक कथा रातराणी - (' पारवा' ,१० पानी) जीवनदर्शन कथा

अस्तित्ववादी प्रेमातल्या स्वर्गसुखावर
सांसारिक प्रेमाची गडद शोकात्म सावली

१ कथेतील मुख्य पात्रे, परिसर, सुरुवात, शेवट, स्वरूप

A)मुख्य पात्रे

सहसा जी एं च्या कथेतील पात्रे कमी शिक्षण असलेली, अत्यंत गरीब, एककल्ली/ हट्टी असतात.या कथेतील पात्रे मात्र सुशिक्षित, बरी आर्थिक परिस्थिती असलेली, छंद / आवडीनिवडी , स्वप्न रंगविणारी व प्रयत्न करणारी आहेत.

१ माधव - नुकताच लिलूशी लग्न झालेला. मधुचंद्र संपवून नुकत्याच नविन विकत घेतलेल्या मोठ्या बंगल्यात ( जेथे तो पूर्वी भाडेकरू म्हणून रहात होता ) माधव व लिलू आले आहेत.

'धंदेवाईक माळी'

२ लिलू - लालूंच्या वडिलांनी माधवला मोठ्या पगाराची नोकरी लावून दिली आहे.( 'हिंदू विषयी त्याला फार कृतज्ञता वाटली तिच्या वडिलांच्या मदतीने त्यालाही नोकरी मिळाली सुख पोचले नीलूमुळे नक्की आपले आयुष्य सभ्य सुखाचे झाले नाही तर लहानपणापासूनचे दारिद्र्य पुढेही चालूच राहिले असते) हे लक्षात घेऊन माधवने लिलूची लग्न केले आहे.

लिलूने वडिलांजवळ आपल्या जोडीदाराविषयी अपेक्षा, आवडीनिवडी, इच्छा मोकळेपणाने व्यक्त केल्या नसाव्यात.

३ मेधा - माधवची पूर्वीची प्रेयसी. फुलांची विशेषतः रातराणीचा आवड आसलेली, तिच्या मानेवर कोड असल्याचे अनपेक्षितपणे लक्षात आल्यावर माधव तिच्याशी लग्न करीत नाही. गरोदर मेधा ' त्या मोठ्या विहीरीत जीव देते'.

४ अरविंद - भाबडा, लिलू ' त्याच्या आयुष्याशी गंमत म्हणून खेळते व त्याचे आयुष्य उद्ध्वस्त करून टाकते.'

५ वत्सलाबाई - मेधाची आई. पूर्वी अनीतिमान असावी ('तिची आई हलक्या कुळातली होती') पण नंतर माधवच्या शेजारच्या बंगल्याचे मालक कामत यांच्याशी लग्न केलेली,

B) कथेचा परिसर

अ) दोन शेजारी असलेले बंगले.एकात वत्सला बाई व मेधा व दुसऱ्यात माधव - आधी भाडेकरू व नंतर मालक म्हणून ( लिलूशी लग्न केल्यानंतर).

ब) माधवच्या बंगल्यातील रम्य व सुंदर बाग ही माधवने, विशेषतः मेधाने फुलविली आहे. माधवच्या बंगल्यात पण बाग आहे

क)कथेचे भावकेंद्र -माधवच्या बागेतली रातराणी हे मेधाचे प्रतिक आहे.. .

C) मध्यवर्ती प्रतिमा

रातराणीचा वेल ही मध्यवर्ती प्रतिमा आहे. तिच्या भोवती रातराणीच्या अनेक प्रतिमा गुंफल्या आहेत . त्यामुळे नायिकेचा जीवन आशय स्पष्ट होतो.

प्रतिमांची रचना विरोधलयावर आहे. कोमलतेबरोबर कठोरता आहे.( ' हिरव्या रंगातील आयुष्य भोवती शिवाय मातलेल्या हिरवट पाण्यातच शेवट. तरारलेल्या दोनच पेटाऱ्यातल्या लार्कस्पर रूपांच्या पेटाऱ्यांना वाळवी लागून त्याचे तुकडे झाले.')

जागृत अवस्थेतील इतरांना दाखविण्याच्या स्वतः च्या उजळ प्रतिमेला छेद देणारी मनातील काळी ,नकोशी प्रतिमा,

D) कथेची सुरुवात

' निळ्या विशाल पंखासारखे आभाळ, स्वच्छ धुतल्यासारखे वाटणारे समोरचे दृश्य, जुनी चरबट पाने जाऊन त्या जागी आलेली नाजूक शालीन हिरव्या रंगाची पालवी. साऱ्यांनीच त्याच्या कोरीव पूर्ण आयुष्याचे प्रतिबिंब धारण केले होते.'

( जी एंनी 'कोरीव पूर्ण 'आयुष्यावर उपहासपूर्ण भाष्य केले आहे. फक्त पालवीप्रमाणे नविन, वाढणारे, - लेकरांनी भरलेले /फळलेले निश्चित आयुष्य. हेच पूर्ण जीवन. विशाल पंखाप्रमाणे आभाळाएवढी लालसा व आपल्याच आभाळात शांतपणे फिरत ती पूर्ण करणारे एवढ्या मोठ्या दिवसही छोटा वाटणार पाखरु - लग्नबंधनातले सुखासीन जीवन.

E) कथेचा शेवट

'आपण ते अरविंदाच्या आयुष्याचा विध्वंस करण्याचे पाप केले नसते तर कदाचित हे दुःख ही घडले नसते . या तिच्या( वत्सला काकूंच्या ) दुःखाला आपणच जबाबदार आहोत असा एक वेडा विचार चर्रकन तिच्या मनात येऊन गेला व वत्सलाकाकू गेलेल्या दिशेने ती (लिलू )शरमून व्याकूळ नजरेने पाहू लागली.'

( आत्यंतिक अनुभवाच्या क्षणी होणारी अस्तित्ववादातील नवी जाणीव / ज्ञान, शोककारक ,दुःखद, अपराधगंडाची, जन्मभर पोळणारी )

शेवट सगळ्या पात्रांना शोकात्म व तीव्र दुःख होते.

१) मेधा आत्महत्या करते २) मेधाशी केलेल्या अन्यायकारक वर्तनाने माधवला मन कुरतडणारा अपराधगंड ( guilt complex) व अप्रामाणिकपणा ३) लिलूला पण अरविंदाशी केलेल्या तशाच वागण्याने अपराधगंड ४) वत्सलाबाई - लिलूच्या आत्महत्येने उरलेल्या आयुष्यात दु:खव्याकुळता

F) कथेचे स्वरूप

या कथेत व्यक्तीं जीवनात सुखी व्हायची स्वप्ने पाहतात व प्रत्यक्षात ती नियतीच्या शक्तीने भंग झाल्याचा ,व्याकुळ करणारा अनुभव त्यांना येतो.

माधव व मेधा काही काळ एकमेकांसाठी सर्व प्रकारे ( शारिरीक व मानसिक दृष्ट्या) अनुरूप असल्याचा अनुभव घेतात .पण लग्न ठरायच्या क्षणी मेधाच्या मानेवरचा कोडाचा डाग अचानक दिसतो व तो लग्न न करण्याचा निर्णय घेतो.

पण या निर्णयामुळे त्याच्या मनात अपराधीपणाची भावना ( guilt complex) निर्माण होते. त्यांचे नकारात्मक परिणाम त्याला भोगावे लागतात.

लिलूचे वडिल त्याला चांगली ( पैसा व प्रतिष्ठा या दृष्टिकोनातून) नोकरी मिळवून देतात. यामुळे माधव लिलूशी लग्न करतो.

लिलूही अरविंदाला फसविते. तिलाही त्यांचे दारुण परिणाम भोगावे लागतात.अचानक तिला माधवचे मेधाबरोबरचे प्रेमाचे संबंध समजतात.

मेधाही तिचे भवितव्य समजते व गरोदर असताना आत्महत्या करते.

वत्सलाबाईंना हे सर्व माहित असते. पण त्या प्रश्न सोडविण्यासाठी पुढाकार न घेण्याचा निर्णय घेतात.

हे सर्वजण अस्तित्ववादातले व्यक्तीच्या निवडीचे स्वातंत्र्य व आपल्या निर्णयाचे परिणाम अटळपणे भोगतात.

२ 'रातराणी' कथेचे मुख्य प्रमेय (उपमेय)

१ मानवी अस्तित्व हे अजस्त्र विश्वात अर्थशून्य,विसंगत, दु:खमय, एकाकी व भयव्याकुळ करणारे आहे.

२ सर्व रूपात 'मानवाचे अस्तित्व' हेच रूप महत्त्वाचे आहे.

३ (१)माणसाचे अस्तित्व हे खालील सहजप्रेरणांतून व्यक्त होते

- या अस्तित्वाबरोबरच निर्माण होतात (Being - असणे)

अ) सुख -वस्तूपासून वा व्यक्तीपासून सुखाची इच्छा. त्या व्यक्तीबद्दल मोह उत्पन्न होतो.

यातूनच शारीरिक वासना,प्रणय,प्रेम ही न संपणारी भावनांची साखळी सुरु होते.

प्रत्येक व्यक्ती स्वतः ला वरिल सहजप्रेरणांच्या संदर्भात सतत व्यक्त होत असते, भूमिका घेते

सुखाच्या सहज प्रेरणेतून स्त्रीविषयक वासना व प्रणय आदिम समाजात निर्माण झाले.नंतर स्त्रीविषयक प्रेमभावना उत्पन्न झाल्या.पण त्या संदर्रहित असल्या ( पती-पत्नी इ बंधनांनी जोडल्या नसल्या ) तर अलौकिक, कालातीत अनुभव जास्त वेळा मिळू शकतो.

आ) दुःख ( sadness)- ज्या वस्तूपासून वा व्यक्तिपासून दुःख होते, द्वेष वाटतो ती नको वाटते. त्या व्यक्तीचा राग येतो. तिच्याबद्दल उबग ( disgust ) वाटतो. या दोन्हींमधून तिरस्कार ( contempt )निर्माण होतो.

इ) जिज्ञासा - काही तरी नवीन समजावे अशी इच्छा

ई) कृतीशीलता - काहीतरी करण्याची इच्छा

उ) स्मृती/ आठवणींमुळे उत्पन्न होणारा खेद

ऊ) भय - भविष्यातील संकटाबद्दलची कातरता, व्याकुळता, चिंता,काळजी ( भीतीची भावना ). शेवटी घबराट (panic) होते.भीती आणि दुःख यातून अपराधीपणाची ( guilt) भावना उत्पन्न होते. आपण नाहीसे होऊ हे मृत्यूचे भय असते

ए) अतृप्ती - कितीही व कितीदाही विषयांचा ( स्त्री, सत्ता, संपत्ती, समाजातील स्थान - राजा, अमात्य इ ) उपभोग घेतला तरी तृप्ती न होणे. हवे असलेले कितीही मिळाले तरी समाधान न होणे. यामुळे माणसाची भोगलालसा अनिवार वाढते. याचा उपयोग माणूस मरणजाणिवेवर ( मृत्यूच्या अस्पष्ट ,धूसर,अमूर्त अनुभवांवर) मात करण्यासाठी वापरतो.

Becoming - होणे - सहजप्रेरणा - प्रेम

स्त्री-पुरूष हे कौंटुबिक नातेसंबंधांनी - लग्नबंधनात अडकले तर मात्र प्रेमाचा शुध्द ,कालातीत ,अलौकिक अनुभव येणे कठिण व दुर्मिळ होते. कारण विवाहात जोडीदार निवडताना संपत्ती, वय, प्रतिष्ठा, इ इतर घटक विचारात घेतले जातात.

पति पत्नीच्या जगण्याच्या विशेषतः शारीरिक संबंधांच्या, प्रणयाच्या कल्पना वेगळ्या असतात. शिवाय परंपरागत पुरुषप्रधान संस्कृतीचा ही परिणाम होतो. विवाहाचे एक प्रयोजन संततीचे निर्माण व तिचे समाजस्वास्थ्याकरिता खूप वर्षे लालनपोषण यांचाही प्रभाव पडतो.

प्रत्येक व्यक्ती अशी घडत असते (becoming). पण प्रेम भावनेच्या कृतीत, आविष्कारात, दोन भिन्न व्यक्तींचे घडणे असते.

या प्रक्रियेत खालील सकारात्मक, सुखाच्या अधिकाधिक उच्चतर व सूक्ष्म भावनांचा काहीवेळा अनुभव येऊ शकतो

माया,वात्सल्य ( आई -लेकरे ),आपलेपणा ( बहिण- भाऊ), ओढ, आकर्षण, प्रणय,प्रेम ( तरुण - तरूणी, प्रियकर - प्रेयसी, पति-पत्नी ) , बंधुभाव, माणुसकी ( स्त्री -पुरुष)

ऐ) प्रेरणा आणि भावना -

भूक, तहान ,कामवासना (लैंगिक गरजा), प्राणवायू ,झोप अशा शारीरिक गरजाच माणसाच्या वागणुकीमागच्या प्रेरणा आहेत. या सर्वांशिवाय माणूस जगू शकत नाही .

भावना (e-motion) म्हणजे शरीरात निर्माण होणारी सूक्ष्म मानसिक शक्ती आहे. यांच्या द्वारा एक व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीला साद (प्रतिसाद) देते. ( क्रिया - प्रतिक्रिया)

मानसिक अवस्थांमुळे भावना जाग्या होतात व त्यामुळे काही गोष्टी करायची प्रेरणा मिळते. तसेच प्रेरणांमुळेही भावना निर्माण होतात.

ओ) नंतर माणसाची १ राजकीय,२ सामाजिक , ३ सांस्कृतिक ४ कौंटुबिक विशेषतः लग्नबंधनातून व त्याच्याबाहेरून ५ शैक्षणिक ६ निसर्गाशी संबंधित ७ अध्यात्मिक रूपे येतात

औ) कौंटुबिक व सांस्कृतिक नातेसंबंध भयावह व हास्यास्पद असतात.पण यातूनच व्यक्तीला अधूनमधून प्रेमसाफल्याचा अनुभव येतो.

अं) मानवी अस्तित्वावर, वरिल सहजप्रेरणांवर,नातेसंबंधांवर नियती या सर्वव्यापी, अनाकलनीय शक्तीचा निर्णायक प्रभाव आहे.

अः) ' रातराणी ' कथेतील प्रतिमान (उपमान)

या कथेतील मुख्य व्यक्ती - माधव,लिलू,मेधा, वत्सलाबाई, या आहेत. या व्यक्तीरेखांतून,घटनांतून,भाष्यातून सुख, दुःख, भय व प्रामुख्याने प्रेमभावनेची अतृप्ती या सहज प्रेरणा प्रामुख्याने कौटुंबिक व सामाजिक नातेसंबंधातून व्यक्त होतात. कामवासनेच्या विविध छटा चित्रीत केल्या आहेत.पण या पृष्ठभागाखाली असलेल्या अस्तित्वाच्या असे संदर्भ

नसलेल्या प्रणय/ प्रेमाच्या मूळ प्रेरणा जाणवतात.

३ 'रातराणी'चे प्रतीक / स्त्रीचे अलौकिक रूप

रातराणीचा वेल हाच स्त्रीपुरूषांचा प्रणय आणि प्रेम (नंतर द्वेष) या मध्यवर्ती प्रतिमेभोवती प्रेमभावनेच्या छटा असलेली अनेक सुट्या प्रतिमा आहेत.

१' ज्यावेळी रातराणीवर फुले असत(A) त्यावेळी आवारातली खाजगी रात्र त्या मदिर गंधाने धुंद होऊन जात असे.'

( स्त्री-पुरूषांच्या वासना-प्रणय- प्रेम  या मदनाच्या त्रिवेणीच्या फुलांच्या अलौकिक गंधाशी निसर्गातल्या रातराणीच्या  धुंद गंध एकरूप झाला आहे.)

२ ' दिवसा तिच्यात तीन-चार भारद्वाज दिसत आणि ते हलू लागले की रातराणीलाच त्यांचे बदामी पंख, रेशमी काळा रंग आणि वितळलेल्या माणसाच्या थेंबाप्रमाणे डोळे आहेत असे वाटते आणि तिची पाने तर मेघाच्या चिंचपानी जॉर्जेटप्रमाणे'(B)

(रातराणीचा वेल हीच कामिनी ( मेधा), येथे रंग, रूप व वाऱ्याच्या संवेदनांना जी ए नी कमाल केली आहे. भारद्वाज पक्षी व रातराणीचा वेल यातून तरुण सुंदर मेधाला साक्षात उभे केले आहे. अमानवी निसर्गाचे मानवी चैतन्यमय अलौकिक स्त्री तत्वात रूपांतर केले आहे.)

३ 'लिलूचा आवाज घडी करून दाबल्याप्रमाणे सपाट होता.लिलू आता रंगाने मेधापेक्षा नक्की उजळ होती पण मेधाच्या आवाजात विलक्षण आर्तता होती.मेधा गाऊ लागली की रातराणीला फुले येत आहेत असे वाटावे. अगदी तृप्त सुखाच्याही अंतर्हृदयात असलेली तृप्तीची निळीसावळी छाया त्यामुळे स्पष्ट जागी होत असे(C)..... माधवला लिलूविषयी फार कृतज्ञता वाटली. तिच्या वडिलांच्या मदतीने त्यालाही नोकरी मिळाली सुख पोसले लिलूमुळे नक्की आपले आयुष्य सभ्य, सुखाचे झाले !'

( मेधा व लिलूविषयी माधवच्या मनातली भावना/मत)

४ 'मेघाच्या हाताला बिया चिकटल्या असत्या तिने हात मातीवर नुसता झाडला तरी रोपे अधाशीपणाने, खुषमस्कऱ्यासारखी तरारून तिच्यापुढे उभी राहत.(D)

५ हिरव्या रंगाची तिचे काही गुण नाते होते की काय कुणास ठाऊक! निशिगंधाच्या कंधातून पांढरे फूल आल्याप्रमाणे ती स्वतःच कुठल्यातरी कंधातून वर आली असावी अशी तिला झाडे समजत.((E)

६ कागदाचे ढिगारे उपसून त्याने मेधाची पत्रे , खूपशी फुले वेणीत असलेला वेणी गळ्याभोवती टाकलेला तिचा फोटो, तिने एका पत्रात घातलेली रातराणीची वाळलेली फुले ,ही सारी माधवने निबरपणे जाळून टाकली.

७ मेघा रात राणीचा एक तुरा खुडत असे आणि तिचा गंध शाली सारखा पांघरून ती वाट पहात उभी असे.(F)

,८ मेघाने रेशमी काळ्या केसांत रातराणीचा झुबका खोचला होता. हिरव्या जॉर्जेटचे पातळ,... तिच्या हातात देखील तीच फुले. ती त्याच्या चेहऱ्यावर हलकेच खेळवत होती...... आनंदाने मोहरून ती कुजबुजली . त्याला वाटले ही मेधा? छट. ही रातराणीच हिरव्या स्वराने उमलत आहे. (G)

९( मेधाचे शेवटचे पत्र ) 'शेवटचे एकच .ती रातराणीची फुलं. तिनंआपली पहिली भेट पाहिली. या शेवटच्या भेटीत तिला असू दे.'

१० ( माधवला वाटले) कोणाचे ते शब्द ? कोण बोलले आता ? लाल ठिपक्यांच्या बदामी पातळातल्या, हिरवी शाल घेतलेल्या वत्सलाकाकू ? छे, त्यांचे डोळे तर मेधासारखे वाटले. मेधा की लाल, बदामी, हिरवी रातराणी ?(H)

जी ए कुलकर्णी यांच्या कथांतून सहसा स्त्री चे रूप पुरुषांच्या भावविश्वातला सूर्यासारख्या धगधगत्या वासनांचा, प्रणयाचा व चंद्रासारख्या कोमल, शीतल प्रेमाचा आयुष्यात शेवटपर्यंत राहणारा अद्वितीय तारा असे असते. हे रूप पार्थिव, लौकिक,व्यवहारी असते.

पण 'रातराणी ' कथेत मेधाचे वर्णन करताना जी एंनी स्त्री चे अलौकिक, अपार्थिव वर्णन केले आहे (A,B,C,D,E,F,G , H) ते अप्रतिम आहे.

४ कथेतील प्रतिमा सृष्टी

१ ' तो एका खांबाला रेलून उभा राहिला व आजूबाजूच्या शांततेच्या स्पर्शाला आपल्या मनाला कुरवाळू देऊ लागला.' ( खांबांचा रेलून राहिल्याने निवांत शरिराला शीतल वाऱ्याचा स्पर्श ,समोर वसंत ऋतूतील कोवळी पालवी पाहताना

डोळ्यांना रंगांचा  निववणारा भास आणि वरच्या निळया आभाळातून उतरून मनाला करणारा नीरव शांततेचा स्पर्श अशा सर्व अस्तित्वाला टिपणाऱ्या संवेदना जी एं नी टिपल्या आहेत.)

२ 'आता आपले आयुष्य स्थिरावले, फळले .अशाच दिवसांच्या मालिकेचे त्याला तोरण लागणार.'(माधव) लग्न हीच जीवनातील क्रांती - तोरण लावण्यासाठी घटना. मग पुढे सुखच सुख .

४ 'नाहीतर हलक्या जातीच्या मुलीच्या सानिध्यात फसव्या मुखवट्याने आपण आयुष्याचे एक एक पान निराशेने तोडत बसलो असतो-' (माधव)

५ 'लिलूचे लक्ष भोवताच्या शांततेवर तरंगू लागले होते.'

६' पण मेधा काही केल्या (माधवच्या )मनातून जाईना. तेथे ती ठिकठिकाणी आठवणींची रोपे लावत फिरत होती . पायांखाली ती चिरडून टाकण्याचा प्रयत्न करूनही ती जोमाने वाढतच होती.'

७ 'पण लगेच माधवचे मन संशयाने चाकूच्या पात्यासारखे झाले.:

८' वत्सलाकाकूंनी आपले अधू डोळे ताणून माधवकडे पाहिले व त्या कुंपणावरील चिंधी हलल्याप्रमाणे हसल्या.'

९ 'मूळ वस्तू पासून सुटून जाणारी एखादी सावली स्वतंत्र हिंडावी त्याप्रमाणे वत्सलाकाकू विरलेल्या वाटत होत्या..... पुन्हा मागे न पाहता वत्सलाकाकू पांढऱ्या सावलीप्रमाणे निघून गेल्या.'

१०' माधव खिळल्यासारखा उभा राहिला. भूतकाळ पांढऱ्या ठिपक्यांच्या हजारो टोकांनी आपल्याला स्पर्श करीत आहे असे त्याला वाटले.'

५ निसर्ग प्रतिमा

१ 'पहाटेच्या टेकडीवरून धुके सरकत खाली आले की ते झाडांच्या अनेक बोटांतून विशाल जाळ्याप्रमाणे झाडातच लोंबू लागेल आणि रात्री चांदणे ओतू लागले की त्याला फांद्यांच्या हालचालींनी तडे जात व  ते फुटून त्याचे तुकडे रस्त्यावर तुकड्यांचे नक्षीकाम केल्याप्रमाणे पडत.'

(अलौकिक निसर्गचित्रातून लौकिक नक्षीकामाचे वर्णन. पहाटेच्या स्वप्नाचे रात्रीच्या उपभोगानंतर , क्षणिक धुंदी नंतर जमिनीवर तुकडे झाले )

बाग करतानाच्या सुखद श्रमाची त्याला आठवण झाली व तो स्वतःशीच हसला. ( त्याच्या उमटलेल्या प्रेमाची रात्र पडताना झालेली आठवण.सुखाच्या लालसेच्या रम्य आठवणी चांदण्यात  अस्तित्वावर जाग्या होऊन लागल्या. )

२ ' निशिगंधा मधून तर आत्ताच उंच छड्या निघाल्या होत्या व त्यावर छोटे छोटे हंस चिकटवल्याप्रमाणे फुलोरा जागा झाला होता. '

( अत्यंत काव्यात्मक वर्णन.निशिगंधाची कळी म्हणजे गर्भरेशमी तेज - फुलोरा म्हणजे छोटे छोटे हंस - पांढऱ्याशुभ्र कळया - रात्री प्रणयाच्या फुलोरा ही तसाच त्याच्या मनात जागा होत होता . आताच निशिगंधाच्या उंच उड्या निघाल्या होत्या त्याच्या मनासारख्या)

३ 'भिंतीच्या कोपऱ्यात लहान गेटाजवळ रातराणी माहेरवासिनीप्रमाणे सुखावली होती.  आता तिच्यावर फुले नाहीत पण ज्यावेळी असत त्यावेळी हा आवारातील खाजगी रात्र त्यामधील गंधाने धुंद होऊन जात असे.'

(रातराणी / नायिका मेधा आता त्याच्या मनात आता फक्त माहेरवासिनीसारखी - सासरचे,लग्नामुळे निर्माण झालेले संबंध काही काळ विसरून फक्त स्वतःच्या भावविश्वात सुखावली होती. येथे जी एं नी  फुले नसलेल्या रातराणीच्या वर्णनाने नियतीच्या पुढील भीषण खेळाची पूर्व सूचना दिली आहे.)

४ 'काय अधिकार आहे तिला आता आपल्या सुखावर पावले उमटवण्याचा '( येथे अमूर्त सुखाच्या संवेदनेला मूर्त रूप दिले आहे.)

५ आजूबाजूस पाच पाच पोरांचे शेजार असलेले, किडलेल्या लाकडी खोक्यातील भोकाप्रमाणे दिसणारे एक जुने घर  माधवने ठरवली ही होते.

६ प्राणिविश्वातल्या प्रतिमा

१ ठिकठिकाणी खिडक्यांचे प्रकाशित पिवळसर चौकोन मात्र हजारो पानांचे खवले असलेल्या प्राण्यांच्या डोळ्याप्रमाणे होते.

२ माधवने शरमेने मान खाली घातली आपल्या अंगावर सर्वत्र सरड्याप्रमाणे काटे फुटत आहेत असे त्याला वाटले.

७ समारोप

जी ए कुलकर्णी  यांनी या  कथेत व्यक्तीच्या जीवनातील सर्वात महत्त्वाची भावना स्त्री पुरूषातील प्रेमभावना या कथेत नाट्यमय पद्धतीने, कलात्मक , काव्यात्मक वर्णनांनी, प्रभावी प्रतिमा सृष्टीने , रातराणीच्या मध्यवर्ती प्रतिकाने सुंदर उलगडून दाखविली आहे.

त्यांनी माधव व मेधा यांच्या प्रेमाचे ,कोडाचा भाग दिसेपर्यंतचे स्वरूप हे अस्तित्ववादी रूप घेते. या अवस्थेत माधव व मेधा यांच्यात रूढ ,सांकेतिक, सामाजिक नातेसंबंधांचे दडपण नसते. ते दोघे त्यांना येणारे अनुभव सहज प्रेरणेच्या स्तरावर घेतात. दोघेही परस्पर संवादातून , भावनांच्या अभिव्यक्तीतून, विचारांच्या देवाणघेवाणीतून, प्रत्यक्ष शारीरिक संवेदनांतून घेत घडत असतात. या अनुभवांना - शब्द, रस,रूप,गंध,स्पर्श यांच्या संवेदनांना सीमा नसते. यात मुक्त , स्वतंत्र दोन जीव केवळ अलौकिक, अथांग, अपार अनुभवांना सामाजिक संदर्भरहित सामोरे जात असतात.

नंतर मात्र माधव व लालू लग्नबंधनात एकत्र येतात.तेव्हा नातेसंबंधातील स्वार्थी प्रेरणा., व्यक्तिगत हेतू ( मातृत्व प्रेरणा , लग्न स्थैर्य इ), प्रत्येकाची बदलण्याची

क्षमता व इच्छा असेल अनेक घटक असल्याने तेवढा अलौकिक आनंद फार वेळा मिळणं कठिण जाते.

जी एं च्या महान प्रतिभेने अस्तित्ववादातील प्रेमभावना निर्णायकपणे , सूर्यप्रकाशाइतकी सत्य 'रातराणीत' दाखविली आहे. म्हणून ही कथा मला फार आवडते.

डॉ माधव पुराणिक

भ्रमणध्वनी ९६२३४४२२२१

दिलिप बडे:

https://www.facebook.com/100001558665495/posts/pfbid0z5DSMrpssXiUCGF8PF5h7GUTM93G4t21b9NbUf51J8SY2Eby3cAmRCHjoVNYjdTSl/?sfnsn=wiwspmo

डॉ माधव पुराणिक

https://youtu.be/dkSCCI-yh7k

# कथा- रात्र झाली गोकुळी -कथासंग्रह- पारवा

यतीन गुळवणी : माननीय सुनीळजींच्या सूचनेप्रमाणे, "रात्र झाली गोकुळी" या कथेचे सूतोवाच देत आहे. ही कथा पारवा पुस्तकात आहे. तरी वाचकांनी कथा मूळातून वाचावी/खालील विवेचन वाचावे. व कृपया आपला प्रतिसाद अवश्य द्यावा.

यतीन गुळवणी : कथासंग्रह पारवा कथा रात्र झाली गोकुळी जी. ए. कुलकर्णी यांनी आक्टोंबर १९५९ च्या दीपावली या अंकात लिहून प्रसिद्ध केलेली ही कथा सप्टेंबर १९६० मध्ये प्रकशीत झालेल्या पारवा या कथासंग्रहात समाविष्ट आहे. सोळा पानांची ही कथा मुळातूनच वाचण्यासारखी आहे. सामान्य व्यक्तीची नव्हेतर सामान्य कुटुंबाचीच मानसिक व शारीरिक नेमकी दु:खे जी. ए. नी अत्यंत तपशीलवारपणे व प्रभावीपणे मांडली आहेत. गरीब असले तरी हे कुटुंब संस्कारहीन नाही. पण गरिबीमुळे त्यांची परवड चालली आहे. दाजी (वडील), वारणाई (आई), दुर्गी (थोरली मुलगी), शकी (मधली मुलगी) व कृष्णा (धाकटा मुलगा) या अत्यंत गरीब नव्हे तर दरिद्री कुटुंबातील प्रत्येकाच्या वेदना धारदारपणे जाणवतात. इतर अनेक कथाप्रमाणेच कथाकथन संध्याकाळी सुरू होऊन मध्यरात्री संपते.

काबाडकष्ट करणारे दाजी हृदय वेदनेने त्रस्त आहेत. हा मनुष्य इतका निर्जीव व निर्विकार की, “आयुष्यावरील एक थर त्याने बैलाच्या मानेवरील जाड कातडयाप्रमाणे निबर केला होता.” हल्ली खाली वाकले की डाव्या बाजूला त्याच्या छातीत मोठी तापलेली सुई सावकाश खोल रुतवल्याप्रमाणे बारीक पण असह्य कळ येत असे. दाजी विडया ओढत असले तरी सदर दुखणे शारीरिक मेहंनतीमुळे असावे.

वारणाई शेजाऱ्यांशी भांडखोर पण घरातल्यासाठी हाडे झिजवणारी बाई आहे. तिला नवऱ्याची काळजी, दुर्गीची माया आहे. शकीचा व कृष्णाचा राग येऊन सुद्धा ती तो आवरते. सारे घर तिने पाठीवर सांभाळले आहे. वारणाईला खोकल्याचा त्रास

आहे. खोकल्याने छातीची हाडे दुखून ती असहाय्य होते. चिमूटभर श्वास संथपणे घ्यावा यासाठी ती धडपडते. खोकून खोकून बरगड्या बाहेर फेकल्या जातात की काय असा त्यांच्यावर ताण पडतो॰

थोरली लाडाने वाढवलेली नाजुक गोरी दुर्गी. सरळमार्गी आणि सालस. पहिली मुलगी म्हणून वारणाईने तिला अगदी साईसारखे वाढवले. दाजी-वारणाईच्या आयुष्याचा कोंभ. हौसेने वाढवलेली व लाड केलेली.

पण हल्ली ती खंगत चाललेली आहे. तिचे शेजारच्या इमारतीतील रात्रीपाळीचा पहारेकरी लक्ष्मणशी प्रेमाचे धागे जुळलेले असतात. तो तिला लग्नाचे आमिष दाखवतो. पण त्या रात्री तिचा भ्रमनिरास होतो॰

मधली मुलगी शकी बेरकी व छानछोकी आहे. ती रानवट तऱ्हेने भरदार झाली आहे. ती आपले सुख साधणारी आहे.

धाकटा शाळकरी कृष्णा अजाण नासमज आहे. त्याला परिस्थितीची जाण नाही.

त्यादिवशी संध्याकाळी दुर्गी उदास बसलेली असते. तर रात्रीच्या जेवणाला मूठभरही तांदूळ नसल्याने काय करायचे या विवंचनेत वारणाई असते. चूलीवर सकलचा गुळाचा चहा गरम करायला ठेवतानाच कृष्णा शाळेतून आला. चहा तयार नाही म्हणून चिडला. (गुळाच्या) नुसताच चहा व बरोबर खायला नाही म्हणून कृष्णाचे तोंड गाडग्यासारखे होते. कृष्णा चहा पिऊन सटकतो. इतक्यात दाजी येतात. औषधाची गोळी घ्यायला वारणाई त्यांना शकीचा चहा देते. दजींचा चहा होतो म्हणेपर्यंत शकी येते व आपल्या वहाणा पुसून ठेऊन “दमले” म्हणून घरातल्या एकुलत्या बाजल्यावर आडवी होते. आपला चहा दाजीना दिला म्हणून चरफडते.

आपल्या धुतलेल्या पातळावर शकीला लोळताना पाहून दुर्गी नाराज होते. पातळ दुर्गीकडे फेकून शकी उद्धटपणे तिला “घरी बसून खायचे” असे म्हणून डिवचते. कहर म्हणजे दुर्गीला आणलेली काकणे शकी न मागता, न सांगता आपल्या

हातात घालून मिरवते आणि वर “माझा पगार माझ्याजवळच राहिला तर मी तुला काकणे घेऊन देईन” असे सांगते. दुर्गी हिरमसून बसते.

पुढच्या भागात कृष्णाला भोपळ्याची चोरी करताना रंगेहात पकडून वकिलांचा गाडी मारुति घरी आणतो. घरी पोटभर खाण मिळत नसल्याने कृष्णा ऊचापति करण्यास सोकावलेला असतो. डांगर व वांग्याच्या आमटिबरोबर दुपारच्या भाकऱ्यावर रात्रीचे जेवण आटोपते. रात्री झोपताना शकी दुर्गीच्या जागी दाराजवळ जबरदस्तीने झोपते व दुर्गीला आपल्या जागी बाजल्यावर झोपण्यास भाग पाडते. मध्यरात्री दुर्गी लक्ष्मणच्या खोलीत त्याला व शकीला बोलताना हसताना पहाते आणि उन्मळून पडते.

हे झाले पात्र परिचय व घटनाक्रम.

मला भावलेले मुद्दे.

१ गरीब परिस्थितीचे यथार्थ वर्णन! बऱ्याचजणांनी अशी स्थिति पाहिलेली, भोगलेली असेल. सर्वसामान्य कुटुंबातील माणसांचे भावनिक हिंदोळे जी. ए. नि यथार्थ दाखवले आहेत.

२ सर्वच पात्रांचे मानसिक स्थितीचे सूक्ष्म वर्णन. सर्व व्यक्तींच्या मनाच्या भाव-भावनांचे टिप्पण करून ते तसे होण्याची कारणमीमांसा अगदी योग्य शब्दात जी. ए. दाखवतात.

३ मनाची घालमेल! “पहाट व्हावी पहाट होऊ नये” ही तगमग सर्वच पात्रांची (अगदी मंजू मांजरीच्या) वेगवेगळया मंनोभूमिकेतून दाखवली आहे.

४ अत्यंत तपशीलवार वर्णन, मुद्देसूद मांडणी व सुरेख गुंफण हे जी. ए. वैशिष्ट्ये जाणवतात.

५ निसर्गाशी सांगड घालणारे चित्रण चाफ्यच्या रूपाने दिसते. हे चाफ्याचे प्रचंड झाड सतत हालत हजारो पानांनी सळसळत या घटनांचा मुक साक्षीदार आहे. सोबत रात्रभर घुशीचे कुरुकुरू करत पोखरणे चालू असते.

६ "राधी" कथेतल्याप्रमाणे हृदय पिळवटल्याप्रमाणे वाटले नाही तरी दाजी, वरणाई यांच्या वेदनेने व दुर्गीच्या झालेल्या फसवणकीतून वाचकाचे मन व्यथित होते. हलाखीच्या परिस्थितीच्या रेट्यात भरडत जाणाऱ्या माणसांची तगमग पाहून वाचक अस्वस्थ होतो. त्यातही जी. ए. नि शेजारी आपटे कुटुंबाच्या हालचालीच्या वर्दीची विनोदी पखरण केली आहे.

Sanjeev Kulkarni: https://youtu.be/RCG7PHP7JEA

सुनीळ सामंत: धन्यवाद यतीनजी

जीएंच्या 'रात्र झाली गोकुळी' ची अगदी व्यवस्थित सुयोग्य ओळख करून दिलीत.

ही कथा वाचताना मला तरी जुने रेशनचे, टंचाईचे सत्तरीच्या दशकातले दिवस आठवतात. आताच्या बहुतांश मध्यमवर्गीय मुलांना ज्या दिवसांची कल्पनाही करता येणार नाही असे. घरात खाणारी दहा तोंडं (ही परिस्थिती तर अगदीच कल्पनेबाहेरची) आणि कमावणारा एक जण. त्यालाही काही ना काही आजाराने ग्रासलेले. पोटभर तर सोडाच पण भूक शमवेल इतकेही अन्न अनेकदा वेशेषतः महिना अखेरीला नसे.

पण याचबरोबर सन्मान आणि तत्त्व यांच्याशी कसलीही तडजोड नसे.

जीएंच्या अनेक कथांमधली माणसे (अशक्त मुली आणि रासवट वाढलेल्या मुली उदाहरणार्थ) भेटत. पण जीएंच्या कथा वाचताना त्या समजून येतात. जीएंच्या

बालपणातल्या या आत्मकथनात्मक आठवणी असाव्यात. आणि त्या कलात्मकरित्या फ़क्त जीएच मांडू जाणोत.

या कथेतील एकच बाळ असणारे ते शेजारी कुटुंब (हे आताचे वास्तव आहे) या दारिद्र्याचे वर्णन अधिक गडद करणारी पार्श्वभूमीच आहे. त्यांचे एक वाक्य- ती खिर सकाळि शेजारी देऊन टाक- वेगवेगळया व्यक्तींच्या मनात वेगवेगळया भावना जागे करते. दाजीने ते ऐकले नाही नाहीतर तो दुःखी झाल असता, वारणाईला त्याचा आनंद होतो, मुलांना देण्यासाठी काही मिळेल याचा, तर कृष्णा एकदम खुलला, त्याची दडपून ठेवलेली भुक एकदम जागी झाली आणि रांगेने मांडून ठेवलेल्या चपात्या आणि खिरीची भांडी यावर खुशाल चरू लागली. हे सारे सकाळि देण्याऐवजी आताच का दे्त नाहीत?

जीए किती सुंदर लिहितात नाही. कुठलिही भावना, कितीही कष्टदायक, पण जीएंच्या लेखणीचा स्पर्श त्याला सुंदर बनवतो. क्लासिक.

यतीन गुळवणी : खरंच जीएंच्या परिसस्पर्शाने सर्व भावना लख्ख उजळतात. वास्तविक अशी गरीबी अनेकांनी पाहिली, भोगली असेल. पण त्याचे भांडवल न करता (बऱ्याच दलित साहित्यात आढळते तसे) तटस्थपणे कथन करण्याचे कसब जीएचं करो जाणोतं! आपण माझ्या विवेचनाची दखल घेऊन दाद दिल्याबद्दल आभार. माझे विवेचन बाळबोध वाटण्याची शक्यता आहे.

वास्तविक या समूहातील अत्यंत अभ्यासू जाणकारांच्या चर्चा व एकंदर विचारचक्राने झालेले मंथन वाचून माझ्या जीए समजण्यातल्या तोकडेपणाची जाणीव झाली. पण

जीएंच्या कथा समजून घेऊन त्या "उपभोगण्यात" मदत होत आहे.

मी बऱ्याच कथा परत परत वाचून आनंद मिळवतो.

विलास वाघोलीकर: रात्र झाली गोकुळी, पारवा पुस्तक.

या कथेची वैशिष्ट्ये सांगता येतील -

लहान गावातील धडपडणाऱ्या कुटुंबातील व्यक्ती, तसे कुटुंब , यांची अनेक चित्रणे जी एंनी केली. या कथेतील हे चित्रण अशाच, पत्र्याच्या घरात राहणाऱ्या पाच जणांच्या कुटुंबाचे आहे.

त्यात दोघे आजारी आहेत. दोन मुली लग्नाच्या वयाच्या आहेत. (त्या अर्थात लग्नासाठी आसुसलेल्या आहेत. माणसाच्या जीवनाचा हा शृंगारभाग कथेत आला आहे.) तुटपुंजे मिळकतीचे दोघे आहेत. न शिकता दिवस घालवणारा भुकेला मुलगा आहे. म्हटले तर ते कुटुंब म्हणून जोडले गेले आहेत. पण पैशाच्या टंचाईने, लहान घरात मोठे कुटुंब गुरफटल्याने ते एकमेकांपासून तुटले आहेत.

कथेत भुकेचे चरचरीत वास्तव दाखवले आहे. जीएंच्या भूक कथेची येथे आठवण येते.

अशा परिस्थितीत बाहेरून डोकावणारे अशाच हलाखीच्या जीवनाचे आहेत. गिरणी कामगार सखाराम आहे. वॉचमन लक्ष्मण आहे. वाडयातील मारुती गडी आहे. भाजीविक्या भटजी आहे.

अशा जगात खोटेपणा करणारा हेड क्लार्क व वजन मापे तपासणीस हे तुपट समाधानाने राहात असतात. कारण त्यांनी आत्मा विकलेला आहे. अस्तित्ववादी दृष्टीकोणातून प्रत्येकजण दुसऱ्याबरोबर रहात असतो, पण तुटलेला असतो.ते या कथेत यथार्थपणे दाखवले आहे.

दिवस ,रात्र , काळपुरुष, हा आकाशस्थ शक्तींचा पैलू जी ए विसरत नाहीत. कथाशेवटाचे परिच्छेद तर जीएंची कविता आहे.

"....पहाट झाली काय न झाली काय याची परवा नव्हती फक्त दोघांना. सतत हलणारा चाफा, आणि त्याखाली साचलेले, कधीच न हलणारे हिरवट काळे पाणी.

पहाट काय रात्र काय, न शमणारी अखंड अस्वस्थता, कधीच न जळणारी चिरंतन मृतकळा. आणि पहाट ?

दूर कुठेतरी, ही जर्जर असहाय भुकेली म्हातारी रात्र जाण्याची वाट पाहात ती सज्ज होऊन राहिली होती. तिला येण्याची घाई नाही, परंतु मागे रेंगाळत राहण्याचीही तिची तयारी नाही.

आणि हवी असो अगर नसो, पहाट ही होणारच !"

याप्रमाणे तटस्थपणे पाहणारी पण कवितेत वर्णन करणारी ही जीएंची अस्तित्ववादी कथा आहे.

-धन्यवाद. विलास वाघोलीकर

सुनीळ सामंत: रात्र झाली गोकुळी. हे नाव कुठून आलं? काही संदर्भ आहे का?

विलास वाघोलीकर: माझे मत - कृष्ण जीवनात गोकुळ व रात्र या शब्दांना महत्व आहे. गोकुळात आनंद होता. कान्हा रात्री गोकुळात फिरत असे, कदाचित राधेला भेटण्यासाठी. त्यामुळे गोकुळची रात्र हा आनंदी आनंद असा संदर्भ होता. जीएंना inversion करायला आवडत असे. उदा

विदूषक मध्ये चंचला, ध्रुवशीला ना वे. त्या प्रमाणे या कथेतील रात्र, गरीबीला उद्देशून कथेला inversion चे नाव दिले असावे.अर्थात हे माझे व्यक्ती गत मत. - विलास वाघोलीकर

Vishweshwar Nandedkar: गोकुळ हा शब्द मराठीत लहान मुले जेथे एकत्र जमतात त्या जागेच्या संदर्भाने वापरला जातो. कथेतील घरात दोन मुली आणि एक मुलगा आहे त्या अर्थाने ते गोकुळ झाले , आणि तेथे काहीच नीट होत नाही सगळेच कसे अंधारून आल्या सारखे उजेड कुठेच नाही त्यामुळे गोकुळात रात्र आली आहे आसा आर्थ आसावा

Wasudev Sawant: रात्र झाली गोकुळी'चा हा अर्थ अजिबातच वाटत नाही.

सुनीळ सामंत: कुठल्याही कवितेच्या ओळी असाव्यात का?

सुनीळ सामंत: मुलाचं नाव कृष्णा आहे

+91 90212 10112: *एका वेब ब्लॉग वर "रात्र झाली गोकुळी" या कथे बाबत उत्तम विवेचन वाचनात आले, आपल्या साठी इथे कॉपी पेस्ट करत आहे -

--------

कारट्या, किती भूक भूक करशील…’ घरोघरी ऐकू येणारा संवाद. वाढत्या वयाच्या मुलांची भूक असतेच अशी न संपणारी. पण या लटक्या तक्रारीमागे खरे तर असते कौतुकच. आपल्या मुलांनी भरपूर खावे आणि भरभर मोठे व्हावे अशी सगळ्या आईवडीलांची मनीषा असते. त्यांना तसे करताना बघणे यातून आईवडीलांना खूप खूप समाधान मिळत असते.

पण हे झाले सर्वसामान्य, खाऊनपिऊन सुखी घरातले चित्र. जिथे या भुकेमागे भयाण दारिद्र्याचा काळाकुट्ट भेसूर पडदा असतो तिथे ही नैसर्गिक भूक अगदी भयानक, विदारक रूप धारण करते. शाळकरी वयातला कृष्णा हा असाच वाढत्या

वयाचा मुलगा. त्याचे पोरपण अजून संपलेले नाही. दारिद्र्य, गरीबी याची त्याला जाणिवही नाही. भूक लागली की खायला हवे इतक्या निरागस त्याच्या भावना. तो शाळेतून घरी येतो तोच भुकेने कलकलून. त्याचे घर म्हणजे तरी काय,एका बाजूला तट्टे आणि दुसऱ्या बाजूला रॉकेलच्या डब्यांचे गंजलेले पत्रे लावून कसाबसा केलेला आडोसा. त्यातच सतत धूर ओकणारी ओलसर चूल. खोकल्याच्या उबळीने प्राण कंठाशी आलेली त्याची आई, खंगत चाललेली त्याची बहीण दुर्गी, जिच्या दवाखान्यातल्या नोकरीच्या तीस रुपये महिना पगारावर कसाबसा संसार चालतो ती कामाने दमून चिंब झालेली दुसरी बहीण शकी आणि अठराविश्वे दारिद्र्याबरोबर झट्या घेणारा, छातीत डाव्या बाजूला तापलेली सुई खुपसावी तसे होत असताना हेडक्लार्कच्या घरी दोन गाड्या लाकडे माळ्यावर रचून लोळागोळा झालेला त्यांचा बाप दाजी….

कृष्णाला घरी खायला काही नसते. त्याचा चहाही गरम झालेली नसतो.कोमट काळसर गुळाच्या चहाचा कप त्याच्यासमोर आई आदळते. "अगदी दुष्काळात जन्मलंय कारटं.." ती करवादते. "नुसता चहाच प्यायचा? ते कालचे चिरमुरे संपले?" कृष्णा चिडून विचारतो. तेलहळद लावलेले ते मूठभर चिरमुरे कधीच संपलेले असतात. कृष्णा परसात जाऊन उभा रहातो. समोरच्या घरातली मुले पोह्याच्या ताटल्या घेऊन बाहेर आलेली असतात. भूक असह्य होऊन आपल्या घराकडे भीतभीत पहात कृष्णा एकापुढे हात करतो. तो मुलगा आपला रिकामा हात फटदिशी कृष्णाच्या हातावर मारतो….

शेजारच्या वकीलांच्या परसात दोडके, दुधी भोपळे फोफावलेले असतात. ते चोरून भटाच्या भाजीच्या दुकानात विकले की भट दोन आण्याचे बटर, बिस्कीटे देत असतो. या वेळी कृष्णा ते चोरत असताना भोपळ्याचा मांडवच कोसळतो आणि वकीलांचा गडी कृष्णाला बेदम मारतच घरी घेऊन येतो. "मी कशाला घेऊ यांची भाजी?" हुंदके देत कृष्णा खोटे बोलतो…

कृष्णाची आई कण्हत कसाबसा स्वयंपाक करत असते. स्वयंपाक म्हणजे काय..घरात भातापुरते तांदूळही नसतात. दुपारच्याच अपुऱ्या भाकरी, तुरट, बियाळ वांग्याच्या फोडी आणि मूठभर डाळ घातलेली लालसर बेचव आमटी आणि गाठी झालेल्या एवढ्याशा डांगराच्या पिठात घातलेले थेंबभर काळसर ताक.... हेच त्यांचे जेवण.तेही अपुरे. दुर्गीला अन्नाची वासनाच नसते. तिचा भाकरीचा चूर खाऊनही कृष्णाची भूक तशीच रहाते. वाढत्या वयातील मुलाच्या पोटातील न संपणारी भूक...

सगळेच अंधारात आडवे होतात. कृष्णाला काही झोप येत नाही. अंधारातच तो खुडबुड करू लागतो.चुरमुऱ्याच्या डब्यातले खालचे उरलेले तिखट, आईने ठेवलेले उपासाचे दाणे..त्याला काही काही सापडत नाही. घटघटा पाणी पिऊन तो परत आडवा होतो. शेजारची आचरट पोरे कृष्णाच्या घराच्या पत्र्यावर दगड फेकण्याचा खेळ सुरु करतात. गल्लीतली कुत्री वचावचा ओरडू लागतात..

“खीर खीर म्हणून बाळाने हट्ट धरला, म्हणून केली कपभर, पण त्याने बोटसुद्धा लावलं नाही. शिवाय ही बटाट्याची भाजीदेखील उरली” शेजारच्या घरातून आवाज येतो “काय करायचं आता?”

“आता असं कर.. सकाळी ते सगळं देऊन टाक शेजारी..”

कृष्णा एकदम खुलतो. ‘सकाळी देण्याऐवजी आत्ताच का देत नाहीत? मी स्वतः जाऊन आणतो हवे तर..’पण शेजारचे घर बंद होते..

घरात घुशींची खरखर सुरु होते. आईला बरगड्या बाहेत पडतील की काय अशी खोकल्याची ढास लागते. न संपणारी लांबलचक काळी रात्र सुरु होते..

कशाने तरी कृष्णाची झोप चाळवते. “उजाडलं आई?” तो आशेने विचारतो. अजून रात्रच आहे हे पाहून तो हिरमुसतो आणि काही तरी बडबडत पुन्हा झोपतो..त्याच्या झोपेत येते ती खीर. शेवयांची, केशरी रंगाची, मधून-मधून बेदाणे असलेली चांगली पातेलेभर दाट खीर..

“उजाडलं आई?” हा कृष्णाचा प्रश्न कृष्णाची सारी वेदना व्यक्त करून हृदय कापीत जातो. अशी ही हृदय पिळवटून काढणारी कृष्णाची आणि त्याच्या गोकुळाची कहाणी. असे कोट्यवधी कृष्णा महान सांस्कृतिक परंपरेचा वारसा सांगणाऱ्या भारत-भूमध्ये केविलवाणे जीवन निमूटपणे जगत आहेत. स्वातंत्र्य आले, योजना आल्या आणि गेल्या, कार्यक्रम आले, राबताहेत, पण कृष्णा आहे तिथेच आहे. रात्र संपून उजाडण्याची वाट पहात आहे. केशरी रंगाची दाट खीर....

कथेचे नाव ‘रात्र झाली गोकुळी’ लेखक अर्थातच जी.ए.कुलकर्णी. कथासंग्रह ‘पारवा’. वरील शेवटच्या परिच्छेदाचे लेखक धनंजय आचार्य.

रेखा दातार : रात्र झाली गोकुळी

परसातला चाफा आणि त्या खालचे हिरवट काळपट पाणी या पासुन गोष्टीला सुरवात होते आणि ती आपल्याला वारणाईच्या घरी घेउन जाते. घर कसले ते, डोक्यावर छप्पर आहे आणि माणसे त्यात रहात आहेत म्हणुन घर म्हणायचे एवढेच! खर म्हणजे मुलाबाळांनी भरलेल्या नांदत्या घराला गोकुळ म्हणतात. हे घर मुलाबाळांनी भरले आहे इतकेच! भरले म्हणजे इतके भरले आहे की सगळे एकत्र घरात असले की घरात हलायला सुध्दा जागा रहात नाही. आणि घर भरले आहे फक्त माणसांनी, बाकी घरातील डबे , पातेली आणि खीसे रिकामेच आहेत. सर्व दूर दारिद्र्याचा मीट्ट काळोख पसरला आहे आणि या परिस्थितीत बदल होईल असा आशेचा एक किरण देखील कुठे दिसत नाही. सगळी कडे न संपणारी भयाण रात्र!

वारणाईने आणि दाजीने संसार सुरु केला तेव्हा त्यांच्या डोळयात स्वप्ने असावीत. त्या मुळेच पहिल्या वहील्या दुर्गाला त्यांनी साई सारखे जपले आणि प्रेमाने वाढवले. पण नंतर मात्र संसाराच्या रेट्याखाली त्यांची स्वप्ने दबुन गेली आणि

आता तर रात्री स्वप्ने पडावीत अशी गाढ झोपही दोघांना लागत नाही. आला दिवस रेटण्याची इच्छा आणि शक्ती दोन्ही त्यांच्याकडे राहिलेले नाही. बाहेरचे काम दाजीने बघायचे आणि घरातले वारणाईने अशी कामाची अलिखीत वाटणी त्यांच्यात झाली आहे. त्या मुळे थकुन भागुन घरी आलेला दाजी घरात आल्यावर डोळयावर झापडे आणि कानावर पडदे ओढुन घेतो. घरातला ओढगस्तीचा सर्व संसार रेटायची, मुलांवर शक्य तेव्हढे संस्कार करायची जबाबदारी खोकल्याने बेजार झालेल्या वारणाईची.

लहानपणी साईसारखी जपलेली दुर्गी अशक्तआणि आजारी आहे. त्यातच तारुण्यसुलभ भावनेने लक्ष्मणच्या प्रेमात पडल्याने सैरभैर झालेली. त्याच्याशी लग्न करुन या दैन्यातुन सुटण्याची आशा बाळगणारी. पण काही करायची हिम्मत नसल्याने आतल्या आत कुढणारी.

कृष्णा वाढत्या वयाचा शाळकरी मुलगा. घरात पोटभर जेवायला मिळत नसल्यामुळे कायम भुकेने वखवखलेला. त्याने कोणापुढे हात पसरु नये, मानाने जगावे ही वारणाईची इच्छा. अगदी शेजारच्या घरातले उरले सुरले अन्न आपल्या कडे येते हे दाजीला कळु नये या साठी धडपडणारी. पण वाढीच्या वयातल्या कृष्णाला भूक थोडीच आवरते आहे! बाप जेऊ देईना आणि आई भीक मागु देईना अशातली गत! मग तो शेजारच्या बागेतल्या भाज्या चोरुन त्या वीक असले उद्योग करतो.

ह्या घरात शकीच तेवढी निगरगट्ट.त्यातच तीला आता नोकरी लागल्याने जास्तच दादागीरी करणारी. तीचे हे वागणे वारणाईला रुचत नाही आणि शकीला मात्र वाटत रहाते की या घरात कोणालाच आपली किंमत नाही. हवे ते मिळवायचे आणि नाही मिळणार ते हिसकावुन घ्यायचे हे तीला चांगलेच अवगत आहे. त्यातच दुर्गी आई बापाची जास्त लाडकी त्यामुळे तीच्या बद्दल तीला आसूया आहे. त्या मुळे दुर्गीच्या बांगड्यांपासुन ते प्रियकर लक्ष्मण पर्यंत सगळे तीने हिसकावुन घेतले

आहे. निगरगट्टपणे तीने घरात आपले स्थान बळकावले आहे. घरातील बाकी कोणाला तीला बोलण्याची हिम्मत नाही आणि त्राणही नाही.

परिस्थितीने गांजलेले हे पाचहीजण रात्र झाल्यावर घर नावाच्या खुराड्यात दाटीवाटीने झोपतात. दिवसभराच्या श्रमाने ठणकणाऱ्या अंगाने अर्धवट झोपेत आणि अर्धवट ग्लानीत असलेला दाजी, खोकुन छातीचे खोके झालेली व संसाराचा गाडा पुढे खेचायची ताकद न उरलेली वारणाई या दोघांची रात्र इतकी दाट काळी आहे की त्यात त्या दोघांना आता स्वप्नेही दिसणे बंद झाली आहेत. त्या दोघांना रात्र कधी संपेल असे झाले आहे पण उजाडणाऱ्या दिवसाकडुनही त्यांना काही अपेक्षा नाहीत. नुकताच प्रेमभंगाचा धक्का बसलेल्या अशक्त दुर्गीला ही रात्र संपुच नये असे वाटत आहे. त्या मुळे रात्रीच्या अंधारात तीला तीचा चेहरा लपवता येईल. कृष्णाला पोटातली भूक झोपु देत नाहीये. पण तो सकाळची मात्र आतुरतेने वाट पहात आहे कारण सकाळी त्याला शेजारच्या घरातुन उरलेली पोळी, बटाट्याची भाजी आणि खीर मिळणार आहे.

बेरकी शकु मात्र रात्रीच्या अंधाराचा फायदा घेउन लक्ष्मणला भेटायला जाऊन आपला कार्यभाग उरकुन आता निवांत झोपली आहे.

या रात्रीचा फायदा घेउन घूस घराला अधिकाधिक पोखरत आहे. अंगणातली गुलबक्षी अर्धमिटल्या थकल्या डोळयांनी उजाडण्याची वाट पहात आहे चाफा आणि त्या खालचे हिरवट काळपट पाणी मात्र निर्वीकारपणे तसेच उभे आहेत.

एकच रात्र पण प्रत्येकासाठी वेगवेगळी!

विलास वाघोलीकर: 🙏 ☝ अगदी योग्य. एक रात्र - प्रत्येकाला कशी वाटते. कारण प्रत्येकजण दुसऱ्या पासून तुटलेला आहे. अस्तित्ववादा प्रमाणे प्रत्येकाला त्याचे आयुष्य तुटकपणे काढण्याचा शाप आहे. धन्यवाद

विलास वाघोलीकर: 🙏 ☝ प्रत्येक कथेसंबंधी इतरत्र मराठीत जे आले, ते याप्रमाणे सांगीतल्यास उपयोगी पडेल. धन्यवाद

सुनीळ सामंत: ही संपूर्ण कथा या दृष्टिकोनातून विचार केल्यास वेगळी दिसेल

संजीव सावरगांवकर: क्लासिक विवेचन. प्रत्येकाची रात्र हाच कथेचा गाभा. त्या 5 जणांच्या आयुष्यातील रात्रीचे यथायोग्य परीक्षण. रात्र झाली गोकुळी 👏 👏 👏

दिलिप बडे: https://youtu.be/0X0PxhC_VfI

सुनीळ सामंत: रेखाजी, खुपच छान आणि वेगळे विवेचन. ही कथा भुकेबद्दल आहे. पण फ़क्त भुकेबद्दल नाही. माणसांचे एकमेकांपासून तुटलेपण हा कथेचा मुख्य गाभा जीएंच्या मनात असावा. तुमचे विवेचन वाचल्यावर रात्री (मुद्दामच रात्री) ही कथा वाचली. आणि आपण सर्वच जण रात्री कसे तुटतो याची जाणीव लख्ख झाली. एका माणसाच्या मनाचा दुसऱ्याला थांगही नसतो.

दिलिप बडे: रात्र झाली गोकुळी"हे व्युत्क्रम-inversion आहे.वाघोलीकरांनी हे बरोबर लिहिले आहे.हे एक विधान आहे.वाक्य आहे.घुशीला,दाजीला,दुर्गीला ही रात्र कधी संपूच नये असे वाटत होते.शकीचे ऊफाड्याचे रसरसीत तृप्त मांस झोपी गेले होते.तर मंजुला पहाटेची ऊत्सुकता नव्हती,वारणाई,कृष्णा,गुलबासाची फुले यांना रात्र लवकर सरावी असे वाटत होते.सतत हालणारा चाफा-कधीच न हालणारे काळे पाणी यांना पहाट झाली न झाली काही पर्वा नव्हती,कारण,पहाट काय,रात्र काय,न शमणारी अखंड अस्वस्थता.कधीच न जळणारी चिरंतन मृतकळा,पहाट मात्र

रात्र सरण्याची वाट पहात होती.तिला येण्याची घाई नव्हती व रेंगाळण्याची तयारी नव्हती.(प्रत्येकाची वेदना वेगळी-प्रत्येकाचा आनंद वेगळा)अस हे गोकुळ.

श्रीकांत देशमुख : अतिशय समर्पक विवेचन. 👌

# राक्षस- हिरवे रावे

सुनीळ सामंत:

**राक्षस- जी ए कुलकर्णी- हिरवे रावे**

जी एंच्या इतर कथांच्या घाटाहून काहीशा वेगळ्या घाटाची ही कथा आहे. जीएंच्या कथांमधे (कैरी, तुती, राधीम्रात्र झाली गोकुळी, बळी, जन्म) लहान मुले असतात आणि त्यांच्या साक्षीने कथा घडत उलगडत जाते. त्यातील जन्म सोडली तर बाकी कथांमधे लहानमुले ही अन्याय सहन करणारी मुकी बळीच असतात. जन्म मधे मुलगा घर सोडून निघून जातो पण सांकेतिक प्रतिकारापलिकडे जात नाही.

राक्षस या कथेत एक लहान मुलगी आहे. तिच्यावरही अन्याय होतो. पण ती केवळ साक्षीदार नाही. या कथेची मुख्य किरदार आहे. कथा तीच घडवते. मात्र जीएंच्या या कथेतील वेगळ्याच शैलीमुळे वाचकाला (निदान मला तरी) नेमके काय घडते आहे याचा संभ्रम, धुके, अस्पष्टता जाणवत रहातात.

कथेतला शंकरू सोनार हा माणुसकी, नीती वगैरेंचा वाराही नसलेला, माणूस कसला राक्षसच आहे. स्त्री, पैसा आणि आराम यासाठी तो काहीही करतो. वेश्यांची दलाली, मटका असे धंदे करत असताना तो आजुबाजूच्या स्त्रियांना नाडतो. अशाच एका संबंधातून जन्माला आलेली बारकी गुणी त्याला चिकटलेली आहे. तिला तो हिडिसफ़िडिस तर करतोच पण वेळेला डागण्याही देतो.

कथा घडते त्या दिवशीही तो, शेगडीवर तापवून लाल झालेल्या कात्रीने तिला डागण्या देतो आणि जीभ कापण्याची धमकीही देतो. नंतरच्या वेळात तिला समोरच्या दफ़नभूमीत कसलासा साक्षात्कार होतो.

तशी तीही काही कमी नसते. जिवंत किड्यांना हालहाल करून मारणे, झुरळाला संथ थंड रक्ताने मुंग्या लागून तडफ़डून मरताना पहाणे असे तिचे छंद

असतात. ती रात्री घरी येते आणि शंकऱ्याला त्याच कात्रीने मारते. अत्यंत थंडपणे आणि निरागस बुद्धीने.

सकाळी पोलिस येऊन जेव्हा गवगवा होतो तेव्हा शेजारची येसूबाई तिला घेऊन जाते. येसूबाईही शंकऱ्याने पिडलेल्या स्त्रियांपैकीच. पण तीही बेरकी असते. तिला संशय येतो सिद्रामचा. (की तिने काही पाहिलेले असते?) त्याला धमकावून पैसे कसे उकळता येतील याचा ती विचार करत असते. तिला गुणी अडचणीची वाटत असते. आणि गुणी तिच्या गळयातील मऊ जागा बघून ठेवत असते. दोघांच्याही मनातला राक्षस जागा होत असतो.

कथेत जागोजाग प्रत्येकातच राक्षसी वृत्तीचं दर्शन जी ए घडवतात. राक्षस असतो प्रत्येकातच पण त्याला बाहेर यायला निमित्त, वेळ आणि साधन मिळायचा अवकाश असतो असं ही कथा सांगते. जीए या कथेतून आपल्यालाही आरसा दाखवतात असे वाटते. त्याचबरोबर ही कथा दिलासाही देते. अन्यायाला तोंड देण्याची शक्ती दुबळया दिसणाऱ्या अन्यायग्रस्ताच्या आतच असते. दमनकर्त्यांने आपल्या बळाला अंतिम समजू नये हा इशाराही ही कथा देते. आपल्या प्रत्येकाच्या अस्तित्वाला एक मऊ, कोवळी vulnerable जागा असते, आणि ती केव्हाही आपला घात करू शकते याची जाणीवही ही कथा करून देते.

या कथेला समांतर अशी कथा मला जीएंच्या साहित्यात दिसली नाही. रत्नाकर मतकरींच्या भयकथांमधे या कथेच्या जवळ जाणाऱ्या कथा आहेत. पण त्यांची तुलना करू नये असे मला वाटते.

या कथेतील थडग्याजवळ गुणीला भेटलेल्या त्या त्रयस्थ व्यक्तीबद्दल मला नीटसे काही समजले नाही. ती जिवंत व्यक्ती असते की गुणीच्या आतला आवाज की भूत?

या कथेवर जाणकारांची मते ऐकायला आवडेल.

-सुनीळ सामंत

विलास वाघोलीकर: राक्षस - हिरवे रावे. जीएंच्या अनेक गूढ कठीण कथांपैकी ही कथा आहे. परंतु सुनीळजींनी या कथेचे सहज विवेचन केले आहे, याबद्दल त्यांना धन्यवाद देतो.

अनेक प्रवाह एकत्र होवून एक प्रवाह होतो व कथेचा अर्थ लागतो. शंकरू सोनाराचे , गुणीचे, उंच माणसाचे बाह्य व मनातले वर्तन यांचे प्रवाह वाहत आहेत. त्यातून एकत्र होवून कळते की गुणीने शंकरूला मारले.

.. शंकरू ने तिची (गुणीची) अशक्त मळकट दोरीसारखी बघीतल्यावर त्याची बोटे शिवशिवू लागली... काय ग गुणे काय चालले? त्याने तिच्या तोंडावर हात ठेवला व चिमट्याचे गरम पाते मनगटावर ठेवले. तो म्हणाला," मी आल्यावर तू दिसलीस तर कातडे सोलून का ढेन."

मग ती गुणी, गोरीत कब्रस्तानात गेली. तेथे स्वच्छ कपड्यातला हातात छडी घेतलेला माणूस भेटतो. तो माणूस कब्रस्तानातच भेटतो व बाहेर येत नाही. नंतरही तो गुणी ला दिसतो, हे महत्वाचे आहे. त्याने तिच्याकडून कु त्र -यालाला मारले. तो म्हणाला, सुरी तुला कधी लागली तर मिळेलच त्यावेळी.

गोरीच्या बाहेर तो माणूस आला नाही... कुणीतरी स्वच्छ पुसून टाकण्याप्रमाणे तो माणूस दिसेनासा झाला.

... कपाटावर हात ठेवताच गुणीने ते आपल्या (घामाने चिकट झालेल्या) हातात पकडले... घरी आली तर चार पाच माणसांचा घोळका होता व एक पोलीस आला होता.. शेवटी गुणीच्याच मागे सावली टाकत तो माणूस उभा होता. तो गुणाकडे पाहून हसला.

कथेत गुन्हा करणाऱ्याच्या मनातले द्वंद्व विचार, लहान मुलाच्या मनातील कल्पना - प्रत्यक्ष विचार यांचे द्वंद्व यांचे सुरेख चित्रण केले आहे. - धन्यवाद. विलास वाघोलीकर

सुनीळ सामंत: सुंदर. विचारांना चालना देणारे लिहिले आहे.

मुलीचे नाव गुणी का ठेवले असेल?

# लई नाही मागणे     रक्तचंदन

अलका तडकलकर :

**लई नाही मागणे**

**रक्तचंदन**

...............................

जीएन्च्या रक्तचंदन या कथासंग्रहातील ही सहावी कथा. दहाबारा पानांची.ही कथा धडल् बंडाचार्य व त्याची बायको सावित्री यांची संसारकथा आहे. जी करूणाजनक आहे.तसेच त्याबरोबरच या कथेतून या जोडप्यांच्याविषयीचे समाजभानही दिसून येते.जे आजही अनेक ठिकाणी पहायला मिळते.

बंडाचार्य व त्याची बायको सावित्री हे दिसायला विजोड जोडपे.जणू शाईची दऊत आणि बोरू किंवा रवी आणि ताकाचे डेरकं असं. जोडी तर लागतेच पण दोघांची कामे निराळी. परमेश्वर ही अशा जोडी कशाला जन्माला घालतो हे एक कोडेच.

बंडाचार्य व सावित्री एका छताखाली राहणारी.पण दोघांचे विचार व वागणे एकमेकांच्या विरूद्ध. सावित्री गलेलठ्ठ असूनही शरीर सावरत शाळेत शिकविते व घरप्रपंचही बघते.जणू ही तिच्या एकटीचीच जबाबदारी.तर धडल् बंडाचार्य हा रिकामटेकडा. कुणीही हक्काने त्याला काम सांगून आपला मतलब साध्य करून घेणारे लोक.अशाच लोकांची कामे करून स्वतःच्या जगण्याची दिशाभूल करून घेत स्वतःचे भुसारमालाचे चांगले चालणारे दुकानही बिनकामाच्या लोकसंग्रहापायी पुरीभाजी खाण्यात मोडून जाते.

खरेतर एकदा संसारात पडले की तो नेटाने पार पाडायला हवा. कारण संसार म्हणजेच अनंत अपेक्षा व जबाबदारी याचे एकत्रीकरण. त्यात येणाऱ्यां अनेक

अडचणींवर मात करून सुखी संसाराचे स्वप्न साकार होत असते.पण इथे बंडाचार्य व सावित्री याच्या वागण्याच्या दिशाच विरूद्ध आहेत.त्यामुळेच सुखी संसारासाठी तिच्या एकटीची धडपड हे साहजिकच तिचा मनस्ताप वाढवत असतो.जे लोकांना मजा मारायला पाहिजेच असते.त्याचा गैरफायदा घेऊन बंडाचार्यला कामे दिली जातात..कोणती तर पत्रके वाटणे, घोषणा करत फिरणे किंवा देशभक्तीपर कार्यक्रमात सतरंजी टाकणे ,व्यवस्था बघणे अशी कामे करताना स्वतः बंडाचार्यलाही फार आनंद वाटत असे पण त्या कामाचा मोबदला काय? तर सतत चेष्टा मस्करी..व टोमणे एवढेच.

त्यातून पोट भरत नसते. याचे भान नसल्याने बंडाचार्याचे जीवन त्यालाच नीरस वाटू लागते.मग तो मरणाची भाषा करत डॉक्टर कडे मरणाचे औषध मागतो.मरणाचे स्वप्न पहातो हे कसे पूर्ण करायचे याचे सल्लेही त्याला दिले जातात पण पोटभर अन्न मिळण्यासाठीचे काम कुणी देत नाही.

जगण्याची दिशा बदलल्याने व आयुष्याची दशा झाल्याने मरण्याचे औषध मागणारा बंडाचार्य अचानक जगण्याचे औषध मागू लागताच डॉक्टरही आश्चर्यचकित होतात.बंडाचार्याच्या बायकोला दिवस गेलेले असतात.कितीतरी वर्षांनी. आणि संसारात एक नवा आशेचा किरण दिसताच बंडाचार्याची जगण्याची इच्छा जागृत होते..अपत्य प्राप्तीचा आनंद त्याला हवा असतो.अंगात शक्ती नाही पोटात अन्न नाही अशा अवस्थेत तो फाटलेल्या चपला कोटाच्या खिशात ठेवून वेताळाच्या कट्टयावर जाऊन पडतो.त्याला आपले आईवडील,जत्रेत हरवलेली बहीण आठवू लागतात.घरची बेताची परिस्थिती आठवू लागते खूप वाईट वाटते त्याला. आपण काहीच करू शकलो नाहीत याचे दुःख वाटू लागते.जुन्या जीर्ण आठवणी नकोशा होतात तो रडू लागतो.

इथे हा प्रसंग जीएनी खूप भावूक केला.वाचताना आपल्याही एक चुटपुट लागून जाते.

परावलंबी जगणाऱ्या बंडाचार्यांचे जीवन हवे हे मागणे तसे फार मोठे नसते ,पण इथेच नियती आडवी येते.त्याचे सगळे अवसान संपले जाते.

एक विषण्ण मनःस्थितीत ही कथा संपते.

धन्यवाद

🙏

डॉ. अलका तडकलकर

अंबाजोगाई

अलका तडकलकर : मान्यवर वाचक ,समीक्षक आणि अन्य सर्वजण

या ग्रूप मध्ये माझे लेखन आपल्यासमोर ठेवत आहे.

या ग्रुप ची ऊर्जाबचत वेगळी आहे

मी प्रयत्न करणार आहे. संधी देता हीच माझ्यासाठी मोठी पर्वणी

सुनीळ सामंत: वा मॅडम. फ़ारच सुंदर लिहिले आहे. नेमके शब्द वापरले आहेत.

माझि ही आवडती कथा आहे. तुम्ही बहुतेक सर्वच बाजू लक्षात ठेवून लिहिल्या आहेत. तरीही पुनारवृत्ती झाली तरी मी या कथेवर लिहिणार आहे. धडल बंडाचार्य मी फ़ार जवळून पाहिला आहे. म्हणून.

अलका तडकलकर : खरेच..मग खूप नेमके बंडाचार्य दिसतील 👍

विलास वाघोलीकर: - समाजात एका कोपऱ्यात काही माणसे जगत असतात. त्यांच्याकडे फार सांगण्यासारखे गुण नसतात, कष्ट नसतात, 1 मिळकत नसते. त्यामुळे ते इतरांच्या दयेवर समाजात जगत असतात. त्यांना हिडिस फिडीस करून घेण्याचाही सवय होते. पण जीए अत्यंत गंभीरपणे ही व्यक्तीचित्रे रंगवतात. कारण अस्तित्वाचा हा प्रकार त्यांना महत्वाचा वाटतो.

-विलगपणाची प्रबळ भावना असून ही ते समाजात मिसळत असतात, हे महत्वाचे असते. उदाहरणार्थ,अवशेष मध्ये लंगडा गोविंदाचार्य, वीज मधला बळवंत मास्तर, काळी आजी, कवठेतला दामू, सूड मधली शिक्षिका, कसाब मधला सोनू आणि या प्रस्तुत कथेतील धडल् बंडाचार्य ही व्यक्ती चित्रे लक्षात ठेवण्यासारखी आहेत.

- डॉ अलका तडकलकर मॅडमनी थोडक्यात, मुद्देसूदपणे या कथेचा परिचय करून दिला आहे, याबद्दल त्यांना धन्यवाद देतो. - विलास वाघोलीकर

सुनीळ सामंत: उत्तम विश्लेषण.

विलासजींना दिसलेले आणि अलकाजींना दिसलेले बंडाचार्य वेगवेगळे आहेत असे मला वाटते. विलासजींना बिचारे बंडाचार्य दिसले, मला समाजासाठी काही करू इच्छिणारे, त्यासाठी वेळ आणि शक्ती देणारे आणि त्या बदल्यात कशाचीही अपेक्षा नसणारे बंडाचार्य दिसतात. ते स्वतःमधे एवढे मश्गूल असतात की लोक आपल्या मागे (किंवा समोरही) काय आणि कसे बोलतात याची त्यांना पर्वा नसते, माझे काही नातेवाईक, भाऊ, आणि अनेक मित्र या प्रकारात आहेत किंवा होते. समाजात आता अशा लष्करच्या भाकऱ्या भाजणाऱ्यांची संख्या कमी कमी होत आहे.

या सर्वांच्या बाबतीत (माझ्य ओोळखिच्च्या) एक कॉमन धागा होता. तो म्हणजे यांच्या कुटुंबियांचे होणारे हाल. पत्नीला सोसावे लागणारे बोलणे आणि कष्ट. मुलांच्या वाटेला येणारी अवहेलना.

हे लोक सर्वच संघटनांत, संस्थांत आणि पक्षांत दिसत. किंबहुना यांच्या जिवावरच संस्था चालत. त्यांचे चालक मालक प्रसिद्धीला पावले पण हे मात्र वाईट परिस्थितीतच जगले आणि मेले.

यांचे कमी कमी होत जाणे हे समाजासाठी वाईट आहे. पण यांच्या कुटुंबियांच्या नजरेतून मात्र जे घडते आहे ते योग्य वाटेल.

जीएंनी ही एकच कथा, पण एवढी प्रातिनिधिक लिहिली आहे की जणू त्यांना असे अनेक बंडाचार्य माहितीत असावेत. अगदी जवळून.

दिलिप बडे: बंडाचार्य ही मनाची उन्नत अवस्था आहे.मी व इतर, हा भेद संपला की सारेच अद्वैतात विलीन होते.फायद्या तोट्याचा हिशोब संपला की "माझे मी पण लोपो,नाम रूप हरपो"अशी कैवल्यावस्था प्राप्त होते.

अलका तडकलकर : अगदी योग्य शब्दात...लष्कराच्या भाकऱ्या भाजणाऱ्याची संख्या

श्रीकांत देशमुख : वेगवेगळया कोनातुन व दृष्टीकोनातून केलेली सर्वच विश्लेषणं विचार प्रवर्तक आहेत. वाचकाला रसग्रहण कसे करावे ह्याचा पाठ मिळतो. तसेच समृद्ध होत असल्याचा अनुभव मिळतो. 🙏

वैभव कुलकर्णी :

सुनीळजी ,विलास सर आणि डाॅ. अलका मॅडम.....

धड्डल बंडाचार्य खरोखरीच जागोजागी दिसतात,

अशी जगावेगळी माणसे आणि त्याचे जीवन याचे जीएंना विलक्षण आकर्षण असावे.

पण जीए कथा आपल्याकडून जगवून घेतात...

वैभव कुलकर्णी : लई नाही मागणे....ही कथा आज अनेक वर्षांनी वाचली.

ऐसपैस पसरू शकणाऱ्या कादंबरी वाचल्याचा जबरदस्त फिल येतो.

कथा वाचून आरती प्रभूंची कविता आठवली.....

जाहला सुर्यास्त राणी ,खोल पाणी जात असे !

दुरचा तो रानपक्षी , ऐल आता येत असे......

अलका तडकलकर : कथेच्या शेवट वाचत असताना खूप विषण्ण मनःस्थितीत मन जाते आणि कथा मनाच्या गाभाऱ्यात पोहोचल्याची जाणीव होते.

सागर कुलकर्णी: आपण केलेले रसग्रहण अतिशय मर्मग्राही आणि प्रभावी असे आहे.

आपले खूप खूप धन्यवाद.

ही कथा पुन्हा एकदा वाचण्याची प्रेरणा आपल्या लिखाणा मधून मिळाली.

महेश आफळे : सहसा मी या ग्रुपवर व्यक्त होत नाही

पण सध्या धडल वरची ही समग्र चर्चा वाचताना यात कुणालाही थट्टा प्रसंगात विहिरीत जीव देण्याचा पर्याय ऐकून असा जीव दिलेल्या बायकोच्या आठवणीने बाळकूचा गोरामोरा खजील चेहरा /त्याचे तिथून उठून जाणे

अथवा नंतर शेवटी त्याची थट्टा मस्करी करणाऱ्या डॉक्टर ची निपुत्रिक व्यथा जराही दिसू नये याचे काहीसे आश्चर्य वाटते

आता बंडाचार्य ला जगण्याचे औषध द्यायला हवे असे डॉ ला वाटते तेव्हा धडल त्या ही पलीकडे पोहोचला असतो

जी ए म्हणजे चुकामुक

एवढेच खरे

बाळकू नाव असावे त्याचे,बारकू नव्हे

कथा वाचून किमान 15 वर्षे झालीत तरी हे लख्ख आठवते

वैभव कुलकर्णी : जीएंनी बंडाचार्याचा मृत्यू इतके शब्द राखून रंगवला आहे की प्रथम वाचताना मृत्यु जाणवतच नाही.

इतकी प्रतिके एकामागुन एक येतात की !जीए आपल्याला प्रतिकातच खिळवून ठेवतात.

वैभव कुलकर्णी : बंडाचार्याच्या बायकोची भानगड पत्ते कुटणाऱ्याच्या तोंडी सतीसावित्री सिनेमा विषयीचे वाक्य टाकून जीए संदिग्धता निर्माण करतात....

अलका तडकलकर : हो एकदम खरे आहे.मृत्यूविषयी लिहीताना शब्द आणि प्रतिके लेखणीत येणे ही एक देणगीच असते

# वंश - कथासंग्रह - काजळमाया

सिद्धेश खांडेकर: कथा - वंश

कथासंग्रह - काजळमाया

'वंश' ही मला एक गूढ संसारकथा वाटली. एखादी मादी नरासोबत 'लग्न' नावाच्या तरतुदीनंतर राहायला लागल्यावर प्रथम अपेक्षा असते ती संततीची. मुळात संतती वाढत राहावी हेच तर त्या दोघांना एकत्र आणण्याचे प्रमुख कारण असते. घराला वंश देणे आणि स्वयंपाक करणे ही दोन कारणे सोडली तर इतर कारणे जेवताना ताटाबाहेर जमिनीवर पडलेल्या मळकट शितांसारखी उपयोगाची नसतातच. पण स्त्रीच्या शरीरात काहीच दोष नसूनसुध्दा आजूबाजूच्या समाजाने तिला वांझोटी ठरवले तर? तर तिची करेव्वा होते...

कथेची सुरुवात होते ती करेव्वाच्या उरावर येऊन बसलेल्या संध्याकाळच्या पायवाटेपासून. आता संध्याकाळ हा प्रकार प्रत्येकासाठी वेगवेगळा असतो. काहींना सुखवतो, शांत-शांत वाटतो. तर काहींच्या आधीच रिकाम्या झालेल्या मनाला आणखीनच चघळू लागतो. पायवाटेवरून तिच्या पुढे चालणाऱ्या बायकांच्या तोंडून तिच्याच वांझोटेपणाबद्दल बोलताना करेव्वा नकळत ऐकते, तेव्हा मात्र तिच्या मनातील संध्याकाळ पालटून ती बायकांच्या अंगावर चवताळल्यासारखी धावत जाते. तिच्या नशीबी चेपवलेला वांझपणा जर तिच्यामुळे आलेला असता तर ती बायकांच्या बोलण्याने एक वेळेस खचून गेली असती, पण शरीराने ओबडधोबड सुटलेल्या निकामी नवऱ्यामुळे उदभवलेल्या असंततीचे जडपण तिच्या गाठोड्यात कोंबले गेले याचाच तिला असह्य राग आला असावा. कर्दनकाळातल्या दिवसामध्ये

अनपेक्षित दुःखद घटनाक्रमांची साखळी असते आणि अंतला साखळीला जोडलेला शून्याच्या आकाराचा अवजड पोलादी गोळा पडून राहिलेला असतो, तसेच काहीसे करेव्वाच्या बाबतीत घडते.

मुल-बाळ नसले तरी तेवढाच जीव लावून वाढवलेला कुत्रादेखील तिला उतरणीच्या वाटेवर घ्यायला येत नाही, नंतर तिला कळते की म्युनिसिपालिटीने गावात कुत्रे मारण्यासाठी विषारी गोळया टाकल्या आहेत. तिच्या झोपडीच्या शेजारी मेलेल्या डोळयांनी बरगड्या फुगवून पुन्हा आकासणारा कुत्रा तिला दिसतो आणि संथपणे मरण पावतो. 'संग्या' हा चुलत बहिणीचा मुद्दाम घरी आणलेला सात-आठ वर्षांचा मुलगा. आपली वाईट सावली संग्यावर पडून त्यांचेपण काही बरे-वाईट होऊ नये म्हणून ती तिरक्याला सांगून त्याला त्याच्या घरी सोडून यायला सांगते आणि या कारणाने तिला एकांतही मिळतो. पण अनेकदा एकांत हवा म्हणता-म्हणता तो खरोखरच मिळाला की मात्र नाचक्की होते आणि आता कितीही नको म्हटले, तरी तो जाणाऱ्यातला नसतो. शरीर कितीही शिणलेले असले तरी मन शांत असल्याखेरीज झोप लागत नाही. एकांत मिळाल्यावर करेव्वादेखील जमिनीवर फक्त पडून होती. वांझपणा आपल्या नियतीमध्ये का लिहिला गेला असावा, यामागचे नको तेवढे तर्क तिने जुळवून पहिले. वडलांच्या मृत्युंनंतर जोगतीन झालेल्या आईने एका बाईला वांझपणावर उपाय सांगत असताना तिने एकदा चोरून ऐकले होते, तो भयाण उपाय तिला आठवला.

वांझपणाचे मूळ तिच्या स्वतःमध्ये नसूनसुध्दा ती तो उपाय करण्याचे धाडस करते ते तिच्यावरचे डाग कायमचे पुसून काढण्यासाठी. पण उपाय करण्यासाठी नारळ घेऊन रानमारुतीच्या देवळाजवळ ती पोहोचते तेव्हा सरतेशेवटी तिला जे सत्य कळते ते काही निराळेच आणि अनपेक्षित असते.

रानमारुतीच्या देवळाचे, मारुतीच्या लाल मूर्तीचे, देवळाबाहेरच्या तलावाचे, टेकड्यांचे वर्णन वाचत असताना एक स्वतंत्र्य भयकथा वाचल्यासारखे वाटते.

करेव्वाच्या झोपडीपासून देवळापर्यंतचा दगडी मार्ग करेव्वाचा हात धरून तिच्यासोबत कापल्यासारखा जाणवतो इतके जिवंत वर्णन जीएं नी केले आहे.

समाजाने करेव्वाच्या कपाळावर मारलेला वांझपणाचा दगड तिच्यामध्ये काडीचा दोष नसतानाही ओठावर ओठ दाबत तिला सहन करावा लागला. आणि कदाचित झोपडी शेजारच्या मेलेल्या कुत्र्यासारखा तिचाही काळ तोंडाशी आला तरी तिच्या कपाळावरील वांझ जखम चिरंतर हळहळत आणि रक्ताने ओथंबत राहिल...!

सुनीळ सामंत: अतिशय सुरेख आणि नेमके

गौतमी कोंडे: ह्या कथेतून जी. ए. नी एक सामाजिक मुद्दा जगासमोर ठेवला आहे. कित्येकदा स्त्रियांना स्वतः मध्ये दोष नसताना देखील जगाचा तुसडेपणा सहन करावा लागतो.

वंश ह्या कथेतून जी. ए. नी तो सामाजिक विषय त्यांच्या शैलीतून मांडला आहे आणि @सिद्धेश खांडेकरतुम्ही त्याचे उत्तम व पूर्ण कथा न उलगडता योग्य रीतीने विवेचन केले आहे.

शशांक म्हसवडे: वंश - एका आदिम प्रेरणेचा रहस्यमय, करुण अंत

जी ए लिहितात तेव्हा कायमच मूळ मानवी प्रवृत्ती, त्यावरील नैसर्गिक शक्तींचा प्रभाव, आणि अर्थातच सगळ्यांचा खेळ मांडणारी नियती यांचे एक अभूतपूर्व मिश्रण आपल्या समोर येते. Procreation अर्थात वंशवृद्धी ही सर्व प्राण्यांप्रमाणेच मनुष्यप्राण्यातील सुद्धा आदिम प्रेरणा आहे. त्यातही प्रत्येक स्त्रीला, स्त्री मधील

मातेला ही प्रेरणा पुरुषापेक्षा कैक पटींनी अधिक प्रमाणात, तीव्रतेने जाणवते. या प्रेरणेचे जर समाधान होत नसेल तर ही अशी प्रेरित स्त्री कुठल्याही थराला जाऊन मातृत्वाची प्राप्ती करून घेण्याचा प्रयत्न करते.

वंश कथेतील करेव्वादेखील (आणि तिची आई सुद्धा) याला अपवाद नाहीत. करेव्वा आई होण्यासाठी अत्यंत आसुसलेली आहे. पण जुगारासह इतरही बाबीत कायमच हरणारा, लठ्ठ, बेढब, षंढ नवरा तिला मातृत्व देऊ शकत नाही. समाजातही तिची वांझोटी म्हणून अवहेलना सुरू होते. अपत्यहीन स्त्रीचे जगणे असह्य करण्याच्या आपल्या समाजातील या वाईट प्रवृत्तीवर जी ए यांनी नेमके बोट ठेवले आहे. मातृत्वाची भूक भागवण्यासाठी करेव्वा मग कुत्रा पाळ, कुठल्याशा बहिणीचा मुलगा पालन पोषण करण्यासाठी आपल्या घरी आण, असे प्रकार करते. मानवी मन दुःखात सुख शोधायचा प्रयत्न करते ते असे! जी ए कायम या मानवी गुणावर आपल्या लेखनातून प्रकाश टाकतात. त्यांच्या लेखनाचा हा पैलू फार सुंदर आहे!

करेव्वा स्वतःच्या नकळत स्वतःला दोषी मानू लागते. पालिकेच्या लोकांनी विष घातल्याने करेव्वाचे कुत्रे मरते. करेव्वाला मात्र उगाचच असे वाटते की आपण वांझ असल्याने जीवन आपल्यापासून दूर पळते आहे. त्यामुळे घरी आणलेल्या भाच्याला आपल्यामुळे काही बरे वाईट होऊ नये म्हणून ती त्याला नवऱ्या सोबत स्वगृही पाठवून देते. स्त्रियांचा हा ही पैलू - सतत स्वतःला दोष देणे, प्रत्येक वाईट गोष्टीला स्वतःला जबाबदार समजणे - जी ए खुबीने आपल्यासमोर आणतात.

उपाशी पोटी रात्री अंथरुणात पडल्यावर करेव्वाला आपल्या आईची आठवण येते. तिची आई वैधव्यानंतर मंत्र तंत्र, गंडे दोरे, करून लोकांना अघोरी उपाय सांगत असते. करेव्वाच्या लहानपणी एकदा करेव्वाची आई एका श्रीमंत बाईला मूल होण्याचा उपाय सांगते - रानात एकट्याने एका विशिष्ट ठिकाणी, विशिष्ट रात्री, विशिष्ट वेळी एक नारळ पुरायचा. वर पुरावा म्हणून हे ही सांगते की करेव्वा मला याच उपायाने झाली! हे बाल करेव्वा ऐकते आणि मनात ठेवते. कुत्रा मेलेल्या, भाच्याला घरी पाठवलेल्या रात्री करेव्वाला हे सर्व आठवते आणि ती हा उपाय

करायचे ठरवते. नवऱ्याने कधी काळी जुगारात जिंकून आणलेला वाळका नारळ आणि पहार घेऊन ती जंगलात रात्री एकटीच जाते. स्त्रीची मातृत्वाची आस कसे तिला काहीही करायचे बळ देते, हे जी ए आपल्यासमोर आणतात.

जंगलात ती खड्डा खणत असताना तिथेच आजूबाजूला वस्तीला असणारा बैरागी तिच्यावर अतिप्रसंग करण्याचा प्रयत्न करतो. तिचे चुंबन घेतो. तिला भयंकर घृणा आणि संताप येऊन ती त्याच्यावर प्रतिहल्ला चढवते. पहारीचे घाव घालून त्याचे डोके फोडून त्याचे प्राण घेते. इथे आता जी ए त्यांचा ट्रेडमार्क कहानी मे ट्विस्ट आणतात! आपल्या आईने हा उपाय करून आपल्यला जन्म दिला. इतरांनाही मूल होण्यासाठी हा उपाय सांगितला. याचा अर्थ कदाचित हा बैरागीच आपला बाप होता आणि आपण त्याचाच वध केला, हे तिच्या लक्षात येते!

अशा विचित्र गुंतागुंतीतून नियतीचा फेरा जी ए उलगडून दाखवतात. करेव्वा वंश वाढवण्यासाठी उपाय करायला आली आणि स्वतःच्या वंशाचे मूळ खुडून बसली! माणूस काही करायला जातो, त्याला वाटते सर्व गोष्टी, निसर्ग, भविष्य आपल्या अधीन आहे. पण तसे नसते. पराधीन आहे जगती पुत्र मानवाचा हे अजरामर सत्य जी ए अतिशय उत्तम शैलीत कथांच्या माध्यमातून आपल्यला सांगतात.

वंश कथा खूप वरच्या पातळीवरची आहे. या कथेवर लघुपट करण्याचा मानस आहे. आपल्या शुभाशीर्वादांची गरज आहे.

आपला नम्र

शशांक म्हसवडे 'डोमकावळा'

विलास वाघोलीकर: छान लिहिले आहे. या ग्रुपवर आपण वेळ काढून असेच लिहावे ही विनंती. जीएंनी आयुष्यातील दुःखे पुरेपूर कथां मध्ये उतरवली. - मांजराने

दुधाची बशी चाटूनपूटून स्वच्छ करावी तसे. ऑर्फियस मध्ये म्हटल्या प्रमाणे - जन्म वेदनेत, जन्मानंतर वेदना, मृत्यू वेदनेत. तरी मृत्यूनंतर परत जन्माला यावे अशी घुसमट हे माणसाचे भागदेय आहे का?लघुपट करण्यासारखी पटकथा जरूर आहे. क रेव्वा चे कष्ट, झोपडी, बालपण, मारुतीच्या देवळापर्यंतचा प्रवास हे नेपथ्य परिणामकारक होईल. लक्ष्मी पटकथेतील , घर ते कपिलेश्वर देवळाच्या प्रवासाप्रमाणे. भावी उपक्रमांना शुभेच्छा

सुनीळ सामंत: वंश ही कथा "नैतिकता" या संकल्पनेवरच आघात करते का?

ही कथा वाचयावर कोणाच्या मनात आपल्या सर्व पुराणकथांबाबतही प्रश्नचिन्हे निर्माण झाली का? किंवा तेव्हा वाटलेल्या अचंब्याचे निराकरण वेगळ्या प्रकारे झाले असे वाटले का?

शशांक म्हसवडे: खूप आभार वाघोलीकर सर 🙏🏾 आपले प्रोत्साहन आणि शुभेच्छा अमूल्य आहेत! लिहिता राहण्याचा प्रयत्न करेन 🙏🏾

शशांक म्हसवडे: 'नैतिकता' हा एक सोयीस्कर भ्रम आहे असे माझे मत आहे. जी ए या अशा तथाकथित नैतिकतेवर कायम हलकेच भाष्य करतात. पुरुष कथा हे याचे उत्तम उदाहरण आहे.

पुराणकथा वानगी दाखल उत्तम असतात. त्यात कायम एक हिरो आणि एक व्हिलन असतो, आणि व्हिलनची बाजू आपल्यासमोर येऊ दिली जात नाही. त्यातील संदेश घ्यावा इतकेच.

श्रीकांत देशमुख : ह्या कथेतुन वंश वृद्धिची आस आणि त्यासाठी कोणत्याही स्तराला जायची तयारी ह्याचे मुळ कारण (root cause) आहे पुरुषप्रधान संस्कृती व त्यानुसार जिवन व्यापन.

स्वतःचे दोष लपविण्यासाठी स्त्री ला वेठीस धरणारा आपला समाज व त्याची स्त्रीविषयीची हिन विचारसरणी.

आज आधुनीक विज्ञानाद्वारे जरी सिद्ध झालेले आहे कि वंशवृद्धी साठी स्त्री पुरुष दोघांचाही वाटा ५०% असतो. मग एकट्या स्त्रिला कां दोष. तसेच मुलगी किंवा मुल्गा होणे ह्यात पुरुष हा जबाबदार आहे (yy XX). परंतु मुलगी झाल्यासही दोष स्त्रियांनाच.

तसेच मुल नसलेल्या स्त्रियांना समाजाकडून कुचेष्टा सहन करावी लागते.

हे सर्व ह्या कथेतुन बघायला मिळते. आणि शब्दप्रभू जि. ए. जेव्हा त्याबाबत लिहीतात तेव्हा त्याला तोड नसते.

दिलिप बडे: वंश,मातृत्व हा देवाचा आशिर्वाद समजण्याचाही एक काळ होता.अधुनिक स्त्रि विवाह नको-बाळ तर नकोच नको या निष्कर्षाला आलेली दिसते.हि कथा साधारण 50वर्षापुर्वी लिहिली असेल अस समजल्यावर बाळ होण्यासाठी आईने बैरागी पर्याय म्हणुन वापरला.करेव्वाने हा पर्याय नाकारला.यात काळा बरोबर तीच्या वासना प्रगत झाल्या असे म्हणू. डॉ.तारा भवाळकर या लोकसाहित्याच्या अभ्यासिका एके ठिकाणी लिहितात- स्त्रि पुरूषाच्या संयोगातुन, अणु एवढ्या कणातुन पुर्नरूत्पादनाचा नैसर्गिक चमत्कार घडतो. ही केवळ निसर्गाची निर्मिती आहे.या निर्मितीत स्त्रि व पुरूषाच दोघांचही कतृत्व शुन्य आहे.काळाच्या ओघात पुर्नुत्पती आणि वंश या संकल्पना पुसल्या जातील असे वाटते.लक्ष्मी दारिद्रयाने दबली.करेव्वा वांझपणाचा सामाजिक कलंक घेऊन होरपळळी.जी.एं.नी अनेक सामाजिक समस्या कलात्मकरीत्या आपल्या समोर ठेवल्या,असे म्हणावे वाटते.

सुनीळ सामंत: @ श्रीकांत देशमुख @शशांक म्हसवडे @ दिलिप बडे

जीएंच्या कथा काळाच्या पुढे किंवा खरेतर काळाच्या बंधनापलिकडे का होत्या याचे गुपित त्यांच्या मुक्त विचारसरणीत होते असे आता वाटते. जीएंची शैली, कथा बांधण्याची हातोटी उच्च दर्जाची होतीच. पण त्यांच्या विचाराला कोणत्याही सरणीची वेसण नव्हती आणि ते स्पष्टपणे आणि तरीही कलात्मकरित्या तो विचार, तो प्रश्न वाचकांपर्यंत पोहोचवत.

सुनीळ सामंत: वंश ही कथा खरोखरच फ़ार खोलवर विचार करायला लावणारी आहे. त्यावर चित्रपट करताना कदाचित सध्याचे राजकीय वातावरण आडवे येऊ शकते.

म्हसवडे: अगदी खरे आहे... बघू कसे काय करता येईल

Barbind Sir: वंश कथेचा एका पध्दतीने केलेला शोध संयुक्तिक वाटला.करेव्वाच्या आयुष्याच्या प्रवाहाच्या निमित्ताने जी.ए.नी एकंदरीत मानवी लोकिक जीवनाचेच केलेले interpretation च आहे. कुठले ही मानवी जीवन म्हणजे प्राणी पातळीवर सुखाची पुर्णता व तसेच त्याच्या सामाजिक पातळीवर साचेबंद साफल्य जीवनासाठी केलेली धडपड व त्याला जोडून असलेला महत्वाचा भाग म्हणजे नियती,या सर्वांचा आयुष्यभर चाललेला खेळ म्हणजेच मानवी जीवन. प्रत्येक मनुष्याची धडपड सारखीच असते पण ती धडपडीच्या जोडीला नियतीचा प्रभाव प्रत्येकाला मिळालेला हा वैविध्यपूर्ण असतो आणि त्यामुळेच प्रत्येक मानवी जीवन हे विविध मार्गांनी वाहणारा जीवन प्रवाह ठरतो,त्यात वासनांची तसेच समाज धारणेतून त्यानेच निर्माण झालेल्या काही ध्येयाची सफलता व असल्या यांच्या विविध प्रमाणातील मिश्रणामुळे प्रत्येकाचा हा प्रवाहाला आपण लौकिक जीवनात नशीब किंवा भाग्य म्हणून संभावना करतो.ऊपरोक्त वाचकांनी विविध प्रकारे केलेल्या या कथेच्या विश्लेषणावरुन सहज सुचलेले इथे व्यक्त केले.धन्यवाद

श्रीकांत देशमुख : 👍 सहमत. वैश्विक स्तराचे कालातीत विचार व लेखन शैली ही जि. एं ची खासीयत.

दिलिप बडे: आपल्या कथांतुन जी.एं.नी मानवी शृद्धांना जोरदार धक्के दिले आहेत.त्यामुळे आपण सारेच त्यांच्या कथा वाचताना सैरभैर होतो.

सुनीळ सामंत: त्याहून महत्वाचे म्हणजे ते धक्के त्यांनी ओढून ताणून धकातंत्र वापरून लोकांना इंप्रेस करण्यासाठी, किंवा एखादी वैचारिकता मांडण्यासाठी दिले नाहीत. ते त्यांच्या कथांचा अभिन्न भाग होते.

संजीव सावरगांवकर: माझे कथेचे बाबत मनोगत: तुम्हा सर्वांचे "वंश" कथेबाबतचे विचार व विवेचन, विविधांगी निरुपण वाचले, थक्क झालो, किती बाजूने कथा वाचता येते हे उमगले आणि कथा पुन्हा एकदा वाचली. विचारांचे येवढे वैविध्यपूर्ण लेखन हा जी. ए. यांच्या लिखाणाला विचारवंत वाचक किती तरी दृष्टिकोन येऊ शकतात हे लक्षात आले व पटलेही. आणि येवढे असुन वंश ही मूळ कथा अंगुली भर वर उरतेच. कथा लेखनाचा काळ पाहता करेव्वा चा जन्म हा "मूग गिळून तत्कालीन समाज मान्य" होता व करेव्वा च्या आईला कोणी अपरोक्ष दोष दिलेला नाही, नसावा, पण तीला समाज मान्यता ही प्राप्त झाली नाही. तिची मातृत्वाची आस असणे हे मानवी मनाचे द्योतक आहे, ते स्वाभाविक आहे, नैसर्गिक आहे. पण हे काही दैवी देणे नव्हते तर स्त्री पुरुष वासनेचे फळ होते. व्यक्तिगत पातळीवर आई समाधानी असेल कदाचित पण त्याची बोच तिलाही आयुष्यभर होतीच. करेव्वा नारळाचा उपाय, जो तीने चोरून ऐकला होता, तो करण्यासाठी पहार घेऊन निघते तिथेच तिची त्या ठिकाणी जाण्याची भिती अनाठायी नसल्याचे जाणवते. तिच्या मनाच्या एका कोपऱ्यात हा उपाय काही खुप धार्जिणे असेल असे तिला वाटत नाही. आणि शेवटच्या क्षणी हाच नराधम आपला बाप असला पाहीजे

हे मानसिक दृष्ट्या तिला उमगते त्यावेळेस तिला त्याची हत्या केल्याचेही काही पाप वाटत नाही. तिच्या मनाच्या कोपऱ्यात असले तीरपांगडे मातृत्व झिडकारून टाकावे वाटले हेच तीचे त्या क्षणी वंश न वाढविण्याचे निर्णय धोरण योग्य वाटते. यात त्या व्यक्तीच्या (करेव्वा) मनात काय घडले असेल हे सांगण्याचा हा प्रयत्न आहे. कथा लेखकाने कथेच्या ठिकाणी आपली उच्च स्तरीय पातळी लेखकाच्या वाहत्या, ओघवत्या लिखाणाने चांगलीच वर ठेवली आहे. त्यात कुठेच बीभत्सपणा येऊ दिला नाहीये. ही कथेचे थोडी उजवी बाजू.

दिलिप बडे: खर आहे.त्यांच चिंतन कालातीत आहे.त्याला चॅलेंज करण्याइतकी आपली योग्यता नाही.

श्रीकांत देशमुख : अगदी बरोबर 👍

अतिशय वेगळ्या कोनातुन केलेले मार्मिक भाष्य. 👍

अलका तडकलकर : जीए सरांची प्रत्येक कथा आपण जवळून पाहिलेली असूनही ती जणू विस्मृतीत गेलेली असते पण ती कथा वाचताना पुन्हा एकदा जागे होतो. वंश कथेवर उद्या लिहीते.

दिलिप बडे: करव्वाच्या वैवाहिक जिवनात आलेली निरसता ही (10वर्ष) वैवाहीक सुखाची, आनंदाची मर्यादा स्पष्ट करते.आणि तिने अनैतिक वंशप्राप्ती पेक्षा वांझ राहण्याचा घेतलेला निर्णय करव्वाची नैतिक ऊंची वाढवतो

Paramjit Singh: करेवा ह्या टीका पर्यंत का आली असे विचार का करत होती. जी ए.नी लिहळे आहे की ती घरी आली तेव्हां तो अंगणातल्या खटे वर एस पैस बसला होता. त्याचे सुटलेले अंग ढेऱ्याप्रमाणे दिसणारे पोट पाहून तिच्या मनात

किळस निर्माण झाली व ती पचकान थुकली.तिने भारा अंगणात टाकला.ह्याच्या मुळे आपले सारे आयुष्य भरड होऊन गेले. हे तिला एकदम अंगात सलकल्या प्रमाणे जाणवले. कश्या साठी ह्याच्याशी लग्न केले. इथे त्या बैरागाच्या घटनेशी संबंध असावा

अलका तडकलकर : खूप सुंदर विवेचन

करेव्वा सहनशील आहे. तसेच विचारशील. लहानपणी आपल्या हातून घडलेल्या चुकांबद्दल तिला जाणीव आहे.वाईट कर्माची फळे आपण भोगत असताना आपल्यामुळे आणखीन काही वाईट व्हावे हे तिला मान्य नाही. पण स्त्री सुलभ भावनेचे तीनतेरा झाल्याची मानसिकता घेऊन जगणेही तिला पाहिजे.

यतीन गुळवणी : आणखी एक प्रकर्षाने जाणवते की वाव असून देखील जीएंनी अश्लील वा असंविधानीक शब्द वापरला नाही. बिभत्सपणा बरोबरच अश्लीलता टाळण्याचे व्रत जीएंनी सर्वच कथांत पाळले.

# वस्त्र - - जी ए कुलकर्णी, - रक्तचंदन

विलास वाघोलीकर:

🙏 💐 💐 💐 💐 💐 💐 💐 💐 🙏

माननीय सुनीळजींच्या सूचनेप्रमाणे, वस्त्र कथेचे सूतोवाच देत आहे. ही कथा , रक्तचंदन पुस्तकात आहे. तरी वाचकांनी कथा मूळातून वाचावी/खालील विवेचन वाचावे. व कृपया आपला प्रतिसाद 2 / 3 परिच्छेदांमध्ये अवश्य द्यावा.

अगदी विशेष विचार असेल तर याआधीच्या कथेवर लिहावे. धन्यवाद. विलास वाघोलीकर.

🙏 💐 💐 💐 💐 💐 💐 💐 💐 💐 🙏

विलास वाघोलीकर:

वस्त्र कथा- लेखक - जी ए कुलकर्णी, पुस्तक - रक्तचंदन

विवेचक -व्ही एस वाघोलीकर

जीवनासाठी वस्त्राची प्रतिमा मुख्यत्वेकरून घेऊन, त्याला पोषक उपप्रतिमांचा वापर या कथेत केला आहे. मिस मेरी डिसोझा या प्रौढ कुमारिका नर्सचे जीवनवस्त्र कसे क्रमाने विरविरित झाले, हे या कथेत दाखवले आहे.

- मेरी डिसोझा दिसायला ओबडधोबड असते. पण ती कष्टाळू असते. ती आई वडिलांच्या माघारी लहान गावात भावाकडे रहात होती. भावाचे सुंदर मुलीशी लग्न झाल्यावर बायकोने भावाला मुठीत ठेवले व मेरीला कपड्यानिशी घराबाहेर काढले.

भावाच्या बायकोने तिचे कपडे गोळा करून रस्त्यावर फेकून दिले. (म्हणजे)तेव्हा अनवाणी पायांनी ती घराबाहेर पडली. पण भावाने थांब म्हणून सांगितले नाही.(धक्का क्र. I)

- मेरीचे फार शिक्षण झाले नव्हते. आयाचे काम करता येईल एवढे जुजबी नर्सिंग तिला माहित होते. नंतर ती शोधत शोधत या माळरानावरच्या कॉटेज होममध्ये आली. हेच तिने घर मानले. दिवसरात्र कष्ट केले. सराव करत नर्सिंगचे ज्ञान मिळवले. तिला सराईतपणे इंजेक्शन देता येई. बीपी मोजता येत असे. एक्स रे काढता येत असे. बायकांची बाळंतपणे करता येत असत. नर्सिंग होम चे व्यवस्थापनही करता येई.ते हॉस्पीटल (बहुतेक) अमेरिकन मिशनचे होते. मुख्य डॉक्टर अमेरिकेत शिकला होता. आता तीन इमारतीं एवढा पसारा झाला होता. आधीचे माळरान छोट्या हॉटेल्स नी गजबजले होते. जवळ रेल्वे स्टेशन होते. त्यामुळे भारतभरहून पेशंट येत.मेरी बायकांच्या वार्डची प्रमुख होती. पण तिलाही कँटीनमधून भाजी पोळी नेण्यासाठी परवानगी विचारावी लागे. तिच्यासाठी स्टाफ क्वार्टर्स मध्ये एक खोली होती. पण पगार तुटपुंजा होता. पंधरा वर्षांनंतरही तिच्याकडे जेमतेम तीनशे अकरा रुपये शिल्लक राहीले. तिने टॉमी कुत्र्याला पाळले होते. लोकरीच्या धाग्यांचे टाके घालत ती दिवसाचे वस्त्र विणत होती.

- हॉस्पीटलमध्ये या वॉर्डमध्ये डॉ अय्यर, डॉ. दामले, सायप्पा आया इत्यादी जेमतेम स्टाफ होता. मात्र बॉसगिरी करणारे ऑफिसर होते. अय्यरने ऑफिससाठी पेपरवेट आणले तर त्याचे पैसे त्यांनी पगारातून कमी केले. दरवाजा दुरुस्त करायला सुतार बोलवला तर त्याला हाकलून लावले. मेरीवर आळ घेवून तिच्याकडचे औषधांचे काम काढून घेतले.मेरी मात्र दिवस रात्र काम करत असे, सगळीकडे जातीने लक्ष ठेवत असे. मोकळा वेळ मिळाला की लोकरीचे स्कार्फ, मोजे, स्वेटर असे काही तरी विणकाम तिच्या हातात सतत चालत असे. जीएंनी त्या विणण्याचा व तिच्या जीवनवस्त्राचा संबंध गुंफला आहे.

- कथेमध्ये संध्याकाळ होते. तेव्हा मेरीच्या मनात बायकांच्या वॉर्डमधील दहा बायकांच्या आठवणी उभ्या राहतात. त्या आठवणींच्या अनुषंगाने वाचकांपुढे हॉस्पीटलचे चित्र उभे राहते. जीएंनी ते अशा यथातथ्यपणे केले आहे की जणू ते अनेक महिने स्वतः त्याच हॉस्पीटलमध्ये राहीले होते. जी एंच्या 'घर ' कथेतही असेच हॉस्पीटलचे यथातथ्य वर्णन आहे.

- अनेक पेशंट बायका मेरीला त्यांच्या कुटुंबांसह, स्वभावांसह आठवतात - पार्वती देशमुख, राधाबाई अष्टपुत्रे, अमीनबाई, शिवाणी चिकमठ, धोपेश्वरकर , मोहिनी दास, चंद्रमा हळबवी , गंगा पाटील, नीला देशपांडे व आगाऊ ,स्वभावाची आडदांड सावित्री सूर्यवंशी. त्यांच्या स्वभावातील खाचाखोचा तिला आठवतात. त्या सर्व कथेत मूळातून वाचल्या पाहिजेत. ती तेथील पेशंटसच्या सुखदुःखांत सहभागी होते. त्यांना धीर देते. त्यांना माया देते.यावरून मेरी हॉस्पीटलच्या कामकाजात, वातावरणात खूप गुंतली होती, हे कळते.

- पण नवीन आलेत्या मुख्याधिकाऱ्यांनी मेरीच्या जागी शांता पै नावाच्या शिकलेल्या नर्सची नेमणूक केली होती. व उद्या संध्याकाळी ती हजर होवून चार्ज घेणार होती. ही बातमी सगळीकडे पसरली होती. (धक्का नं. 2)

- काही आडदांड महिला अशा वेळी मेरीला योग्य वागणूक देण्याचे सौजन्य दाखवत नव्हत्या. उलट शांताबाई सूर्यवंशी कुत्सीतपणे मेरीची खिल्ली उडवत होत्या. तिला आता कसे हाकलले ,याची नक्कल करत होत्या व इतर त्यावर इतर पेशंटस् खिदळत होत्या.शांताबाई प्रत्येकाचे उणेदुणे काढून, नावे ठेवून स्वतः कुत्सित आनंद मिळवत असे. त्याप्रमाणेच ती मेरीशीही वागली. वाईट परिस्थितीत चोची टोचून दुसऱ्यास वेदना देणारी माणसे आजूबाजूला असतात. तुम्ही ते टाळू शकत नाही. इतक्या दिवसांत आपल्याला माणसे ओळखता आली नाही. त्यांच्यासाठी आपण रात्री जागलो याचे मेरीला खूप दुःख होते. (धक्का नं. 3)

- हे दुःख मेरीच्या जिव्हारी लागते. आता यापुढे तिला ' आया' म्हणून काम करण्याची मजबूरी येणार असते. त्यावेळी आपल्याला हिडिस फिडिस केले जाईल हे तिला स्पष्ट दिसते. असे अपमानास्पद भविष्य तिला दिसते. मग ती ठरवते की, आता (पंधरा वर्षांनंतर) भावाकडे जायचे. शिल्लक रुपयांवर काही दिवस काढायचे व दुसऱ्या हॉस्पीटल मध्ये नोकरी करायची. (धक्का नं 4)

- एका कष्टाळू स्त्रीच्या जीवनात किती वेगवेगळे अनुभव येतात, हे या जीवनचरित्रात्मक कथेत दाखवले आहे. माणसाच्या आर्थिक जीवनात अचानक चढ उतार येत असतात. ते जवळजवळ अनाकलनीय असतात. पण खुद् त्या माणसावर मात्र त्याचे मानासिक, सामाजिक, कौटुंबिक, व पर्यायाने शारिरीक परिणाम होतात. त्या माणसाचे आयुष्य उलटेपालटे होते. आर्थिक दमनकारी चक्रामध्ये एका माणसाला कोणी विचारत नाही. व्यवस्थेत तशी तरतुदही नसते. नंतर त्या माणसाला, काळ्या ,वादळी वातावरणात जगावे लागते.***

- रात्री वॉर्डमध्ये न जाता, मेरी हॉस्पीटलमधूनच खोलीवर जाण्याचे ठरवते. खूप उदास झाल्यामुळे कँटिनमधून खाण्याचे काही न घेता , ती खोलीवर येते. तर तेथेही खाण्याचे काही नसते, मग टॉमी कुत्र्याला खिडकीशी दोरीने बांधते. नंतर कोणाचाही निरोप न घेता, गावाकडे जाणारी रात्री एकची आगगाडी पकडण्यासाठी प्लॅटफार्मवर एकटीच येते.

(धक्का नं 5)

- तेथे तिला तिच्या गावाकडचा पिंटो योगायोगाने भेटतो. तो सांगतो की, तिच्या भावाचे हाल हाल झाले व त्याचे निधन झाले. म्हणजे आता गावाकडे जाण्यात मतलब नव्हता. (धक्का नं 6)

- अशा वेळीही माणूसकीचा अनुभव येत नाही. उलट पिंटोच्या रूपाने , एकट्या स्त्रीच्या परिस्थितीचा गैर फायदा घेणारा पुरुष दिसतो. जीएंनी येथे एका आर्थिक दृष्ट्या स्वतंत्र, एकट्या, स्त्रीला समाजात येणारे अनुभव दाखवून दुःखद अनुभवांचा एक प्रकार दाखवला आहे. अनेक पुरुष स्त्रीला स्वतंत्र इच्छाशक्ती आहे

हे लक्षात घेतच नाहीत तर ते स्त्रीला अगदी जैविक पातळीवर ओळखतात. हे एक स्त्रीचे भागधेय असते का हा प्रश्न पडतो. (इतके दिवस ती हॉस्पिटल मध्ये नर्स होती. क्वार्टर मध्ये रहात होती. टॉमी कुत्रा बरोबर होता. आता ती एकाकी प्लॅटफार्मवर होती.) मग पिंटोला हातातली सूटकेस जोराने मारून ती सुटका करून घेते व खोलीत परत येते. (धक्का नं. 5)

** नात्याच्या माणसांपासून मेरी दुरावते. माया केलेल्या, जोडलेल्या माणसांपासूनही तुटते. सर्वांना माया देणाऱ्या मेरीला कृतघ्न जग समजून घेत नाही. व तिचे जग रीते राहते. तिचे जीवनवस्त्र विरते.... तिला वाटले, आपले आयुष्य या मऊपणाच्या वस्त्राने झाकले गेले आहे. मात्र आता ते टाकून दिले पाहिजे. पुन्हा एकदा वस्त्रहीन जन्म घेवून नवी वाट शोधली पाहिजे... नव्या जन्मासाठी प्रत्यक्ष मरायलाच हवे असे इथे कोठे आहे? हयात असतानाच आपण अनेकदा मरतो, जन्म घेतो. घरातून बाहेर पडण्यावेळी भाऊ खाली मान घालून बसला. त्यावेळी काहीतरी मेले.नवे जन्मले... सारेच लहानमोठे मृत्यू, लहानमोठे जन्म...आणि खरे मरण म्हणजेच या चक्रातून मुक्ती असते. आता टॉमीला टाकलेच पाहिजे हेच खरे... एवढे काही हळवे व्हायला नको. माणसे काय, कुत्री काय, कुणा वाचून मरत नाही. भावाचा आधार तुटला म्हणून मेरी , तू मेली नाही. तू गेलीस म्हणून ते उपशी मरणार नाही....

कथेत वस्त्र प्रतिमा प्रकर्षाने वापरली आहे. तसेच त्याला पोषक अशा इतर प्रतिमा वापरल्या आहेत. याची काही उदाहरणे देता येतील....मेरी सतत कष्ट, कामे करून जीवनवस्त्र विणण्याचा प्रयत्न करत होती. पण तिच्या वस्त्राला कसर लागते. मेरी मोकळ्या वेळी सतत लोकरीचे काम करत होती..... स्कार्फ, पायमोजे, स्वेटर असे काहीतरी टाक्या टाक्याने जन्माला येत असे...आता तिला प्रश्न पडला की कोणते नवीन आकृतीचे दुसरे वस्त्र सुरू करायचे.. सारे पिंजून, कातून त्याचे वस्त्र केले व निवाऱ्यासाठी अंगावर घेतले. आता तेच टाकून द्यायची वेळ आली... पुन्हा वस्त्र नाही असा जन्म घेवून नवीन वाट शोधली पाहीजे असे तिला वाटले. भावाला सोडून, गाव सोडून आपल्याला कपड्यानिशी निघायला लागले. आताही टॉमीला सोडून

,पसारा आवरून जावे लागणार... जन्मभर असे लहानमोठे जन्म, लहानमोठे मृत्यू येत असतात. व खरे मरण म्हणजे या चक्रातून मुक्ती असते.*

- सकाळ होते. उजाडते. डॉ दामले येतो व काहीबाही बोलतो. परत तिला त्याच्याकडून एका एकट्या स्त्रीसाठी पुरुषी आक्रमणाला अनुभव येतो. येथे ही एकाकी कथा संपते.

🙏 💐 💐 💐 💐 💐 💐 💐 💐 💐 💐 💐 💐 💐 🙏

धन्यवाद. - विलास वाघोलीकर

वस्त्र ('रक्तचंदन' , १९६५, २१ पानी), जीवनदर्शन कथा

विवेचन - डॉ माधव पुराणिक

'वस्त्र' - ' धागेदोरे' ते 'वस्त्र' अस्तित्वाचा आकर्षक प्रवास

स्त्रीच्या दु:खमय, परावलंबी जगण्याला 'वस्त्रा'ची अटळ मिठी

१) कथेची सुरवात,स्वरूप,शेवट,मुख्य पात्रे

अ) मुख्य पात्रे

१ मिस डिसूझा- दिसायला साधारण, अनाकर्षक, अविवाहित, अशिक्षित, भावाच्या बायकोने हाकलून दिल्यामुळे , घराबाहेर पडून दूर गावात हॉस्पिटलमध्ये काबाडकष्ट करणारी उपेक्षित वंचित एकाकी आया/ नर्स, उपाशी व आश्रयाला आलेल्या कुत्र्याच्या पिलावर जीव लावणारी 'हा टॉमी त्या रात्री पावसात भिजून पायरीवर आला त्यावेळी त्याची काही अपेक्षा नव्हती'

२ दामले - बायको हॉस्पिटलमध्ये स्वर्गवासी झाल्यावर तेथेच कमी कौशल्याची शुश्रुषेची कामे करणारा, मिस डिसूझाला मदत करणारा पण शेवटी अनीतिमान होणारा, अपयशी, सामान्य माणूस, स्वतः बद्दल भ्रमात राहणारा

३ अय्यर डॉक्टर- आपल्या शिक्षणासाठी पैसे देणाऱ्या माणसाच्या मुलीशी लग्न करणारा आई अर्धांगवा म्हातारी आई त्याच हॉस्पिटलमध्ये अर्धांगाने अंथरुणाला घेऊन होती वैवाहिक नातेसंबंध कमालीचे अपयशी -

लग्नानंतर काहीच दिवसांनी अय्यर डॉक्टर व त्याची बायको यांच्या झोपायच्या खोल्या वेगळ्या होत्या व ती आपल्या खोलीला आतून कडी घालत असे आया सांगत असे. हे वैराण जीवन पाहून डॉक्टरची बायको मोठमोठ्याने रडत बसली व तिने संतापाने कपबशी फोडून टाकल्या. ती आता बाहेर क्वचितच दिसे.'

४ पिंटो- मिस डिसूझाच्या गावचा, तिच्या भावाच्या वयाचा, रेल्वे स्टेशनवर काम करणारा चंचल व अनितीमान

५ हॉस्पिटलच्या वार्डमधील अनेक जिवंत व अनेक जिवंत नसलेले पेशंट यांच्या आठवणी

आ) कथेची सुरवात

सुरवातीला जी एं नी हॉस्पिटलचे अत्यंत रेखीव व समर्पक परिसर चित्र रेखाटले आहे त्यामुळे कथेच्या परिसर डोळ्यापुढे साकार होतो.

इ) कथेचा शेवट

कथेचा शेवट अत्यंत नाट्यमय व कलात्मक केला आहे.

समाजात एकटे राहणाऱ्या ,अविवाहित ,गरीब, घरचा आधार नसणाऱ्या, दिसायला साधारण अशा स्त्रियांना समाजातले अनितीमान संधीसाधू पुरुष संधी मिळेल तेव्हा कशी बळजबरी करायचा प्रयत्न करतात याचे वर्णन केले आहे. असे पुरुष स्त्रियांच्या संकटाच्या वेळेला त्यांना मदत करण्याचा बहाणा किती सफाईने

करतात हे दाखविले आहे. अत्यंत संयमाने कमीत कमी शब्दात स्त्री-पुरुषांमधल्या या दुर्दैवी व विदारक घटनेचा तपशील जी एं यांनी उभा केला आहे.

ई) कथेचे स्वरूप

या कथेत प्रामुख्याने कथेची नायिका मिस डिसूझा हिच्या दु:खमय जगण्याच्या विविध छटा करूणेच्या स्पर्शाने चितारलेल्या आहेत. पण एकंदरीत संपूर्ण स्त्रियांचेच वेदनामय आयुष्य जी एं नी सर्व वाचकांसमोर सूर्यप्रकाशाइतके उभे केले आहे. ते आपण जी एं च्याच शब्दांत पाहू

१) मिस डिसूझा -

अ)'भावाच्या बायकोशी (देखणी ;तसे रूप आपणाला हवे होते.) केलेल्या ईर्ष्येचे मिस डिसूझाला सार्थक वाटे,'(पान १०८) ' नव्या सीएमओने अविश्वासाने अशिक्षीत,ठेंगण्या, गोऱ्या, पण ओठावर लव असलेल्या ओबडधोबड मिस डिसोझाकडे पाहिले.' (नायिकेला नियतीने अनाकर्षक रूप दिले होते. समाजातील परंपरेनुसार साधारण रूपाच्या स्त्रियांच्या वाट्याला येणारे दु:ख ती भोगत होती.

आ) ' तशी ती एकटीच होती. एकदा भावाच्या बायकोने तिचे कपडे गोळा करून रस्त्यावर फेकून दिले.तेव्हा जी ती बाहेर पडली तेव्हापासून पंधरा वर्षे तिने त्या घराकडे पाठवली होती.'(लग्नानंतर भावाच्या गोऱ्या बायकोचा घरावर हक्क. नवरा वैवाहिक सुखाचे लाचार. ही तिची नियती.)

इ) ' आता हा वार्ड ,तिथे काम करणारे बॉय, येथे कुडत शिजत राहिलेल्या दोन पौंड वजन वाढताच हर्षधुंद होणाऱ्या बायका हाच तिचा गोतावळा होऊन राहिला होता.' (परकी, अनोळखी, कामाच्या ठिकाणची माणसे हेच तिची नाती होती.मग येणारा एकटेपण, तुटलेपण हे ही आलेच्)(पान १०९)

(ही सर्व तिची सर्रास चेष्टा करीत.)

इ) ' तिला वाटले अय्यर डॉक्टरही आपल्यासारखेच टाकून दिलेले आहेत.' (उपेक्षेचे, वंचनेची भावना)

ई) ' बरे झालेल्या रुग्णांकडून तिला कधीही पत्रे आली नाहीत.'

(व्यावहारिक स्वार्थी संबंध)

उ) ' तिला स्वतःला तसला काही अनुभव नव्हता. तिच्याकडे कधी कोणी ढुंकून पाहिले नव्हते. तिच्या चेहऱ्यावरील लव दोन हातावरून दिसे. अंग निबर होत चालले होते. त्याला आता फारसा आकार उरला नव्हता.'(किमान शारिरीक सुखाला ही वंचित झालेली)

ऊ) ' मिस डिसूझा दररोज यावेळी तेथे थांबत असे व वाढत्याच्या कल पाहून मधल्या मध्ये दोन-चार चपात्या कागदात गुंडाळून घेत असे हे नियमाविरुद्ध होते पण आज मात्र तिला एकदम शरम वाटली.' (गरिबीमुळे, एकटेपणा मुळे उचलेगिरी ची सवय)

ओ) 'गेली बारा पंधरा वर्षे अशी वांझोटी निघून गेली इतक्या दिवसात एका माणसाची पारख झाली नाही'(स्वतः घ्या सुमार बुध्दीबद्दल खेद) ' माणसे तर कोणी जवळ झाली नव्हतीस पण भोवती वस्तू ही फारशा जमल्या नव्हत्या'(अठरा विश्व दारिद्र्य)' एका ब्रेडच्या तुकड्यामध्ये टॉमी व ती जेवण करतात.'

अं) ' हयात असतानाच आपण अनेकदा मरतो जन्म घेत असतो. भाऊ शरमून खाली मान घालून बसला. यावेळी काहीतरी मेले, नवे जन्मले. आईचा आरसा फुटला, महिने राबून केलेली बाग उन्हात जळून गेली, चोरून विकली म्हणून आळ आला, उशीला लाथ बसली ,शांता पै आली, सारेच लहान मोठे मृत्यू लहान मोठे जन्म आणि खरे मरण म्हणजे या चक्रातून मुक्ती असते. आता टॉमी ला टाकलेच पाहिजे हेच खरे'(विषण, व्यथित करणारे ,विदारक, उद्ध्वस्त करणारे नियतीच्या अनाकलनीय शक्तीने दिलेले हादरे.)

अ:) टॉमी हाच तिला या जगात एकमेव मित्र नातेवाईक जिवलग उरला (माणसाची / तिची शोकांतिका)

क) ' अय्यर डॉक्टर खुर्चीत बसलेले दिसत होते. त्यांच्या हातात लांब लखलखीत सुरी होती व ते तिच्याकडे पाहत ती फिरवत असतात तिची धार चमकत होती. जणू होती तिच्याच गळ्या वरून फिरल्याप्रमाणे मिस डिसोझा चरकली.' (वरिष्ठांचे कायम अतोनात भय, धाक)

ख) ' भाऊ वारला आणि मला कोणीच कळलं नाही ? मिस डिसो झाने चिंबलेल्या आवाजात विचारले (कायमचे तुटलेले भावनिक आधार)

ग) 'मनात घृणा असतानाही अंग तापल्यासारखे झाले.' ( अनुभवातील कटू वास्तव)

' दामलेच्या ओठावर तोच तो हावरा परिचित ओलसरपणा होता' (स्नेहामागचे छुपे, वासनामय ,फसवे, पाशवी हेतू)

२ रूग्ण पार्वती देशमुख - शेवटच्या रात्रीही तिला भेटायला न आलेला तिचा नवरा (दु:खद अंत)

३ रूग्ण राधाबाई अष्टपुत्रे -'ऑपरेशन असले तरी घरी कळवले तेव्हा नवऱ्याकडून बोटभर चिठ्ठी आली नाही'

४ रूग्ण मोहिनी दास - ' नवऱ्याकडून गेल्या वर्षात दोन ओळीचे पत्र नव्हते.'(आजारामुळे विरत गेलेले नातेसंबंध)

५ रुग्ण चंद्रमा हळभावी - ' तिचा नवरा मळकट कोट टोपी घालून तेलकट चेहऱ्याने येत असेल मदर खेतीला हात मागाचे एक जाडे भरडे लुगडे आणि पण त्याचा एक पाय वाळल्या पडवळासारखा होता' त्याची सर्व बायका चेष्टा करत.

६ वार्डातील आया- गरिबीमुळे मृत रूग्णांचे कपडे पळविणाऱ्या

७अय्यर डॉक्टरची बायको- लग्नानंतरची ऐषारामाची कल्पना प्रत्यक्षात न आल्याने वैवाहिक सुखाला पारखी झालेली व डॉक्टरांना दु:खी करणा री

२) कथेचे बीजात्मक प्रमेय

मानवी जीवन विशेषतः स्त्रियांचे जीवन सामाजिक व कौटुंबिक नातेसंबंधात अतिशय एकाकी,दु:खमय असते. परंपरागत रूढींमुळे ,पुरुषप्रधान मानसिकतेमुळे स्त्रियांचे जगणे अन्न,वस्त्र, निवारा या गरजा पूर्ण करताना भय, चिंता, हतबलता, केविलवाणेपणा, निराधार स्थिती यातच जाते.

त्यांना होणे (Being) पासून स्वतः ला घडविणे (Becoming) अवघड जाते व जगणे एक कंटाळवाणी, परावलंबी, तुटलेली,निराशेची न संपणारी अंधारी रात्र होते.

३) कथेतील मध्यवर्ती प्रतिमा- ' वस्त्र'

'वस्त्र' ही मध्यवर्ती प्रतिमा 'वस्त्र' हा शब्द वापरून आली असली तरी ती अस्तित्वाची जीवनाकडे झुकणारी कोणत्याही ठिकाणची (स्थळ), कोणत्याही वेळेची (काळ) ओढ दाखविते. अन्नाच्या (शेतीच्या) शोधानंतर वस्त्रापासूनच मानवी संस्कृती,समाज व नातेसंबंध सुरु झाले. आदिम वासनांवर नियंत्रण राहावे, थंडीवाऱ्यापासून संरक्षण अशी सुरुवात करत आतापर्यंत 'वस्त्राशी' निगडित सर्व भावना (सुख,दु:ख,भय, अतृप्ती, चिंता इ. सहजप्रेरणा) अत्यंत सूचकतेने जी एं नी दाखविल्या आहेतच पण 'धागेदोरे ते पांढरी चादर' (पिन टू पियानो, बिंदू ते शून्य) यातल्या सर्व अवस्था नाट्यमयतेने चित्रीत करुन वस्त्र हे अस्तित्वाचे (Being, असणे ,धागादोरा) व ते घडत व घडवत जाणाऱ्या जीवनाचं ओढे (Becoming,होणे, रेशमी झगा, स्कार्फ इ.) प्रतीक आहे. त्यामुळे वस्त्र या संकल्पनेत 'धागेदौरै ते वस्त्र' यातल्या सर्व प्रतिमा एका विस्तारणाऱ्या अटळ क्रमाने जी एं नी

कथेत ओल्या आहेत. त्या स्वतंत्र ही आहेत व इतर प्रतिमांची जोडल्या ही गेल्या आहेत.

१ कंटाळवाणा वेळ घालविण्यासाठी ती लोकरीचे विणकाम करी. स्कार्फ, पायमोजे ,स्वेटर काही ना काही टाक्याटाक्याने जन्माला येत असे. एखादे वस्त्र विणून झाले की मात्र त्याचा उपयोग काय ,ते कोणाला द्यायचे हा तिच्या पुढे प्रश्न पडे. (जणू स्वेटर इ. म्हणजे माणसाचा जन्मच.मग तो स्वेटर कोणाला द्यायचा? जन्म कोणाकरिता ? कशासाठी?)

२ एकदा भावाच्या बायकोने तिचे कपडे गोळा करून रस्त्यावर फेकून दिले तेव्हा ती बाहेर पडली तेव्हापासून...(तिचे कपडे म्हणजे तिचे अस्तित्वच. भावाच्या बायकोने आपल्या मानसिक जगातून काढून टाकले)

३ आता इतक्या वर्षानंतर येथे हाडे हलवून आयुष्याचे वस्त्र विणले ते टाकून दुसऱ्या विणीचे ,नव्या आकृतीचे दुसरे वस्त्र पुन्हा सुरू करायचे कुठे आणि कसे? (ही प्रतिमा अप्रतिम आहे. (हाडे हलवून म्हणजे कपडे जावून ,स्व:तिचे जीवन घडविणे. हे जीवनाचे वस्त्र काळाच्या धाग्यांनी विणले की पुन्हा उस्ताद येत नाही.)

४ पण त्यावेळी पाठ ताठ होती आणि अंगावरील मांस लोखंडाचे होते आता ते सारे पिंजून कातून त्याचे वस्त्र केले व निवाऱ्यासाठी अंगावर घेतले आता ते टाकून जायचे ते कुठे? ( सगळयांशी जुळवून, स्वतः:घ्या इच्छा मारून म्हातारपणासाठी घरटे बांधले तेतो काळ , शक्ती, सामर्थ्य पुन्हा मिळत नाही. कारण जीवन सतत परिवर्तनशील असते व मृत्यू कडे नेत असते)

५ (पान ११०) चार वर्षांपूर्वी त्यांनी लग्न केले ते त्यांना शिक्षणासाठी पैसा देणाऱ्या माणसाच्या मुलीशी. रेशमी वस्त्रे नेसणारी एक कुर्रेबाज बाई त्या घरात आली. (विवाहसंस्थेतील सौदेबाजी. व्यावहारिक फायद्यासाठी जोडीदाराच्या

(शारीरिक, मानसिक, लैगिक) अनुरुपतेची सोडचिठ्ठी) (वस्त्र रेशमी, सुळसुळीत , सळसळणाऱ्या पदराचे असले तरी वैवाहिक सुखाला टोचणारे निघाले)

६ (पान११०) वार्डातल्या बायकांच्या आयुष्याशीच तिचे धागेदोरे जमून गेले होते. (एका जीवनाला दुसऱ्या जीवनाशी जोडणारे अमूर्त, अदृश्य भावनिक धागेदोरे.येथे जी एं नी दोन व्यक्तींमधील आदिम ओढीची संकल्पना अतिशय तरल पध्दतीने साक्षात केली आहे)

७ (पान १११)तोपर्यंत पार्वती दूर शेतामधील त्या खोपटातील टेबलावर गेली होती व तिच्यावर पांढरी सादर पूर्णपणे झाकली होती. काहीजणींच्या अंगावर मिस डिसूझाने पराभूत होऊन हताश मनाने पांढरी चादर घातली. (पांढरी चादर हे वस्त्रांचे अखेरचे/ मृत्यू चे रूप. त्या चादरीसमोर - मृत्यू समोर प्रत्येक जण - मिस डिसूजा / धोपेश्वर बाई ही पराभूत झाली.)

८ (पान ११३)डोळे तसेच हताश, निर्जीव ठेवून धोपेश्वर बाई संपली होती. मग वार्डबॉय व आयाने बॅटरीच्या प्रकाशात नवीन पैकी चार परकर ,तिची पातळे पळविली. मग मिस डिसूझाने तिच्या सामानाचे एक गाठोडे केले व चिरडून गेल्या

प्रमाणे झालेल्या नवऱ्याने ते तेथेच कुणाला तरी देऊन टाकले. (येथे वस्त्राचे सार्वकालिक, सर्व परिस्थितीत अब्रूरक्षण इ. करता महत्त्व, गरिबी नुकत्याच मृत्यू पावलेल्या बाईची वस्त्रे पळवायला प्रवृत्त करते. मृत्यू समयी पण उरलेले सामान वस्त्यांत / गाठोड्यात बांधतात)

९ (पान ११४) फक्त मानेवरील केस किंचित उंच केले तर मान मात्र गोरीपान स्वच्छ दिसे. दुकानात हस्तीदंती साटीन कापडाची गुंडाळी असावी तशी आणि ती मान गोल ,आकर्षक आहे हे तिला सांगितले होते तेही गिरीजा तेंडुलकर या शिकाऊ नर्सने. (तिची एकमेव सुंदरता)

१० (पान ११४)तिचा (रुग्ण स्त्रीचा) नवरा दर खेपेला ला हातमागाचे एक जाडेभरडे लुगडे आणी.

११(पान ११६) सावित्रीने आपला झोपायचा झगा घालून आत उशी ठेवत स्वतःला एखाद्या पिंपासारखे गोल केले होते. तिने एका हातात लोकरीचा गुंडा व सुया घेतल्या होत्या. ते सोंग मिस डिसुझाचेच होते.(तिचा अपेक्षाभंग करणारा रुग्णांचा प्रतिसाद)

१२ (पान ११७) पण आज त्याने कधी नाही ते तिने दिलेला स्कार्फ वापरला होता हे तिच्या ध्यानात आले होते. दामले काही बोलला नाही त्याने स्कार्फ उगाचच सावरला. (दामले डॉक्टर मिस डिसुझावर अनीतिमान प्रभाव टाकण्यासाठी असे करतो)

१३ (पान ११७)वार्ड मधील त्या बायांसाठी हाडांच्या काड्या केल्या पण तेथे त्यांनी उशीला लाथ मारून हाकलले.(स्वार्थापोटी, कृतज्ञतेवर मात)

१४ (पान ११७ )स्वतः चिंध्या झालेला दामले डॉक्टर आपल्याला काय मदत करणार?(वस्त्राच्या चिंध्या किंवा नाश म्हणजेच दामले डॉक्टरच्याही सामर्थ्याचा विनाश)

१४ (पान १२०) तिला अद्याप टॉमीच्या केसांचा मऊ स्पर्श जाणवत होता.त्याचा वास ताजा होता. तिला वाटले आता आपले आयुष्यच या केसांच्या वासाच्या मऊपणाच्या वस्त्राने झाकले आहे पण आता मात्र ते टाकून द्यायला हवे आणि पुन्हा एकदा वस्त्रहीन जन्म घेऊन नवी वाट शोधली पाहिजे.(अतिशय हृद्य, काळीज पिळवटून टाकणारी प्रतिमा)

१५(पान १२०) तिने कपडे वाळत घालायची दोरी सोडली व ती टॉमीच्या गळ्यात बांधून तिचे दुसरे टोक खिडकीला बांधून टाकले.(दोरीचे / वस्त्रांचे परतंत्र करणारे बंधन)

१६ ,(पान १२२) काळ्या लोकरीच्या सूट मधल्या माणसाकडे तिने निरखून पाहिले मग तिला आठवले.

१७ (पान १२५) भिंती बाहेर जवळच एकदम अंधाराच्या चिंध्या झाल्यासारख्या झाल्या (बळजबरीच्या वेगाने, जोराने अंधाराच्या चिंध्या झाल्या)

१८(पान१२५) तिच्या झग्याची वरची दोन बटणे तुटली होती व गळ्यातील पांढऱ्या मण्यांची माळ ही नाहीशी झाली होती

१९ (पान१०६ )एखाद्या कसर लागलेल्या वस्त्रावर वेड्यावाकड्या आकृती दिसाव्यात त्याप्रमाणे त्या माळरानावर हॉस्पिटलच्या इमारती दिसत. (सुंदर उपमा - निसर्गाच्या - मआळरआनआच्यआ सुंदर वस्त्राला जणू कुरूप इमारतींची सौंदर्य पोखरणारी वाळवी लागली होती.)

२० (पान १२५) जणू त्या आधाराची वाट पाहत असल्याप्रमाणे तिने सूटकेस उचलली व रागाने पिंटोच्या चेहऱ्यावर आढळली. त्याच्या नाकातून रक्त आले व त्याच्या मळकट खाकी शर्टावर पडू लागले.(सूटकेस म्हणजे त्यातील तिचे कपडेच वेळप्रसंगी तिचे लज्जारक्षण करतात. पइंटओचआ मळकट शर्ट त्याची मलिन, कुटिल वृत्ती दाखवतो.)

२१ (पान १२४) त्यादिवशी अंगावर रेशमी झगाही असेल कदाचित हात रुमालावर आपण थोडे अत्तरही टाकले असेल. मनात कुठेही त्या दिवशी घरदार ,भाऊ ,आई यांची पुसटही आठवण नसेल. (येथे जी एं नी नियतीची सर्वंकष शक्ती जवळचे नातेसंबंध कसे विस्कटून टाकते हे उत्तम दाखविले आहे.)

२२ (पान ११९) हे कुत्रे कोणाचे कोणास ठाऊक ; पण एका रात्री चिंधीसारखे भिजून पायरीवर ओरडू लागले. ते नेमके याच पायरीवर का बरे आले ? (चिंधीची उपमा अप्रतिम आहे.चिंधी अंतर्बाह्य पूर्ण भिजते.तसे कुत्रेहि बाहेरून भिजले होतेच पण आश्रयाला आल्याने आणूनही हेलावले होते.)

२३ (पान १०८) तिने मिस डिसुझाने पायमोजांच्या दोन जोड्या सातव्वाला दिल्या होत्या. एक स्वेटर तिने अय्यर डॉक्टरला दिला होता पण लगेच अर्ध्या तासात त्यांची दुर्गाई सारखी दिसणारी बायको वस्कन अंगावर आली होती व चुरगाळलेले स्वेटर तिने सगळ्यांसमोर मिस डिसोझाच्या तोंडावर फेकले होते.दामले डॉक्टरने मात्र तिने दिलेला स्कार्फ घेतला होता. त्याच्या विणीची खूप स्तुती केली होती. पण तो वापरताना मात्र फारसा दिसत नसे.

पण आज प्रयत्न करूनही तिचे विणकामात लक्ष लागेना. शांता पै मुळे टाके चुकले. दोनदा लोकर तुटली. व आता लोकरीचा गुंडा खिशात ठेवून ती हताशपणे उभी होती.

(या वर्णनात जी एं नी सामाजिक नातेसंबंधातील परावलंबीपणा व लग्नसंस्थेतील अदृश्य बंधने कलात्मकरीत्या दाखविली आहेत. मिस डिसूझाने व्यक्त केलेली स्नेहाची भावना सातव्वा स्वीकारते, अय्यर डॉक्टर कजाग बायकोमुळे स्वीकारू शकत नाही. दामले डॉक्टर वरकरणी स्वीकारतो.

शेवटी हाच दामले डॉक्टर मनात अनैतिकता निर्माण झाल्यावर हा स्कार्फ मुद्दाम वापरतो. 'मिस डिसुझाने विणलेला स्वेटर मोहिनीच्या मुलाकरता विणलेला स्वेटर त्याच्या डोक्यावरून उतरलाही नसता', टाके चुकले इ.वर्णनात जी एं नी तिच्या मनातील अपयशाची भावना, काळजी, अस्वस्थता या अमूर्त संकल्पना साकार केल्या आहेत.)

२४ (पान १०६) अय्यर डॉक्टर स्वतःच एक रोगी असल्याप्रमाणे आराम खुर्चीत शून्यपणे पडून राहत. व्हरांड्यात पिवळा दिवा लागला की एका दिवसाला गाठ बसली. (येथे दोन वस्त्रांची गाठ दिवसाला (काळाला) बसली आहे. गाठ हे बंधनाचे, जगणे कुंठित झाल्याचे दाखविते - अनिवार्य कंटाळा दाखविते)

२५ (पान ११२) धोपेश्वरबाईला अंगावर पातळ नेसता येत नव्हते आणि हाड कातडे राहिलेले अंगावर तिला ओझेही सहन होत नसे.(मृत्यूकडे जाताना शरीराला वस्त्रांचे ही ओझे होते.)

२६ (पान १२०) तिने कपडे वाळत घालायची दोरी सोडली व ती टॉमीच्या गळयात बांधून तिचे दुसरे टोक खिडकीला बांधून टाकले. (दोरीचे/ वस्त्रांचे बंधन प्राण्यांना / माणसांना)

४) कथेतील प्रतिमा सृष्टी

अ) निसर्ग प्रतिमा

१ (पान १०६) देवदारी फळयांच्या खोक्यासारख्या दिसणाऱ्या टांग्यांना कमाई होई.

२ (पान १०६)त्या ठिकाणी काहीच खायला मिळत नसल्याने बोटभर अशक्त गर्भासारखी दिसणारी केळी देखील खपत.(कथेतला स्थळ - हॉस्पिटलमधला मॅटरनिटी वॉर्ड, त्याला सजेशी उपमा)

३ (पान १०६) आपले युनिफॉर्म कातड्यासारखे मळकट करून टाकणारे वॉर्डबॉय तोंड वेंगाडत सगळयांपुढे नियमांविरुद्ध हात पसरत.

४ (पान १०७) पण थोड्या वेळाने कोल्ह्यांचे ओरडणे सुरू होत असे. इमारतीवर बसून घड्ल ओरडणाऱ्या घुबडांचे घूत्कार तर ते इतके परिचित झाले होते की ते कुणाच्या ध्यानातही येत नसत.येथील आजूबाजूची कुत्री वचावचा ओरडत. दर रात्री तीनदा हॉस्पिटल जवळील रुळाने जाणाऱ्या आगगाडीची शीळ लाल तारेप्रमाणे त्या वचवचीतून ओवल्यासारखी लांब सरकून संपे आणि क्षणभर वार्डातील झोप चाळवे.(तेथील आजारी माणसांना पडणाऱ्या स्वप्नातील कोलाहलाचे,गोंगाटाचे, झोपेतल्या शांततेत भयानक वाटणाऱ्या अज्ञात आवाजाचे

वर्णन.मग शेवटी मन एखादी सुसंगत ,दाहक,आठवण करते व त्या आवाजाला छेद देऊन जाग येते.

प्राण्यांच्या , पक्ष्यांच्या व आगगाडी घ्या अंधारातल्या ध्वनींच्या नादमय ध्वनी चित्रमय प्रतिमा)

५ (पान १०७) व्हरांडा फिकट, पिवळसर क्षयी प्रकाशाने ओलसर दिसत होता. (हॉस्पिटल मधील रुग्णांच्या मनस्थितीचे वर्णन- क्षयाने आजारी रुग्ण येथील प्रकाशही त्यांच्या शारीरिक आणि मानसिक स्थिती सारखा कमी होत चाललेला, संपत चाललेला)

६ (पान १०७) पण आज मात्र ती चिंता तिची तिलाच भेडसावू लागली होती व ती खांबाला खिळून टाकल्याप्रमाणे उभी होती. (अमूर्त चिंतेची भावना कलात्मकतेने मूर्त झाली आहे. जणू क्रूसाला खिळे ठोकून येशू ख्रिस्तच उभा आहे. चिंता आक्रमक झाली होती व तिला बांधून टाकत होती.)

७ समोर बाग होती तिच्या विहिरीतील पंप वेदनेने ठसठसत असल्याप्रमाणे आताही चालू होता. (अमूर्त वेदनेला मूर्त केले आहे. एकसुरी, संथ,सतत, नको वाटणारी संवेदना.नियतीचा पंप,अस्तित्वाच्या तळातून दु:ख सातत्याने उपसून ओठांवर हुंदके व डोळयात पाण्याच्या रूपाने व्यक्त करीत होता.)

८(पान १०८) कित्येकदा तर आडरात्री ती दचकून जागी होत असे व कोल्हेकुईच्या अंधारात ती एखाद्या नवख्या बाईकडे जाऊन धीर देत असे. (बाहेरचा अंधाराच कोल्हेकुई सारखा भयानक होतो व आडरात्री झोपेतल्या अंधारात मिसळून जागे करतो)

९ (पान १०८)डोक्यावर ताठ, पांढऱ्या कापडांच्या फण्या घेणाऱ्या, दंडावर घड्याळ बांधणाऱ्या , शिकल्यासवरलेल्या नर्स आल्या. (येथे पांढऱ्या कापडांच्या

फण्या ही प्रतिमा अप्रतिम आहे. या नविन नर्स म्हणजे मिस डिसूझा करिता तिची उपजीविका, नोकरी घालविणाऱ्या मृत्यू सूचक फणा उभारून आलेल्या नागिणीच)

१० (पान १११) ऑपरेशनच्या दिवशी आले ते अगदी थकून विरून गेलेले तिचे आईबाप. राधाबाईचे आईबाप एका खोलीत दोन प्राचीन गिधाडांप्रमाणे राहिले. (आईबाप वयाने व राधाबाई घ्या चिंतेने प्राचीन, भूतकाळातले वाटत होते. त्यांना भविष्यच नव्हते)

११ (पान ११४) पण त्याचा एक पाय वाळल्या पडवळ्यासारखा होता. (परिसरातील वनस्पतीशी नाते जोडणारी चपखल उपमा)

१२ (पान १२३)पिंटो किंचित स्थूल झाला होता व त्याचा चेहरा फळावरील पातळ सालीप्रमाणे तुकतुकीत, थोडा सुरकुतलेला होता. (निसर्गातली समर्पक उपमा)

आ) भावनिक प्रतिमा

१३(पान ११८)आता मात्र कोणालाच त्याचे काही नाही.आधाराला घेतलेली काठी टाकून द्यावी ,तसे आपण फेकलो गेलो उशीला लाथ मारून! (डोक्याखाली घ्यायच्या मऊ चवीचा चेष्टेखोर उपयोग करून मिस डिसुझाची इतर स्त्रियांनी केलेली निर्घृण थट्टा)

१४ (पान ११८) एका दृष्टीने वार्डाशी असलेले धागेदोरे असे एका हिसक्यासरशी तुटून गेले हे बरेच झाले म्हणायचे. आपुलकीचा एक शब्द उच्चारला असता तर कदाचित आपले मन विरघळून गेले असते व आपण असेच भाबडेपणाने दिवसाला दिवसाचा टाका घालत राहिलो असतो. (सुंदर उपमा, जीवनाचा काळ अर्थहीन , गोष्टीत वाया घालवला असता)

१५ (पान ११९) आत आईचा फोटो होता, दोन रेशमी झगे होते. तिने कोणती दोरीवरील आपले कपडे भराभर आत भरले खाटेवरील गादी गुंडाळून कोपऱ्यात

उभी केली. (वात्सल्य व शृंगाराचा व्यवहारातील रूप - दोरीवरिल वाळलेले कपडे व खाटेवरची एकटीने झोपायची गादी)

१६ (पान १२५)पिंटोने सिगार तशीच कोपऱ्यात टाकून दिली ती जर त्या रेषेत कोपऱ्यात जाऊन पडली व तेथे धगधगीत डोळ्याप्रमाणे दिसू लागली हळूहळू तिच्यावर राग जमली व डोळा मिटल्याप्रमाणे झाला. (पिंटोच्या मनातल्या अमूर्त पाशवी अंगारमय वासनेचे मूर्त रूप)

१७ (पान १०९) तिच्या मनात हजारो प्रश्नांचे कोंब उगवले.(नियतीच्या निर्णायक क्षणी मनात एकदम उठणारे अनेक विचारांचे अंकुर)

१८ (पान १०९)म्हणजे आता एका दृष्टीने बरेच झाले. त्या आता भोळ्या खोट्या आशेचा देखील निवारा उरला नाही. (आशा या अमूर्त संवेदनांचे मूर्त रूप - निवारा)

५) समारोप

जी एं कुलकर्णी यांच्या अलौकिक प्रतिभेने 'वस्त्र' कथेतून स्त्री जीवनाची विलक्षण करुणामय अनुभूती देणारा आर्त सूर अस्तित्वाच्या सतारीतून आळविला आहे. हे सूर प्रत्येक सहृदय व्यक्तीच्या हृदयात दीर्घकाळपर्यंत निनादत राहतील.

डॉ माधव पुराणिक

भ्रमणध्वनी ९६२३४२२२१

---

1) एका सूक्ष्म विणकामाच्या भव्य कथेबद्दल , आपण अभ्यासपूर्ण, भव्य लिहिले आहे. आपल्याला मनापासून सलाम ! या विवेचनासाठी आपल्याला किती अभ्यास करावा लागला असेल, आपण ही कथा किती वेळा, सूक्ष्मपणे वाचली असेल, लिखाणाचा ओघ कसा राखला असेल याची फक्त कल्पना करता येते. पढते रहो, लिखते रहो, साहब. 2) वस्त्र ही कथा संसारकथा आहे.पण खरे तर ती जीएच्या

मूलभूत कथांपैकी एक कथा आहे. धागा धागा अखंड विणू या.. अशा वस्त्र व जीवन यांमधील साम्य दाखवणाऱ्या कविता अनेक आहे. म्हणूनच जीएंनी वस्त्र व विशेषतः डिसोझाचे जीवन दाखवणारी ही कथा आपल्याला दिली आहे. जीएंच्या पद्धतीप्रमाणे objective Correlative वापरून कथेचा भव्य गालिचा तयार केला आहे. त्यामधील अनेक उपमांची उकल आपण केली आहे. (जाता जाता साहित्यशास्त्राचे कोणी अभ्यासक, इलियटच्या या 'objective correlative चे विवेचन करतील काय. मी त्यांना धन्यवाद देईन. हेमलता अंतरकर यांच्याशी झालेल्या संभाषणात जीएंनी याचा उल्लेख केला होता.) पुन्हा एकदा आपल्याला धन्यवाद. नवीन कथेवरील आपल्या विवेचनाची वाट पहातो. गुड डे. विलास वाघोलीकर

---

दिलिप बडे: कथेची नेमकी ओळख. नाव मेरी पण आनंदाचा एकही धागा जिवनाला चिकटला नाही. खिश्चन मेरी मध्ये सेवाभाव पारंपारिक आला असावा.अशा असंख्य डिसुझा-लक्ष्मी-करव्वा समाजात असहाय पणे जिवन मुर्त्यूच्या फेर्यात लटकलेल्या असतात.यांना परिस्थिती-नाती-नियती सर्वांचे तडाखे खावे लागतात.मानसिक-शारिरीक वेदना याच धाग्यांनी यांचे जिवनाचे वस्त्र रेशमी होते.

सुनीळ सामंत: खुप छान ओळख.

मुळात मला या कथेला ’वस्त्र’ हे शिर्षक का दिले हे कुतुहल होते ते शमले.

जीएंच्या कथांतील स्त्रिया यावर एक पुस्तकच लिहिले गेल्याचे वाचले. (लेखिका डॉ. प्रमदा देसाई आपल्या ग्रुपवर आहेत). त्यापुर्वी यावर एखादा लेख इहावा असे मनात आले होते. पण जीएंच्या कथांतील स्त्र्यांचे विश्व इतके खोलवरचे

आहे की एकाच व्यक्तीला स्त्रियांची इतक्या आंतरिकपणे ओळख होणे हे ईश्वरीयच असावे.

रक्तचंदन च्या सुरुवातीला टॉलस्टॉयचे एक टोकदार वचन आहे.

सुखी कुटुंबे सर्वसाधारण सारखीच असतात. पण प्रत्येक दुःखी कुटुंबाची कथा वेगवेगळी असते. युनिक असते.

सर्वच स्त्रियांच्या बाबतीत हे खरे आहे. आणि जीएंनी रेखाटलेली (रंगवलेली म्हणणार होतो, पण अनेकदा रंग विटलेले असतात) स्त्री व्यक्तीरेखा इतक्या वेगवेगळ्या आहेत की त्या प्रत्येकीवर एक एक पुस्तक वा सिनेमा होऊ शकतो.

मेरी (इंग्रजीत आनंदी, हिंदीत - माझी) ची कथा काळजाला हात घालते पण त्याचबरोबर ती असंख्य स्त्रियांची कथा आहे हे जाणवल्यावर एक भेसूर चित्र उभे रहाते.

या कथेतील इतर स्त्रियाही, (वहिनी, सुर्यवंशी आणि न पाहिलेली शांता पै, मेलेल्या पेशंटचे कपडे चोरणारी नर्स) ्याही युनिक आहेत आणि वैश्विक आहेत.

जीएंना आजवर हजारो सलाम केले आहेत. या कथेसाठी अजून एक.

दिलिप बडे: या ग्रूप वरच कोणीतरी वस्त्र कथेवर अगोदरच आपले भाष्य व्यक्त केल्याचे आठवते.

सुनीळ सामंत: ठरवून चर्चा प्रथमच करत आहोत. आधी कोणी के असेल तर कृपया आता पुन्हा करणे योग्य ठरेल.

दिलिप बडे: बहुधा ही कथा घेऊन कथालेखन स्पर्धेत कोणी आपल्या शब्दातकथा सादर केली असावी असा संदर्भ आहे.

Paramjit Singh: अहो इतके धक्के देण्या पेक्षा जी ए नी एका वाक्यात सांगितले आहे की पुन्हा एकदा उशी ला लाथ बसली.

वस्त्र मध्ये किती सुंदर वाक्य आहेत जसे ती अपंग आई आहे म्हणून त्यांना कुठे जाता येत नाही अपणाल कुणी नाहीच म्हणून जात येत नाही. मग माणसाला माणसे असावीत की नाही

नुसती कथा वाचून दाखवली.अस थोडीच असते

मिस डिसुझा ला वाटले पत्रे आलीच पाहिजेत पाहिजे अस कुठे आहे.ही माणसे विखरून सगळीकडे गेली,त्या त्या ठिकाणी आपली आठवण असणारच

प्रथम बोचते पण नंतर सवय होते.जगात सगळ्याच गोष्टीची सवय होऊन जाते

टॉमी chhy केसाचा मऊ स्पर्श जाणवत होता. आता आपले आयुष्य या केसा chya वासाच्या मऊ पणाच्य वस्त्राने झाकले आहे, निदान टॉमी तरी अन्न देणाऱ्या हाताला जगणारा आहे

Paramjit Singh: पुन्हा वस्त्र हिन जन्म येऊन नवी वाट शोधली पाहिजे.हयात असताना आपण अनेकदा marto जन्म घेतो.आणि खरे मरण महनजे या chakra तून मुक्ती असते

मनात भावाचे प्रेत असेल तरी भूक काही मारत नाही

Gyanoba Pawar: अशी वाक्य लिहून तुम्ही अक्षरशः थकून जाल पण संपणार नाहीत संपूर्ण जी ए असेच आहेत

Paramjit Singh: मी कधीच थकणा र नाही. मी ही कथा वारंवार वाचतो किती रंगांनी ही कथा भरली आहे

दिलिप बडे: मनात भावाचे प्रेम असले तरी भुख काही मरत नाही.खरय,शिवाय काहींसाठी अन्न हीच जगण्याची प्रेरणा असते.ऊरलो खाण्यापुरता(ऊरलो ऊपकारापुरता)

मंजिरी देशमुख: भुक स्थळ, काळ, वेळ, कारण या सर्वांपलिकडचं वास्तव आहे आणि एकमेव सत्य आहे हेच अधोरेखित करायचं आहे जी.एंना.

सुनीळ सामंत: सर, थकला नसाल तर अजून लिहा ना.

आजपर्यंत ७३ कथा झाल्या, त्यातल्या एकाही कथेवर आपक्याकडून पाच ओळींहून अधिक काही वाचल्याचे आठवत नाही. आपल्याकडून सखोल विश्लेषणाची व मार्गदर्शनाची अपेक्षा आहे.

Paramjit Singh: लिहीन खूप लिहीन.फक्त वाइट वाटून घेऊ नका. अस उपरोधिक बोलू नका. थोड जी ए बद्दल भाऊक होतो दुसर काही नाही अन् कोणाला ही दुखवाव अस कधीच मनात येत नाही 🙏

सिद्धेश खांडेकर: प्रत्येकाची स्वतंत्र्य लेखनशैली असते.

कदाचित त्यांना जे सांगायचे आहे ते नेमके तुमच्या नजरेआड झाले असेल.

Paramjit Singh: आणि महत्वाचे म्हणजे मी काही लिहल्या वर एक शब्द कोणी बोलत नाही.म्हणूनच मला लिहावं वाटत नाही.सिद्देशजी च म्हण बरोबर.ह्या पुढे मी काळजी घेईन

संजीव सावरगांवकर: साहेब लिहीत राहण्याचे काम आपले, वाचकाने वाचकाचे काम करावे तर आलोचना इतर कोणी करतीलच की. बऱ्याच जणांना विचार खूप येतात प्रत्येक वाक्यावर, कथेवर पण लिहिणे जमत नाही. तुम्ही जी. ए. यांचे गाढे वाचक आहात, आणि प्रत्येक वाचकाचे कडे, आस्वादकाकडे वेगवेगळे दृष्टिकोन असतात म्हणुन प्रत्येक कथेवर भाष्य येणे म्हणजे एक वेगळा दृष्टीकोन

समजावणे असते. आम्ही जी.ए. वेडे याकरता आसुसलेले असतो. म्हणुन लिहा. तुम्ही लिहले की चर्चा तर होणारच, ती साहित्य म्हणुन स्विकारलेली उत्तम.

Paramjit Singh: आणि सुनील जी मी न लीहण्याच कारण मी सांगेन 8वाजता.आज पूर्णच मन मोकळे करेन

दिलिप बडे: परजित सर,मी लिहिल्यावर कुणीच काही बोलत नाही.अस वाटुन घेऊ नका.येथे एक ओळ आवडली तरी कौतुक होतेच.प्रतिक्रिया येतातच.आपली प्रतिक्रिया महत्वाची आहे.आपल्या प्रतिक्रियेवर साद-प्रतिसाद ही नंतरची गोष्ट आहे.आपल्याला साद प्रतिसाद मिळाला न मिळाला तरी त्याचे स्वागत.आपण खुप लिहा.

+91 77983 80401: 'सुखी कुटुंबे सर्वसाधारण सारखीच असतात. पण प्रत्येक दुःखी कुटुंबा्ची कथा वेगवेगळी असते. युनिक असते.'

सर,हे वाक्य पूर्णतः माझ्याकडून विस्मृतीत गेले होते.मला आठवतच नव्हते,नक्की हे वाक्य कोणाचे आणि मी कुठे वाचले होते.ही अशी वाक्ये विस्मृतीच्या अंधार्या खोलीत निपचित पडलेली असतात.कधीतरी बोलण्याच्या ओघात त्यांना जाग येते.मला आठवण करून दिल्याबद्दल धन्यवाद.......!

दिलिप बडे: वस्त्र-हे मेरीच जिवनवस्त्रच आहे.आपल्या जीवनातुन नाती वगळली तर आपले जीवन म्हणजे काय? या प्रश्नाच समाधानकारक ऊत्तर आपल्याला देता येणार नाही.भाऊ, वहिणी,टॉमी,वार्डमधील सर्व पेशंट, डॉ. अय्यर, पिन्टो,दामले, शांता पै ही सर्व नाती आणि त्याच्यांशी घडलेल्या 10-15 वर्षातील घटना म्हणजे हि कथा. अय्यर-दामले-पिंटो हे तिन्ही पुरूष तिच्या सुंदर मानेकडे हळुवार प्रेमाने पहात नाहीत.त्या मुळे शारिरीक भुख-प्रेम या भावनेची अतृप्ती मेरीच्या

जिवनात राहिली.तिच्या सेवाभावाची सर्व पेशंटनी सोंगा-सोंगाने थट्टा केली. सर्वत्र कृतघ्नता 300-350शे रूपयेची शिल्लक हे मेरीच भविष्य.मेरीच्या जिवनात टॉमीने न खाल्लेला अर्धा पाव खाऊन झोपण्याची घटना,अशा अनेक घटना मेरीला मरण यातना देतात.जी.ए.कोणत्याच कथेत घटनांचे निष्कर्ष नोंदवत नाहीत.वाचक म्हणुन आपण फक्त घटनांचे निष्कर्ष आपल्या बकुबाप्रमाणे नोंदवतो.

Sanjeev Kulkarni: https://youtu.be/6A2ps7Vf5wc

# वहाणा -- हिरवेरावे

यतीन गुळवणी : माननीय सुनीळजींच्या सूचनेप्रमाणे, वहाणा कथेचे सूतोवाच देत आहे. ही कथा जी. ए नी सत्यकथेत एप्रिल १९५६ मध्ये छापून आली. सदर कथा १९६२ मध्ये प्रकाशित झालेल्या हिरवेरावे या कथासंग्रहात समाविष्ट आहे. कथा प्रथम पुरुषी एक वचनी सर्वनामात असली तरी त्यात कथानक वा घटनाक्रम नाही. नऊ पानांत आहे तो आठवणींचा व विचारांचा कल्लोळ! कथानायक औषध कंपनीचा प्रतींनिधी असावा. साहजिकच कायम प्रचंड फिरतीवर असावा. कपडे म्हणजे वेश रोज बदलला तरी पायी मात्र त्याच वहाणा आहेत. त्यामुळे त्याच्या बरोबर वाहनांची फरफट! वहाणा जीर्ण होताना व झाल्यावर दुरुस्त करताना, त्या वहाणा पूर्वीच्या जुन्या वाहणांच्या आठवणींचे काहूर जी. ए. नी आपल्या शब्दबंबाळ भाषेत मांडले आहे. इतर कथाप्रमाणे "वहाणा" मध्ये घटनाक्रम, घतांनाबहुलता, स्थळकाळ सुसंगत हलके संदर्भ वा गुंफण नाही. भाषालांकारांची खैरात नसली तरी बऱ्याच ठिकाणी उपमा चपखलपणे वापरलेल्या आहेत. सुरवातीला एखाद्या नवकवीच्या तुटक तुटक काव्याप्रमाणे वाटते लहानपणा पासूनच्या या आठवणी कडू, गोड, व अत्यंत हळव्या आहेत. एका अत्यंत सवेदांनाशील मनाने उमजून घेतलेल्या, नोंदलेल्या, जपलेल्या स्मृतींचा ठेवा जी. ए. नी उलगडलेला आहे. माझ्या अल्पमती प्रमाणे मी सुतोवाच केले आहे. जाणकारांच्या विचारांची उत्सुकता आहे. त्यामुळे आकलनात मदत होईल. कृपया कथास्वाद घेण्यात मला सहाय्य करावे ही विनंती. धन्यवाद!

सुनीळ सामंत: धन्यवाद यतीनजी. या कथेवर काही थोडक्यात लिहिणे अवघडच आहे. ्पारंपारिक अर्थाने ही कथा नाहीच. नोस्टाल्जिआची लडी आहे.

गाण्याची धून ऐकून जुन्या आठवणी जाग्या व्हाव्यात तसे पाण्याची धार बघून जुन्या मित्रांची आठवण येते त्याची ही कथा आहे. निळया वहाणांच्य आठवणी आड आईच्या नथीची आठवण आणि नथी आड आईची आठवण.

दिसलं खूप पण पाहिलं काही नाही अशी मनाची अधांतरी अवस्था.

गाडी खाली चिरडलेया कुत्र्याच्या रक्ताचे वहाणेवर पडलेले डाग. निनावी पत्रामुळे आत्महत्या करणारा कारकून. उन्हाबरोबर सुगंध आणणारा पारिजात. अशा असंबद्ध नोस्टाल्जिक गोष्टींची लडी.

कथा वाचण्यासाठी आहे. विवेचन किंवा चर्चेसाठी नाही असे वाटले. मला तरी.

यतीन गुळवणी : आभारी आहे सुनीळसर! ही कथा लिहिण्यामागची जीएंची मानसिकता काया असावी किंवा काय असू शकेल यावर थोडा उहापोह व्हावा अशी अपेक्षा आहे.

सुनीळ सामंत: जीएंचा सखोल अभ्यास केलेली व्यक्तीच यावर काही सांगू शकेल. मलाहीहे कुतुहल आहे. जीएंच्या इतर कथांहून हा फ़ॉर्म अगदी वेगळा आहे.

१) जीएंच्या सुरुवातीच्या काळात जीए वेगवेगळया फ़ॉर्म्स चा वापर करून पहात असावेत. साठच्या सुमारास नवकथा, लघुकथा, न-कथा असे काही प्रकार चर्चेला येत असत. अरविंद गोखलेंसारखे लेखक तेव्हा नवनवीन प्रयोग करत होते. याचाच एक भाग म्हणून जीएंनी ही कथा लिहिली असेल का?

२) जीएंचा पाश्चात्य साहित्याचा फ़ारच सखोल अभ्यास व परिचय होता. त्यांच्या पत्रांतून काफ़्का, काम्यू यांचे उल्लेख सतत येतात. मला ही कथा काम्यू आणि दोस्तोव्हस्की यांच्या साहित्याच्या जवळची वाटते. दोस्तोव्हस्कींचा अतिवास्तववाद आणि काम्यूंची "outsider" style. आपल्या मनात येणाऱ्या

विचारांवर विचार करण्याच्या पद्धतीचा विचार. जणू काही आपण दुसऱ्याच कोणा व्यक्तीच्या मनातले विचार तटस्थपणे वाचत आहोत.

अर्थात जीएंनी या प्रकारची कथा का लिहिली, त्यावर तेव्हाच्या वर्तुळांत काय प्रतिक्रिया उमटल्या आणि जीए नंतरच्या काळात अशा निवेदनकथेपासून दूर का झाले यावर कोणी लिहिले तर मलाही वाचायला आवडेल.

विलास वाघोलीकर: मला हा क्रमांक ।चा विचार योग्य वाटतो. ही कथा सत्यकथा मध्ये 1956 च्या सुमारास आली होती. सत्यकथेत संपादक श्रीपु भागवतांचे लेखकांना मार्गदर्शन असे. (कथा आणखी टोकदार हवी इत्यादी)त्या काळात अॅब्सर्ड नवकथेचा बोलबाला होता. त्याचा परिणाम म्हणून नाही, पण स्वत : केलेला प्रयोग म्हणून जीएंनी ही वेगळी कथा (मला अगम्य) लिहिली असावी. अर्थात हे सर्व माझे तर्क आहेत. नवकथेत फ्राईड च्या इड , इगो, संज्ञा प्रवाह या कल्पना वापरल्या जायच्या. जीएंनी नंतर स्वतंत्र वाट घेतली. त्यात अस्तित्ववादाचा प्रभाव होता. असो. यतीनजींनी त्यांच्या अभ्यासाने चांगले विवेचन केले आहे.

# वासंती कथासंग्रह - निळासावळा

गौतमी कोंडे: कथा - वासंती

कथासंग्रह - निळासावळा

वासंती ही कथा एकाकी जीवन जगणाऱ्या शांताबाईं विषयी आहे. त्या हायस्कूल मध्ये जरी काम करीत होत्या, तरी जोडूनच असलेल्या मराठी शाळेचा व तिथे शिकणाऱ्या लहान मुलींचा त्यांना लळा होता. अनेकदा आपल्या आयुष्यात अशा काही घटना घडतात ज्यांच्या आठवणींने जगणे असहाय्य होते. दैनंदिन जीवनात त्याच जुन्या आठवणी कोणत्या ना कोणत्या कारणाने समोर उभ्या राहतात.

असाच एक प्रसंग शांताबाईंना भूतकाळात नेतो.

आपल्याजवळ जी गोष्ट असते तिचे खरे मोल आपल्याला ती नसल्यावरच कळते. हा देखील एक विचार जी. ए. नी ह्या कथेतून व्यक्त केला आहे. आणि अर्थातच शांताबाईंना त्यांच्या जवळ नसलेल्या त्या गोष्टीची उणीव समोर घडणाऱ्या प्रसंगातून जाणवत जाते. अन् त्यात काही अनपेक्षीत असे योगा योग घडून येतात.

विलास वाघोलीकर: वासंती कथा - जी ए कुलकर्णी

- मांजराने बशी भरून दूध चाटून पुसून स्वच्छ करावे तसे.ठिकठिकाणची दुःखे टिपून घ्यायची. हे जीएंनी केले आहे.

- प्रस्तुत कथेत नायिका नवरा गेल्याचे दुःख पचवत असते.

- नवऱ्या माघारी, तिला वासंती या तिच्या मुलीला वाढवावे लागत होते. एकेरी पालकाची तारांबळ होते. ती रंगीबेरंगी परकरचा हट्ट करते.तो न आणल्याने रुसते. त्यात ती मुलगी वयपरत्वे खेळकर असते.मनात आले की रस्त्यावर जाते. व तिला मोटार अपघात होवून जाते.

- या दुःखाची खपली नंतर प्रसंगाने प्रसंगाने निघत असते. बरोबरची शिक्षिका ,तुम्हाला मुलगी असती तर त्यांचे व्याप कळाले असते, असे म्हणून दुःख देते. माणूस समाजात, कुटुंबात रहातो. पण अनेकदा माणसाच्या दुःखाचे कारण आजुबाजूची माणसे असतात. तिच नियती होतात.

- त्या वर्गात गेल्यावर, वर्गातली त्याच वयाची मुलगी धडा वाचल्यावर, तिचे नाव वासंती सांगते. व या नावाच्या साम्याने पुन्हा आठवणींची खपली निघते. दुःखी माणसाला त्याचे दुःख कधी पावलो पावली भेटते. त्याप्रमाणे कथेतील योगायोगाचे प्रसंग घडतात.

- या कथेत छोट्या दैनंदिन प्रसंगांतून पूर्वीच्या घटना उलगडत जातात. त्यातून जीएंचे कथा कथनाचे कौशल्य कळते. ' प्रवासी' कथेत म्हटल्याप्रमाणे, कथे इतके महत्व कथा ऐकणाऱ्याला, सांगणाऱ्याला असते.त्या आईचे दुःख शेवटानंतर वाचकाला डसून जाते. राणी कथेसारखी कथा लहान आहे. पण टोकदार आहे. लक्षात राहणारी आहे.

- धन्यवाद. विलास वाघोलीकर

सुनीळ सामंत: उत्तम प्रयत्न गौतमी. छान लिहिले आहेस. तुझ्या अभ्यासातून वेळ काढून लिहिल्याबद्दल धन्यवाद आणि परिक्शेसाठी शुभेच्छा.

--

दिलिप बडे: https://youtube.com/watch?v=AxjavUx6U5I&si=EnSIkaIECMiOmarE

सुनीळ सामंत: वासंती- निळासावळा- जी ए कुलकर्णी

या ग्रुप वरील चर्चांतून एक लिंक लागली. जी एं चा कथासंग्रह वाचताना त्यात सुरुवातीला लिहिलेले अर्पण पत्रिका किंवा वचन पाहून त्या संग्रहातील कथांची प्रकृती कळते. जीए अर्पणपत्रिकाही विनाकारण लिहित नाहीत.

निळासावळा हा कथासंग्रह इंदू, सुशी व जाई या तीन आठवणींना अर्पण केलेला आहे. व्यक्तींना नाही; आठवणींना. व्यक्ती वेगळ्या, त्या व्यक्तीची आठवण वेगळी. या व्यक्तीने आपल्यावर सोडलेली छाप, छोट्या छोट्या घटना, प्रसंग, चवी, वास, गाणे, सब्द, ध्वनी या सर्वांची मिळून आठवण बनते. आणि ती आठवण त्या व्यक्तीहून खूप मोठी असते. वासंती ही तशीच शांताबाईंच्या मनावर कोरलेली डागासारखी आठवण आहे. ती त्यांची स्वतःची मुलगी खरे, पण तिची आठवण इतकी हळवी असते की त्या तिच्याबद्दल कोणाकडेही बोलत नाहीत. त्यामुळे बरोबरच्या शिक्षिकांनाही त्यांना एक मुलगी होती हेच माहित नसते. इतरांनी अहेतुकपणे बोललेला एखादा शब्दही या जखमेवरची खपली काढतो व भळाभळा रक्त वाहू लागते. मग धड्यामध्ये येणारे वासंती हे नाव किंवा वासंती या नावाची विद्यार्थिनी हे सर्व त्या डागाला त्या जखमेला अधिकच ओली करतात. एखादी छोटी गोष्ट, फुलाफुलांचा परकर तिने मागितला आणि तो हट्टही आपण पुरा करू शकलो नाही याची खोलवर झालेली होणारी व पुन्हा पुन्हा होत राहणारी खंत हीच या कथेची मध्यवर्ती जखम आहे. कथा अतिशय लहान आहे पण ती जवळपास प्रत्येकाने कोणा ना कोणा तरी संदर्भात भोगलेली असते विलासजींनी म्हटल्याप्रमाणे मांजराने बशी चाटून पुसून स्वच्छ करावी तशी आपल्या सर्वांची दुःखी जीए आपल्या कथेमध्ये आणतात.

ही कथा लहान असली तरी तिची आठवण मात्र दूरवर साथ देते.

+91 98236 41860: खूप सुंदर विवेचन.

छान वाटलं विवेचन.जी.एं.च्या कथा मनाला पिडतात,भिडतात आणि काळीजवेड्या अहेत.

# वीज कथा - पुस्तक पिंगळावेळ

विलास वाघोलीकर: 🙏 💐 💐 💐 💐 💐 💐 💐 🙏

वीज कथा - पुस्तक पिंगळावेळ - लेखक जी ए कुलकर्णी

विवेचक - व्ही एस वाघोलीकर

- सुमारे 36 पानांची ही मोठी कथा आहे, ही कथा महत्वाचीही आहे. वाचकांनी नेटाने ती वाचावी अशी ही कथा आहे. माणसाच्या मनाचे विश्व समजून घेण्यासाठी कथा उपयोगी आहे. कारण जीएंनी एखाद्या कसलेल्या मानसशास्त्रज्ञाप्रमाणे मनाचा अभ्यास केला होता.

- शारीरीक, मानसिकदृष्ट्या कमकुवत असलेल्या काही व्यक्ती समाजात एका कोपऱ्यात रहात असतात. तशा प्रकारच्या परिस्थितीमुळे त्या व्यक्ती गरीबही असतात. पण जीएंनी विशेषकरून अशा व्यक्तींकडे लक्ष दिले आहे. कारण जीएंच्या दृष्टीने प्रत्येक अस्तित्व महत्वाचे आहे. अस्तित्व म्हणजे काय, अस्तित्वाचे सार म्हणज जाणीव काय असेल, शून्य अस्तित्व - मृत्यू - म्हणजे काय, हे जीएंना महत्वाचे प्रश्न वाटतात.

- म्हणून जीएंनी वीज मधील बळवंत, कवठे मधील दामू, जखम मधील बापू, अवशेष मधील लंगडा गोविंदाचार्य, धडल बंडाचार्य रंगवले आहेत. तसेच यात्रिक मध्ये डॉन घेतला आहे. भोवरे मधील नमूताई, काळी आजी यांच्याकडे लक्ष दिले आहे.

- प्रस्तुत वीजमध्ये बळवंत हा वृद्ध गोदाक्का यांचा दुसरा मुलगा. पहिला, सदाशीव लौकर गेला. बळवंत या अशक्त, डोक्यावर परिणाम झालेल्या मुलासोबत गोदाक्का धर्मशाळेच्या खोलीत रहात होत्या. बळवंत वडाच्या पारावरच रहात असे. गाव लहान होते. वासू, श्रीधर, दिलीपकुमार इत्यादी मुलांना गोळा करून , बळवंत तोडून मोडून गोष्टी सांगत असे.म्हणून ते लहान गाव त्याला मास्तर म्हणून ओळखत असे.. त्याच्या गोष्टीत एकसलगता नसे. मनापासून अभिनय, हावभाव करून गोष्टी सांगताना , तो राम, बाजीप्रभू, तानाजी, अलिबाबा यांच्या गोष्टींची सरमिसळ करत असे. व त्यामुळे पोरे खदाखदा हसत. माणसाची जाणीव कशी असते, स्मरणशक्ती कशी असते. हे येथे दाखवले आहे. व त्यांची असंबध्दता कशा पद्धतीने होते, हा मानसशास्त्रीय पैलू येथे दाखवला आहे.

- बळवंताला या गोष्टी सांगता येत. कारण तो आजूबाजूची पेपर्स, मासिके यांची रद्दी आणून दिवसभर सर्व मनापासून वाचून काढी. निळ्या आकाशातल्या पांढऱ्या विमानाचा फोटो पाहून तो त्या विमानात जाई. असे मनाने मजकुरात गुंतल्यामुळे त्याच्या सर्व लक्षात राही. पण अधू मनामुळे त्यांची सरमिसळ होई. अधू मन, वेळ घालवायला काहीतरी असंबद्ध , रिपिटीटीव्ह करत असते, हे येथे दाखवले आहे.

- बळवंताचा गंगी गायीवर जीव होता. ती गाय सकाळी देवळाच्या पायरीवर बसे. तिच्या अंगावर मुले खेळली तरी ती सहन करी. फक्त मंगळवारी माणसे दर्शनासाठी आली की, बळवंत तिला म्हणे," गंगे, उठ. काय म्हशीसारखी बसलीस मधेच." मग ती त्याचेच ऐके व उठून दुसरीकडे जाई. कमकुवत मनाचा बळवंत पाळीव प्राण्यांशी कनेक्ट होत असे, असे जीएंनी दाखवले आहे. बळवंताचे मन अधू असते. प्राण्यांचे मन फार विकासित झालेले नसते. त्यामुळे ती मने लौकर कनेक्ट होतात. एकमेकांवर माया करतात हा पैलू लक्षात येतो.

-तेथे कठडा नसलेली विहिर होती. एका रात्री गंगी गाय विहिरीत पडली. प्रयत्न करूनही तिला कोणी बाहेर काढू शकत नाही. त्यामुळे, ती रात्री ओरडून ओरडून विहिरीत मेली. बळवंताने मनाने घेतले की विहिरीमुळे गंगी गेली.तर आता ती विहिर एकट्याने बुजवायची. अनेक महिने विहीरीत माती टाकण्याच्या खेपा करून बळवंत हडकुळा झाला. पावसाळ्यानंतर ते काम कर ,असे गोदाक्काने सांगीतल्यामुळे ते काम थांबले. त्याच्या मनाचा इगो , त्याचा एकारलेपणा यातून दाखवला आहे. मानसशास्त्राप्रमाणे मनाला इगो प्राप्त होतो." मी आहे, मी कोणीतरी वेगळा आहे" ही इगो ची जाणीव असते. जीएंनी हा पैलू स्पष्ट केला आहे.

- एकदा गावात सर्कस आली.जीएंनी त्या सर्कसचे हुबेहुब वर्णन केले आहे. हत्ती, घोडे ,वाघ ,सिंह, कसरती असलेली सर्कस, हे रूटीन आयुष्याला फिके पाडणारे वेगळे विश्वच असते. अधू मनाचा बळवंत त्या सर्कशीत, व विशेषतः त्यामधील सर्कस सुंदरीत पुरेपूर गुंतला. जीएंनी मनाचा इड हा भाग येथे दाखवला आहे. फ्रॉईड च्या मानस शास्त्रीय विचारात, इड ला महत्वाचे स्थान आहे. अजाणतेच्या अर्भक वयात,बालपणी, किशोर वयात, प्रौढपणी, वृद्धत्वात असे सर्व वयांत, पुरुष स्त्री यांमध्ये हा इड मनावर हुकमत गाजवत असतो. इड ची उर्जा खूप मोठी जीवनभर असते असे फ्रॉईड सांगतो. येथेही तसे घडते. बळवंत घर सोडून त्या सुंदरीच्या मागे गावोगावी गेला. तिनेही त्याला नेले कारण,तिला एक हरगडी मिळाला. (चंद्रावळ मध्ये त्या कथेचा कथानायक चंद्रावळ नर्तिकेमागे जातो, याची आठवण होते) पण एकदा बळवंत तिला,"मी तुला आधार देईन" असे म्हणतो व तिच्या जवळ जातो. मग ती त्याची खेटराने पूजा करते व त्याला चाबूक मारते. सर्कशीत काम केल्याने ती मनाने, शरीराने सशक्त असते. तिच्या अशा वागण्याने त्या प्रसंगानंतर बळवंत हिनदीन होवून घरी परत येतो.

- पण ती सुंदरी त्याच्या दिवास्वप्नात येत राहते. सबकॉन्शस मनात इड उसळी घेत असतो. जीएंनी एक मनाचा महत्वाचा पैलू, दिवास्वप्न नंतर दाखवला आहे.

मानसशास्त्राप्रमाणे कॉन्शस, (जाणीव) व डीप सबकॉन्शस (गाढ झोप) मध्ये दिवास्वप्नाचा, सबकॉन्शस चा भाग येतो. कथेत दिवास्वप्नाच्या घटना दाखवल्या आहेत. बळवंताच्या वाचनाच्या कारणामुळे ते प्रसंग जाणीवेत जातात व अधु मनामुळे त्याचा प्रखर परिणाम होवून या घटना त्याच्या दिवास्वप्नात येतात. त्या जाणीवेतून सबकॉन्शस मनात, दिवास्वप्नात जातात. ही दिवास्वप्ने बळवंत पहातो. उदाहरणार्थ -।) बळवंत समुद्रात देवमाशाची शिकार करतो. २) तो किल्ल्यामधील सिंहाला मारून राजकन्येची सुटका करतो 3) सोळा जणांच्या गटामध्ये तो एकटा हिमशिखर सर करतो. पण प्रत्येक वेळी सर्कससुंदरी येवून दिवास्वप्नाचा भंग करते. म्हणजे इड आपला प्रभाव दाखवतो.येथे जीएंनी सब कॉन्शस मनाच्या लीला दाखवल्या आहेत.

- एकदा तर तिच त्याला सांगते की गंगी गाय ओरडत होती. कारण तू तिची सुटका करायला हवी होतीस. म्हणजे मनातील विवेकाचा आवाज येथे बाह्य मनाला सांगत असतो. जाणीवेतला विवेकाचा भाग येथे जीएंनी दाखवला आहे. कोणत्याही परिस्थितीत हा विवेकाचा आवाज मनाने काय ठरवावे हे सांगत असतो. त्याचे ऐकायचे की नाही हे इडवर अवलंबून रहाते.जी ए लिहितात -

."...मृत्यूक्षण जवळ येतो तेव्हा आपण मदतीची हाक देतो, ती आपल्याला मदत करावी म्हणून नव्हे.

कारण त्या इतरांची मदत आपल्याला तशी उपयोग

पडण्याच्या अवस्थेपलीकडेच गेलेली असते - तर त्यांनी आपल्याला नाहीसं करावे.आपल्याला मुक्त कराव. आपल्या वेदना नाहीशा कराव्यात, म्हणून आपण त्यांच्याकडे धावतो...

."...गाईचा आवाज केवळ तुझ्यासाठीच होता हे तुला आतड्यात जाणवलं नाही? तू यावे आणि गळयातली शीर चिरून आपल्या वेदना संपवाव्यात म्हणूनच ती रात्रंदिवस आक्रंदत होती.

"मी त्या गाईला चिरणार?'' तो चकित होऊन म्हणाला, ''मी जसा आहे तसाच मला स्वीकारणारा तो मूक प्रेमळ जीव! मी तिची हत्या कशी करणार?"

''त्याच ठिकाणी तुझं खरं धैर्य दिसलं असतं. अरे, तिच्याविषयी निर्विकार असताना एखाद्या खाटकानं देखील तिची हत्या केली असती; पण जे अतिशय जिव्हाळयाचं असतं, त्याची देखील स्वतः हत्या करण्याचे प्रसंग आयुष्यात येतात आणि अपार प्रेम असतं म्हणून अशा जीवघेण्या प्रसंगी हत्या करावी लागते. असा हा एकच क्षण तुझ्यासमोर आला

होता आणि नेमक्या त्याच वेळी तू भेकड, भेंडाळलेला निघालास.

''पण एका साध्या गाईच्या प्रसंगानं तू माझी परीक्षा करणार की काय?'' त्याने अस्वस्थपणे विचारले.

''साधी गाय?'' ती त्वेषाने म्हणाली, ''मग तुझ्यासारख्याच्या आयुष्यात काय चंद्रसूर्य येऊन एकमेकांवर आदळतील, की वीज तुझ्या घरच पाणी भरायला विहिरीचा दोर होईल? आणि ती गाय साधी नव्हती. मी तिच्या कपाळावर तळवा उमटवला होता

हे तू कधी पाहिलं नाहीस?"....

आता जणू त्याच्याशी बोलणेच संपले.मृत्यू /बद्दलचे हे जी एंचे महत्वाचे आहेत, ते या कथेतील मृत्यूविषयी भाष्य आहे. या मृत्यूवरील भाष्याने ही कथा अत्यंत महत्वाची झाली आहे.

त्यानंतर एकदा रात्री खूप जोराचा पाऊस येतो. बळवंत खोपटाच्या उंबऱ्याशी बसून असतो. दोरी एवढया जाड धारा पडतात. व (जवळ, वडाच्या झाडावर) वीज

पडते. जांभळसर प्रकाशात वडाच्या झाडाची पाने दिसतात. व कडा ड् - आवाज येतो. बळवंताला वाटते आपल्यातील वीज आता मेली आहे. (याचा संदर्भ त्याच्या मनावरच्या आघाताशी आहे ?)तो खाली मान घालून स्वतःला स्वतः मध्ये पुरल्याप्रमाणे बसतो. सकाळी उजाडल्यावर त्याची मान अवघडलेती असते. सगळयांना कळते की वडावर वीज पडून वडा चा एक भाग काळा ठिक्कर झालेला असतो.

- आपण बळवंताच्या मनात डोकवले तर

दिसेल - त्याची प्रिय गंगी गाय मरते. तिला मारायला कारणीभूत झालेली विहीर तो बुजवू शकत नाही. नंतर पावसाळा येतो. तो घरात मोकळा अडकून पडतो.... पूर्वी सर्कस सुंदरी ने त्याला हाकलले होते. तो अपमान त्याच्या मनात डागल्यासारखा रहातो. मनाला तेथेही स्थिर स्थान मिळत नाही. त्याचा रद्दी वाचण्यातील रस संपतो. मग बळवंतासमोर जीवित स्वप्न रहात नाही. त्याचा परिणाम बळवंताच्या मनावर आणखी होतो. त्याचे मन पोकळीत असताना आणखी भेलकडते. त्यातच घराशेजारी कडा ड् करून वीज पडते. त्यातून पुढील घटना घडते.

- एक दिवस दोरखंड घेवून तो मुलांना सांगतो की मी आता विमान कसे उडते ते दाखवतो. त्यावेळी बळवंत म्हणतो - (प्रेमळ)वासू असता तर बरे झाले असते... पण मी एकदाच हे करणार बरे का... यावरून बळवंताने मनाच्या जाणीवेमध्ये आत्महत्या करण्याचे ठरवले असते....वडाच्या झाडावर चढून तो गळयात दोरखंड बांधून उडी घेतो व फास लागून मरतो. बळवंताला शेवटी असे, लोकांना कळेल असे धाडस करावेसे वाटते. व वरील सांगितलेल्या अपयशामुळे त्याला जिवाचा कंटाळा आलेला असतो. जीएंनी आत्महत्येच्या

मानसशास्त्राचा पैलू कथेत सांगीतला आहे. येथेच ही लक्षणीय कथा संपते.

🙏💐💐💐💐💐💐💐💐🙏
धन्यवाद. व्ही एस वाघोलीकर

🙏💐💐💐💐💐💐💐💐💐🙏

मंजिरी देशमुख: वीज या कथेचं सुरेख विवेचन 🙏

सागर कुलकर्णी: किती खास लिहलय हो.

वीज ही अतिशय महत्त्वाची कथा आहे.

आपले विश्लेषण वाचून या कथा पुन्हा एकदा वाचण्याची प्रेरणा मिळते.

संजीव सावरगांवकर: कथा आणि विवेचन दोन्ही आलटून पालटून वाचावेत इतके सुरेख विवेचन. या पेक्षा वेगळे काही सुचेल असे या क्षणी तरी वाटत नाही. आत्ता वाचून तृप्त आहे. 🙏🏻

Gauri Deshpande: अप्रतिम विवेचन. मी कथा अजून वाचली नाही...तरीही आपल्या सविस्तर आणि अतिशय मुद्देसूद विवेचनामुळे संपूर्ण कथा आणि तिची वीण डोळ्यासमोर उभी राहते. आपले खूप खूप आभार. 🙏

सुनीळ सामंत: वीज पिंगळावेळ

वीज या कथेतला बळवंतमास्तर, पांडू आणि वस्ताद इराण्णा यांचा त्रिकोणी सामना रंगवणं हे जीएंचं खास वैशिष्ट्य आहे. हत्ती, सिंह यांच्याबद्दलच्या बळवंतमास्तरच्या ताणलेल्या कल्पकते बद्दल पांडू त्याला डिंवचतो तेव्हा

बळवंतमास्तर त्याला तानी शिंपीणीवरून उलट जवाब देतो. इथे मला गिधाडे कथेची आठवण झाली. आपले न्यून लहान दिसावे व स्वतःलाही तसे वाटावे म्हणून इतरांच्या कमीपणाला डिवचणारे गिधाड.

सुनीळ सामंत: वीज

पिंगळावेळच्या पहिल्या पानावर जीएंनी स्टाईनबर्ग चे एक वचन दिले आहे- Shallow people demand variety, But I have been writing the same story, everytime, cutting nearer the aching nerve.

विलासजींना वीज ही कथा वाचताना कवठे मधील दामू, जखम मधील बापू, अवशेष मधील लंगडा गोविंदाचार्य, धडल बंडाचार्य यात्रिक मध्ये डॉन , भोवरे मधील नमूताई, काळी आजी हे सर्व आठवले. मलाही गिधाडे मधला बापू, अहम मधला साधू आठवले. बळवंत आणि पांडू यांच्यातल्या संवादाने गिधाडे आठवली. तर हिमालयातले शिखर गाठतानाच्या वर्णनात अहम मधला बैरागी दिसला.

जीएंच्या प्रचंड शब्दसामर्थ्याचा प्रत्यय हिमालयाच्या त्या वर्णनात येतो. ते वर्णन मुळातून देत आहे.

एकाला विस्मयाने बोलता येईना. काही वेळाने तो म्हणाला, "आणि तू तू एकटाच पुढं जाणार? वादळात तू गवताच्या काडीसारखा होशील. आताच शिखर काळवंडू लागलं आहे. रात्रीपुरता देखील कुठे आडोसा नाही. आणि तशात तू एकटा जाणार!"

बळवंतमास्तराने खांद्यावरील पट्ट्यात बोटे फिरवीत पाठीवरील ओलावून घेतले व तो म्हणाला, "तुम्ही इतकी सरळ माणसं आहात! तुमच्यासारखे सहकारी मला मिळाले, हा माझ्या आयुष्यातला सर्वांत मोठा आणि बहुधा शेवटचाच आनंद आहे. पण मी काय म्हणतो हे तुम्हांला पटणार नाही. कदाचित समजणारही नाही. मी स्वभावानं जुगारी आहे. एकएक सावध पाऊल टाकत, मागंपुढं पाहत, क्षण मोजत,

कातडीला एक ओरखडा देखील काढणार नाही एवढं पोटापुरत यश घेऊन बसण्याचा माझा स्वभाव नाही. पत्त्याचं एक नेमकं पान उलटण्यावर सारी जिंदगी पणाला लावणाऱ्याचा माझा पिंड आहे. मला हवं असलेलं जर पान उलटलं तर साऱ्या आभाळातली चांदण्यांची उधळण मी अंगावर घेईन. नाहीतर मी कुत्र्यापेक्षाही कंगाल होईन. याचसाठी मी एकटाच पुढे जाणार आहे. इथं निवाऱ्याला जागा नाही तरी चिंता नाही. कारण आता मला जी विश्रांती मिळेल ती शेवटचीच आणि आपल्याला शेवटच्या विश्रांतीसाठी कसली जागा मिळेल याचा विचार करण्याचा क्षण केव्हाच नाहीसा झाला आहे. जर सकाळी मी तुम्हांला शिखरावर दिसलो तर तुम्हांला देखील फार अभिमान वाटावा. कारण तुमचं साहाय्य नसतं तर मी इथपर्यंतही येऊ शकलो नसतो. उलट मी जर दिसलो नाही तर आपला संबंध एवढाच होता असं समजा. पण मला जरी यश मिळालं नाही तरी शेवटच्या क्षणी देखील मला अभिमान वाटेल, की निदान तुमच्यासारखे चोख धैर्याचे मित्र मला आयुष्यात लाभले. आता मात्र आपले मार्ग वेगळे आहेत."

त्याने दोन सहकाऱ्यांच्या खांद्यावर हात थोपटले व किंचित वाकून तिसऱ्याकडे पाहिले; पण तेथे डोळयांत हालचाल दिसली तरी ओळखीची चमक दिसली नाही. त्याने एक निःश्वास सोडला व तो वर जाण्यासाठी वळला.

आता पुढे खिळयांना आधार देण्यासाठी मोठा खडक नव्हता आणि चाचपडत सरकताना बोटांना नेट सापडत नव्हता. आता एकदम अंधारू लागले. त्याने मध्येच थांबून मागे वळून पाहिले. त्याच्या दोन सहकाऱ्यांनी कापडाची झोळी करून तिच्यातून तिसऱ्याला खाली सोडले होते व ते सावकाश, खडकाचा आधार घेऊन खाली उतरत लहानलहान होत होते. त्याला वाटले, आता मात्र मागचे बंध सुटले. आता आपण व शिखर यांच्यामध्येच शेवटचा डाव उरला. त्याने चिंबून गेलेली हाडे सावरली; पण आता त्याला स्वतःचे भान सुटले एका ठिकाणी लहान खडकाच्या नळकांड्यात दोन्ही बाजूंना पाय रेटत तो केव्हा वर चढून आला आणि सरपटत केव्हा

शिखरापर्यंत पोचला याची त्याला स्वतःलाच स्मृती नव्हती. शिखराजवळच्या रुंद जागेवर तो उभा राहताच शेवटचे पीस असल्याप्रमाणे दिसणारे उरलेले शिखर त्याच्या खांद्याला लागले. त्याने हाताच्या एका झपाट्याने वर साचलेल्या हिमाचे वीतभर टोक झटकून टाकले आणि त्या दुर्गम शिखराची शान आपण वीतभर उतरवली या कल्पनेने त्याला खूप समाधान वाटले; पण आता अद्याप न जाणवलेले श्रम उफाळून आले व एक श्वास घेताघेता छातीत निवडुंग उगवत असल्याप्रमाणे वेदना होऊ लागल्या. त्या ओझ्याखाली तो कोसळणार होता, तोच त्याचे शरीर एकदम ताजे झाले. वाऱ्याच्या झुळुकीबरोबर तो परिचित, धुंद रक्ताचे लाल उष्ण मद्य करणारा सुगंध येऊ लागला होता. त्याने डोळे ताणून समोर पाहिले. शिखराच्या शुभ्र रेषेजवळच समोर एका हातावरच त्याहीपेक्षा शुभ्र वस्त्र असलेली, सोनेरी केस वाऱ्यात हलत असलेली ती उभी होती. तिच्या बाह्य तलम वस्त्रातून तिची गोरी काया निर्लेप दिसत होती. आता तिचे आतील वस्त्र लालभडक मखमलीचे होते आणि ते उघड्या हातांचा, मांड्यांचा डौल घेऊन भरजरी फुले मिरवत होते.

• बळवंतमास्तर उभा राहिला आणि म्हणाला, "मी हे शिखर जिंकलं आहे. ते भाग्य मिळवणारा मीच पहिला मानव आहे. ते मी तुला अर्पण करण्याची प्रतिज्ञा केली होती त्यासाठी मी आलो आहे."

Paramjit Singh: छापले ले पान दिसले की बळवंत मास्तरांचे डोळे अधीर होत व त्यातील अक्षर न अक्षर वाचल्या खेरीज त्याला सैल वाटत नसे

तेथे खणताना काही वर्षा पूर्वी एक शिलालेख मिळाला होता.हातात फाईली घेतलेली रुमाल वाली शहाणी माणसे आली.

Paramjit Singh: पण सवय काय होईल हळू हळू सगळच अंगवळणी पडताच की नाही. पण एक दिवस ती विहीर भरून तिच्या वर दोन तीनदा चालल्या शिवाय मी राहणार नाही

Paramjit Singh: पत्याच एक नेमक पान उलटन्यावर सारी जिंदगी पणाला लावणाऱ्या चा माझा पिंड आहे.मला हवं असललेले पण जर उलटले तर साऱ्या आभाळाला तील चांदण्याची उधळण मी अंगावर घेइन नाहीतर मी कुत्र्या पेक्षा ही कंगाल होईन

Paramjit Singh: ईराण्णा नेहमी काव घातलेली लुंगी नेसत असे.आणि काखा फुगवून समोरच्या अदृष्य प्रतिस्पर्ध्या चाल करत असल्या प्रमाणे चालत असे.

हा दिलीप कुमार म्हणजे नागव्वा च मुर्दाड karrt. त्याच खर नाव भिमु पण इंग्रजी शाळेत त्याने कपाळ ला वर झिंज्या आणल्या आणि दिलीप कुमार होऊन बसला. त्याचे ते घाणेरड्या केसांनी झाकले ले बकरच्या ढुंगणा सारखे तोंड पाहताच बळवंत मास्तरांच्या डोक्यात सलकले. त्याची मुंडी पिरगळून टाकावी असे वाटले.

हे जी दोन पात्र आहेत मास्तर च त्यांच्यावर फार राग होता

Vishweshwar Nandedkar: वा. खासच. नक्कीच परत वाचेन. या कथेत असे बरेच लखकन चमकणारे हिरे आहेत

# वेड --- कथासंग्रह - सांजशकुन

सिद्धेश खांडेकर: कथा – वेड ---कथासंग्रह - सांजशकुन

लेखक - जी. ए. कुलकर्णी

मराठी साहित्यात ज्ञात असलेल्या सात अंगांपैकी कोणत्या अंगावर जोर देऊन कथा लिहावी हे संपूर्णतः लेखक ठरवत असतो. जी. ए. कुलकर्णी लिखीत "वेड" ही कथा मला कल्पकतेच्या अंगाने लिहिलेली दिसून आली. या कल्पकतेच्या अंगामुळे कथेला इतर कथांपेक्षा स्वतःचे वेगळेपण मिळाले आहे.

कथेतील नायक हा कवी मनाचा आहे. कवीला कविता करण्यासाठी प्रामुख्याने हवी असते ती शांतता. देऊळ आणि स्मशान यांसारख्या शांत जागा या जगात आता उरल्या नाहीत, म्हणून कदाचित तो भर दुपारी गावाबाहेरील स्मशानात येतो. कागद काढून त्यावर काहीतरी लिहून स्वतःशी गुणगुणू लागतो तेव्हा त्याला स्वतःशीच बोलताना पाहून काही कुत्री त्याला वेडा म्हणतात. वास्तवात पाहता, वेड्या माणसाला संपूर्ण जग हे वेडेच दिसत असते आणि जगाला तो माणूस वेडा दिसत असतो. त्याचप्रमाणे कुत्री स्वतः पिसाळल्या सारखे कृत्य करून त्या माणसावर पिसाळलेला असल्याचा डागही लावतात.

परंतू कुत्र्यांच्या बाजूने बघता, स्वतःसोबत बोलणारी माणसे ही "वेडी" असतात असे गृहीत धरले तर "कवी" हादेखील एक वेडाच झाला! या दोघांशिवाय

संपूर्ण जगतात इतर कोणी स्वतः सोबत एकटाच (मोठ्याने) बोलताना आढळून येतो का?

कथा दोनच पानात संपत असली तरी लहान लहान वाक्यांतून आणि संवादातून गहन विचार प्रकट होताना दिसतात.

उदाहरणार्थ -

"आणि ती अशी हसत स्वतःशीच गाणेही म्हणत नाहीत." हातभर उंचीच्या एका कुत्र्याने मध्येच सांगितले.

पण त्या काळया कुत्र्याला हा अडथळा खपला नाही. त्याने वस्सकन आपले दात त्याच्या मानगुटीत रोवले व त्याला बाजूला फेकून दिले. इतर कुत्र्यांनी एकदम ओरडून ज्याचा अयजयकार केला. नंतर ती गोष्ट आपणच प्रथम सांगत असल्याप्रमाणे तो काळा म्हणाला, "आणि ती अशी हसत स्वतःशीच गाणे म्हणत नाहीत!"

या लहानशा घटनेतून काळया कुत्र्याचा संपुर्ण मी पणाचा स्वभाव लक्षात येतो. दुर्बलांच्या गटावर ताकदीचे वर्चस्व गाजवू पाहणाऱ्यांचे तो काळा कुत्रा नेतृत्व करताना दिसतो. कुत्र्यांच्या रूपाने माणसांचे स्वभाव या कथेत मांडलेले आहेत.

ही कथा जी. एंना सहज सुचली असेल असे मला वाटत नाही. कदाचित त्यांच्या कवितेच्या संदर्भात त्यांच्यासोबत घडलेल्या एखाद्या घटनेचा परिणाम म्हणजे "वेड" कथा असावी असे मला वाटते.

विलास वाघोलीकर: वेड ही कथा मानवी समाजासंबंधी आहे. प्रत्यक्ष वातावरण व अप्रत्यक्ष सूचकता यांच्या संयुगाची ही - कथा - कला आहे. सिद्धेश खांडेकर जींनी कथेचे विवेचन मुद्देसूदपणे करून कथा उलगडून दाखवली आहे. त्याबद्दल त्यांना धन्यवाद देतो.

कथेत स्मशान दाखवले आहे. जिथे हल्ले होतात, हिंसक मृत्यू होतो. अशा ठिकाणाचे स्मशान म्हणून वर्णन करणे योग्य आहे.

कुत्र्यांचा कळप म्हणजे हपापलेल्या माणसांची झुंड आहे. त्यात हुकूमशहा आहे. मवाळ अनुयायी आहेत. एकच वाक्य अनुयायी बोलतो. तसेच्या तसे वाक्य हुकुमशहा बोलतो, पण त्याच्या हाताशी हिंसक शक्ती असते. त्यामुळे हुकूमशहाचा जयजयकार होतो. अनुयायावर हल्ला होवून तो जखमी, हिनदिन होतो. (विदूषक मधील खार)

कथेतील माणूस हा कलावंत आहे. कलावंतांच्या शब्दांना अर्थहीन समजू नये. हुकूमशहांना ते पचत नाहीत. ते कलावंताला जगू देत नाहीत. ते कलावंताला पिसाळलेला म्हणतात. इंग्लीश मध्ये म्हण आहे. -call a dog mad and kill him - असा हुकूमशहा कलावंतावर हल्ला करून त्याला मारतो. कोणत्याही समाजात हुकूमशहाला मानवेल एवढीच कला जिवंत रहाते. याची उदाहरणे इतिहासात अनेक आहेत. आणीबाणीत, किस्सा कुर्सी का - हा सिनेमा. साम्यवादी रशीयात सैबेरियात धाडलेला नोबेल विजेता - अलेक्सांद्र इसायेविच सोल्झेनित्सिन - त्यांची दी गुलाग ही रचना,नाझी जर्मनीत ज्यू म्हणून संशोधन नाकारलेला आईन्स्टाईन, बांगलादेशात ' लज्जा' कादंबरी लिहीणारी तस्लीमा नसरिन - इत्यादी उदाहरणे या कथेमुळे आठववात. अशा प्रकारे, मानवी समाज, कला, हुकूमशाही, त्याची हिंसा, अनुयायी यांवर प्रखर भाष्य करणारी ही जी ए कुलकर्णी यांची लक्षणीय कथा आहे.

धन्यवाद. - विलास वाघोलीकर

राजेश उनवणे : 👍 👌 ... मार्मिक विश्लेषण.. आवडले. 👍

---'हातभर कुत्र्याने (एक अनुयायी.. तुलनेने साधा किंवा छोटा) मध्येच बोललेले काळ्या कुत्र्यास (नेता)आवडले नाही..त्यास तो जखमी करतो. !' ---

ही या कथेतील एक महत्वाची घटना. तिचा आपण योग्य उल्लेख केला आहे...! 👍

नंतर...

हातभर कुत्र्यास(अनुयायी), माणसाने दयाबुद्धीने ब्रेडचा तुकडा दाखवून जवळ बोलावले, आपुलकीने उचलले पण कुत्रे हातातून निसटून गेले व जाताना माणसाच्या बोटाचा चावा घेऊन गेले.

ही घटना आणि

कथेच्या शेवटी...

----'माणसास मारल्या नंतर परत जाताना तो ब्रेडचा तुकडा हातभर- ज़ख्मी कुत्र्याने उचलण्याचा प्रयत्न करताच फक्त काळ्या कुत्र्याने (नेता आहे तो) पुन्हा त्यास लचका काढला व तो ब्रेडचा तुकडा स्वतः घेऊन गेला. इतरही कुत्रे होते पण त्यांची हिम्मत झाली नाही तो उचलण्याची. '--- ही कथेतील घटनाही तेवढीच महत्वाची.

ही संपूर्ण घटना कोणत्याही काळातील, कोणत्याही राजकीय व्यवस्थेविषयी समाजास प्रचलित असलेल्या अनेक गोष्टींवर प्रकाश टाकते..!

आदरणीय जीए यांची लेखणी अशा अन्याय करणाऱ्या राजकीय व्यवस्थेवर (आणि हा अन्याय प्रत्येक नेता करत असतोच. मग ती 'शाही' कोणतीही असो) त्या नेत्यांच्या सत्तापिपासू , स्वार्थी, दहशती प्रवृत्तिवर "एका छोट्याश्या कथेतून" कठोर प्रहार करते, प्रकाश टाकते तेव्हा जीए यांच्या विलोभनीय प्रतिभेविषयी सांगण्यासाठी शब्द नसतात. फक्त नतमस्तक होणे एवढेच आपल्या हाती असते...!

राजेश उनवणे : सर, आपण अगदी

मार्मिकपणे कथेचे अंतरंग उघडून दाखवले आहे...धन्यवाद 🙏

नेत्याची दहशत ही त्यास सत्ता टिकवण्यासाठी आवश्यक असली तरी त्यात सामन्य-सज्जन माणसेच बळी जातात, हे उघड सत्य आहे. आपण नमूद केलेली उदाहरणे खूपच आवडली. 👌

हुकुमशाहीमध्ये तर हे घडतेच घडते..अगदी उघडपणे...!

राजेशाही मध्ये प्रश्नच उद्भवत नाही...घडणारच..!

लोकशाही मध्ये मात्र लोकशाहीचा मान, लोकांच्या इच्छा मी किती मानतो, जे काही करतो ते लोकांसाठी हे सर्व नेत्यांचा सतत जनतेवर बिंबवण्याचा प्रयत्न असतो..!

तो बुरखा पांघरूनच सत्ता हुकुमशाही मार्गांनेच तो टिकवण्याचा प्रयत्न करत असतो... (धर्मगुरु, कावळ्यांचा नेता व आता हा कुत्र्यांचा नेता)...ही पात्रे त्याचेच द्योतक आहेत असे वाटते. आणि आता आपण दिलेली उदाहरणे...! 👌

धन्यवाद सर.. 🙏

विलास वाघोलीकर: छान प्रतिसाद. आपले लिखाण वाट पहायला लावणारे, मुद्देसूद असते. धन्यवाद

# व्यथा--- पारवा

यतीन गुळवणी : जी. ए.. कुलकर्णी यांची व्यथा ही कथा साधनाच्या अंकात छापून आली असून ती त्यांच्याच पारवा या सप्टेंबर १९६० मध्ये प्रकाशित झालेल्या कथासंग्रहात समाविष्ट केली आहे. निळासावळा नंतरचा पारवा हा जी. ए. कुलकर्णी यांचा हा दुसराच कथासंग्रह आहे. हिरवे रावे या तिसऱ्या कथासंग्रहा नंतरच्या त्यांच्या कथांनी अलंकारिक भाषेत तत्वज्ञानाने ठासून भरलेल्या विचारांची गरुडभरारी घेतली असे म्हटल्यास अनाठायी ठरू नये. १९४० ते १९६० या काळातल्या त्यांच्या कथा सभोवतालच्या समाजात दिसणाऱ्या व्यक्तींच्या, कुटुंबांच्या प्रापंचिक स्वरूपातल्या आहेत. व्यथा ही कथा याच पठडीतली आहे.

या कथेत खाष्ट राधाबाई, तिचे थोडे बावळट असे यजमान भास्करभट व त्या दोघांची उपवर मुलगी कालिंदी अशी तीन मुख्य पात्रे आहेत. भास्करभटाची कमाई काहीच नसते. पण त्याला परसात काही न काही लागवड करण्याची हौस आहे. पण त्याने लावलेली रोपे कोमेजून जात असत. राधाबाई लोका घरी स्वयपाक करून थोडेफार कमावते. कालिंदी शिक्षिकेची नोकरी करून कमवते. तिच्या पगारावर घर चालते..

त्या दिवशी (दोन दिवसापूर्वी कालिंदीला पाहून गेलेल्या) यळूरकराकडील मंडळीकडून बोलणी करण्याकरिता यायची असतात म्हणून राधाबाईची लगबग असते. आदल्या दिवशीच्या नारळाच्या भकलाला कापसासारखा हिरवा बुरा आल्यामुळे नारळ आणण्यासाठी राधाबाई बाहेर जाते.

रमाबाईकडे जाऊन येते असे सांगून जाताना ती भास्करभटाला यळूरकरांकडे "आपली गरज मोठी" म्हणून अगत्याने जाऊन यायला सांगते. इथे ती त्याला मागच्यासारखी अक्कल न पाजळण्याची ताकीद देते. तीन चार वर्षांपूर्वी एका गरीब

मुलाला कालिंदी पसंत पडली होती. दोन दिवसात बाकीच्या गोष्टी ठरणार होत्या. पण कालिंदी गेल्यावर घर कसे चालायचे या धास्तीने भास्करभट त्या घरी जाऊन "कालिंदीला मुलगा पसंत नाही" म्हणून सांगतो. दोन दिवस वाट पाहून नशिबाला दोष दिल्यानंतर खरी हकीकत समजल्यावर " तिच्या पैशावर जगायला काय धाड झालीय आम्हाला? तुम्ही नको पण माझे हातपाय धड आहेत तोपर्यंत राबेन मी. नाहीतर मग दोघेही उडी टाकू विहीरीत एकदाची." असे म्हणत दोन दिवस न जेवता राधाबाई भास्करभटावर तोंडसुख घेते. त्या प्रसंगाच्या आठवणीने 'आपण खरेच विहीरीत उडी मारायला हवी होती' असे त्याच्या पोळलेल्या मनाला वाटे.

राधाबाई बाहेर जाऊन नर्सबाई, गोपाळ, बाळासाहेब, रमाबाई, शांताबाई, वगैरे चार लोकांशी (दोन देऊन चार घेऊन) भांडून गोपाळकडून नारळ उधार घेऊन घरी परतते. कालिंदी येऊन चटईवर पडली होती. भास्करभट यळूरकराकडे गेलाच नव्हता. भेंडीचे झाड घेऊन आलेल्या वासू परांजपेमार्फत त्याने निरोप पाठवून उलट पावली "मुलगी पसंत नसल्याचा" संदेश आणला होता. कालिंदी हे सर्व ऐकते. राधाबाई तिची समजूत काढण्याचा प्रयत्न करते व 'मुतलिकांच्या' भाच्याच्या स्थळाविषयी सांगते. कालिंदी म्हणते "आई, आता पुन्हा नको ते. मला कंटाळा आलाय. मी तुला जड झाले आहे का? सांग, म्हणजे मीच जाते कुठंतरी."

"असं नको ग म्हणू." जडावलेल्या आवाजात राधाबाई म्हणते. तिघे जेउन अंथरुणावर पडतात. दिवस संपतो. सारा वेळ आधारासाठी दिलेली टेकणे कोलमडून पडतात. राधाबाईचे मन आगतिक, लुळे होऊन खाली पडते.

राधाबाईची व्यथा "कालिंदी आपल्या पोटचा गोळा, आपण तिला रक्तमास दिले. दिवस न दिवस प्रेम शिंपून तिला वाढवले. पण हे आपल्या प्रेमाचे रोप कुणाला कसे नको आहे, हे तिला समजेना. उद्या जर पटदिशी आपल्याला काही झाले तर

त्या रोपाला जगात अधांतरी, उपरे, कुणालाही नकोसे सोडून द्यायचे, भरल्या नदीत पाळणा सोडून द्यायचा, कुणालाही नकोसा!...

आणि हा विचर मनी येताच मात्र तिचा ताबा पुर्णपणे सुटतो. कालिंदीला ऐकू जाऊ नये म्हणून ति ओठ दाबून धरते व भोवतालचा अंधार ओलाचिंब करत ती मूकपणे रडू लागते.

नावाप्रमाणेच जी. ए. नि राधाबाईची व्यथा मांडली आहे. राधाबाई खाष्ट, भांडखोर आहे. पण आपली मुलगी व्यापारी, दुकानदार, शाळा मास्तर कुणालाच नको आहे. तिने पुष्कळश्या चित्राकडे बोट दाखवले; पण तिचे बोट रोखले जाताच ती सारी चित्रे एकामागोमाग नाहीशी होतात. ही व्यथा रंगवताना राधाबाईच्या खाष्ट स्वभावाचा मुखवटा उसवतो.

सदर कथेत कालिंदीची व्यथासुद्धा समोर येते. कालिंदी दिसायला अगदीच साधी आहे. ती ठेगणी असल्यामुळे तर ती निबर व रानवट वाटते. चेहऱ्यावरच्या बारीक लवेची तिला शरम वाटते. चारचौघात असताना आपल्याकडे कुणी पाह्यला नको म्हणून ती नेहमी गप्प असते. खाली मन घालूनच ती आयुष्यात एकापुढे एक पावले टाकते.

जाता जाता भास्करभटाची व्यथा! त्याने परसात लावलेली झाडे वाढतच नाहीत.

वास्तविक या धडपडीत कुणाचीच चूक नाही. हे तिघेही कुटुंबातील सदस्य आपापल्या परीने प्रयत्न करतात. पण नियतीच्या फेऱ्यात गरगर फिरत राहतात. वर गरिबीच्या शापामुळे भरडली जातात...

कथेची गुंफण घट्ट आहे. घटनाक्रम धावता व सुसंगत आहे. भाषा मनोवेधक आहे. उदाहरणार्थ ' एखादे बी जमिनीत घालावे, त्यावर पाणी ओतत राहावे.

जमिनीच्या अंधारात अनेक तऱ्हेची किमया होत राहते. विशाल वाड्याचे दरवाजे उघडत जावे त्या प्रमाणे पापुद्र्यावर पापुद्रे उघडत जातात आणि आत सुप्त असलेला जीवकण अंधाराचे पडदे बाजूला करीतकरीत वर चढतो आणि शेवटी हिरव्या टोकाने प्रकाश गाठतो. त्याच्या व आपल्याही जीवनातील तृप्तीचा, सफल्याचा तो कोंभ !.

दिलिप बडे: कथेच नाव व्यथा,पण बी मध्ये लपलेल्या अदृश्य शक्यतांच कोंबातुन पसणार असिम विश्व याचाही ऊल्लेख.दोन्ही भावणारे.

विलास वाघोलीकर: यतिन गुळवणीजींनी या चटका बसणाऱ्या कथेचे चांगले विवेचन केले आहे, त्याबद्दल त्यांना धन्यवाद देतो.

- जीएंनी लिहीलेल्या एकेक कथेत ,एकेक जीवन , टीपकागदासारखे टिपलेले असते. आपण वाचक म्हणून आपल्याला त्या आकृतीचे चित्र कसे उमटलेले वाटले हे निश्चितपणे सांगावे. जी एंच्या, भूक, रात्र झाली गोकुळी, काकणे, जन्म इत्यादी अनेक कथांत दारिद्रय, भूक यांची चित्रे रंगवली आहेत. व्यथा या कथेत तिहेरी घटकांच्या कुटुंबातही कसे दारिद्रय नांदते हे दाखवले आहे. राधाबाईचा स्वभाव, दोन घ्यायचे दोन द्यायचे ,असा खणखणीत आहे. पण गरीबीने तिला सतत माघार घ्यावी लागते. समाजात गरीबीला नाती नसतात. राधाबाईला प्रत्येकवेळी गरीबीचा चटका सहन करावा लागतो. महिलांच्या गटात कसे हेवेदावे असतात, आडवे तिडवे प्रवाह असतात हे जीएंनी निरिक्षणशक्तीने कथेत पुरेपूर दाखवले आहे.

- भास्करभटाच्या झाडे लावण्याच्या बेलगाम छंदाचे मर्म या कथेत वाचण्यासारखे आहे. हिरव्या मिरच्यांच्या शेताचे वर्णन, झाड कसे वाढते याची जादूमय करामत यांतून जीएंचे वनस्पतींवरचे प्रेम दिसते. हा भाग स्वामी कथेशेवटच्या वेलाची आठवण करून देतो.

- कालिंदीच्या भूमिकेत, वयाने वाढलेल्या, (विशेषतः गरीब असलेल्या, फारसा आधार नसलेल्या) तरुणीचे काजळलेले दुःख दाखवले आहे. लहानपण सरले आहे. तरुणपणातून जीवनातील स्थिरता मिळालेली नाही, अशा मधल्या कालखंडातील दिवस काजळलेले असतात. दर दिवशी आशा व जास्त करून निराशा भोगावी लागते, त्याचे जीएंनी मायेने वर्णन केले आहे. (जाता जाता - शिक्षण संपून बेकारीत असलेल्या मुलांनाही हा वेगळा काजळलेला अनुभव येतो)

- प्रश्न उभे करणारी पण उत्तर न सापडलेली अशी ही जीएंची लक्षणीय ' व्यथा 'कथा मनाला चटका लावून जाते.

धन्यवाद. व्ही एस वाघोलीकर

🙏 💐 💐 💐 💐 💐 💐 💐 💐 🙏

सुनीळ सामंत: पारवा या कथा संग्रहातील सर्वच कथांचा एक वेगळा असा वर्ग आहे. या कथांतून जीएंच्या सर्वसामान्य माणसांच्या आयुष्यातील बारकाव्यांची जाण जाणवते. अगदी सूक्ष्मातली सूक्ष्म दुःखंही जीए या कथांत टिपतात.

जीएंनी स्त्रियांच्या मानसशास्त्राचा अभ्यास या कथेत फ़ार बारकाव्याने दाखवला आहे. विशेषतः राधाबाई जेव्हा रमाबाईंच्या घरात जातात तेव्हा पापड लाटायला जमलेल्या बायकांतल्या संवादातून त्यांचा तो सूक्ष्म अभ्यास उलगडतो. हसत हसत टोमणे मारणे, जिरवणे, आतून जळत असताना वरवर काहीही न दाखवणे, अ जेव्हा ब ला टोमणे मारते तेव्हा क चे आतून सुखावणे या सर्व भावनांचे दर्शन जीए कोणताही आव न आणता घडवतात.

आपल्या ग्रुपवरील प्रमदा देसाई मॅडम जीएंच्या कथांतील स्त्री या विषयावर पुस्तक लिहीत आहेत त्याबद्दल मला अत्यंत कुतुहल आहे ते याचसाठी. स्त्रीमुक्ती वगैरे बद्दल कोणतेही वाद न घालता जीएंनी स्त्रीवरील अन्याय ऐरणीवर आणला.

यतीन गुळवणी : सुनीळसर आपण फार योग्य नोंद केली आहे. जीए मानवी स्वभावाचे कंगोरे अत्यंत सफाईने दाखवतात.

# शलॉट --- कथासंग्रह पारवा

विलास वाघोलीकर:

🙏 💐 💐 💐 💐 💐 💐 🙏

माननीय सुनीळजींच्या सूचनेप्रमाणे, शलॉट कथेचे सूतोवाच देत आहे. ही कथा , पारवा पुस्तकात आहे. विवेचनाचे दोन भाग आहेत -

इंग्लीश शलॉट कविता

मराठी शलॉट कथा.

तरी वाचकांनी कथा मूळातून वाचावी/खालील विवेचन वाचावे. व कृपया आपला प्रतिसाद 2 / 3 परिच्छेदांमध्ये अवश्य द्यावा.

धन्यवाद. विलास वाघोलीकर.

🙏 💐 💐 💐 💐 💐 💐 💐 💐 🙏

विलास वाघोलीकर:

🙏 💐 💐 💐 🙏

शलॉट कथा - लेखक जी ए कुलकर्णी, कथासंग्रह पारवा

विवेचक - व्ही एस वाघोलीकर

🙏 💐 💐 💐 💐 💐 💐 💐 💐 🙏

भाग एक - शलॉट - इंग्लीश कविता

- जीएंनी या कथेला ,मूळ टेनीसन यांच्या प्रसिद्ध

इंग्लीश कवितेशी साम्य दाखवणारे शलॉट हे नाव दिले आहे. ही अपोक्रिपा म्हणजे मूळ कथेचे कलात्मक रूपांतर आहे. कारण त्यांना मूळ कवितेबद्दल काही विशेष ललित सांगायचे आहे. अशा प्रकारे त्यांनी इतर ऑर्फियस, यात्रिक या अपोक्रिपा लिहिल्या आहेत. या प्रकारात वाचकावर जबाबदारी येते की त्यांनी मूळ कविता / लिखाण इत्यादी समजून घ्यावे व नंतर जीएंची कथा वाचावी. म्हणून खाली मूळ इंग्लीश कवितेचा गोषवारा व शेवटी मूळ कवितेची गूगल लिंक देत आहे.

इंग्लीश शलॅटचा गोषवारा -

- I) पहिले कडवे - एलिन नावाच्या राजकन्येला शलॉट बेटावर एकांतवासात म्हणजे कैदेत ठेवले होते. बेटाशे…

विलास वाघोलीकर: 💐 💐 💐 💐 💐 💐 💐 💐 🙏

विवेचन -भाग दोन- शलॉट - मराठी कथा. विवेचक - व्ही एस वाघोलीकर

- जीएंची मराठीतील शलॉट कथा, ही रुपांतरीत, ललित, वेगळी कलाकृती आहे. जीएंनी कथेचे नाव तेच देवून मूळ कवितेशी अर्थाचे साम्य आहे हे स्वतः मान्य केले आहे. पण कथेचे वातावरण आताचे, स्थळ कर्नाटकमधील शहरातील गल्लीचे, नायिका सुंदर नसून, लंगडी, सरड्यासारख्या पायांची, गरीब परिस्थितीतील असा बदल आहे. कारण ही जी एंची अपोक्रिया आहे.

- पण माणसांच्या दुःखात विलक्षण साम्य आहे. काशीला अपंगत्वाचा व लहानपणापासून क्रूर बापाच्या त्रासाचा शाप आहे. यातही नियती ही प्रधान नायिका

आहे. कुरूप पाय तिला आयुष्यभर सहन करावे लागणार. प्रत्येक अपंगाला ते भागधेय म्हणून सहन करावे लागते. त्याशिवाय काशीला बापाच्या हेटाळणीचा भूतकाळ हा यापुढेही मानसिकतेने सहन करावा लागत आहेत. ही परिस्थिती मृत्यूसम असल्याने कथा मूळ इंग्लिश कवितेशी समांतर जाते.

काशी ही अजाण , गरीब परिस्थितीतील तरुणी आहे. ती अपंग आहे. सरड्यासारखे पाय असलेली आहे. तिचा बाप क्रूर होता व त्याने तिचा, तसेच तिच्या आईचा छळ केला. काशी जरा मोठी झाल्यावर त्याने तिला फडताळाचे छोटे दुकान एका गजबजलेल्या रस्त्यावर काढून दिले आहे. त्यात बसून ती दिवसभर विकते - खडीसाखर, काडेपेटी, साखरकांडी , गोळया, बिस्किटे ,शेंगदाणे , विड्या , सिगारेट , इत्यादी ती विकत असते.व सतत स्कार्फ , रुमाल असे काहीतरी (इंग्लीश कवितेप्रमाणे) विणत असते. काशीचा बाप अनेक वर्षांच्या दुखण्याने मेल्यानंतरच्या दुसऱ्या दिवशी कथा सुरु होते. इंग्लीश कवितेप्रमाणेच तिचाही आरसा फुटतो.

(येथे तिची नंतरची मृत्यूसमान परिस्थिती सूचित होते)सकाळचे नऊ वाजले.. ती कंटाळून उशीरा दुकानात जाते. तेथे दुकानाच्या फडताळातून आरशाच्या प्रतिबिंबाप्रमाणे तिला घटना दिसतात -

शाकंबरी देवळाच्या दर्शनाला जाणारे भक्त, नारळ फुले विकणारा नामू, सिगारेट ओढणारा आशाळभूत गुंजीकर, जवळच्या शाळेतील एकत्र जाणाऱ्या मुली, जवळचे सुतिकागृह व तेथली नर्स, देवळापुढली भिकारी वेडसर म्हातारी, डान्स क्लासला येणारे मास्तर व मुली तसेच त्यांची प्रिया मोहिनी इत्यादी तिला दिसतात. ही प्रतिबिंबांसमान असतात. कारण तिच्या अपंगत्वामुळे ती घटनांत प्रत्यक्ष सहभागी होवू शकत नाही. इंग्लीश कवितेशी हे साम्य आहे.

काशी तरुण आहे. त्यामुळे तिच्यात तारुण्यसुलभ भावना जागृत झाल्या आहेत. इतके दिवस बापाचा कडक पहारा होता. पण आता आजुबाजूचे संस्कारहीन पुरुष तिच्या भोवती घोटाळायला लागले आहेत. त्याप्रमाणे तिच्यात व इतरांच्यात फ्रॉईडियन 'इड 'ची उपस्थिती अनेक वेळा दिसते. उदाहरणार्थ-

सुतिकागृहातील बायका म्हणतात, "तुम्हाला काही अनुभव नाही ".

- सकाळी नामू दुधवाला उंबरठ्याच्या आत येतो. तोच रात्री 9 वा. दार खडखडवतो.

-डान्स क्लासचा टिचर अग्नीहोत्री, तरुण मोहिनी शिकायला आली की दार लावतो. काशी डोकावून पाहते तर ते दोघे बेडवर जवळ असतात.

-काशीला लक्ष्मणशी लग्न व्हावे असे वाटते. पण त्याचे दुसरीशी थाटात लग्न होते.

-काशी पहाते की रमाबाईचे पातळ छान असते.

-कमलचा नवरा कामावरून आला की तो तिचे दोन्ही हात धरतो.

-म्हातारा गुंजीकर शाळा सुटून मुली येताना घराबाहेर थांबतो. तो थिएटरच्या बाहेर बायकांकडे पहात सिगारेट ओढत उभा राहतो.

**

इंग्लीश कवितेतील राजकन्येप्रमाणे काशीचा धक्कादायक मृत्यू झाला नाही. पण कुरूप पाय व हेटाळणी करणाऱ्या बापाचा भूतकाळ, हे यापुढेही नियती म्हणून उभे आहेत. राजकन्येचे व काशीचे दुःख समान असते. व दोघींचीही परवड होते.त्यामुळे अदृश्य तुरुंगात तिला रहावे लागणार आहे. ती आलेला दिवस ढकलते व तिला पुरुष प्रधान परिस्थिती मुकाट सहन करावी लागते..... हे वातावरण उदासवाणे असते. सरड्याप्रमाणे पाय घेवून ती बाहेरच्या जगात उभी राहू शकत नाही. त्यातून स्वप्ने असली तरी एकटेपणाची भावना राहते. त्यापासून दूर जाण्याचा

प्रयत्न करते पण इंग्लीश कवितेप्रमाणे मृत्यू न येता, मृत्यूसम परिस्थितीत रहावे लागणार असते.

काशीचा दुकानातला दिवस संपतो.संध्याकाळी दुकानातून बाहेर पडल्यावर काशी सिनेमाचे पोस्टर पहाते. त्या चित्राद्वारे मराठी शलॉटचे इंग्लीश शलॉटशी साम्य सूचित केले आहे. जी ए लिहितात -

"- - -सिनेमाच्या जाहीरातीच्या गाडीला दोन पोस्टरे होती. एका चित्रात मागच्या बाजूला डौलदार आयाळीचा पांढरा घोडा होता व त्यापुढे, कानात रुंद रिंग घातलेला एक धिप्पाड देखणा पुरुष हातात वाकडी तलवार घेऊन उभा होता. काशीची बोटे त्याच्या दंडावरून हळुवार फिरली, थरारली. तिने त्याच्याकडे टक लावून पाहिले. तोही आपल्याकडेच रोखून पाहात आहे असे तिला वाटले व ती एकदम अस्वस्थ झाली. तिने नजर चटकन उचलली आणि दुसऱ्या चित्राकडे लावली. मोहनाच्या जांभळया पातळासारख्या आभाळात चंद्र आहे.खाली, काठाने फुले उमललेली असलेली नदी असून तिच्यातून हंसाच्या आकाराची होडी चालली आहे. तिच्यात रेशमाची केलेली असल्याप्रमाणे दिसणारी सोनेरी राजकन्या रेलून झोपी गेली आहे. काशीचे डोळे मोठे झाले व तिने उत्कटपणे आपली बोटे एकमेकात गुंतवली. नदीचे निळसर निळे पाणी अगदी थंडगार आहे. त्या फुलांच्या वासाने तर सारे

अंग जडावते. त्या होडीचे शुभ्र प्रतिबिंब जसेच्या तसे पाण्यात आहे. वळसे घेत नदी दूर शहराकडे गेली आहे, व तेथील वाडे, घुमट, मनोरे, झाडींमधून अस्पष्ट दिसतात. राजकन्येच्या पायाखालील लाल मखमली उशीला काशीच्या पायाचा स्पर्श झाला. फुलांवरून वासाने झिंगून येणारा वारा तिच्या छातीला लागला, व ती वेड्यासारखी त्या होडीमागोमाग चालू लागली. थोड्या अंतरावर अगदी खाली आलेल्या एका फांदीला होडी तटली.

.. " सारा सिनेमा रंगीत आहे ? " तिने गाडीवाल्याला विचारले."तर काय ! त्यात दोन नाच फार मस्त आहेत. "

" फार गर्दी असेल नाही ? " काशीने चाचरत विचारले.

" गर्दी कसली, ह्येः ! " थुंकत गाडीवाला म्हणाला, “ पिक्चरनं मार खाल्ला. पाच-लोकदेखील नव्हते काल. " (या वर्णनातून जीएंनी इंग्लीश शलॉटचा सूचक संदर्भ दिला आहे. मात्र जीएंना चांगल्या कलाकृतीबद्दल काही सुचवायचे आहे?)...

...त्यानंतर काशी थिएटरवर जाते. जीएंनी थिएटर भोवतालची परिस्थितीचे यथातथ्य वर्णन केले आहे. ती तिकीट काढणार असते. पण त्याआधी तिच्या अपंगत्वाची हेटाळणी होते. समाजात अनेक लोक अपंगांना हिणवतात. त्यामुळे अपंगांना शारीरिक त्रास होत असतो. त्यात मानसिक त्रासाची खूप भर पडते. बिचाऱ्या काशीच्या मनाला ते खूप झोंबते.इंग्लीश शलाटमध्ये राजकन्या शापाची अट मोडल्याने मरते. मराठी शलॉटमध्ये काशी अंधारात परत खुराड्यात येवून मरणप्राय जीवन जगते व येथेच ही लक्षणीय कथा संपते.

समाजाच्या कोपऱ्यात राहणाऱ्या माणसांची अगतिकता जीए दाखवात. जीएंच्या कथांमध्ये अपंगांचे स्थान कळेल असे आहे. उदाहरणार्थ - राणीत अंध भाऊ, लंगडा गोविंदाचार्य, काळी आजी, बाधात रमा, बळीत अमाशी, जखम मध्ये बापू, भोवरे मध्ये नमूताईचा माधव, वीज मध्ये बळवंत इत्यादी. हे जन्मजात बदल न करता येणारे अपंगत्व, सतत डोक्यावर ठेवून त्यांना आयुष्य काढावे लागते. ते मानवी समाजात रहात असल्याने मानवी घटक त्यांना कुचेष्टेचे, अडवणूकीचे दगड मारत असतात. त्या मानसीक जखमा, शारीरीक जखमांबरोबर त्यांना भागधेय म्हणून सहन कराव्या लागतात.शांता शेळके यांनी म्हटल्या प्रमाणे, जीएंच्या कथांमध्ये, नियतीच्या सर्पफण्याखाली माणसे वावरत असतात..जी ए कथेशेवटी लिहितात. -

"- -पण तिने दरवाजा लावून खिडकीही बंद केली आणि अंधारातच अंग चोरून बसली.या साऱ्या वस्तू टाकल्या, पण हे पाय मात्र टाकता आले नाहीत ! तिला त्या सरड्याची आठवण झाली. तो खूप मोठा मोठा होत खोलीभर झाला. त्याचे पाय व आपले पाय एकच आहेत, परंतु तो बापाच्या कर्कश आवाजाने बोलतो. मग नलूला आपली लाज वाटते, रामूदेखील आपल्याकडे बोट दाखवून त्या मुलीसमोर हसतो. काशीला एकदम सारे नकोसे वाटू लागले. कुणी तरी आपणाला दूर कुठे येथून नेतील, अंगावरचे वळ निवतील...पुन्हा आवाज झाला.

कुणी तरी दार ठोठावले... आत बारीक केलेल्या कंदिलाचाही प्रकाश नाही....मग ती अंधारात स्थिरावली. तिला वाटू लागले, या मळकट धुरकटलेल्या चार भिंतींत आपण सुरक्षित आहोत. पायांना बांधलेल्या साखळयांनी बापाचे कायम गुलाम आहोत. बाहेरच्या वाहत्या जीवनाचा स्पर्श नको. तेथे आपले आहे तरी काय ?येथून जायचे म्हणजे चौघांच्या खांद्यांवरूनच !दुपारच्या उन्हात भुताप्रमाणे आपण तेथे उगाच गेलो वेड्यासारखे ! आपले स्थान इथे. त्यांना स्वतःचाच प्रकाश असल्याप्रमाणे त्या खोलीतील वस्तू तिला अंधारातही

जाणवू लागल्या. धुराने काळवंडलेली चुलीमागील भिंत, फुटलेल्या आरशाचे तुकडे, लाल साडी, हिरवी करवंदी माळ, हिरव्या -लाल रंगांनी विणून ढिगारा केलेले गत दिवस..रात्र आता गडद झाली, व चार डोळयांच्या मनोऱ्यातून नवाचे ठोके पडले. पण

आपण परत आलो की नाही हे पाहण्यासाठी बापच नऊ हातांनी अंधारात चाचपडत जोडल्याप्रमाणे काशीने अंग चोरले व शेवटी अंधारालाच नवे ठिगळ जोडल्याप्रमाणे ती तेथेच आडवी झाली.

येथेच ही लक्षणीय कथा संपते.

🙏 💐 💐 💐 💐 💐 💐 💐 💐 🙏

टीप - I) माननीय अतुल ठाकुर व माननीय अशोक पाटील यांनी शलॉट कथेवर पूर्वी विवेचन केले होते. मला त्याचा या लिखाणात खूप उपयोग झाला. मी त्यांना धन्यवाद देतो.

2)इंग्लीश शलॉटशी संबंधित पेंटींग्जच्या लिंक्स, तसेच ती इंग्लीश कविता , खाली माहितीसाठी देत आहे -

🙏 💐 💐 💐 💐 💐 💐 💐 💐 🙏
धन्यवाद. - विलास वाघोलीकर

🙏 💐 💐 💐 💐 💐 💐 💐 💐
विलास वाघोलीकर: परिशिष्ट - कविता - https://www.poetryfoundation.org/poems/45359/the-lady-of-shalott-1832

विलास वाघोलीकर: https://images.app.goo.gl/GUgVggY8k26VjjxAA

सुनीळ सामंत: अतिशय सुंदर विवेचन. मला यातलं (मूळ कविता वगैरे) काहीच माहिती नव्हतं. जीएंच्या इतर कथांप्रमाणेच एक कथा म्हणून मी ही वाचत गेलो. त्यातल्या अनेक भावनांशी रिलेटही झालो.

तुम्ही विवेचनाच्या शेवटी अतुल ठाकूर आणि पाटील सरांचे आभार मानले व श्रेय दिले ही फ़ार मोठी गोष्ट आहे. सहसा हल्ली तसे कोणी करत नाही.

संजीव सावरगांवकर: वाघोलीकर सर शतशः प्रणाम. कथा कशी बहरते व त्यामागील काय सूत्र असू शकते याचे विचारपूर्वक केलेले मनोहारी शब्दांकन म्हणजे तुमचे ओघवते विवेचन आहे. थोडे आउट of ट्रॅक जाऊन म्हणतो "काही वेळा वाटते लिहण्यापेक्षा सांघिक चर्चा जास्त आनंद देऊ शकतील. महिन्यातून एकदा भेटून अशा कथा बाबत बोलणे संयुक्तिक असेल". असो. तुमच्या मित्रांचे ही आभार कारण त्या

संजीव सावरगांवकर: त्यांचे विचार व पाठविलेल्या लिंक्स मुळे कथा वाचन आणखीन बहरणार हे निश्चित. धन्यवाद.

मंजिरी देशमुख: लेडी ऑफ शेलॉटचा संदर्भ प्रत्यक्ष इंग्रजी कविता व त्या संदर्भातील चित्रं देऊन तुम्ही शेलॉट या कथेचं अतिशय सुंदर विश्लेषण केलंत व कथा किती बारकाईने वाचायला हवी याचा वस्तुपाठ दिलात. ही कथा पुन्हा वाचताना निराळा आनंद नक्कीच मिळणार. खूप धन्यवाद!

विलास वाघोलीकर: अगदी बरोबर. कथेच्या नावापासून ही कथा इंग्लीश श लॉट कवितेचा संदर्भ देते हे कळत होते. जीएंनी लिहिले आहे - कथा लिहिताना मी खूप कष्ट घेतो. वाचकांनीही किमान अभ्यास करावा, असे मला वाटते. जीएंचा कथा वाचणारा लाईट वाचक असणार नाही. त्यामुळे जास्तीत जास्त संदर्भ दिले आहेत. आपल्यासारख्या साक्षेपी वाचकांनी त्याचा अर्थ (इंटरप्रिटेशन) जास्त सांगावा ही विनंती. आपण आवर्जून प्रतिक्रिया दिलीत, याबद्दल धन्यवाद. गुड डे. विलास वाघोलीकर

रमा गर्गे: काशी हे नाव नायिकेला असणे हे विशेष आहे!

काशी किंवा वाराणसी,बनारस ही नगरी प्राचीन आहे! पाप धुऊन पुण्य देणारी, शिवशंकराची नगरी,पण हिची दुसरी बाजूही आहे-

इथे नकोश्या गोष्टींना आणून टाकले जाते,विधवा,वृद्ध,अनाथ,अपंग यांची वस्ती इथे असते।देव सांभाळतात या विश्वासावर हे चालते।तसेच येथील दहन घाट सतत चिता जाळीत असतात।

कथानायिका काशीचे आंतरिक जीवन व बाह्य परिवेश यांचा वाराणशीशी बरेच संयोग दर्शवतो।

सुनीळ सामंत: शलॉट पुन्हा वाचली. विलासजींच्या विवेचनानंतर.

तरीही या कथेत जीएंनी जी विविध व्यक्तीचित्रे गडदपणे रेखाटली आहेत त्यांचाच प्रभाव जास्त पडला. मुख्य कथेहूनही. बाप, नामू गवळी, नार्वेकरंची रमाबाई, हायस्कुलच्या मुली, म्हातारा लठ्ठ गुंजीकर, पार्वतीबाई, डॉक्टर साठे, सुशीलाबाई, रामू हणमशेट, वेडी म्हातारी, अग्नीहोत्री मास्तर, वकीलाची बायको मोहना, अशी सगळी पात्रं (हे सगळं त्या कवितेत असेल?) मला तरी मार्रिओ मिरांडाच्या चित्रासारखी एकत्र पण वेगवेगळी दिसतात. प्रत्येक व्यक्तीला तिचे तिचे स्वतंत्र व्यक्तीमत्व आणि सजीव परिसर आहे आणि तरीही या सर्व गोतावळयाला एक प्रकारची एकसंघता आहे. मी स्वतः अशा प्रकारच्या लहान गावांत राहिलेला असल्याने मला ते चित्र अगदी ओळखीचे वाटते.

शलॉट कथेच्या मुख्य आत्म्याच्या बाहेरची असली तरी ही सर्व पात्रे खास जीए (अरभाट आणि चिल्लर) अनुभव देतात.

सुनीळ सामंत: The Lady of Shalott (1832)

BY ALFRED, LORD TENNYSON

Part I

On either side the river lie
Long fields of barley and of rye,
That clothe the wold and meet the sky;
And thro' the field the road runs by
 To many-tower'd Camelot;
The yellow-leaved waterlily
The green-sheathed daffodilly
Tremble in the water chilly
 Round about Shalott.

Willows whiten, aspens shiver.
The sunbeam showers break and quiver
In the stream that runneth ever
By the island in the river
 Flowing down to Camelot.
Four gray walls, and four gray towers
Overlook a space of flowers,
And the silent isle imbowers
 The Lady of Shalott.

Underneath the bearded barley,
The reaper, reaping late and early,
Hears her ever chanting cheerly,

Like an angel, singing clearly,
 O'er the stream of Camelot.
Piling the sheaves in furrows airy,
Beneath the moon, the reaper weary
Listening whispers, ' 'Tis the fairy,
 Lady of Shalott.'

The little isle is all inrail'd
With a rose-fence, and overtrail'd
With roses: by the marge unhail'd
The shallop flitteth silken sail'd,
 Skimming down to Camelot.
A pearl garland winds her head:
She leaneth on a velvet bed,
Full royally apparelled,
 The Lady of Shalott.

Part II
No time hath she to sport and play:
A charmed web she weaves alway.
A curse is on her, if she stay
Her weaving, either night or day,
 To look down to Camelot.
She knows not what the curse may be;
Therefore she weaveth steadily,

Therefore no other care hath she,
 The Lady of Shalott.

She lives with little joy or fear.
Over the water, running near,
The sheepbell tinkles in her ear.
Before her hangs a mirror clear,
 Reflecting tower'd Camelot.
And as the mazy web she whirls,
She sees the surly village churls,
And the red cloaks of market girls
 Pass onward from Shalott.

Sometimes a troop of damsels glad,
An abbot on an ambling pad,
Sometimes a curly shepherd lad,
Or long-hair'd page in crimson clad,
 Goes by to tower'd Camelot:
And sometimes thro' the mirror blue
The knights come riding two and two:
She hath no loyal knight and true,
 The Lady of Shalott.

But in her web she still delights
To weave the mirror's magic sights,
For often thro' the silent nights

A funeral, with plumes and lights
 And music, came from Camelot:
Or when the moon was overhead
Came two young lovers lately wed;
'I am half sick of shadows,' said
 The Lady of Shalott.

Part III

A bow-shot from her bower-eaves,
He rode between the barley-sheaves,
The sun came dazzling thro' the leaves,
And flam'd upon the brazen greaves
 Of bold Sir Lancelot.
A red-cross knight for ever kneel'd
To a lady in his shield,
That sparkled on the yellow field,
 Beside remote Shalott.

The gemmy bridle glitter'd free,
Like to some branch of stars we see
Hung in the golden Galaxy.
The bridle bells rang merrily
 As he rode down from Camelot:
And from his blazon'd baldric slung
A mighty silver bugle hung,

And as he rode his armour rung,
 Beside remote Shalott.

All in the blue unclouded weather
Thick-jewell'd shone the saddle-leather,
The helmet and the helmet-feather
Burn'd like one burning flame together,
 As he rode down from Camelot.
As often thro' the purple night,
Below the starry clusters bright,
Some bearded meteor, trailing light,
 Moves over green Shalott.

His broad clear brow in sunlight glow'd;
On burnish'd hooves his war-horse trode;
From underneath his helmet flow'd
His coal-black curls as on he rode,
 As he rode down from Camelot.
From the bank and from the river
He flash'd into the crystal mirror,
'Tirra lirra, tirra lirra:'
 Sang Sir Lancelot.

She left the web, she left the loom
She made three paces thro' the room
She saw the water-flower bloom,

She saw the helmet and the plume,
 She look'd down to Camelot.
Out flew the web and floated wide;
The mirror crack'd from side to side;
'The curse is come upon me,' cried
 The Lady of Shalott.

Part IV

In the stormy east-wind straining,
The pale yellow woods were waning,
The broad stream in his banks complaining,
Heavily the low sky raining
 Over tower'd Camelot;
Outside the isle a shallow boat
Beneath a willow lay afloat,
Below the carven stern she wrote,
 The Lady of Shalott.

A cloudwhite crown of pearl she dight,
All raimented in snowy white
That loosely flew (her zone in sight
Clasp'd with one blinding diamond bright)
 Her wide eyes fix'd on Camelot,
Though the squally east-wind keenly
Blew, with folded arms serenely

By the water stood the queenly
 Lady of Shalott.

With a steady stony glance—
Like some bold seer in a trance,
Beholding all his own mischance,
Mute, with a glassy countenance—
 She look'd down to Camelot.
It was the closing of the day:
She loos'd the chain, and down she lay;
The broad stream bore her far away,
 The Lady of Shalott.

As when to sailors while they roam,
By creeks and outfalls far from home,
Rising and dropping with the foam,
From dying swans wild warblings come,
 Blown shoreward; so to Camelot
Still as the boathead wound along
The willowy hills and fields among,
They heard her chanting her deathsong,
 The Lady of Shalott.

A longdrawn carol, mournful, holy,
She chanted loudly, chanted lowly,
Till her eyes were darken'd wholly,

And her smooth face sharpen'd slowly,
 Turn'd to tower'd Camelot:
For ere she reach'd upon the tide
The first house by the water-side,
Singing in her song she died,
 The Lady of Shalott.

Under tower and balcony,
By garden wall and gallery,
A pale, pale corpse she floated by,
Deadcold, between the houses high,
 Dead into tower'd Camelot.
Knight and burgher, lord and dame,
To the planked wharfage came:
Below the stern they read her name,
 The Lady of Shalott.

They cross'd themselves, their stars they blest,
Knight, minstrel, abbot, squire, and guest.
There lay a parchment on her breast,
That puzzled more than all the rest,
 The wellfed wits at Camelot.
'The web was woven curiously,
The charm is broken utterly,
Draw near and fear not,—this is I,
 The Lady of Shalott.'

राजेश उनवणे : सर,

सचिन, विराट सारख्या कसलेल्या फलंदाजाने अतिशय कमी चेंडूत खणखणीत शतक ठोकल्यानंतर जसे डोळ्याचे पारणे फेडणारा आनंद होतो, अगदी तसाच आनंद मिळाल्याची भावना आपल्या सखोल विवेचनानंतर झाली आहे.

म्हणजे प्रथम "द लेडी ऑफ शलॉट' कविता वाचावी. नंतर जीएंची "शलॉट' कथा वाचावी. आणि मग सर आपल दोन्हीवरती भाष्य करणारे अभ्यासपूर्ण रसग्रहण वाचावे. म्हणजे विषयच संपला. The End.

खुपच सुंदर, सर.....दिल खुश हुआ...! 👌 👍 👌

दोन्ही कलाकृती जसाआनंद देतात तसाच आनंद आपल्या सुतोवाच मधून मिळतो.

दोन्ही कलाकृतीमधील सौन्दर्यस्थळे, आपण अतिशय मार्मिकपणे दाखवली आहेत. मनापासून खूपखूप धन्यवाद सर...! 🙏

(टीप -२०१९ च्या कोरोंना काळात शलॉट वर हॉलीवुडमध्ये एक चित्रपट बनवण्याचे काम सुरू झाले होते. तो २०२३ मध्ये रीलीज होणार होता. पण तो अजून झाला की नाही माहिती नाही. गूगल वर पण release विषयी माहिती नाही. कोणास काही माहिती आहे का? 🙏 )

दिलिप बडे: https://youtube.com/watch?v=v7bi6ysVRE8&si=EnSIkaIECMiOmarE

राजेश उनवणे : खरे आहे... जीए नेहमीच प्रत्येक कथेत पात्रांची नावे वैशिष्ट्यपूर्ण ठेवतात...मूळ कथेतील मुख्य विषयाचे प्रतिबिंब नेहमीच या नावात पडलेले, दडलेले असते. आपण सांगितलेला अर्थ भावला...! 👌 धन्यवाद 🙏

जयश्री जंगले : मला वाटतं, जी. एं. ची शलाॅट ही मूळ कवितेचा व्यत्यास आहे. कवितेत तिच्या किल्ल्याबाहेरचे जग सुंदर आहे. तिला तिथे जाण्याची उत्सुकता आहे. इथे काशी बाहेरच्या जगाची कुरूपता जाणते. अधिकाधिक आक्रसते. शलाॅट बाहेर पडून स्वातंत्र्यासाठी प्राणांची किंमत देते. काशीने दररोजच्या बंधनातले मृत्युवत् जीवन स्वीकारले आहे.

विलास वाघोलीकर: धन्यवाद. अशाच वेगवेगळ्या इंटरप्रिटेशनची अपेक्षा आहे. तर या अवघड कथेला न्याय देता येईल. कृपया आणखी सविस्तर लिहावे ही विनंती. विलास वाघोलीकर

# शिक्षा--- हिरवे रावे

सुनीळ सामंत: शिक्षा- जी ए कुलकर्णी (प्रथमप्रसिद्धी- रहस्यरंजन- १९६०)

कथासंग्रह- हिरवे रावे

============

छोट्या शहरात रहाणाऱ्या, मराठी , मध्यमवर्गीय, तरुण मुलीची ही वेदनामय कथा वैश्विक आहे. स्थलकालातीत आहे.

विनयभंग हा स्त्रियांच्या वाटेला येणारा वैश्विक अनुभव. त्याचे विविध बटबटीत प्रकार आहेत तसे अनेक छुपे, सटल प्रकार आहेत. रस्त्याने जाणाऱ्या मुलींची छेड हा तर नेहमीचाच प्रकार. तो पाहून न पाहिल्यासारखे करत जाणारे असंख्य स्त्रीपुरुष असतात. काही त्याचा आनंद घेतात तर काही मनातल्या मनात संताप होत असताना तसेच पुढे निघून जातात. बहुतेक लोक त्याकडे दुर्लक्ष करतात, पण जीएंनी 'शिक्षा ' या कथेत हा प्रकार किती जीवघेणा आणि मन नासवणारा असतो याची जाणीव करून दिली आहे. तरुण मुलीच्या दिवसाचा संपूर्ण आनंद शोषून घेणारा हा प्रकार शोभाच्या वाट्याला येतो आणि ती जीवालाच कंटाळते. वर्षभर एका पानपट्टीवाल्याच्या "शुक शुक" आणि नेत्रपल्लवीचा सामना ती करते. अखेर ती आपल्या वडलांना ते सांगते. त्यातून पुढे कोर्टकचेरी होते. कोर्टात गुन्हेगार खुशाल बसलेला असतो तर शोभा एखाद्या गुन्हेगाराप्रमाणे घामाघूम, लज्जित होऊन बसलेली असते.

या सर्व प्रकारातून समाजात तिचीच बदनामी जास्त होते. घरातही तिच्याकडे तुटकपणा येतो. तिचा प्रियकरही तिला सोडून जातो. सगळ्या आयुष्याचा आनंद निघून जातो.

तिचे सगळे आयुष्यच एक शिक्षा बनते.

पण केवळ तिलाच नव्हे... या कथेतील शेवटच्या वाक्यात या कथेचे सार आहे. ही कथा एका मुलीची न रहाता साऱ्या स्त्रीजातीची होते ती या एका वाक्यात.

एक पुरुष असूनही जीएंनी एका तरुण मुलीच्या मनातले द्वंद्व, थरथर, भिती, संकोच, शिसारी आणि सर्वच प्रकारच्या हळुवार भावना ज्या तऱ्हेने समजून लिहिल्या आहेत त्यातून जीएंची एक लेखक म्हणून दुसऱ्या व्यक्तीच्या मनात शिरण्याची ताकद उमजून येते. एखादा श्रीमंत अभिनेता जेव्हा एका गरीब भिकाऱ्याची भुमिका समजून घेऊन साकारतो तेव्हा त्याला जी समज लागते तसेच हेही.

ही कथा वाचत असताना मी संजीव कुलकर्णी यांचे जीए – कला आणि कुसर हे भाषणही ऐकत होतो. शोभाचे मन समजून घेणे ही जीएंची कला आहे, आणि शब्दांत ती नेमकी मांडत जाणे, तशा घटना उभ्या करणे ही त्यांची कुसर आहे असे मला वाटते. या अंगानेही या कथेवर चर्चा व्हावी, ही इच्छा.

-सुनीळ सामंत

दिलिप बडे: अशा अगणित शोभांचे,छेडछाडीने - एकतर्फी प्रेमाने-अजाणत्या वयात मुलींनी केलेल्या छोट्या छोट्या चुंकामुळे आयुष्य मातीमोल होते.पालकही हाय खाऊन मरणप्राय होतात.

Paramjit Singh: शिक्षा कथे वर च लिहन बंद झाले.इतकी सुंदर कथा माझ्या आवडत्या कथे पैकी एक.ह्या कथे मधील काही सुंदर सांगायचं प्रयत्न करतो....

शिक्षा ह्या कथे वर जास्त काही चर्चा झाली नाही. इतकी सुंदर कथा.माझ्या आवडत्या कथे पैकी एक. मी काही सुंदर ह्या कथे तील काही सांगायचं प्रयत्न करतो

महंजे शोभा chya मनात आणि तिला काय वाटत असेल ते सनांगण्याचा प्रयत्न

रात्र दिवस vhimto पिणारी गुलबी तरुणी व फोटो chya दुकानातील चंद्रा जाधव. एक जन्मा ला न आल्या मुळे व दुसरी मैल्या मुळे.

आपण बोलायला पाहिजे होते पण नाही. तो क्षण गेला.त्याची खूण मात्र राहिली.

घर.घर.चार भिंतीत बांधून टाकले की त्या कोशात शरीर रातभर टिकटिक त राहील

कडवट पणे तिला वाटले. ह्या क्रूर समर्थशाली रांगोळीत तील एक तरी टिकली पुसणे आपणाला शक्य झाले असते,

एवढे मोठे जग आहे, आणि आपण मात्र या लहानशा कोंदट खोलीत या ashay झालेल्या गावात शिक्षा भोग त जगात आहोत. आणि ह्या तुरुंगातून सुटका नाही

तिला वाटले साबणे ला कसली आली आहे शिक्षा.शिक्षा मला, मागच्या त्या देखण्या मुलीला, आणि शिक्षा त्या तिसऱ्या वाढदिवसाच्या मुलीला...

रमा गर्गे: ही कथा वाचकांना विशेषतः स्त्री वाचकाला अस्वस्थ करून जाते।आजूबाजूला असलेले ,पाहिलेले,क्वचित अनुभवलेले साबणे आठवतात।लिहू म्हटलं तरी शोभाचं दुःख शब्दांत मांडणे अवघड होते।तिला जिथेतीथे साबणेची स्मृतिचिन्हे दिसत जातात। तिच्या मनाचे अवकाश त्याने किती झाकोळून टाकले आहे हे समजत जाते।तिला आपल्या मनात ज्या असुरक्षित भावनेने घर बांधले आहे ते कसेच पाडता येत नाही।

ही कथा मला अनेकदा पु.भा.भावेंनी फाळणीच्या वेळी वाताहत झालेल्या मुलीची कथा सांगितली आहे त्याची आठवण करून देते।

मुलगी,बहीण, विद्यार्थिनी अशी स्वतःची मधुर ओळख असलेली मुग्ध युवती जेव्हा 'तू मादी आहेस' या विकृतीचा सामना करते तेव्हा ती भयग्रस्त शोभा होते।

काही वेळा एखादी आई मुलीवर खूप बंधने टाकते, तिला आपण नावे ठेवतो,पण कोण जाणो तिने शोभा होण्याची लहानमोठी शिक्षा भोगली असावी,ती तळघरात असेल,तर तशी झळ मुलीला लागू नये म्हणून ती कठोर पावले उचलते।तिला सुरक्षित ठेवते,तिचे लग्न लवकर करून देते।

असो।शोभा ही भळभळती जखम नाही तर अमीट व्रण आहे मनावरचा।

सुनीळ सामंत: बरोबर. कथानायिकेचे नाव शोभा ठेवण्यात जीएंनी सूचक विधान केले आहे.

दिलिप बडे: शोभा'हे नाव आई-पत्नी-मावशी-काकी-आजी-पणजी या सर्व नात्यांबरोबरही विशेषण म्हणूनही समोर येते.अशा सर्व नात्यांना साबणेचा अवतार चहूबाजुनी व्यापून ऊरतो.तेंव्हा जाणवणारी असुरक्षितता किती भयकंर यातना देत असेल.साबणे वृती म्हणजे समस्त स्रि जातीला शापच होय.

वाघोलीकर: मत्स्यकन्या कथेत जीवन म्हणजे दुःखाचा जन्म हे सांगीतले आहे. जीएंनी पुरुष - स्त्री -अपंग - बालके यांची दुःखे दाखवली. शिक्षामध्ये स्त्रीचे दुःख दाखवले आहे.

स्त्री व पुरुष वेगळे (व पूरक) आहेत. पण स्त्रीजीवन धोकादायक आहे. स्त्रीची मानसिक व रोगप्रतिकारक शक्ती खूप आहे. पण स्त्रीचे तुलनेने कमी सामर्थ्य असते. व बेजबाबदार, रानटी पुरुषांपासून तिला धोका असतो. जीएंनी काकणे मध्ये हे रंगवले आहे. म्हणून सर्वसाधारण धर्मपरायण समाजात स्त्रीवर बंधने टाकली आहेत. व पुरुषांना सभ्यपणा बजावला आहे. पण, शंभर अपराधी सुटले तरी चालेल.... या बेजबाबदार तत्वाच्या कोर्टामुळे प्रत्यक्षात शंभर गुन्हेगार सुटतात व दुष्टांचा जमाव करून सज्जनाला वेठीला धरतात. जीएंनी प्रवासी कथेत यावर विखारी शब्दांत टीका केली आहे.

जीएंचा मानसशास्त्रीय अभ्यास प्रचंड आहे. मनाचा संज्ञा प्रवाह कथेत दाखवला आहे. माणूस जागा असताना त्याला जे समोर पॅसिव्ह दिसते, त्यावर मनात मानसीक अनुभवांचा प्रवाह सुरु होतो. तो कथेत सूक्ष्मपणे दाखवला आहे. हाही कथेचा विशेष आहे. ही लक्षणीय कथा वाचून माणसाला समाजातल्या दुष्ट प्रवृत्ती ठळकपणे कळतात. व वाचक काही काळ सुन्न होतो.

- व्ही एस वाघोलीकर

राजेश उनवणे : ही कथा वैश्विक, स्थलकालातीत कथा आहे, ती एका मुलीची न होता संपूर्ण स्त्री जातीची होते, या वाक्यातूनच आपण या कथेचे महत्त्व अधोरखित केलेले आहे.

शोभाचे सगळे आयुष्यच एक शिक्षा बनते, हे खरेच आहे.

('एवढे जग मोठे आहे, आणि आपण मात्र या लहानशा कोंदट खोलीत, या असह्य झालेल्या गावात शिक्षा भोगत जगत आहोत. आणि त्या तुरुंगातून सुटका नाही.’--इति जीए.)

ही कथा १९६० साली जीएनी लिहिलेली आहे.

त्यावेळी विनयभंग कृति ही फारच गंभीर घटना असे. तेव्हा बलात्कार होण्याचे प्रमाण आजच्यासारखे नव्हतेच. त्यानंतर हळूहळू बलात्कारात खूप वाढ झालेली आहे. बलात्कार करून स्त्रीची हत्या करण्याचे प्रमाण ही खूप वाढलेले आहे. विनयभंग या विकृतिला सद्यस्थितीत अनेक स्त्रिया सर्रास तोंड देत आहेत. खरं तर हा संपूर्ण विषय खूप गंभीर आहे.

अर्थात, तो या ग्रुपवर चर्चा करणेचा विषय नाहीच.

हे सांगण्याचा उद्देश, जर आज जीए असते तर त्यांनी शोभाचे दु:ख, शोभाचे शिक्षामय जीवन एका वेगळ्याच प्रकारे रंगवले असते, असे वाटते.

तरीही ही कथा वैश्विक,कालातीत आहे यात वादच नाही.

थोडक्यात लिहिलेले सुतोवाच व जीएंच्या लेखनशैली बद्दल आपण दिलेल्या उपमा आवडल्या.

राजेश उनवणे : खरे आहे, आपण लिहिलेले.. 👍

एखाद्या स्त्रीचे आयुष्य समाजातील एकाच्या विकृती मूळे उद्ध्वस्त होतेच पण त्याबरोबरच तिच्या घरादाराला त्याचे चटके बसतात, क्वचितदा त्या घराची अक्षरशः राखरांगोळी होते. हे सत्य आहे.

कथा वैश्विक असलेने म्हणजेच तीला काळाचे बंधन नसलेने ही चर्चा होण स्वाभाविक आहे.

आपण नमूद केलेली ही साबणे वृत्ती समाजातून नष्ट होण्यासाठी अशा कृत्यास कठोर शिक्षा त्वरित होणे आवश्यक आहेच. त्यामूळे अशा वासनांधांचे प्रमाण कदाचित कमी होईलही, पण पूर्णपणे नष्ट होणार नाही. त्याबरोबरच त्यासाठी प्रत्येक कुटुंबात--- लहानपणापासून विशेषत: शैशवात पदार्पण करणाऱ्या प्रत्येक मुलास व मुलीस त्यांच्या पालकांनी तसेच शाळांमधून या विषयावर माहिती देऊन त्यांना जागरूक केले पाहिजे. हे समाजप्रबोधन ही आज तितकेच अत्यावश्यक झाले आहे.

जीए कथा सांगतात. पण तिचा अर्थ, त्या कथेतून दाखलेल्या अथवा निर्माण झालेल्या प्रश्नांची उत्तरे शोधण्याचे काम वाचकांवर सोडून देतात.

आपण लेखक आहोत, समाजसुधारक नाही याचे भान ते कधीही सुटू देत नाहीत.

त्यांच्या लेखणीचे हे एक वैशिष्ट्य आहे, असे जाणवते..

धन्यवाद 🙏

राजेश उनवणे : आपले हे लिखाण कौतुकास्पद आहे. 🙏 आणि कथेप्रमाणेच अस्वस्थ करून टाकणारे आहे.

ही कथा स्त्री-वाचक वर्गाला जास्त अस्वस्थ करून जाते, हे आपले वाक्य तर १००% वास्तवतेशी जोडलेले आहे.

ही अस्वस्थता येण्याचे कारण, आज जगात साबणे वृत्तीच्या लोकात झालेली प्रचंड वाढ. ही वृत्ती एवढी वाढत चाललेली आहे की, मुळातच असहाय असलेल्या स्त्रीने त्याची आता सवय करून घेतली आहे की काय असे वाटेल लागते. या

वाक्यातील ‘असहायता’ हा शब्द स्त्रीला पुरुषापेक्षा निसर्गनियमाप्रमाणे मिळालेल्या शारिरीक दुर्बलतेशी निगडीत आहे.

पण निसर्गाने ही कसर स्त्रीला पुरुषापेक्षा मानसिकदृष्ट्या अधिक कणखर बनवून भरून काढलेली आहे, हे स्वानुभवाने ठामपणे सांगू शकतो.

स्व-अनुभवाने लिहिण्याचे कारण मी पोलीस खात्यात ३३ वर्षे सेवा करून सेवानिवृत्त झालेला ६० वर्षाचा म्हातारा माणूस आहे. मी 'शिक्षा' कथेतील जीएनी वर्णन केलेल्या अनेक स्त्रियांचे दु:ख जवळून पाहिलेले आहे. अशी उदाहरणे सांगायची ठरवली तर त्यांची एक फटाक्याची माळच लावू शकतो. असो.

वरील पहिल्या वाक्यात शिक्षा कथेवर आपण लिहिलेले ‘कौतुकास्पद’ म्हटले आहे, ते आपण स्वत:ला व्यक्त केलेत म्हणून. पण.. त्या वाक्यातील माझी ‘अस्वस्थता’ खरतर वेगळी आहे. या महत्त्वाच्या कथेवर या ग्रुपवर सतत लिहिणाऱ्या स्त्री-सदस्यांनी पण मौन बाळगलेले पाहून ही अस्वस्थता आलेली आहे. सुनीलजींनी 'सुतोवाच ग्रुप'मध्ये या महत्वाच्या कथेवर फारशी चर्चा झाली नाही ही खंत व्यक्त केलेली आहे, तिच्याशी पूर्णपणे सहमत आहे. अर्थात व्यक्त व्हायचे की नाही हा ज्याचा त्याचा वैयक्तिक प्रश्न आहे. हा व्यक्तिस्वातंत्र्याचा अधिकार अजूनतरी प्रत्येकालाच आहे.

जीए यांच्या अनेक कथा दुर्बोध असतात. पण सगळ्याच कथा तशा नाहीत. त्यांच्या कथा समजून घेऊन वाचणे करिता, जीए यांच्या कथा लिहिताना असलेल्या मानसिक अवस्थेपर्यंत वाचकास पोहाचावे लागते, असे मला वाटते. प्रत्येक वाचक दरवेळी त्यात यशस्वी होतोच असे नाही.

या ठिकाणी आरती प्रभूंच्या कवितेतील ओळी आवर्जून नमूद कराव्याशा वाटतात. ‘नक्षत्रांचे देणे’ कवितासंग्रहातील पहिल्याच कवितेत ते लिहितात,

“या माझ्या अजाण कवितेच्या वाटेला जाऊ नका.. कारण ती ज्या वाटा चालत आहे त्या आहेत तिच्या स्वत:च्या नागमोडी स्वभावातून स्फुरलेल्या. मोडून पडाल !”

संपूर्ण कविता तर खूपच काही सांगते.

जीए यांच्या अनेक कथा या अशा नागमोडी वळणाच्या आहेतच. म्हणून त्या दुर्बोध वाटतात.

पण 'शिक्षा' सारख्या अनेक कथा सुरवातीच्या काळात त्यांनी लिहिलेल्या आहेत. त्यामूळे शिक्षा कथेवर अनेक स्त्री-सदस्य ग्रुपमध्ये असताना आपण लगेच व्यक्त झालात हे कौतुकास्पद आहे.

आपण शेवटी लिहिलेले ‘शोभा ही भळभळती जखम नाही तर अमीट व्रण आहे मनावरचा।‘ हे वाक्य मनाला भावले. वासनांधांच्या या दुनियेत क्वचितच एखादी स्त्री भूत- वर्तमानातून सुटली असेल. भविष्य मात्र फारसे वेगळे नसून, उलट जास्त गंभीर आहे.

अर्थात आजही या जगात अनेक खूप चांगली, संत,सज्जन मंडळी अजूनही आहेत. उलट त्यांची संख्या यांच्यापेक्षा जास्त आहेत. पण ती एकवटलेली नाहीत. अनेक जण वैयक्तिक व संस्थामार्फत यावर कार्य करीत आहेत.

पण चार गुन्हेगार एखादा गुन्हा करणेसाठी फारशी ओळख नसतानाही लगेच एकत्र येतात, तसे यांच्या बाबतीत होत नाही.

इमारत उधवस्त करणे सोपे असते. पण ती बांधण्यासाठी अनेक हातांना एकत्र येऊन वेळ द्यावा लागतो व ते काम खर्चीकही असते.

Vishweshwar Nandedkar: काही शोभा मी स्वतः माझ्या पस्तीस वर्षांच्या पोलिसी सेवेत जवळून पहिल्या आहेत. काहींच्या कथा ऐकाव्या लागल्या. आशा काही शोभा त्या कोंदट घरातून म्हणजे मनाच्या कोंडमर्यातून सुटका होण्याचा कोणताही मार्ग मिळू न शकल्याने , आणि काही शोभा उपलब्ध सर्व मार्गांने आश्या साबणे चे कचाट्यातून सुटायचा प्रयत्न करून ही काही उपयोग होत नाही हे लक्षात आल्याने आपले जीवन संपवत्या झाल्या. कमीत कमी चार आस्या शोभा एकतर मी पहिल्या किंवा त्यांच्या कथा आमच्या मासिक पोलिस बैठकीत चर्चेला घेतल्या गेल्या. दुर्दैवाने पोलिसांनी त्या कथांमधील साबणे ला योग्य जरब न बसल्याने त्याचा त्रास सुरूच राहिला उलट तो वाढला , त्यामुळे त्या कोवळया मुलीने कॅनॉल मध्ये जीव दिला. शोभा ही कथा त्या सर्वांची प्रातिनिधिक कथा च आहे

दिलिप बडेः शाळा, महाविद्यालय, कॉलेज.नोकरी,बाजार किती ठिकाणे लिहायची,घरी -शेजारी अशा सर्वच ठिकाणी स्त्रिया मुली दबाव-भिती-असुरक्षीतता अशा घुसमटीत संपुन जातात.

# शेवटचे हिरवे पान. पुस्तक : काजळमाया

मंजिरी देशमुख: मा. श्री सामंत ह्यांच्या सुचनेनुसार शेवटचे हिरवे पान या कथेवर आधारित लिखाण इथे सादर करते आहे. मला हे लिखाण इथे सादर करण्याची संधी दिल्याबद्दल समूहाच्या संयोजकांचे मनापासून आभार!

कथा: शेवटचे हिरवे पान. पुस्तक : काजळमाया

लेखक: जी ए कुळकर्णी

शेवटचे हिरवे पान या कथेची नायिका सीताक्का हिरवळ, ओलावा निघून गेलेलं विराण आयुष्य जगत आहे. ती दुबळी झालेली, कसल्यातरी खोट्या वेड्या विषाने पिचलेली आहे. दुमजली १५-२० खोल्यांच्या कळा गेलेल्या घरातील वाटणीला आलेल्या दोन खोल्यांमध्ये सीताक्का रहात आहे.

बहुतेक खोल्यांना आयुष्याला गाठी मारल्याप्रमाणे वाटणारी गंजलेली कोळिष्टिकानी भरलेली कधीही न उघडणारी कुलूपे लागलेली होती. काही ठिकाणी कुलूप लावलेल्या केवळ चौकटी होत्या, तर काही ठिकाणी रात्री गाई विसावा घेत, तर कुठे केवळ मातीचा ढिगारा होता.

घराच्या पुढच्या बाजूला पार्वती अंथरुणाला खिळलेल्या नव-यासोबत रहात होती तर वाटणीच्या दोन खोल्यांमध्ये प्रल्हादबरोबर सीताक्का रहात होती. प्रल्हादला भाजीपाला लावायचा होता व नवीन जीना देखील करून तयार होता पण प्रल्हादच्या अचानक मृत्यूनंतर तो नवा कोरा जिना मोठ्या सोप्यावर तसाच पडून राहिला व देऊळ देखील पार्वतीच्या ताब्यात गेले होते.

सीताक्काची एकमेव आस असलेला प्रल्हाद हट्टाने पार्वतीकडे प्रसाद आणि काही खाणे खाऊन आला आणि त्याच रात्री पोट फुगून कायमचा अंथरुणाला खिळला. रामभटाच्या अंगात येणा-या बायकोने सांगितल्यावरून सीताक्काने प्रल्हादला ताबडतोब अण्णा कुळकर्ण्याच्या घरी दिलेल्या खोलीत नेऊन ठेवले. सीताक्का खिळून बसल्यासारखी मुलाच्या अंथरूणाजवळ तो वाचावा म्हणून नवस बोलत बसून राहिली. घंटा वाजवताना दंडाची बेटकी दिसणा-या मुलाची हाडं तेवढी शिल्लक राहिली होती.एक दिवस अचानक दाराशी पार्वतीच्या मोलकरणीला सीताक्का पाहते आणि तिच्या काळजाचं पाणी पाणी होतं. काही वेळाने तिच्यासोबती पार्वती खोलीवरून पुढे जाताना पाहून सीताक्का हादरून जाते. आणि त्याच वेळी तिचा मुलगा दैवाने दावा साधल्यासारखा तिला कायमचं सोडून जातो. ४-६ दिवसांत दोघंही परत येणार म्हणून मोलकरणीला सांगणारी सीताक्का एकटीच घरी परतते. उभ्या उभ्या भेटायला येणा-या माणसांसमोर सीताक्का कोरड्या डोळ्यांनी मख्ख चेहऱ्याने बसून रहाते. भावाच्या जागी असलेला फकीरा सुतार भेटून गेल्यानंतर कुणी आलं नाही याचं तिला बरंच वाटलं.

परंतु एक आठवड्यानंतर मात्र सीताक्काचा द्वेष पेटून उठतो आणि लाकूड हाती घेऊन पार्वतीच्या दाराशी जाऊन ती शिव्याशाप देऊ लागते. पार्वती बाहेर आली की तिचं डोकं फोडायचं म्हणून दाराशी बसून रहाते. पार्वतीचा जाड गलेलठ्ठ गळा आपण हाती धरून कचाकचा दाबत आहोत असं सिताक्काला दिसू लागले.

एके दिवशी ऐवज असलेला पत्र्याचा डबा घेऊन सीताक्का फकीरा कडे जाण्यासाठी बाहेर पडते. पार्वतीचं मढं पाडायला लांब, धारेची,न मोडणारी सुरी त्या ऐवजाच्या बदल्यात फकिराला तिने मागितली. तिचं म्हणणं होतं मुंगीसारखी मुंगी चावल्याशिवाय मरत नाही, माझा नष्टांश झाला आणि मी चूप बसू? फकिरा तिला समजावून परत पाठवतो. सीताक्का घरी येते व प्रल्हादचं सारं सामान व पुस्तकं एका खोलीत नीट रचून ती बंद करून टाकते.

२-३महिने झाले तरी फकिरा का आला नाही हे माहित करण्यासाठी माणूस पाठविल्यावर जे कळतं त्यानं सीताक्का हादरून जाते. गाडीखान्यातील शेण उचलून आणले या कारणावरून गाडीवानाने त्याच्या मुलीला चाबकानं मारल्याचं कळताच फकिराने गाडीवानाला उळीने १४ वेळा भोसकले होते. फकिरा ला पोलिस घेऊन गेले व त्याची बायको आणि मुलगी कुठेतरी निघून जाते. सीताक्कावरचं माणसं सोडून जाण्याचं सुतक आणखीन गहिरं होते.

खोलीतील खिडकीपासच्या आडोश्याला बसून सीताक्का बाहेर विरंगुळ्यासाठी पहात बसे. पूर्वी शेजारतीपर्यंत जीव कामानी पिंजून जात असे आणि आता चार भांडी घासली व झाडणी फिरवली की तिचं काम होऊन जात असे. असा हा जीवनक्रम प्रल्हाद जाऊन १५वर्षे झाली तरी सुरु होता. कधी दुःखाने पार्वतीला तळतळाट द्यावे असं वाटेपर्यंत जयूचा भेदरलेला चेहरा सीताक्काला आठवून ती चुप बसत असे.

एके दिवशी या दिनक्रमात बदल झाला. सीताक्काच्या कानी सनई चे सूर पडले. प्रल्हादाच्या श्राद्धदिनी जयूच्या मुलाचं बारसं होतं. जयू म्हणताच कैरीसाठी मिठमिरची पुड मागणारी, डाळिंब फुटत असलेल्या चेह-याची, प्रल्हादकडे काही नं काही काम असलेली आईचा डोळा चुकवून येणारी जयू तिला आठवली. तिच्या नाच-या पायांप्रमाणे जिभेलाही उसंत नसे. खोल्यांचा इतिहास विचारत ती घरभर फिरे. घराविषयी बोलताना जणू घरात वर्दळ दिसत असे. अबोलीचा गजरा हाती आला की मात्र चिवचिवणारी जयू निघून जायची. प्रल्हाद तिला वेडा धुमकेतू म्हणत असे. प्रल्हाद गेल्यानंतर पार्वतीने तिला आपल्या दूरच्या भावाकडे ठेवलं व तिकडेच लग्न केलं.

आणि आज सनई च्या सुरांच्या मागोमाग जयूला येताना सीताक्कानी पाहिलं. अनेक वर्षात न उघडलेलं दार उघडून सीताक्का न्हाणीघराजवळ आली. तिला पाहून

जयूला रात्री बेरात्री कुदळ घेऊन दारावर धडका देणारी सीताक्का आठवली व ती घाबरून गेली. सीताक्का तिला म्हणते घाबरु नकोस, मला एका नव्या आईला पहायचं आहे. तिचा स्वर, विशेषतः तिचे मोकळे हात पाहून जयूच्या जीवात जीव येतो. जयूच्या मुलाच्या तळव्यावरून हात फिरवताना सीताक्का जणू जयू होऊन जाते. जयूच्या रसरशीत स्पर्शाने सीताक्काच्या आयुष्यावरील जाड निर्जीव बु-यासारखी वाढलेली वर्षे गळून पडल्यासारखे तिला ताजेतवाने वाटू लागते.

पण पार्वतीचा परिचित आवाज सीताक्काच्या कानी पडतो आणि तिचे रक्त पेटल्यासारखे होते. भान हरपून जणू पार्वती समोर उभी आहे असं वाटून ती जयूच्या दंडावरची पकड आवळते. जयूने हिसडा देताच सीताक्का भानावर येऊन पुटपुटते पुन्हा तुझ्या पोराला कधी पाठवू नकोस नाहीतर मी तुझाच गळा आधी चिरून टाकेल बघ असं कर्कशपणे म्हणून सीताक्का आपल्या पाठीमागे दार लावून खोलीतील खिडकीपासच्या आडोश्याला येऊन बसते. तिला फकिराची आठवण येते हे सगळं त्याला सांगावं असं तिला फार वाटतं.

तिच्या वरातीसोबत आलेल्या गाईचा मृत्यू, गुडघ्याएवढ्या भावाचा मृत्यू, प्रल्हादचा परक्या घरी आलेला मृत्यू आणि तरीही तिचे कोरडे राहिलेले डोळे असं सर्व तिला कोळिष्टकासारखे आठवून गेले.

तिला वाटलं इतरांच्या प्रल्हादच्या आठवणी जतन केलेली ती आहे. पार्वतीच्या द्वेषावर जगणारी एक वेडी म्हातारी आहे. पोलीसांना फकीरा हवा आहे. पार्वती साठी तिचा चार दिडक्या कमवणारा मुलगा, जयू आणि तिचं बाळ आहे, अंथरुणाला खिळलेला तिचा नवरा आहे पण माझी आठवण मनात जागेल असं माझं कुणीच नाही. कदाचित जयू होती पण तिच्या रूपातील ते शेवटचं हिरवं पान देखील खुडल्या गेलं आहे. या विचारानी सीताक्काच्या मुक रडण्याने ही कथा संपते.

विवेचन : मंजिरी देशमुख

मंजिरी देशमुख: शेवटचे हिरवे पान : काही निरिक्षणे - मंजिरी देशमुख

१. शेवटचे हिरवे पान ही कथा अति सामान्य माणसाच्या असामान्यपणे दु:खाला सामोरे जाण्याची कथा आहे. मुलाच्या मृत्यूचं दु:ख सहन करताना सीताक्काला आपली आठवण ठेवेल असं कोणीच उरलं नाही हे मोठं दुःख आहे. ओलावा असणारी माणसं आधाराला असली तर माणूस दु:खाचा मोठा डोंगर पार करतो. जी ए या मनोवस्थेचं वर्णन खुप नेमकं करतात. नवरा मेल्यानंतर सीताक्काला कधीतरी काठी टेकत डोंगर चढायचा होता पण ती काठी मोडून पडली व नकोसे वाटायला लावणारा दिवसांचा डोंगर मात्र उभा होता. सीताक्काचा एकमेव आधार आणि सुखाची आस बाळगावी असा तिचा मुलगा काळानी तिच्यापासून हिरावून घेतला आहे. समोर कोणतीही उमेद नसलेलं किंवा कुणी मायेचं नसलेलं असं वैराण आयुष्य सीताक्कासमोर उभ्या डोंगरासारखं पसरलेलं आहे.

२. जी.एं च्या कथांमधून त्यांनी वापरलेल्या प्रतिमा वाचकाच्या जाणिवा अधिकाधिक समृद्ध करतात.

शेवटचं हिरवं पान या कथेत १५-२० खोल्यांच्या घरात पडझड झालेल्या खोल्यांना कोळिष्टकानी भरलेली व कधीही न उघडणारी कुलूपे आहेत. त्या घराचं ध्वस्त होणं हे त्याचं प्राक्तन आहे.या खोल्या म्हणजे माणसाच्या (सीताक्का) मनातील निरनिराळ्या माणसांच्या कुलूपबंद आठवणी आहेत जणू. त्या गंजलेल्या व कोळिष्टके लागलेल्या आहेत. जीए म्हणतात ही न उघडणारी कुलूपे संपलेल्या आयुष्याला गाठी मारल्यासारखी आहेत. आयुष्यातून कायमची वजा झालेली माणसे ही कधी न उघडणारी कुलूपे आहेत व त्यांच्या आठवणी देखील सुखदायी नाहीत.

३. घड्याळ माणसाला काळवेगाचं भान देतं. पण सीताक्कासाठी काळ थांबून गेला आहे. तिचा एकुलता एक मुलगा काळानी ओढून नेला आहे. ज्याच्या कडे दु:ख सांगावं असं आतड्याचं कुणी उरलं नाही. आहे तो नकोसा वाटणारा दिवसांचा डोंगर आणि म्हणूनच की काय तिला आता घड्याळाची गरज उरली नाही.

४. सीताक्काच्या जीवनात इतकी घालमेल सुरू असताना देखील देवळात वाजणारी जाड घंटा निर्विकारपणे घुमत रहाते, वाजत रहाते. वाजविणारे हात बदलतात या साध्या वाक्यातून माणसाच्या आयुष्यातील उलथापालथ जी ए सांगून जातात. निर्विकारपणे वाजणारी घंटा जणू जगरहाटी दाखवून देते.

५. सनईच्या सुरांमागोमाग आलेली जयू दिसताच सीताक्काच्या मनात ओलावा निर्माण होतो. जी.ए.सुंदर वर्णन करतात. सीताक्काच्या आयुष्यावरील जाड निर्जीव बु-यासारखी वाढलेली वर्षे गळून गेल्यासारखे तिला ताजेतवाने वाटू लागले. नव्या मुलाच्या तळव्यावरून हात फिरवताच सीताक्का जणू जयू होऊन गेली.

पण हा ओलाव्याचा क्षण पार्वतीच्या आवाजाने नाहिसा होतो आणि डोक्यात घण पडल्यासारखे सीताक्काची बोटे समोर पार्वती आहे समजून जयूच्या दंडावर आवळू लागली. जयूने तिचे हात झटक्यात सीताक्का भानावर येऊन तिच्या मुलाला आणि तिला सीताक्काकडे न येण्याविषयी कर्कशपणे बजावते व खोलीत येऊन आपल्या मागे दार लावून घेते. सामान्य सीताक्का जाणिवपूर्वक जयूरूपी शेवटचं हिरवं पान स्वतःच्या हाताने खुडून अखेरचं आशेचं दार स्वतः बंद करून मनाची असामान्य ताकद दाखवते.

६ या विशाल जगात आपली आठवण करणारं कुणी उरलं नाही हे जाणून सीताक्का मुकपणे रडत रहाते. हे दुःख जी ए म्हणतात त्याप्रमाणे एक फार जुने गळू तोंड फुटून वाहू लागावे तसं आहे.

७. जी ए दैववादी होते का? फकीराच्या तोंडून ते समजावतात..जे होतं ते माणसाकडून होत नाही. आपल्या कपाळावरच्या रेघोट्यांमुळे होतं.. आपलं कर्म म्हणायचं व गप्प बसायचं झालं.

८ जी ए कथेचा सुखान्त करून वाचकाला खोटी आशा दाखवीत नाही तर आयुष्य जसं आहे तसं वाचकांसमोर अत्यंत अलिप्तपणे मांडून ठेवतात. शेवटचं हिरवं पान मधील सीताक्काची कहाणी वाचकाला खिळवून ठेवते आणि विषण्ण करून सोडते.

सुनीळ सामंत: शेवटचे हिरवे पान " - ही कथा जीएंच्या सर्वोत्कृष्ट कथांपैकी एक म्हणता येईल. याचे कारण त्यातील भावनांची व्यामिश्रता. माणसांच्या भावना द्विमितीमधे नसतात. अनेक मिती असतात. एखादा हिंस्त्र डाकू एकाद्या लहान अनोळखी मुलाबाबत अतिशय हळवा होऊ शकतो आणि अत्यंत प्रामाणिक सामाजिक कार्यकर्ता एखाद्या दुर्बल क्षणी एखादे मोठे पाप करून बसतो. मानवी जीवनाची ही गुंतागुंत - आहे ती आहे तशी- स्विकारावी. ती जीए स्विकारतात आणि त्याची कथानिर्मिती अत्यंत सौंदर्यपूर्ण पद्धतीने करतात.

मंजीरीजींनी अतिशय योग्य शब्दांत कथेचे सार मांडले आणि दुसऱ्या भागात त्याची वैशिष्ट्ये सांगितली. त्यातली काही वैशिष्ट्ये मला प्रथमच जाणवली आणि त्यासाठी आता कथा वाचायला घेतली आहे. कुलुप, घड्याळ, घंटा या निर्जीव गोष्टींना जीएंनी दिलेले भावनामय व्यक्तित्व मला प्रथमच जाणवले. मंजीरीजी यासाठी तुम्हाला ३ चीअर्स.

या कथेचे नाव "शेवटचे हिरवे पान" असे का आहे यावर विचार करत होतो.

ओ हारा च्या एका कथेचे नाव "the last leaf" असे आहे. त्यावर एक हिंदी सिनेमाही हल्लीच आला. पण त्यांची कथा वेगवेगळी आहे. पण त्याही कथेत एका एकल स्त्रीचे दुःख आहे.

त्याचाच संदर्भ याला असेल का?

दिलिप बडे: युगकर्ते कथा लेखक"हे विशेषण शककर्ते शिवराय"या मोलाचे वाटले.

मंजिरी देशमुख: हे खरंच आहे The Last Leaf ही कथा आठवते शेवटचं हिरवं पान ही कथा वाचताना.

जयश्री जंगले : O'Henry ची कथा अर्थातच आठवते. पण पुन्हा शॅलोट सारखाच व्यत्यासिक संदर्भ आहे. ओ'हेन्रीच्या कथेतले कृत्रिम का होईना, पण पान आहे जे त्या मुलीला जगण्याची उमेद देतं. कुलकर्णींच्या कथेतलं पान गळून पडणारं, जीवनेच्छा खुडणारं आहे.

राजेश उनवणे : फारच छान लिहिले आहे. अभ्यासपूर्ण. धन्यवाद..!

--‘कथेची नायिका सीताक्का हिरवळ, ओलावा निघून गेलेलं विराण आयुष्य जगत आहे.’ ----

हे आपले सुरवातीचे वाक्यच पुढे काय वाचायला मिळणार याची पूर्वसूचना देते. आपल्या लिखाणातील खालील वाक्ये ही कथा अधिक चांगल्यारीतीने समजून घेण्यास मदत करतात. उदा. –

---अति सामान्य माणसाच्या असामान्यपणे दु:खाला सामोरे जाण्याची कथा.

---ओलावा असणारी माणसं आधाराला असली तर माणूस दु:खाचा मोठा डोंगर पार करतो.

---जी.एं च्या कथांमधून त्यांनी वापरलेल्या प्रतिमा वाचकाच्या जाणिवा अधिकाधिक समृद्ध करतात.

आणि शेवटी –

---सामान्य सीताक्का जाणिवपूर्वक जयूरूपी शेवटचं हिरवं पान स्वतःच्या हाताने खुडून अखेरचं आशेचं दार स्वतः बंद करून मनाची असामान्य ताकद दाखवते.

हे वाक्य कथेचे नाव शेवटचे हिरवे पान का आहे याचाही खुलासा करते.

नोंदवलेली निरीक्षणे आपण किती एकाग्रपणे कथा वाचून समजून घेतली याची साक्ष देते. ती निरीक्षणे कथा पुन्हा वाचण्यास भाग पाडतात. आणखी एक मुद्दा सांगावासा वाटतो.

'साऱ्या जगानेच सुतक बाळगावे इतके कोणाचेच दु:ख महत्त्वाचे असत नाही.' – हे जीए यांचे सुरवातीचेच वाक्य कथेमध्ये आहे.

प्रत्येकाला आपले दु:ख मोठे वाटत असते.. फकीरा सुताराकडे सीताक्का सुरी मागते, तेव्हा तो तिला पार्वतीचा खून करण्यापासून परावृत्त करतो. पण परावृत्त करताना सीताक्काला तो ज्ञानामृत पाजतो. तो म्हणतो, "जे काही होत ते माणसांकडनं होत नाही, आपल्या कपाळाच्या रेघोट्यांमुळं होतं. शिक्षा कोणी कोणास करायची?यात कोण कुणाला मारणार काय नि करणार काय?तूच विचार कर. आपलं कर्म म्हणायचं , गप्प बसायचं झालं !"

चूक कोणाची? पार्वतीची की प्रल्हादची? अस विचारणारा हाच फकीरा सुतार आपल्या मुलीने गाडीखान्यातील शेण कुणाला न विचारता घेतल्या नंतर गाडीवानाने

तीला चाबकाने मारले म्हणून कोणाची चूक आहे याचा विचार न करता गाडीवानाचा खून करतो.

मानवी प्रवृत्तीत असलेला हा विरोधाभास हा सुद्धा या कथेतील क्लायमॅक्स आहे, असे वाटते.

आपल्या मुलाच्या खुनाचा बदला तो सीताक्काला घेऊ देत नाही. पण स्वत:च्या मुलीला चाबकाने मारल्याचा बदला मात्र लगेच घेऊन मोकळा होतो. परदु:ख शीतल असते, हेच खरे.

जीएंच्या कथेला अनेक पदर असतात. मूळ कथेत त्याची वीण ते अशा ताकदीने ठेवतात की थक्क व्हायला होते.

कालिदासाचे शाकुंतल जर्मन कवी गटे डोक्यावर घेऊन नाचला होता म्हणे.

जीए यांच्या काही कथा अजरामर, स्थललातीत, वैश्विक आहेत. म्हणूनच आपण त्या वाचून भारावून जातो.

त्या कथा जागतिक पातळीवर समर्थपणे जायला हव्यात, असे राहूनराहून वाटते. कालिदासाचे भाग्य जीएंच्या वाटेला नक्कीच येईल याची खात्री वाटते.

आपणास पुनश्च धन्यवाद

राजेश उनवणे : अतिशय मोजक्या शब्दात आशयघन प्रतिक्रिया दिलेली आहे, सुनीलजी आपण..धन्यवाद..! 🙏

मानवी मन व मानवी जीवन याविषयीचे आपले विचार चिंतनीय आहेत. माणसाच्या भावनांना अनेक मिती असतात, हे खरेच आहे. षड्रिपुंच्या जाळ्यात सापडलेले मानवी मन, मानवाचे जीवन अधिक गुंतागुंतीचे करून टाकते आणि...

या गुंतागुंतीचे जीए सारखा एक योगी, तपस्वी तटस्थपणे कथेच्या माध्यमातून दर्शन घडवतो. हे येरागबाळ्याचे काम नोहे. यासाठी खूप साधना करावी लागत असणारच, पण ती आत्मसात ही करावी लागत असणार.

म्हणूनच...

जीए यांनी एखाद्या संन्याशासारखे जीवनातील मूलभूत आवश्यक गोष्टींना आपल्या खाजगी जीवनात दूर ठेवलेले असावे.

ही तटस्थता (सिनेमाच्या पांढऱ्या पडद्यासारखी)त्यांना प्राप्त झाली असल्यानेच, नियती त्यांच्या कथेत अदृश्यपणे, हळूच प्रवेश करते.

मानवी मनाच्या, जीवनाच्या गुंतागुंतीचे दर्शन जीए कथेतून घडवू लागतात. आणि मग शेवटी जीए आपली कथा त्या नियतीच्या ताब्यात देऊन टाकतात.

(आणि मग मौनपणे वाचकांना म्हणतात, "आता बसा या कथेतून पडलेल्या प्रश्नांची उत्तरे शोधत. आता कथा काही माझ्या ताब्यात नाही. तेव्हा मला काही कथेबाबत विचारायचे नाही. मी काहीच सांगणार नाही. कथेबाबत तुम्हाला काय वाटते तेही मला सांगायचे नाही. कारण कथा आता माझ्या ताब्यात नाही. 😀 🙏 )

सुनीलजी, सुतोवाच मध्ये मंजिरीजींनी विचारलेल्या "जीए दैववादी होते का?" या प्रश्नाचे उत्तर देण्याचा हा वर केलेला अल्पसा प्रयत्न.

एक गोष्ट निश्चित आहे की, जीए अध्यात्मवादी होते. नियतीवर त्यांचा विश्वास होता. पण जीए यांनी अध्यात्म नुसत वाचून, त्यावर फक्त चिंतन करून, साधना करून कथा लिहिल्या नाहीत. तर ते अध्यात्माचे सार आत्मसात केले असणार. आणि ही गोष्ट काही एका क्षणात घडत नाही. ('पात्रता असेल तर काही मुमुक्षूंच्या बाबतीत घडू ही शकते.'—असेही वाचलेले आठवते.)

म्हणूनच जीए यांच्या सुरवातीच्या कथा व काही काळानंतरच्या कथा यामध्ये खूप फरक दिसून येतो.

विलास वाघोलीकर: या दीर्घ कथेचे सूक्ष्म वाचन करून माननीय मंजिरी देशमुख मॅडम यांनी सविस्तर विवेचन वाचकांना दिले. नवनवीन पैलूंतून जीएंचे लेखन कळाले पाहिजे. म्हणून मी त्यांना धन्यवाद देतो.

'शेवटचे हिरवे पान ' ही कथा, आजी वाटेल अशा वयाच्या स्त्रीच्या भूमीकेतून व शब्दांतून व्यक्त होते. सीताक्काचे लग्न होवून त्या या वाड्यात आल्या, तेव्हापासूनचे वातावरण दाखवले आहे. एका दृष्टीने, ' स्त्री जन्मा ही तुझी कहाणी 'असे सांगणारी ही लघुकादंबरीसारखी कथा आहे. वयोवृद्ध स्त्रीचे जीवन पुनरपी या कथेतही येते. कथेत जे वातावरण अगदी यथातथ्यपणे दाखवले आहे, ते असे आहे - जुना काळ , लहान गाव, वारसाने देऊळ आलेले आहे असे मोठे संयुक्त कुटुंब.पण ते कुटुंब कालांतराने विखुरलेले आहे -अशा परिस्थितीचे कथेत वर्णन आहे. कथेत आता असलेली पात्रे आहेत - सीताक्का, जाऊ पार्वती, तिची मुलगी जयू, तिचे बारसे झालेले बाळ.अप्रत्यक्षपणे पात्रे आहेत - पार्वतीचा आजारी नवरा व मुलगा.

मोठ्या जुन्या घराचे व पूर्वी त्यात राहणाऱ्या सात -आठ माणसांचे वर्णनही कथेत आहे. जी ए माणसांचे ,परिस्थितीचे विरुद्ध वर्णन करून जग रंगीबेरंगी असते हे दाखवतात. उदाहरणार्थ नमू आजीने कोणाची चौकशी केली की तो माणूस आठवड्यात आजारी पडत असे. पण तिला मलमलीसारखे मांडे करता येत.सीताक्का एकट्या रहात होत्या त्याचेही अस्तित्ववादी वर्णन आहे. कोपऱ्यावरचा लक्ष्मण आठ दिवसांतून येवून वाणसामान आणून देई. महिन्यातून एकदा फकीरा सुतार येवून काही कामे करून जाई, विचारपूस करून जाई. लहान

गावांमध्ये लोक समजुती असतात. त्यांचेही विलक्षण वर्णन केले आहे. रामभटाच्या बायकोच्या अंगात येत असे. तिने सांगीतले की ज्याने विष दिले त्याची सावलीही पडता उपयोगी नाही...

कथेत जयूच्या लहानपणचे मनोज्ञ वर्णन केले आहे. तिला अबोलीची माळ हवी असे. म्हणून ती दर दिवशी सीताक्काकडे येत असे... जयू लगबगीने आली ती हातात चौकोनी रंगीत तुकड्यांच्या दुपट्यात गुंडाळलेले एक मुटकुळे घेवून.. नव्या आईचा हा संशयी अधीरपणाही सीताक्कांना नवा नव्हता...

कथेतील काही वाक्ये चटका लावणारी आहेत - साऱ्या जगाने सुतक पाळावे इतके कोणाचेच दुःख महत्वाचे नसते.

शरीरभरची वेदना उमटते. अंगाचेच ओझे होवून गेल्याची भावना होते.

भिंत जुनी झाली तरी तिची डागडुजी करायला कोणी तयार नसे. कारण आपोआप दुसऱ्या भाऊबंदाचा फायदा होईल अशी भीती वाटे.

लाथा टोणपे खावून दोनचार तुकडे शिकलो बघ हाडाने. जे काही होते, ते माणसाकडून होत नाही. आपल्या कपाळावरच्या रेघोट्यांमुळे होते.....

त्या काळातील कुटुंबव्यवस्था, हितसंबंध, हेवेदावे, कडाक्याची भांडणे, अगदी दुसऱ्याचा जीव घ्यावा असे वाटायला लागणारे वैर यांचे वर्णन येते. दोन कुटुंबे पिढ्यानपिढया जवळजवळ, लहान गावात राहतात. त्यांच्यात काही कारणाने भांडणे होतात व मग वैर तयार होते. ते आयुष्यभर कसे ग्रासून राहते हे कथेत दाखवले आहे.सीताक्कांच्या समोर दोन कुटुंबांमध्ये आता नवीन घडलेले आहे, ते फक्त पार्वतीची मुलगी जयू व तिचे बारसे झालेले बाळ. म्हणून कथेला शेवटचे हिरवे पान, हे समर्पक नाव दिले आहे , असे वाटते.

धन्यवाद. - विलास वाघोलीकर

मंजिरी देशमुख: खूप सुंदर विविधांगांनी केलेले विवेचन पुन्हा पुन्हा कथेकडे वळते. जीवनाच्या निरनिराळ्या पैलूंचं मनोज्ञ दर्शन जी ए घडवतात. ग्रेस यांना लिहिलेल्या पत्रात जी ए म्हणतात मी कथा लिहिताना खूप कष्ट घेतो तसेच कष्ट वाचकांनी देखील कथा वाचताना घ्यावेत. इथे कथांवर समोर येणारे विविध पैलू वाचक घेत असलेल्या मेहनतीचे प्रमाणच आहेत. 🙏 🙏

सुनीळ सामंत: विश्वेश्वरजी, विलासजी आणि राजेशजी यांच्या टिपण्या वाचून कथेचे बहुअंगी दर्शन होते. मंजिरीजी आणि तुम्ही तिघेही किती बारकाईने कथा वाचता ते पाहून अचंबा वाटतो, हेवाही वाटतो.

मला खरे तर या कथेत एकच महत्वाची टोकदार गोष्ट जाणवली होती. ते म्हणजे परस्पर विरोधी भावना एकाच मनात एकाच वेळी असणे या मानवी प्रवृत्तीचे जीएंनी घडवलेले कलात्मक दर्शन. सीताक्कामधली माया आणि वैर (वैर आणि दुष्टावा यातला फ़रकही जाणावा) एकाचवेळी एकाच क्षणी प्रकट होतानाचे जे वर्णन जीएंनी केले आहे ते मला जागतिक स्तरावरच्या प्रसिद्ध लेखकांतही कधी मिळाले नाही. (नाही म्हणायला शेक्सपिअरच्या ज्युलिअस सीझर मधे ते आहे). मानवी भावना इतक्या गुंतागुंतीच्या असतात की त्यांना कथेत मांडणे खरेच अवघड. त्या मानाने Black n white व्यक्तीचित्रं रंगवणं सोपं असतं.

जीएंची महत्ता अशी जाणवते.

राजेश उनवणे : नांदेडकर साहेब, खरे आहे...! ✔️

आपलाही अनुभव या बाबतीत दांडगा आहे...!

कधी कायद्याच्या चौकटीत राहून तर कधी कायद्याच्या चौकटीच्या बाहेर (त्या शोभाना भविष्यात त्रास होऊ नये म्हणुन)माणुसकीच्या नात्याने अशा शोभाना न्याय आपण पोलिसांनी दिलेला आहे...!

ग्रुप मधील सदस्यांना सांगू इच्छितो की, नांदेडकर साहेब हे पोलिस खात्यातील एक हुशार व कर्तव्यदक्ष अधिकारी होते. आम्हा दोघांनाही एकत्र काम करण्याची संधी सुदैवाने मिळाली..तेव्हा पासून आम्ही जानी दोस्त झालो आहोत..! सध्या दोघेही ACP पदावरून सेवानिवृत्त आहोत. आमच्या त्रिकूटामधील तिसरा अधिकारी ACP म्हणून आजही कार्यरत आहे.

थोडेसे विषयांतर झाले असले बद्दल सुनीलजी आम्हाला माफ करतीलच याची खात्री बाळगतो...! 🙏

पण शिक्षा कथेच्या निमित्ताने...,,

.... अशी हवालदिल झालेली शोभा व शोभाचे पालक यांना पोलिसां शिवाय दुसरा आधार अशावेळी नसतो.. हे या कथेच्या निमित्ताने आवर्जून सांगावेसे वाटले....!

साहेब , आपण सांगितल्या प्रमाणे काही शोभाचा झालेला करुण अंत (तिने पेशन्स न दाखविल्याने) आजही उदास करून जातो..!

विलास वाघोलीकर: धन्यवाद. आपली चांगली माहिती दिली, याबद्दल आनंद वाटला. इतक्या वर्षांच्या नोकरीनंतर आपण दोघेही जीएंचे साहित्य आवर्जून

वाचून मुद्दे मांडता, त्यामुळे इतरांचा फायदा होतो. जीए मुक्त चर्चा ग्रुपमध्ये 'मी जी ए कसे वाचले' याबद्दल अनेकांनी लिहिले आहे. आपणही (तेथे) लिहावे ही विनंती.
विलास वाघोलीकर

राजेश उनवणे : धन्यवाद सर..! 🙏

खर तर या ग्रुपवर मला विश्वेश्वरजी नांदेडकर साहेबांनी आणले...!

मैत्रीसाठी wavelength जुळणे महत्वाचे असते. अनेक बाबतीत आमच्या तारा जुळल्या, सूर जुळले व या गोष्टी आमची मैत्री होण्यास कारणीभूत ठरल्या.


त्यापैकी एक महत्वाची तार अथवा सूर होता...

जीए यांच्या कथा.... 🙏

Vishweshwar Nandedkar: 👍 मला तर जो जी ए चया कथेबद्दल थोडे तरी स्वारस्य दाखवतो त्याचे सोबत लगेच दोस्ती करावी वाटते 😀 🙏

दिलिप बडे: जी.एं.चे वाचक-जिवंत माणस्.

Sudhir Borgaonkar: तुमच्या माणसातील मानव (प्राणी) जागा राहिला.. धन्य आहे अशा सर्वांची.. 🙏🏽 🙏🏽 👏🏻 👏🏻




जीवन इतके अनंतरुप आहे की अगदी संपूर्णपणे माझ्यासारखेच आयुष्य असलेला माणूस पूर्वी कधी झाला नाही व पुन्हा कधी होणार नाही. त्या दृष्टीने प्रत्येक सामान्य माणूस देखील अद्वितीय असतो. मी गेल्यानंतर एक अव्दितीय भावविश्व पूर्णपणे विरुन जाणार आहे



**जी. ए. कुलकर्णी** हे मराठी साहित्यातले रत्नच. त्यांची प्रत्येक कथा पैलूदार असे. या प्रत्येक पैलूचे नेमके आकलन होणे हे कोणा एका वाचकाला दुरपास्तच.

२०२२-२३ हे जी. ए. यांचे शताब्दी वर्ष होते! या वर्षाचे औचित्य साधून जाणत्या जी.ए.प्रेमी वाचकांनी एक उपक्रम हाती घेतला. आभासी पद्धतीने एकत्रित येऊन त्यांनी जी. ए. यांच्या १४ कथांवर विविधांगाने चर्चा केल्या, अनेक मते, दृष्टीकोन मांडले. संकलित केले. ही संकलने सात खंडांत उपलब्ध आहेत. जी.ए. यांच्या कथावाचनाचा आनंद घेतांना या चर्चा जी.ए.प्रेमी तसेच अभ्यासक-समीक्षकांना निश्चितच उपयुक्त ठरतील. हा मौल्यवान ठेवा आपल्याकडे नक्कीच हवा!